
# कोल्हटकरांची पत्रें

''प्रस्तावना व विवेचक टीपा''

संपादक :
डॉ. रा. शं. वाळिंबे





श्री. कृ. कोल्हटकर

# कोल्हटकरांची पत्रे

प्रस्तावना व विवेचक टीपा

संपादक

**डॉ. रा. शं. वाळिंबे**

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ**

**प्रथमावृत्ती**
१६ ऑक्टोबर १९८३

© प्रकाशकाधीन

**प्रकाशक**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**मुद्रक**
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रोड,
पुणे ४११०३०

**मूल्य चाळीस रुपये**

**श्री. पुरुषोत्तम रामचंद्र लेले**
यांच्या स्मृतीस
आदरपूर्वक समर्पण.

## प्रकाशकाचे दोन शब्द

एकदा माझे ज्येष्ठ स्नेही डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्याकडे गेलो असता अनेक जीर्ण पत्रे चाळण्यात डॉ. वाळिंबे गढून गेलेले मला दिसले. चौकशी केल्यावर मला कळले की कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी श्री. पु. रा लेले यांना लिहिलेल्या नाट्यविषयक पत्रांचा अप्रकाशित असा तो संग्रह होता. मी ती पत्रे तेथेच चाळली आणि डॉ. वाळिंबे यांना विनंती केली की ही पत्रे प्रकाशित करायला साहित्य संस्कृति मंडळाकडे द्या. डॉ. वाळिंबे यांनी माझी विनंती मान्य केली. त्यामुळे हा प्रकाशनाचा योग येत आहे.

हा पत्रसंग्रह १६० पत्रांचा आहे. त्यापैकी पहिले पत्र हे १९०९ च्या सुमाराला लिहिलेले आहे. म्हणजे यावर्षी या पत्राचा अमृत महोत्सव करायला हरकत असू नये. डॉ. वाळिंबे यांच्यामुळे साहित्य संस्कृति मंडळाला प्रस्तुत पत्रसंग्रहाचे प्रकाशन करता येत आहे या बद्दल व्यक्तिशः मी आणि साहित्य संस्कृति मंडळ डॉ. वाळिंबे यांचे ऋणी आहोत.

मराठीतील नाटक–नाट्य–परंपरा ज्या प्रभावी नाटककारांनी निर्माण केली त्यामध्ये श्रीपाद कृष्णांचे स्थान महत्त्वाचे आहे. ते सव्यसाची लेखक होते. विनोदापासून ते नाटकापर्यंत सर्व प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. कै. राम गणेश गडकरी तर त्यांना गुरूच मानीत असत. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर यांच्याप्रमाणेच नाटक–नाट्य परंपरेतील श्रीपाद कृष्णांचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. अशा या श्रीपाद कृष्णांनी आपले नाटक लेखनामागील प्रयोजन, आपल्या नाटकांतील संविधानकांची कुळकथा, नाटकांतील पात्रांचे स्वभावचित्रण, नाटकातील प्रवेशांची मांडणी आणि त्यांचे एकमेकांशी असलेले अनुबंध याची मूलग्राही आणि मार्मिक चर्चा श्री. लेल्यांशी १९०९ ते १९२६ या काळात या पत्ररूपाने केली. त्यामुळे श्रीपाद कृष्णांच्या नाट्यविषयक दृष्टीवर आणि एकंदर नाट्यप्रयोजनावर नवा प्रकाश पडण्याचा संभव आहे. तसंच मराठी नाटकात नाटकाच्या ज्या निरनिराळ्या लेखक पंरपरा उत्पन्न झाल्या आणि निरनिराळ्या नाट्यसंस्थांनी नाट्यवृत्तिप्रवृत्यनुरूप, नाट्याच्या तंत्रात आणि प्रस्तुतीकरणात जी प्रगती केली त्यावरही नवीन प्रकाश पडेल. नाट्य, कला आणि साहित्य यांच्या संशोधकांना आणि सामान्य वाचकांना हे प्रकाशन निश्चितच आवडावे.

**सुरेन्द्र बारलिंगे**

# संपादकीय निवेदन

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १९०९–१९२६ या अठरा वर्षांच्या काळांत कै. पुरुषोत्तम रामचंद्र लेले यांना जीं पत्रें लिहिलीं त्यांच्यापैकी १६० पत्रें या संग्रहांत प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

पत्रें लिहिणारे श्री. कृ. कोल्हटकर आणि ज्यांना पत्रें लिहिलीं आहेत ते पु. रा. लेले या दोन्हीही व्यक्ति मातब्बर आहेत.

आपल्या नाटकांचीं संविधानकें, नाटकांतील व्यक्तिरेखा, नाटकांचें लेखन इत्यादि गोष्टींविषयीं कोल्हटकरांनी अगदी मोकळेपणाने लिहिलें आहे. तसेंच नाट्यसमीक्षा, नाटकमंडळ्या, नट, नाटकमंडळ्यांचे मालक, आणि मित्र यांच्या विषयींही असेंच मोकळेपणाने लिहिलें आहे. कोल्हटकरांनी लेल्यांना शेवटचें जें पत्र लिहिलें त्याच्यावर १७–६–१९२६ ही तारीख आहे. यानंतर ५७ वर्षांनी सदर पत्रव्यवहार प्रसिद्ध होत आहे.

'नाटककार खाडिलकर' या ग्रंथाचें हस्तलिखित लेल्यांनी १९–४–६४ रोजीं पुरें केलें. याच्यापूर्वी चार महिने त्यांनी आपल्या संग्रहांतील कोल्हटकरांचीं व इतरांचीं पत्रें, आणि इतर कागदपत्रें आपल्या पश्चात् घेऊन जाण्याची परवानगी देणारें पत्र मला १४–१–१९६४ रोजीं लिहिलें होतें. सदर पत्राची यथामूल नक्कल येथे देत आहे. तसेंच लेल्यांच्या मूळ पत्राचा फोटो सुद्धा छापला आहे.

P. R. Lele, TARABAG A/12
B. A., LL. B. BOMBAY - 4
Author & Journalist

सप्रेम नमस्कार, १४–१–१९६४

सूर्यग्रहणाचा काळ मंत्रसाधनेला अनुकूल असतो. तितके पवित्र नसलें तरी मला अगत्याचें वाटणारें जें एक काम आहे तें मी या प्रसंगीं करतों

(१) माझ्याजवळ माझ्या प्रसिद्ध झालेल्या लेखांचीं जीं जीं कात्रणें आहेंत तीं माझ्या पश्चात् आपण मागून घेऊन जावें.

(२) कोल्हटकर, खाडिलकर, देवल, बामणगावंकर, टेंबे, माधवराव टिपणीस, माडखोलकर यांचीं पत्रेंही आपण घेऊन जावें.

(३) माहितीचीं टांचणें इतस्ततः विखुरलेलीं आहेत. निरनिराळ्या पुस्तकांत माहिती लिहिलेली आहे. छोट्या मोठ्या चोपड्यांत (notebook) माहिती नमूद केलेली सापडेल. ती जर (अथवा जितकी) हातीं आणतां आली तर तीही आपण घेऊन जावें.

आपणांशिवाय त्या साधनांचा योग्य उपयोग करणारा दुसरा कोणीही माझ्या माहितींत नाहीं. सबब पूर्ण विचारांतीं, सावधानचित्तानें मी या सगळ्यावर आपला एकट्याचा हक्क प्रस्थापित करीत आहें.

आज तरी निदान माझी बुद्धि प्रक्षोभित अथवा विचलित झाली आहे असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. अक्कलहुषारीनें मी हें पत्र स्वतः लिहिलें आहे व या खालीं सही माझीच आहे. बहुत काय लिहिणें. आपणांस परमेश्वर प्रथम श्रेणीचें यश देवो ! लोभ आहेच.

**पु. रा. लेले**

३१–५–१९६५ रोजीं श्री. लेले याचे निधन झालें. वर उद्धृत केलेल्या १४–१–१९६४ च्या पत्रांत त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार कोल्हटकरांचीं पत्रें माझ्या ताब्यांत आलीं. तसेंच त्यांनी उल्लेखिलेलीं इतर कागदपत्रें सुद्धा माझ्या ताब्यांत आलीं.

वर उल्लेखिलेली लेल्यांची कागदपत्रें त्यांच्या पश्चात् मला मिळूं नयेत म्हणून एका मातब्बर पुरुषाने जिवाचा अक्षरशः आटापिटा केला. पण या पुरुषश्रेष्ठाला त्यांत यश मिळालें नाही.

कोल्हटकरांचीं पत्रें १७ वर्षें माझ्या संग्रहांत दडून होतीं. सत्तर वर्षांपूर्वीच्या पत्रांच्या जीर्ण कागदांचे तुकडे पडूं लागल्यावर मला त्यांच्या सुरक्षिततेविषयीं फार काळजीं वाटूं लागली. एका प्रतिष्ठित प्रकाशकांना मी या बाबतींत विचारून पाहिलें. पण त्यांच्या व्यवहारशास्त्रांत हें बसेना.

आणि एके दिवशीं अकस्मात् साहित्य संस्कृति मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी मला या अडचणींतून मुक्त केलें. कोल्हटकारांचीं हीं १६० पत्रें मराठी वाचकाला उपलब्ध होत आहेत याचें सर्व श्रेय डॉ. बारलिंगे यांचेंच आहे. कोल्हटकरांनी एकाच व्यक्तीला लिहिलेलीं इतकीं पत्रें अन्यत्र कोठेही उपलब्ध नाहीत. दोन थोर व्यक्तींमध्ये सतत १८ वर्षें चाललेला हा पत्रव्यवहार प्रकाशांत येणें अनेक दृष्टींनी आवश्यक होतें.

या पत्रसंग्रहाला मी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. पत्रांमध्ये आलेल्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर अधिकृत कागदपत्रांच्या आधाराने आवश्यक तेवढ्या टीपाही शेवटीं दिल्या आहेत. या टीपांमधील ऐतिहासिक माहिती जास्तींत जास्त निर्दोष व्हावी याची शक्य तेवढी दक्षता घेतली आहे. १९०९ ते १९१८या काळांतील 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रांचे, आणि 'रंगभूमि' मासिकाचे अंक प्रयत्नांची पराकाष्ठा करून मिळवावे लागले. केवळ ऐकीव माहितीवर विसंबून न राहतां प्रत्येक नोंद अगदी साधार व्हावी हा खुद्द लेल्यांचा दंडक मी अगदी काटेकोरपणाने पाळला आहे.

हा ग्रंथ तयार होत असतां माझे स्नेही श्री. रा. शं. नगरकर आणि विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचे मालक श्री. अ. ज. प्रभु यांनी मला परोपरींनी मदत केली. त्यांचें ऋण न फिटणारें आहे.

कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. चिंतामणि लाटकर यांनी ऋणानुबंधांना स्मरून मला सर्व प्रकारांनी संभाळून घेतलें आणि उत्कृष्ट मुद्रण केलें याबदल त्यांचाही मी ऋणी आहे.

१५ सप्टेंबर १९८३ **रा. शं. वाळिंबे**

# प्रस्तावना

## डॉ. रा. शं. वाळिंबे

श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी श्री. पु. रा. लेले [पुरुषोत्तम रामचंद्र लेले, बी. ए. एलएल्. बी. जन्म ३१ डिसेंबर १८९०. मृत्यु ३१–५–१९६५. मराठी नाट्यसृष्टीचा मार्मिक व सखोल व्यासंग असलेले बहुश्रुत लेखक; साहित्याच्या निर्दोषपणाचा व काटेकोरपणाचा आग्रह धरणारे चिकित्सक; खाडिलकरांचें चरित्र, 'नाटकमंडळीच्या बिऱ्हाडीं,' 'नाटककार खाडिलकर' इत्यादि नाट्यविषयक पुस्तकांचे व अनेक नाट्यविषयक लेखांचे लेखक; १९३०–१९५० बी. पी. सी. सी. चे (मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे) सभासद; काँग्रेसच्या घटना पोटसमितीचे निमंत्रित सभासद; १९३१–१९४१ बी. पी. सी. सी. घटनासमितीचे सदस्य; दिल्ली येथील स्वामी श्रद्धानंद यांच्या 'लिबरेटर' या इंग्रजी नियतकालिकाचे संपादक, १९२६; मुंबई म्युनिसिपालिटीच्या स्कूल्स कमिटीचे सभासद; १९४०–१९५०; फ्री अँड फेअर इलेक्शन्स कॉन्फरन्सच्या स्टँडिंग कमिटीचे सभासद, १९५०; 'Federation of India,' 'War and India's Freedom,' 'Constituent Assembly' इत्यादि इंग्रजी पुस्तकांचे लेखक; मुंबईच्या Blitz या इंग्रजी साप्ताहिकांत Indian Scene या सदरांत अनेक वर्षे सातत्याने लेखन.] यांना १९०९ ते १९२६ या सुमारें अठरा वर्षांच्या काळामध्ये लिहिलेल्या १६० पत्रांचा हा संग्रह आहे.

श्री. लेले यांच्याशीं माझा पहिला परिचय १९५४ सालीं पुणे येथे साहित्य परिषदेच्या कार्यालयांत झाला. त्यांची मला नित्य पत्रें येत. या पत्रव्यवहाराने परिचय दृढ झाला. पुढे १९५६ च्या जूनमध्ये मी मुंबईच्या रामनारायण रुइया कॉलेजमध्ये मराठी विभागाचा प्रमुख म्हणून दाखल झालो. १९५६ ते १९६४ या आठ वर्षांमध्ये मुंबईमध्ये आमचा निकट सहवास झाला. आठवड्यांतून दोन वेळा तरी मला भेटण्यासाठी लेले रुइया कॉलेजच्या कॉमनरूममध्ये येत असत. आणि आमच्या मनमोकळ्या गप्पा होत असत. आठवड्यांतून दोनदा (कधी कधी तीनदा सुद्धा) मी दुपारीं चर्निरोडवरील ताराबाग इस्टेटींत त्यांच्या बिऱ्हाडीं जात असे. संध्याकाळपर्यंत मनसोक्त गप्पांचा आमचा कार्यक्रम चालत असे. लेले म्हणजे मराठी रंगभूमीविषयीं यच्चयावत् गोष्टींचें समृद्ध भांडारच. ते बोलत असत, आणि मी ऐकत असे. कधी कधी तेढा प्रश्न विचारून मी त्यांना मुद्दाम डिवचत असे. अशा वेळीं त्यांच्या बोलण्याला जी धार येई ती बेसुमारच. मराठी प्राध्यापकांविषयीं त्यांचें मत फारच वाईट असे, आणि त्यांच्याविषयीं ते फार अनुदारपणाने किंबहुना कुत्सितपणाने बोलत. त्यांची ही सरबत्ती एकदा सुरू झाली म्हणजे त्यांना मधेच अडविणें अवघड असे. "हे तुम्हांला उद्देशून नाही, बरं का!" असें मधून मधून मिस्कीलपणाने म्हणत ते मला बोलूंच देत नसत.

मुंबईतील माझ्या आठ वर्षांच्या वास्तव्यांत मला लेल्यांकडून नाट्यविषयक अपार माहिती मिळाली. लेल्यांचा जन्म १८९० सालचा. जुनी मराठी रंगभूमी त्यांनी डोळ्यांनी पाहिलेली, अगदी डोळसपणाने पाहिलेली रंगभूमीवर गाजलेल्या अनेक मातबर नटांचा व त्यांचा अगदी जवळचा परिचय होता. अनेक प्रसिद्ध नाटककारांचा व त्यांच्या घनिष्ठ संबंध असे. किर्लोस्कर, महाराष्ट्र, भारत यांच्यासारख्या प्रतिष्ठित नाटक मंडळ्यांच्या बिऱ्हाडीं त्यांचा मुक्त संचार असे. विशेषतः १९०८ ते १९२० या जुन्या काळाविषयीं मी हें लिहीत आहे. कोल्हटकरांचे व खाडिलकरांचे त्यांच्याशीं अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते. गडकऱ्यांचे, विठ्ठल सीताराम गुर्जरांचे, आणि लेल्यांचे संबंध असेच जिव्हाळ्याचे होते. त्यांची स्मरणशक्ति अतिशय तल्लख असल्यामुळे पंचेचाळीस वर्षांपूर्वी घडलेल्या अगदी बारीकसारीक घटना देखील ते काल घडल्याप्रमाणें रंगवून सांगत.

लेल्यांच्या सहवासांत घालविलेल्या अनेक तासांमध्ये रंगभूमिविषयीं आणि नाटकांविषयीं माझ्या मनांत जी उत्कट आस्था निर्माण झाली तिच्यांतूनच 'मराठी नाट्यसमीक्षा' हा माझा ग्रंथ १९६८ सालीं तयार झाला, आणि पुणें विद्यापीठाने तो प्रसिद्ध केला. स्थळ, काळ, आणि व्यक्ति इत्यादींच्या बाबतींत माहितीचा

बिनचूकपणा साधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे हें मी प्रथम ‘लोकशिक्षण’ कार जांभेकरांपासून शिकलो, आणि नंतर पु. रा. लेले यांच्यापासून शिकलो.

मुंबईतील माझ्या आठ वर्षांच्या वास्तव्यामध्ये सत्तर वर्षांपूर्वीची मराठी रंगभूमि, नट, नाटककार, टीकाकार, प्रेक्षक, नाट्यगृहें, स्टेज मॅनेजर, नाटक मंडळ्या, नाटकमंडळ्यांचे मालक, नाटक, मंडळ्यांतील फाटाफुटी, संगीत नट, गद्य नट, संगीत नाटकें, गद्य नाटकें, इत्यादि असंख्य विषयावंर लेल्यांनी मला पूर्णपणें अधिकृत माहिती मुक्तकंठाने दिली. त्यांना लिहिण्याचा कंटाळा असल्यामुळे फुटकळ लेख लिहिण्याव्यतिरिक्त त्यांनी काही केलें नाही. एखादा अधिकृत ग्रंथ त्यांनी लिहावा अशी माझी फार इच्छा होती. पण ती सफल झाली नाही. अखेर मी जेव्हा फारच तगादा लावला तेव्हा त्यांचा अगदी नाइलाज झाला आणि वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी त्यांनी ‘नाटककार खाडिलकर’ हा विस्तृत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ त्यांनी एकटाकी लिहिला. त्याच्या प्रकाशनाची सारी जबाबदारी मीच पत्करली होती, आणि ती जबाबदारी मी पारही पाडली. जोशी–लोखंडे प्रकाशन संस्थेचे मालक कै. नानासाहेब जोशी यांना १४–४–१९६५ रोजीं (म्हणजे मृत्यूपूर्वी सवा महिना) लेल्यांनी जें पत्र पाठविलें त्यांतील काही मजकूर उद्‌धृत करतो. हा मजकूर ‘नाटककार खाडिलकर’ या पुस्तकाच्या संदर्भात आहे. “ ‘नाटककार खाडिलकर’ हें माझें पुस्तक आपण छापून प्रसिद्ध केलें. त्यासंबंधीं आपणांशीं कोणत्याही प्रकारचा आगाऊ करार केला नव्हता. सर्व व्यवहार डॉ. वाळिंबे यांचे मार्फत झाला. माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता व आहे. ते जें करतील तें योग्यच असणार अशी माझी श्रद्धा आहे. पुस्तक अथपासून इतिपर्यंत मी एकहाती लिहिलें हें जसें खरें तसेंच हेंही खरें की त्यांनी हें पुस्तक मजकडून लिहून घेतलें. ते नसते तर माझ्या हातून या पुस्तकाचें लेखन झालें नसतें. म्हणूनच कॉपीराइट त्यांच्या नावें रजिस्टर करावा असें मी आपले चिरंजीव बापूसाहेब यांच्याजवळ समक्ष बोललो. तें बोलणें फोल नव्हतें किंवा त्या वचनापासून मी विचलित झालेला नाही.”

माझे आणि लेल्यांचे संबंध कशा प्रकारचे होते हें स्पष्ट व्हावें एवढ्यासाठीच लेल्यांच्या पत्रांतील वरील उतारा दिला आहे. त्यांचे व माझे असे जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळेच श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी त्यांना जीं पत्रें लिहिलीं व जीं पत्रें ५० वर्षे त्यांनी अतिशय काळजीपूर्वक जतन करून ठेवलीं होतीं, त्या सर्व पत्रांचा संग्रह मोठ्या प्रेमाने त्यांनी माझ्या स्वाधीन केला. तींच पत्रें प्रसिद्ध करण्याचा आज योग आला आला आहे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे.

⁕

कोल्हटकरांनी लेल्यांना जें पहिलें पत्रे पाठविलें त्याच्यावर १५ जानेवारी १९०९ ही तारीख आहे. याच्यापूर्वी थोडे दिवस लेल्यांनी कोल्हटकरांना पत्र पाठवून त्यांचा शिष्य होण्याची इच्छा प्रदर्शित केली असली पाहिजे. “आपला गुरु होण्याची माझी पात्रता आहे असे मला वाटत नाही.” या कोल्हटकरांच्या वाक्यावरून (पत्र १) हें स्पष्ट होत आहे. कोल्हटकरांच्या आत्मवृत्तांत लेल्यांचा पहिला उल्लेख पृ. ७८ वर आला आहे. ‘माझे तरुण स्नेही पुरुषोत्तम रामचंद्र लेले’ असा हा उल्लेख आहे. “आपल्यासारख्यांचा गुरु होण्याची माझी योग्यता नाही असेच मला वाटते. आपला मित्र होण्याची माझ्या अंगी पात्रता असली म्हणजे झाले” असे ते लेल्यांना उद्देशून पत्र दोन मध्ये पुन्हा म्हणतात. लेल्यांचे वय या वेळीं १८-१९ वर्षांचेंच होतें.

कोल्हटकरांचा व लेल्यांचा स्नेह सारखा वाढतच राहिला. दोघांचा पत्र व्यवहार सुरू झाल्यावर पहिल्या वर्षांत (८-१-१९१० पर्यंत) कोल्हटकरांनी एकूण २६ पत्रें लेल्यांना पाठविलीं यावरून हें दिसून येईल. साधारण पंधरवड्यांत एक पत्र असें हें प्रमाण पडतें. काही वेळा तर आठवड्याला एक पत्र गेलें आहे. लेल्यांचा पहिला नाट्यसमीक्षात्मक लेख १९०९ च्या सप्टेंबरमध्ये प्रसिद्ध झाला. हा लेख कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या नाटकावर आहे. 'उत्तररामचरित', 'शाकुन्तल', 'मृच्छकटिक' 'मालतीमाधव' या संस्कृत नाटकांचे समीक्षण रा. सा. बापट ('नाट्यविषयक व्यापक विचार' या अप्रतिम निबंधाचे लेखक) यांनी 'रंगभूमि' मासिकांतून यापूर्वी केलें होतें. पण जेमतेम वीस वर्षे वयाच्या लेल्यांनी 'मालविकाग्निमित्रा' वर ३२ पृष्ठांचा विस्तृत विवेचक निबंध लिहिणें ही कौतुकाचीच गोष्ट होती. सदर निबंधाचा बराचसा भाग या नाटकाचा कर्ता कालिदासच होता का या प्रश्नासंबंधी संशोधकांनी केलेल्या विवेचनाची चर्चा करण्यांत, आणि नाटकाच्या कथानकाला आधारभूत असलेल्या ऐतिहासिक घटनांचे धागेदोरे शोधण्यांत खर्ची पडला आहे. थोडक्यांत, ही आस्वादात्मक समीक्षा नसून संशोधनात्मक समीक्षा आहे. तें काहीही असो, लेल्यांच्या मार्मिक वाचनाचा, प्रभावी विवेचनाचा, आणि त्यांच्या संशोधक वृत्तीचा भरपूर प्रत्यय या निबंधांत येईल. असें असतां आपल्या तरुण मित्राच्या आणि शिष्याच्या व प्रतिष्ठित व प्रगल्भ प्रथम टीकालेखाचें कोल्हटकरांनी मनापासून भरपूर कौतुक करून त्यांना उत्तेजन द्यावयास हवें होतें. पण कोल्हटकरांनी त्यासंबंधीं दोन चार औपचारिक वाक्यें लिहिण्याखेरीज विशेष काही केलें नाही. "रंगभूमीचा अंक वाचून पाहिला. त्यात तुमची टीका आली आहे. तो अंक हाती पडल्याबरोबर वाचून टाकिली. चांगली झाली आहे. मात्र मुद्रणदोष फार झाले आहेत." (पत्र २९). हें पत्र मिळाल्यावर लेल्यांनी स्वाभाविकच कोल्हटकरांना खोदून विचारलें असलें पाहिजे. यावर कोल्हटकर पत्र नं. ३० मध्ये लिहितात— "तुमच्या टीकेसंबंधी मला विशेष काहीच कळविण्यासारखे नव्हते. नाटकाचा काळ, नाटकाचे कर्तृत्व कालिदासाचे असावे की नाही, वगैरे मुद्यासंबंधाचे विवेचन मला मनोरंजक वाटले... इतकेच तुम्हांस कळविण्याजोगे आहे." आपल्या नाटकांविषयीं व त्यांच्या प्रयोगांविषयीं जाणते लोक काय बोलतात अथवा लिहितात याविषयीं नित्य हळवेपणा दाखविणाऱ्या कोल्हटकरांनी (उदा. पत्र १०० आणि १०१ मधील तात्यासाहेब केळकरांसंबंधीं मजकूर पहावा.) आपल्या नवीन तरुण मित्राच्या इतक्या चांगल्या संशोधनाची मोकळ्या मनाने भरपूर तारीफ करावयास हवी होती असेंच मला वाटतें.

आपल्या पहिल्यावहिल्या प्रतिष्ठित कृतीचें आपल्या मान्यवर गुरूने भरपूर कौतुक करावें अशी लेल्यांची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. त्यांची या बाबतींत निराशा झाली असली तरी संकटसमयीं गुरूच्या मदतीला धावून जाण्यांत त्यांनी दाखविलेली तत्परता उल्लेखनीय आहे. कोल्हटकरांच्या 'प्रेम-शोधन' नाटकाचा पहिला प्रयोग २५ जून १९०६ रोजीं झाला. नाटकांचे पुस्तक प्रसिद्ध झालें नसल्यामुळे वृत्तपत्रांत प्रयोगावरच टीका येऊं लागल्या. पहिली महत्त्वाची टीका इंग्रजी 'इंदु' च्या (Daily Indu हे 'इंदुप्रकाश' चें संध्याकाळचें इंग्रजी भावंड.) २६ सप्टेंबर १९१० च्या अंकांत आली. खुद्द संपादकांनी कोल्हटकरांवर बरीच कडक टीका केली आहे. पण याहीपेक्षा कडक टीका १८ नोव्हेंबर १९१० च्या ज्ञानप्रकाशांत रा. सा. वासुदेव गोविंद कानिटकरांनी लिहिली. स्वतः कोल्हटकरांनीच 'कडक टीका' असा या टीकेचा उल्लेख केला आहे. (पत्र ४९ पाहा.) कानिटकरांच्या या टीकेला सौ. मथुराबाई द्रविड यांनी 'विमला' या टोपण नावाने २५ नोव्हेंबर १९१० च्या ज्ञानप्रकाशांत उत्तर दिलें. पण या बाबतींत कोल्हटकरांचें खरें समर्थन केलें ते लेल्यांनीच. त्यांनी आपला लेख वृत्तपत्रीय आचाराला धरून प्रथम ज्ञान प्रकाशाकडेच पाठविला. पण तो खूपच परखड असल्यामुळे ज्ञानप्रकाशाने तो परत पाठविला. नंतर लेल्यांचा सदर लेख शंकरराव मुजुमदारांनी 'रंगभूमीं' त (वर्ष ४ अंक १) प्रसिद्ध केला. हा लेख लेल्यांनी सांगून सवरून कोल्हटकरांवर टीकाकारांनी घेतलेल्या आक्षेपांचें खंडन करून कोल्हटकरांचें समर्थन करण्यासाठीच

लिहिलेला आहे. "कानिटकरांच्या टीकेवरील तुमची प्रतिटीका चांगली आहे. " असें सर्टिफिकेटही कोल्हटकरांनी लेल्यांना लगेच दिलें आहे. (पत्र ५०)

यानंतरही लेल्यांनी संधी सापडेल तेव्हा कोल्हटकरांच्या आक्षेपकांचा खरपूस समाचार घेतला आहे. उदाहरणार्थ, 'रंगभूमि', वर्ष ५ अंक ३ मध्ये लेल्यांनी वरेरकरांच्या 'संजीवनी' नाटकाचें परीक्षण केलें आहे. या परीक्षणांत दोषैकदृष्टि टीकाकारांच्या वृत्तीवर त्यांनी टीका केली आहे. 'रंगभूमि' वर्ष ४, अंक ११ मध्ये 'कवि व टीकाकार' या लेखांतही कोल्हटकरांची तरफदारी आहे. पण सर्वांत गमतीची गोष्ट अशी की, 'रंगभूमि', वर्ष ४, अंक ६–१० मध्ये शेक्स्पीयरच्या 'मिड्समर नाइट्स ड्रीम' या नाटकाचें समीक्षण करतांना अगदी अप्रस्तुतपणें त्यांनी कोल्हटकरांच्या टीकाकारांवर जबरदस्त हल्ला चढविला आहे. लेले यांचे काही विचार 'विषयाला सोडून आहेत' असा शेरा मारणें 'रंगभूमी' कारांनाही भाग पडलें आहे. 'माझे परम मित्र' असा ज्या विठ्ठल सीताराम गुर्जरांचा कोल्हटकरांनी उल्लेख केला आहे (पत्र ३) त्या 'गुर्जरांचे प्रयोगासंबंधाने फार वाईट मत झालें' (पत्र ५६) तरी लेले मात्र कोल्हटकरांच्या पाठीशी सतत उभे राहिले.

'वधूपरीक्षा' नाटकाचें लेखन तर कोल्हटकरांनी सर्वस्वी लेल्यांच्या प्रेरणेनेच पुरें केलें. "१९१२ च्या नाताळच्या १५–२० दिवस पूर्वी यशवंतराव टिपणीसांचे व माझे तरुण स्नेही पुरुषोत्तम रामचंद्र लेले टिपणीसांतर्फे मला नाटकाची निकड लावण्याकरिता खामगाव येथे आले" असें खुद्द कोल्हटकरांनीच आत्मवृत्तांत (दुसरी आवृत्ति, पृ. ७८) लिहून ठेवलें आहे. 'वधूपरीक्षे' ची निकड लेल्यांनी कोल्हटकरांना लावली याचें कारण भारत नाटक मंडळीने या बाबतींत लेल्यांना तगादा लावला हेंच होय. १६–१२–१९१२ रोजीं लेल्यांना लिहिलेल्या पत्रांत भारत नाटक मंडळींतील प्रमुख नट वामनराव पोतनीस लिहितात.— "...पण त्यात मला वाईट वाटले ते इतकेच की, अझुन लीहुन तयार झाले नाहीं ते आपण त्यांच्या (कोल्हटकरांच्या) पाठीशी घाई लावून लिहून घ्यावे कारण इकडे आमची पंचाईत सगळ्या गोष्टींनी झाली आहे... तात्यासाहेबांच्या मागे लागून नाटक लीहून नाताळांत घेऊन यावे म्हणजे नीभाव लागेल..." (पोतनिसांच्या पत्रांतील मजकूर येथे मुळाबरहुकूम छापला आहे. १६–१२–१२ पर्यंत केळकरांच्या 'तोतयाचें बंड' या नवीन नाटकाच्या प्रयोगाला सरकारी परवानगी मिळाली नव्हती. 'मत्स्यगंधा' नाटकाचें उत्पन्न फार कमी झालें होतें. १४ डिसेंबर १९११ च्या खेळाचें उत्पन्न ३७० रु. आणि १४–१२ च्या खेळाचें उत्पन्न ३८१ रु. 'कमला' नाटकाच्या ४–१२ च्या प्रयोगाचें उत्पन्न फक्त ९० रु. इतकें कमी झालें. म्हणून "सर्व आशा आतां खामगावच्या खेळावर आहे. ")

१९१२ च्या डिसेंबरच्या मध्याला कोल्हटकरांकडून 'वधूपरीक्षा' नाटक आणण्यासाठी लेले खामगावला गेले. कोल्हटकरांनी काहीही लिहिलें नव्हतें. नाताळच्या सुरवातीला कोल्हटकरांना घेऊन लेले मुबईला परत आले. खामगावहून दोघे शनिवार, २२ डिसेंबर रोजीं रात्रीं निघाले, आणि रविवार, २२ डिसेंबर रोजीं सकाळीं मुंबईस आले.

या नाताळच्या सुट्टींत कोल्हटकरांनी 'वधूपरीक्षा' नाटक अथपासून इतिपर्यंत लिहून पुरें केलें. या बाबतींत वरेरकरांची साक्ष काढतो. "पुढे अप्पांनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना पकडलं. मुंबईतल्या एका खोलींत त्यांना कोंडून घालून पहाऱ्यासाठी पु. रा. लेले यांना ठेवून सहा दिवसांच्या मुदतींत वधूपरीक्षा नाटक लिहून घेतलं. " ('धनुर्धारी' २१ जानेवारी १९५६).

२५–१२ रोजीं नाटक लिहिण्यास सुरवात केली आणि ३१–१२ ला चार अंक पूर्ण होऊन पाचव्या अंकाचा काही भाग लिहून झाला असें कोल्हटकर म्हणतात. (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ति, पृ. ८०–८१). पण लेल्यांच्या म्हणण्याप्रमाणें सोमवार ता. २३–१२ ला लेखनाला सुरवात झाली, आणि सोमवार ३०–१२ रोजीं लेखन पूर्ण झालें. (एकूण आठ दिवस लेखन चाललें होतें.) लेल्यांचेंच म्हणणें खरें आहे हें मी त्यांच्या डायरीच्या आधाराने निभ्रांतपणें सांगूं शकतो.

सांगण्याचें तात्पर्य असें की 'वधूपरीक्षा' नाटक कोल्हटकरांच्या हातून लिहून पूर्ण झालें याचें सारें श्रेय पु. रा. लेले यांचेंच आहे. लेल्यांच्या डायरींतील एक उतारा या संदर्भांत देतो. "मी खामगावला गेलो नसतो आणि तात्यांच्याकडून 'वधूपरीक्षा' नाटक नाताळच्या त्या सुटींत लिहून घेतलें नसतें तर तेंच नाटक १९१३ च्या नाताळांत गंधर्व मंडळीसाठी तात्यांच्या कडून लिहिलें गेलें असतें....मी तात्यांचा पिच्छा पुरवला म्हणूनच तें नाटक लिहावयास बैठक मारून बसले. त्यांना पानेंसुद्धा किती लिहावयाचीं हें मी बंधन घालून दिलें आणि त्या वेळीं तात्यांनी तें मान्य केलें. मी हें सगळें केलें नसतें तर आप्पांना 'वधूपरीक्षा' नाटक मिळालें नसतें आणि माझे कोल्हटकरांशीं संबंध कटुपणाचे बनले नसते."

१९०९ च्या सुरवातीपासून १९१२ अखेरपर्यंत कोल्हटकर आणि लेले यांचे संबंध किती प्रेमळपणाचे, सलोख्याचे, आपुलकीचे, आणि जिव्हाळ्याचे होते हें स्पष्ट व्हावें एवढ्यासाठीच इतका विस्तार केला. ज्या 'वधूपरीक्षा' नाटकासाठी लेल्यांनी एवढा आटापिटा केला, त्याच नाटकामुळे या गुरुशिष्यांचे संबंध बिघडावेत हा खरोखर दैवदुर्विलासच होय!

मुंबईत ठक्करबाप्पांच्या (ठक्करबाप्पा म्हणजे अमृतलाल ठक्कर. यांच्याच बिऱ्हाडीं लेले यावेळी राहत असत.) बिऱ्हाडीं 'वधूपरीक्षे' चें लेखन एकहाती पूर्ण करून कोल्हटकर १ जानेवारी १९१३ रोजीं मुंबईहून निघाले आणि २–१–१३ रोजीं खामगावला पोचले. यानंतर त्यांच्यांत व लेल्यांत वितुष्ट येण्यास सुरवात झाली. 'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत हेंच वितुष्टाचें एकमेव कारण. २२–२–१३ रोजीं 'वधूपरीक्षे' चा पहिला प्रयोग भारत नाटक मंडळीने केला. मुळांत हें नाटक भारत नाटक मंडळींसाठीच लिहिलें होतें. तथापि महाराष्ट्र नाटक मंडळीला आणि चित्ताकर्षक मंडळीलाही देण्याचें त्यांनी मुंबईतील मुक्कामांत (३१ डिसेंबर रोजीं) कबूल केलें होतें. (आत्मवृत्त पृ. ८३). कारखानिसांना व रघुनाथराव गोखल्यांना त्यांनी अस्सल प्रतीवरून नक्कल करून घेण्याचीही त्याच वेळीं सूचना दिली, आणि अस्सल प्रत त्यांनी लेले यांच्याकडे पाठविली. "सबब अस्सल प्रतच पाठवीत आहे. तिची नक्कल करवून शक्य तितक्या लवकर ती परत पाठवून द्यावी." (पत्र ९७). 'महाराष्ट्र मंडळीकडून व चित्ताकर्षक मंडळीकडून नक्कल होईपर्यंत प्रत (म्हणजे अस्सल प्रत) तेथेच ठेवावी." (पत्र १०५). यानंतर बाराच दिवसांनी "वधूपरीक्षा नाटकाची प्रत्र मी मागाहून केलेल्या फेरफारांसह रा. रा. कारखानीस यांजकडे कोल्हापूर येथे शक्य तितक्या लवकर पाठवून द्यावी" अशी सूचना कोल्हटकरांनी लेल्यांना केली. (पत्र १०६). गडकऱ्यांच्या आग्रहास्तव अस्सल प्रत कोल्हापूरला पाठविण्याचा बेत ठरला असें मूळ बेतांत झालेल्या बदलाचें कारण कोल्हटकरांनी पुढच्याच पत्रांत दिलें. (पत्र १०७) अस्सल प्रत कोल्हापूरला पाठवून देण्याची ही सूचना दोनच दिवसांनी पुन्हा आग्रहाने केली. (पत्र १०९ ता. २–३–२३). "नाटकाची अस्सल प्रत शक्य तितक्या लवकर कोल्हापुरास रा. कारखानीस यांजकडे पाठवून द्यावी. त्यांकडे प्रत पाठविण्याचा माझा प्रथम विचार नव्हता. फक्त रा. गडकरी यांच्या क्षीण झालेल्या प्रकृतीकडे पाहून मी आपला विचार बदलला आहे हे तुम्हाला पूर्वीच कळविले आहे. (पत्र १०७ पाहा.) असे असता मजकडे दोष कसा येतो हे कळत नाही. प्रत पाठविण्याबद्दल मी त्यांस कबूल केले आहे. सबब प्रत लवकर पाठवून द्यावी. त्या कामी एक दिवसाचाही उशीर झाला तर

माझ्या हेतूविषयी महाराष्ट्र मंडळीच्या मनात विनाकारण शंका उत्पन्न होईल." हा निर्वाणीचा मजकूर २–३–१३ च्या पत्रांतील (पत्र १०९) आहे. सदर सूचनेचा पुनरुच्चार पुन्हा दुसऱ्याच दिवशींच्या पत्रांत (पत्र १००) करण्यांत आला आहे. अखेरीस वादग्रस्त 'अस्सल प्रत' लेल्यांकडून कारखानिसांकडे १५–३–१३ रोजीं, म्हणजे २४–२ रोजीं पहिली सूचना केल्यानंतर एकोणीस दिवसांनीं रवाना झाली.

आपण केलेल्या सूचनेप्रमाणें लेले न वागल्यामुळे स्वाभाविकच कोल्हटकर रागावले. पत्रांमधून आपला हा राग त्यांनी तीव्र शब्दांनी स्पष्टपणें व्यक्त केला नाही हें खरें असलें तरी पत्र १०९ वरून त्यांच्या मनाचा क्षोभ जाणवतो.

लेल्यांच्या बाबतींत जें किल्मिष निर्माण झालें होतें तें लेल्यांना पाठविलेल्या पत्रांमध्ये स्पष्टपणें प्रकट झालें नाही हें खरें असलें तरी अन्य रीतीने त्याचें प्रत्यंतर येईल. अगदी सुरवातीपासून (२५–१–१९०९ च्या पहिल्या पत्रापासून) १३-५-१३ च्या पत्रापर्यंत (पत्र ११४) प्रत्येक पत्रावर 'आशीर्वाद विशेष' असा आपुलकीचा व जिव्हाळ्याचा मायना आहे. 'आपण' हें सर्वनाम अगदी अपवादात्मकच आहे. १४–७–१३ च्या पत्रापासून (पत्र ११५) मायना बदलला. 'स. न. वि. वि.' असा औपचारिक मायना आला. आणि 'तुमचे पत्र' या शब्दांऐवजी 'आपले पत्र' हे शब्द आले. पत्राच्या शेवटी 'कळावे, हे आशीर्वाद' हे शब्द असत, त्यांच्या ऐवजीं 'क. लो. अ. हे. वि.' हा प्रकार सुरू झाला. १९-८-१३ च्या पत्रापासून (पत्र ११७) 'स. न .वि. वि.' हाही मायना गेला, आणि त्याच्या ऐवजीं 'सा. न. वि. वि.' हा अगदी रूक्ष मायना सुरू झाला, आणि तो ९–२–२१ च्या पत्रापर्यंत (पत्र १४८) टिकला. ५-३-२१ च्या पत्रावर तर (पत्र १४९) 'साष्टांग नमस्कार विनंती विशेष' असा कमालीचा औपचारिक दरबारी मायना दिसतो. पत्र १५९ पर्यंत प्रत्येक पत्रावर 'सा. न. वि. वि.' हाच मायना आहे. पण १७-६-२६ च्या पत्रावर (पत्र १६०) 'कृ. सा. न. वि. वि.' असा मायना आहे. या गोष्टी क्षुद्र नाहीत. कोल्हटकरांच्या मनांतील अस्वस्थतेचा तो पुरावा आहे. दोघांमधील खरा जिव्हाळा आटून गेला याचा तो पुरावा आहे.

लेल्यांविषयीं कोल्हटकरांच्या मनांत 'वधूपरीक्षे' च्या अस्सल प्रतीमुळे जी अढी निर्माण झाली ती कालान्तराने थोडी कमी झाली असेल, पण पूर्णपणें नाहीशी कधीच झाली नाही. या प्रकरणानंतर सुमारे १५ वर्षें दोघांचा पत्रव्यवहार चालू राहिला. पण त्यांत पूर्वीचा मोकळेपणा व जिव्हाळा मात्र उरला नाही. उलट लेल्यांच्याही मनात जी कटुता निर्माण झाली ती देखील नष्ट झाली नाही. पुष्कळसा तुटकपणा त्यांच्याही वृत्तींत आला. मधून मधून तो तीव्र होत असे. १५–४–१९१९ च्या पत्रांत (पत्र १४५) याला पुरावा आहे. "मी ह्या वेळपर्यंत एकाही इसमाकडे 'परिवर्तन' नाटक पाठविले नव्हते. असे असता केवळ आपणाबद्दल माझ्या मनात असलेल्या स्नेहभावामुळे मी ते आपणांकडे पाठविले. आपणांस त्या नाटकासंबंधाने ज्या गोष्टी कळल्या होत्या त्या मला नाटकवाचनानंतर कळविण्याचे आपण कबूल केले होते, व आपले झालेले बरेवाईट मतही आपणाकडून कळेल अशी मला अपेक्षा होती. परंतु आपण यांपैकी एकही गोष्ट केली नाही. फार काय पण प्रत पोचल्याचे पत्रही पाठविले नाही. मी जो आपणावर विश्वास ठेविला त्याच्या शतांशानेही मजवर विश्वास ठेवणे आपणास योग्य वाटले नाही. असो. आपल्या वर्तनाने मी जो बोध घ्यावा अशी आपली इच्छा होती तो बोध मी घेतला आहे. यापुढे मी आपणास एकाही पत्राने तसदी देणार नाही."

हे अगदी निर्वाणीचें पत्र लिहिल्यावर सुद्धा १७–६–१९२६ पर्यंत कोल्हटकरांनी लेल्यांना आणखी सोळा तरी पत्रें लिहिलीं. ('सोळा तरी' असें म्हणण्याचें कारण असें की प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट न केलेलीं

आणखी सात आठ पत्रें माझ्याजवळ आहेत. पण त्यांचा काही भाग फाटलेला आहे, आणि तारखाही कळत नाहीत म्हणून मी तीं छापलीं नाहीत.)

जे लेले कोल्हटकरांच्या नाटकांची हिरीरीने तरफदारी करून व टीकाकारांचा धुव्वा उडवून त्यांचें शत्रुत्व संपादन करावयास डगमगत नव्हते त्याच लेल्यांनी १९२४ सालीं कोल्हटकरांनी लिहिलेल्या 'शिवपावित्र्य' या नाटकावर प्रतिकूल टीका केली. १७–६–२६ च्या पत्रांत (पत्र १६०) कोल्हटकरांनी या गोष्टीची दखल घेतली आहे, आणि वरकरणी जरी त्यांनी मनःक्षोभ न झाल्याचा देखावा केला असला तरी त्यांच्या मनाला जखम झाली आहे हें कोणाही मार्मिक माणसाच्या लक्षांत आल्यावाचून राहाणार नाही. हें पत्र १७–६–१९२६ चे आहे. या पत्रापाशी कोल्हटकरांचा व लेल्यांचा १७ वर्षें चाललेला पत्रव्यवहार संपला. 'रमणीयोऽ वधिर्विधिना विसंवादितः |' एक रमणीय पर्व संपलें!

⁂

कोल्हटकरांनी आपलें आत्मवृत्त १९१९ च्या मार्चमध्ये लिहून पुरे केलें. पण तें त्यांच्या निधनानंतर १ जून १९३५ रोजीं प्रसिद्ध झालें.

'वधूपरीक्षे' च्या अस्सल प्रतीमुळे कोल्हटकर आणि पु. रा. लेले यांच्यामध्ये जें वैमनस्य निर्माण झालें त्याचा वृत्तान्त या आत्मवृत्तांत कोल्हटकरांनी मोकळेपणाने दिला आहे. (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ती, ८३ – ८४ ही पृष्ठें पाहावीं.) काही वाक्यें येथे उद्‌धृत करतो. "इतके दिवस कारखानिसांचा विनाकारण खोळंबा करून व माझ्या वचनाला हरताळ लावून नंतर मानापमानाच्या थंड गोष्टी करितांना लेल्यांस पाहून मला त्यांचा फार राग आला, व प्रत ताबडतोब कारखानिसांकडे पाठवावी अशा अर्थाची मी त्यांस तार पाठविली. तिची लागलीच अंमलबजावणी करणाच्या ऐवजी त्यांनी मला पुन्हा मानापमानाच्या चर्चेने परिपूर्ण असें पत्रच पाठविलें. असो. यानंतर लवकरच प्रत कारखानिसांकडे रवाना करण्यात आली. पण झालेल्या प्रकारामुळे मजसंबंधाने कारखानिसांच्या मनांत जी तेढ उत्पन्न झाली ती त्यानंतर बरीच वर्षे नाहीशी झाली नाही..... या शोचनीय प्रकारानंतर लेले एकदा मजकडे खामगांवीं आले होते. पण त्यांनी त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली नाही किंवा त्याचा खुलासाही केला नाही. तेव्हापासून मी त्यांच्याशीं तुटकपणाने वर्तन ठेविलें असून आमचा पत्रव्यवहारही पूर्वीइतका व पूर्वीसारखा राहिला नाही." (सदर मजकूर १९१९ च्या सुरवातीस लिहिलेला आहे. या मजकुरांत मानापमानाच्या चर्चेचा उल्लेख आहे. 'मानापमान' नाटकाशीं तिचा कसलाही संबंध नाही. मानापमान म्हणजे लेल्यांचा वैयक्तिक अपमान. अस्सल प्रत लेल्यांच्या जवळ आहे हे माहीत असतांही त्यांच्याजवळ ती न मागतां कारखानिसांनी खामगावला कोल्हटकरांना लिहावें यात आपला अपमान झाला असें लेल्यांना वाटलें.)

खरें म्हणजे अस्सल प्रत कारखानिसांकडे पाठवून देण्याविषयीं खुद्द कोल्हटकरांनी सकारण निक्षून लिहिल्यावर तरी लेल्यांनी प्रत ताबडतोब कोल्हापुरास पाठवून द्यावयास पाहिजे होती असेंच मला वाटतें. अस्सल प्रत कोणालाही न देतां फक्त नक्कल द्यावयाची अशी मुळांत कोल्हटकरांची लेल्यांना ताकीद होती हें खरें. तथापि नंतर त्यांचा विचार बदलला, आणि अस्सल प्रतच कारखानिसांकडे पाठविण्याची त्यांनी स्वतःच लेखी सूचना केली यांत लेल्यांची सर्व जबाबदारी पूर्णपणें संपली होती. प्रत गहाळ झाली असती तर त्याची जबाबदारी सर्वस्वी कोल्हटकरांची होती, लेल्यांची नव्हे!

लेल्यांचा व माझा परिचय बराच वाढल्यावर मी सदर ‘अस्सल’ प्रतीच्या प्रकरणाविषयीं त्यांची स्वतःची बाजू समजावून घेण्यासाठी त्यांना मधून मधून छेडीत असे. प्रथम त्यांनी उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. अखरे मी खनपटीस बसल्यावर त्यांनी स्वतःची डायरी माझ्यापुढे टाकली. (आज ही डायरी माझ्या संग्रहांत आहे.) या प्रकरणाविषयीं डायरींत त्यांनी बराच मजकूर लिहिलेला आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग तेवढा येथे देतो. “सन १९१३ चा जानेवारी महिना उजाडला. ‘वधूपरीक्षा’ नाटकाचें हस्तलिखित संपूर्ण हातीं आलें. कोल्हटकरांनी तें माझ्या स्वाधीन केलें आणि त्याबद्दलची सर्व जबाबदारी माझ्यावर टाकली..... तात्यांनी मला स्पष्ट सांगितलें होतें की ‘हस्तलिखित एकच आहे. तें मी कोणत्याही नाटक मंडळीला द्यावयास तयार नाही. हे हस्तलिखित मी तुमच्या स्वाधीन करीत अहे. महाराष्ट्र मंडळी किंवा सामाजिक मंडळी यांचेकडून मनुष्य आल्यास तुमच्या नजरेखाली आणि देखरेखीखाली त्याची नक्कल त्यांना करूं द्या. हस्तलिखित तुमच्या ताब्यांतून दुसऱ्या कोणाकडे जातां कामा नये. हस्तलिखिताबद्दल मला पूर्वी वाईट अनुभव आले आहेत म्हणून मी तुम्हांला मुद्दाम बजावीत आहे. तुम्ही अजून या क्षेत्रांत नवशिके आहात. हस्तलिखिताबाबत मी तुमच्यावर विश्वास टाकतो आहे, आणि कमजास्त झाल्यास मी एकट्या तुम्हाला जबाबदार धरीन.’ त्यांनी ही वाक्यें इतकीं मोजून आणि निश्चितपणें उच्चारलीं की ते मला लेखी नोटीस देत आहेत असें मला वाटलें. ठक्कर बाप्पांच्या घरांतून बाहेर पडतांना पुनः हस्तलिखिताची काळजी घेण्याबद्दल मला बजावलें. आणि बोरीबंदर स्टेशनवर आगगाडी सुटण्याच्या दोनचार मिनीटें अगोदर आणखी एकदा हस्तलिखिताबद्दल बजावलें. दुर्दैव एवढेंच की त्यांच्या आज्ञेचा अक्षरशः अम्मल मी केला. यामुळेच मला शिक्षा भोगावी लागली... याच मार्च महिन्यांत ती अनिष्ट घटना घडली. वधूपरीक्षा नाटकाच्या हस्तलिखितासंबंधीं कोल्हटकरांनी दिलेल्या अनुज्ञा मी काटेकोरपणें पाळल्या आणि कोल्हटकरांची इतराजी ओढवून घेतली. महाराष्ट्र मंडळीच्या मालकांनी माझ्यावर पक्षपाताचा आरोप केला आणि तात्यांना तो खरा वाटला... कोणी तरी माझ्या विरुद्ध त्यांचें मत कलुषित केलें असलें पाहिजे. मी अदमासाने ती व्यक्ती कोण हें हेरलें होतें. पण त्या व्यक्तीचें नाव माझ्या डायरींत लिहून ठेवावें असें मला वाटत नाही.... एवढें खरें की माझें कर्तव्य चोखपणें बजावल्याबद्दल मला कायमची शिक्षा भोगावी लागली. फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत जे लोभाचे व जिव्हाळ्याचे संबंध होते ते एकदम बिघडले. त्या उन्हाळ्यांत पंधरा दिवस मी खामगावीं गेलो होतो. त्या वेळीं कोल्हटकरांनी माझ्याशीं अत्यंत तुटकपणाचें वर्तन ठेविलें होतें. तात्यांची पत्नी अतिशय बुद्धिमान व कर्तबगार स्त्री होती. तिने या मुक्कामांत मजबद्दल आस्था दाखवली म्हणूनच पंधरा दिवस तरी मी राहूं शकलो....”

ज्या ज्या वेळीं लेल्यांच्या जवळ मी हा विषय काढीत असे त्या त्या वेळीं ते अस्वस्थ होत. त्यांच्या मनातलें हें शल्य शेवटपर्यंत निघालें नाही याचें कारण कोल्हटकरांविषयीं त्यांना वाटणारें असीम प्रेम आणि त्यांच्याविषयींची अपार कृतज्ञता. त्यांच्या डायरीतींल काही वाक्यें उद्धृत करतो “.... नाटक कंपन्यांच्या अंतरंगांत माझा प्रवेश झाला त्याचें संपूर्ण श्रेय कोल्हटकरांना आहे ही गोष्ट मी कधीही विसरलो नाही... यापुढे मला विसर पडण्याचा संभव फारच थोडा आहे. त्यांतल्या त्यांत खाडिलकरांची ओळख मला लाभली ती कोल्हटकरांमुळे. ही घटना माझ्या दृष्टीने अतुल्य मोलाची आहे.”

⁕

“एकदा माझे अकारण स्नेही असून दैववशाने हल्ली निष्कारण वैरी झालेल्या काही व्यक्तींवर प्रतिकूल टीका करिताना माझ्या लेखणीने आपला प्रवास मुंगीच्या पावलानेच केला.” असें कोल्हटकरांनी आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेंत म्हटले आहे.

विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा कोल्हटकरांनी पत्र ३ मध्ये 'माझे परम मित्र' असा प्रेमळ उल्लेख केला आहे. गुर्जरांचा परिचय करून घेण्याची त्यांनी याच पत्रांत लेल्यांना सूचना केली आहे. "त्यांचा स्वभाव भिडस्त असल्यामुळे ते कदाचित् तुम्हाला मानी वाटले असतील." (पत्र ४) अधिक परिचय झाल्याने हा ग्रह नाहीसा होईल असेंही ते. म्हणतात. कोल्हटकरांच्या व गुर्जरांच्या वयांत १०–१२ वर्षांचे अंतर असतां कोल्हटकरांच्या लेखामुळे दोघांचा स्नेह जडला. (पत्र ८). 'प्रेमशोधन' नाटकाच्या प्रयोगासंबंधीं गुर्जरांचें मत फार वाईट झालें हें कोल्हटकरांना समजलें. (पत्र ५६). किर्लोस्कर मंडळींविषयीं गुर्जरांच्या मनांत वितुष्ट आलें असून तें दिवसेंदिवस वाढत चाललें आहे असें पत्र ६७ मध्यें कोल्हटकर म्हणतात. गुर्जरांचें किर्लोस्कर मंडळींशीं व खाडिलकरांशीं काही तरी आक्षेपार्ह वर्तन झालें असलें पाहिजे असें दिसतें. किर्लोस्कर मंडळींशीं वाईट वर्तन म्हणजे मॅनेजर शंकरराव यांच्याविषयीं वाईट वर्तन. पत्र ६८ मध्ये हें स्पष्ट झालें आहे. मुजुमदारांशीं आणि खाडिलकरांशीं गुर्जर वाईट वागले असले तरी कोल्हटकरांशीं ते स्नेहभावाने वागत असल्याने हा वेळपर्यंत (२५–९–१९१२) दोघांचे संबंध मित्रत्वाचे होते. गुर्जरांचा स्नेह तोडून टाकणें आपल्याला शक्य नाही असें त्यांनी कबूल केलें आहे. (पत्र ६७). "गुर्जर यांचें वर्तन कसेंही असलें तरी जोंपर्यंत ते मजशीं मित्रत्वाने वागतात तोपर्यंत मलाही त्यांच्याशीं तसेंच वागलें पाहिजे. त्यांचें वर्तन मला पसंत नाही हे मी त्यांना कळविलें आहेच. पण याच्याही पलीकडे निष्ठुरपणाने वागणें मला अशक्य वाटतें." (पत्र ६८). शंकरराव मुजुमदार आणि खाडिलकर यांच्याशीं गुर्जर कां आणि कोणत्या प्रकाराने वागले या संबंधी माहिती मला उपलब्ध झाली नाही. गुर्जर बोलण्यांत बरेचसे फटकळ होते व ते कुत्सित बोलत असत. प्रतिष्ठित व्यक्तीच्या तोंडावरही सडेतोडपणें बोलावयास ते कमी करत नसत. 'वधूपरीक्षा' नाटकाचें लेखन पूर्ण झाल्यावर स्वतः कोल्हटकरांनी त्याचें वाचन केलें. वाचन नीरस झालें असें लेल्यांनी आपल्या डायरींत लिहून ठेवलें आहे. पण गुर्जरांनी मात्र कोल्हटकराच्या तोंडावर प्रतिकूल मत दिलें. "वाचन संपल्यावर सर्व लोक गेले. फक्त गुर्जर त्या ठिकाणीं बसले. त्यांना मत विचारतां त्यांनी अगदी प्रतिकूल मत बोलून दाखवलें. तात्यांचा अतिशय हिरमोड झाला. आणखी काही वेळाने गुर्जर निघून गेले" असें लेल्यांनी आपल्या डायरींत लिहून ठेवलें आहे. कोल्हटकरांच्या आत्मवृत्तांतही त्याला दुजोरा मिळतो. "नाटकाचे वाचन संपल्यावर गुर्जरांस त्यांचें मत विचारतां त्यांनी तें अगदी कुचकामाचें झालें आहे असें आपलें मत दिलें." (आत्मवृत्त, दुसरी आवृती, पृ. ८२). असलाच एखादा प्रकार 'मानपमान' नाटकाच्या बाबतींत गुर्जरांनी किर्लोस्कर मंडळींत शंकरराव मुजुमदार आणि खाडिलकर यांच्यासमोर केला असण्याची शक्यता आहे. "गुर्जर यांनी पोलिस कमिशनर यांस पत्र पाठविल्याबद्दलची माहिती खोटी आहे असें मला खात्रीलायक कळलें आहे." असें एक वाक्य १९–९–११ च्या पत्रांत (पत्र ६९) आहे. या वृत्ताचा किर्लोस्कर मंडळीशीं व खाडिलकरांशी काही संबंध असेल काय? ते काहीही असो. कोल्हटकरांसारख्या गुरुस्थानीं असलेल्या प्रतिष्ठित नाटककाराच्या तोंडावर नाटक 'अगदी कुचकामाचें' झालें आहे असा अप्रयोजक, औचित्यशून्य शेरा लेल्यांच्या समोर मारण्याचें औद्धत्य गुर्जरांच्या ठायीं होतें हेंच या कथेचें तात्पर्य आहे. ६–२–१९०९ च्या पत्रांत कोल्हटकरांनी 'माझे परम मित्र' असा ज्यांचा आपुलकीने उल्लेख केला होता (पत्र ३) त्या परम मित्राने दाखविलेला हा सुसंस्कृत शिष्टाचार! इतकें झालें तरी गुर्जरांच्या असभ्यपणाविषयीं कोल्हटकरांनी लेल्यांच्या पत्रात नाखुषीचा एक शब्दही काढला नाही हें विशेष होय. उलट गुर्जरांकडून त्यांनी एक पुस्तक मागवून घेतलें. (पत्र १००). नाटकाचा प्रयोग झाल्यावर भाऊसाहेब जयवंतांनी स्तुतीचें पत्र कोल्हटकरांना पाठविलें (पत्र १०७). २२–२–१९१३ रोजीं 'वधूपरीक्षा' नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईत 'बॉंबे थिएटर' मध्ये झाला. "प्रयोग निःसंशय चांगला झाला. पोतनीस तर प्रयोगावर खूष झाला. त्याच्या मेहुण्याचे वडील श्री. जयवंत यांनी प्रयोगाची तारीफ केल्यामुळे पोतनीसच्या खुषींत मोठीच जादा भर पडली" असें लेल्यांनी आपल्या डायरींत लिहून ठेवलें आहे. नाटकाचें वाचन संपतांच त्यासंबंधीं 'अगदी कुचकामाचें' असा परखड शेरा नाटककाराच्या तोंडावर मारणाऱ्या स्पष्टवक्त्या

परममित्र गुर्जरांनी नाटकाच्या प्रयोगानंतर स्तुतीचे एक वाक्य देखील पत्रांतून कोल्हटकरांना लिहिलें असतें तर लेल्यांना धाडलेल्या पत्रांत त्याचा उल्लेख आल्यावाचून राहिलाच नसता. गुर्जरांविषयीं अगदी बारीकसारीक गोष्टींचीही नोंद लेल्यांच्या पत्रांत आढळते (पत्र ४९, ७०, ८५, ८९, ११३, ११८).

गुर्जरांनी तोंडावर पाणउतारा केला तरी २२–९–१५ च्या पत्रांत (पत्र १३५) कोल्हटकरांनी गुर्जरांना नमस्कार कळविला आहे.

'वधूपरीक्षे' च्या वाचनापासून (सोमवार ३० डिसेंबर १९१२ पासून) कोल्हटकरांनी कधीही दुखविले नसतां गुर्जर मात्र अनेक लेखांमधून कोल्हटकरांविषयीं प्रतिकूल लिहीत राहिले. गुर्जरांच्या असल्या जाहीर वर्तनाने कोल्हटकर स्वाभाविकच फार अस्वस्थ झाले, किंबहुना क्षुब्धही झाले. त्यांच्या साऱ्या भावना ३१–३–१८ रोजीं लेल्यांना पाठविलेल्या पत्रांत (पत्र १४३) मोकळेपणाने प्रकट झाल्या आहेत. "रा. रा. गुर्जर यांच्या कल्याणाचीच इच्छा मी नेहमी बाळगीत असतां व तदनुसार माझें वर्तनही असतां त्यांनी मजविषयीं आपली गैरसमजूत करून घेऊन माझ्याशी वैर आरंभिलें आहे. ('वैर' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. खाजगी पत्रव्यवहारांतही कोल्हटकर चुकूनही झोंबणारा कडक शब्द वापरीत नाहीत. अत्युक्ति हा प्रकार तर त्यांना माहीतच नाही.) तें वैरच त्यांच्या अलीकडील लेखातून व्यक्त होत असतें. वैरास अशा प्रकारें वाट मिळून तरी तें कमी होईल अशी आशा करावयास हरकत नाही. मला अलीकडे असे अनेक प्रसंग आले असल्यामुळे त्या गोष्टीने मनास फार धक्का बसला नाही. रा. रा. गुर्जर निस्सीम स्नेही असताना किती प्रेमळ असू शकतात याचा मला चांगला अनुभव आला होता. ते निस्सीम वैरी झाले असता द्वेषाची मजल कोठवर नेऊ शकतात याचाही अनुभव घेण्यासारखा होता व हल्ली मिळत आहे ही गोष्ट वैचित्र्याच्या दृष्टीने इष्टच आहे." (पत्र १४३). सदर पत्र ३१–३–१९१८ चें आहे.

यापूर्वी १९१७ च्या जून महिन्याच्या १३ तारखेपर्यंत कोल्हटकरांनी मुंबईमध्ये 'सहचारिणी' नाटकाचे चार अंक लिहून पुरे केले होते. तीन अंक पूर्ण होतांच लिहून झालेलें नाटक कोल्हटकरांनी प्रथम दाखविले ते गुर्जरांना! गुर्जरांकडून ही गोष्ट हिराबाई पेडणेकरला समजली. लगेच तिने कोल्हटकरांजवळ नाटक वाचावयास मागितलें. पण तिचा प्रतिकूल अभिप्राय आल्यास हिरमोड होईल या भीतीने कोल्हटकरांनी तिला नाटकाचा लिहून झालेला भाग वाचावयास दिला नाही. याचा हिराबाईस फार राग आला. (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ती, पृ. १०३–४. हा सबंध प्रकार मुळांतूनच वाचावा.) यावर कोल्हटकर म्हणतात– "पुढील वर्षांत (म्हणजे १९१८ मध्ये) माझ्या स्नेह्यांच्या व माझ्या स्नेहसंबंधात जो बिघाड पडला त्यास तेथूनच आरंभ झाला असे म्हटल्यास चालेल."

हरिभाऊ आपटे यांच्याप्रमाणें थोडी मागची हकीकत मुद्दाम सांगितली आहे. 'वधूपरीक्षे' चें वाचन झाल्याबरोबर गुर्जरांनी लगेच नाटकाविषयीं जो अश्लाध्य शेरा कोल्हटकरांच्या तोंडावर लेल्यांच्या समक्ष मारला त्यामुळे कोल्हटकर अतिशय नाराज झाले हें खरें असलें तरी १९१७ च्या जून महिन्यापर्यंत कोल्हटकरांनी लेल्यांना पाठविलेल्या पत्रांत गुर्जरांविषयीं एकही अनुदार उद्‌गार काढला नाही. इतकेंच नव्हे तर 'सहचारिणी' नाटकाचा लिहून झालेला भाग हिराबाईला वाचावयास न देतां त्यांनी तो प्रथम गुर्जरांना वाचावयास दिला! (हिराबांईकडून पदांच्या चाली मिळावयाच्या होत्या ही या संदर्भातील महत्त्वाची गोष्ट आहे.)

१९१७ च्या डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत 'सहचारिणी' नाटकाच्या पदांच्या चाली निश्चित करण्यासाठी कोल्हटकर गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडांतच मुक्काम करून राहिले. खोलींतच गडकरी व गुर्जर ही दुक्कल हास्यविनोद करीत बसलेली असे. पदें करण्याच्या या प्रकाराचें कोल्हटकरांनी आत्मवृत्तांत केलेलें वर्णनच देतो. "एखाद्या वेळी मनोनिग्रह करून मी पदें करावयास बसलो तर गडकऱ्यांनी व गुर्जरांनी लागलीच 'कसें काय? किती पदें झालीं? दहा पाच होऊन गेलींच असतील! तुमची प्रतिभा भारी दांडगी!' इत्यादि परिहासात्मक (व क्वचित् प्रसंगीं उपहासात्मक) वाक्यांनी माझी थट्टा आरंभावी." (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ती, पृ. ११०). कोल्हटकरांच्या बाबतींत या दोघांची ही नुसती सलगी नाही, तर फाजील सलगी आहे यांत शंका नाही. "उभयतांचें या वेळेचें वर्तन मला बरेंच चमत्कारिक वाटलें यांल काही शंका नाही" असें खुद्द कोल्हटकरांनीही म्हटलें आहे. (आत्मवृत्त, पृ. १११).

काही महत्त्वाच्या मागच्या गोष्टी सांगून झाल्यावर आता ३१–३–१८ च्या पत्राकडे (पत्र १४३) वळतो. सदर पत्रावर सुरवातीला Confidential असा शब्द आहे. गुर्जरांविषयीं लिहिलेला मजकूर लेल्यांनी स्वतःपाशीच ठेवावा, गुर्जरांना सांगूं नये असा याचा अर्थ आहे. 'सहचारिणी' नाटकांतील पदांच्या बाबतींत गुर्जरांनी व गडकऱ्यांनी कोल्हटकरांशीं जी अश्लाध्य फाजील सलगी केली (१९१७ डिसेंबरचा शेवटचा आठवडा) तिच्यानंतर तीन महिन्यांनी सदर पत्र लिहिलें आहे. कोल्हटकरांविषयीं गुर्जरांनी गैर समजूत करून घेण्याचें कोणतें कारण झालें तें समजत नाही. तसेंच त्यांनी कोल्हटकरांविषयीं द्वेषबुद्धीने कोणते लेख लिहिले याचाही तपास मला लागला नाही. कदाचित् हे लेख निनावी असतील, किंवा टोपण नावाने लिहिले असतील.

तात्पर्य असें की, १९०९ च्या सुरवातीला कोल्हटकरांचे 'परम मित्र' असलेल्या गुर्जरांनी कोल्हटकरांविषयी १९१८ सालीं अकारण आत्यन्तिक द्वेषभावना बाळगावी आणि ते त्यांचे 'निस्सीम वैरी' बनावेत हा आणखी एक दैवदुर्विलास आहे.

गुर्जरांनी कोल्हटकरांशी वैर कां पत्करलें याचा खुलासा त्यांच्या आत्मवृत्तांत मिळेल. कोल्हटकरांच्या 'सहचारिणी' नाटकावर त्यांच्या मागे गुर्जर प्रतिकूल टीका करूं लागले. टीका गणपतराव बोडसांच्या कानांवर गेली व तेही कोल्हटकरांच्या नाटकांविषयीं उदासीन बनले. 'जन्मरहस्य' लिहून पूर्ण होण्याच्या सुमारास गुर्जरांचेंही एक नाटक ('राजलक्ष्मी'?) लिहून तयार होतें. या नाटकाच्या प्रकरणांत गुर्जरांनी कोल्हटकरांना खूपच मनःस्ताप दिला. किंबहुना त्यांनी त्यांच्या तोंडावर स्पष्ट शब्दांत अपमानही केला. कोल्हटकरांच्या तोंडावर वेळीं अवेळी गडकऱ्यांची स्तुती करून कोल्हटकरांचा पाणउतारा करण्याचा त्यांनी सपाटा लावला. इतकेंच नव्हे तर गडकरी त्यांच्या नाटकांची किर्लोस्कर मंडळींतील नटांजवळ मनसोक्त निंदा करतात असेंही कोल्हटकरांना सांगण्यास त्यांनी कमी केलें नाही. परम मित्राने कोल्हटकरकरांचा हा असा दावा साधला! "पण मी त्यांचा कोणत्याही प्रकारचा अपराध केला नसतां त्यांनी मजवर रोष करावा हें अगदीच अनुचित होतें" असा या घृणास्पद प्रकारावर कोल्हटकरांनी शेरा मारला आहे. (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ति, ११३–११९ हीं पृष्ठें या संदर्भांत वाचनीय आहेत.)

वरील मजकूर लिहून झाल्यावर अगदी आकस्मिकपणें गुर्जरांच्या वर्तनाचा ज्यायोगें अन्वयार्थ लागेल असा एक बिनतोड प्रत्यन्तर पुरावा मला आठवला. सदर पुरावा श्री. वि. ना. कोठीवाले यांनी संपादित केलेल्या 'मा. दीनानाथ स्मृतिदर्शन' या ग्रंथांतील पृ. २८ वर आढळेल. "या ठिकाणी श्री. कोल्हापुरे यांनी दिलेली एक नमुनेबाज आठवण नमुद करणें भाग आहे. 'जन्मरहस्य' नाटकाच्या तालमी

चालू असताना श्री. वि. सी. गुर्जर हे त्या बाबत कमालीचे निंदाप्रचुर बनून मनोमय मत्सरग्रस्त रहात असत. ते या वेळीं बलवंतकडे 'राजलक्ष्मी' ची वर्णी लावून तिष्ठत राहिले होते. गडकरी मास्तर यांच्या कानावर जेव्हा ही गोष्ट गेली तेव्हा ते एक दिवस तालमीला आजारी असूनही येऊन बसले. तालीम संपल्यावर रा. गुर्जरांनी परत जन्मरहस्याबद्दल अनुदार उद्‌गार काढतांच गडकरी संतापले व 'माझ्या गुरूच्या नाटकाची निंदा मी कदापि सहन करणार नाही, त्यांच्या एका वाक्याच्या पासंगाला तुमची राजलक्ष्मी पुरणार नाही' असें म्हणून राजलक्ष्मीच्या लिखाणाच्या वह्या त्यांनी भिरकावून दिल्या."

⁕

कोल्हटकरांनी लेल्यांना लिहिलेल्या पत्रांमध्ये अंतर्भूत झालेली त्यांच्या एका 'परम' मित्राची हृद्य कहाणी आतापर्यंत सांगून झाली. आता त्यांच्या आणखी एका सच्छिष्याची आणि जिव्हाळ्याच्या स्नेह्याची कहाणी याच पत्रांच्या आधाराने सांगावयाची आहे. हा सच्छिष्य आणि जिव्हाळ्याचा स्नेही म्हणजे गडकरी. गडकऱ्यांची ही कहाणी साग्र संगीत व्हावी म्हणून मी कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताचा आणि अन्य अधिकृत साहित्याचा यथोचित्त उपयोग करून घेणार आहे.

कोल्हटकरांच्या पत्रांत गडकऱ्यांचा पहिला उल्लेख पत्र २६ मध्ये (८–१–१०) आला आहे. सदर उल्लेख अगदीच जुजबी आहे. हा उल्लेख 'प्रल्हाद चरित्र' ('गर्धनिर्वाण') नाटकासंबंधीं आहे. सदर नाटक बहुतेक वाचलें; काही प्रवेश फार चांगले साधले आहेत; पहिला प्रयत्न या दृष्टीने नाटक उत्तम झालें आहे असा उल्लेख पत्र २७ मध्ये आहे. शेवटचा अंक अजून वाचनांत आला नाही असें कोल्हटकर पत्र २८ मध्ये म्हणतात (३१–१–१०) गडकऱ्यांची व कोल्हटकरांची पहिली भेट झाली "त्या सुमारास त्यांना काही कारणामुळे वैराग्य उत्पन्न होऊन ते वेडे होण्याच्या मार्गाला लागले होते, परंतु माझ्या लेखांनी त्यांच्या मनाला खाद्य पुरवून त्यांचे वेडापासून रक्षण केले असे ते पुढे पुढे म्हणत असत " असें कोल्हटकरांनी या भेटीच्य संदर्भांत लिहीलें आहे (आत्मवृत्त, पृ. ५६). गडकरी लवकरच कोल्हटकरांचे एकनिष्ठ भक्त बनले. कोल्हटकरांच्या नाटकांतील निवडक पदें एकत्र करून त्यांनी 'सुंदर उतारे' हे पुस्तक तयार केलें इत्यादि अनेक कथा सर्वश्रुत आहेत. कोल्हटकरांवरील गडकऱ्यांची भक्ती किती उत्कट होती याचें प्रत्यंतर त्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाच्या अर्पणपत्रिकेवरून येईल. कोल्हटकर गडकऱ्यांचे गुरु होते—लेखनगुरु होते. 'प्रेमसंन्यास' च्या अर्पणपत्रिकेंत 'माझे परमपूज्य लेखनगुरु' असाच त्यांनी कोल्हटकरांचा उल्लेख केला आहे.

गडकऱ्यांचा 'प्रेमसन्यास' नाटकाचा पहिला प्रयोग १७–२–१९१२ रोजीं झाला. या नाटकाची छापील प्रत १९१२ च्या डिंसेंबरमध्ये प्रसिद्ध झाली. या काळांत कोल्हटकरांविषयीं गडकऱ्यांच्या मनांत मृदु भावनांचा, आदराचा, प्रेमाचा, आणि भक्तीचा कसला विलक्षण प्रकर्ष झाला होता याची यथातथ्य कल्पना यावी म्हणून २० डिसेंबर १९१२ रोजीं 'प्रेमसंन्यास' ची जी गाजलेली अर्पणपत्रिका त्यांनी लिहिली तीच येथे समग्र देतो.

## कृतज्ञतेचे अश्रु

माझे परमपूज्य लेखनगुरु

स्वतंत्र शक्तीचे नाटककार, प्रतिभासंपन्न कवि, मार्मिक टीकाकार, कुशल विनोदपंडित व विद्वान निबंधकार—

रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

बी. ए. एलएल्. बी. वकील खामगाव.

संगीत वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन व वधूपरीक्षा या नाटकांचे व सुदाम्याचे पोहे या लेखसंग्रहाचे कर्ते यांस–

गुरुवर्य तात्यासाहेब,

माझ्यासारख्या विषम स्थितींतल्या असदृश योग्यतेच्या मनुष्याला आपण आज इतकीं वर्षे उदार हृदयाने, बरोबरीच्या मित्रपणाचा थोर मान देत आला. वेळोवेळीं माझ्या चुकल्या बालबुद्धीला वडीलपणाने सदुपदेश करीत आलां; कधीं कधीं उच्छृंखलपणाने माझ्याकडून आपला उपमर्द झाला असतां त्याचीही बंधुप्रेमाने क्षमाच करीत आलां; आजवर मी लिहिलेल्या वेड्यावाकड्या शब्दांचें पितृतुल्य प्रेमाने प्रोत्साहनपर कौतुकच करीत आलां; याप्रमाणें एक ना दोन, हजारों उपकारांचें आज एकसमयावच्छेदेंकरून स्मरण होऊन अंतःकरण कृतज्ञतेने उंचबळून येत आहे! त्या कृतज्ञतेचे अश्रूच आज मी सानंद भक्तिभावाने आपल्या परमपूज्य चरणीं वाहत आहे.

आपलेच लेख वाचून मला हे चार शब्द लिहितां आले. तेव्हा यांत जें चांगलें असेल तें आपलेंच आहे, त्याचा आपण स्वीकार करालच; आणि जें वाईट आहे त्याचें तरी क्षमापूर्ण उदारतेने कौतुक आपल्या इतकें दुसरें कोण करणार?

आपला कृपाभिलाषी
राम गणेश गडकरी.

'प्रेमसंन्यासा' ची ही अर्पणपत्रिका येथे मुद्दाम समग्र उद्धृत केली आहे. "त्या सुमारास त्यांना काही कारणामुळे वैराग्य उत्पन्न झालें असून ते वेडे होण्याच्या मार्गाला लागले होते; परंतु माझ्या लेखांनी त्यांना खाद्य पुरवून त्यांचें वेडापासून रक्षण केलें असें ते पुढेपुढे म्हणत असत. त्यांच्या भक्तीचें कारण कोणतेंही असलें तरी तिच्याइतकी उत्कट व अकृत्रिम भक्ति या काळांत फारच विरळा दिसून येते. तिची काहीशी छटा त्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाच्या अर्पणपत्रिकेंत दिसून येते." असें कोल्हटकरांनी आत्मवृत्तांत (दुसरी आवृत्ती, पृ. ५६) लिहून ठेवलें आहे. या अवतरणांतील 'उत्कट व अकृत्रिम भक्ति' या शब्दांचें महत्त्व ध्यानांत घ्यावे उदार हृदय, बरोबरीचा मित्रपणा, वडीलपणाने केलेला सदुपदेश, बंधुप्रेमापोटीं केलेली क्षमा, पितृतुल्य प्रेम, प्रोत्साहनपर कौतुक, कृतज्ञतेचे अश्रु, परमपूज्य चरण इत्यादि अपर्णपत्रिकेंतील खुद्द गडकऱ्यांच्या शब्दांकडेही बारकाईने पाहावें. 'कृतज्ञतेचे अश्रु' हेंच मुळी अर्पणपत्रिकेचें शीर्षक आहे. अकृत्रिम सौहार्दाने सुगंधित व सुरुचिर झालेली, आणि उत्कट भावनांनी रसरसलेली असली काव्यात्म अर्पणपत्रिका मराठींत अन्यत्र दिसावयाची नाही.

'प्रेमसंन्यास' नाटकाचा प्रयोग होण्यापूर्वी दोन अडीच महिने कोल्हटकरांनी आपले 'फार चांगलें मत' गडकऱ्यांना हस्तलिखित वाचून कळविलें होतें हें २०–११–११ रोजीं लेल्यांना पाठविलेल्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. कोल्हटकरांचा आणि गडकऱ्यांचा पत्रव्यवहार चालत असला पाहिजे हें उघड आहे. (पत्र १०७ पाहावें.) तूर्त तरी कोल्हटकरांनी लेल्यांना पाठविलेल्या पत्रांवरच विसंबून राहणें भाग आहे. 'प्रेमसंन्यास' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची जाहिरात वर्तमानपत्रांत ('केसरी' ३०–१–१९१२) वाचल्या-बरोबर "त्यास पूर्ण यश येवो येवढीच इच्छा आहे." असें ते लेल्यांना ९–२–१२ रोजीं पाठविलेल्या पत्रांत म्हणतात (पत्र ७९). गडकऱ्यांनी ३१ जुलै १९१४ रोजीं कोल्हटकरांना पाठविलेलें एक पत्र 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकांत पृ. ११० वर आढळेल. उलट कोल्हटकरांनी गडकऱ्यांना पाठविलेली एकूण आठ पत्रें सदर पुस्तकांत आढळतील. या आठ पत्रांव्यतिरिद्ध कोल्हटकरांनी गडकऱ्यांस लिहिलेलें अन्य एकही पत्र उपलब्ध नाही हें आपलें दुर्दैव आहे.

'प्रेमसंन्यास' नाटकासंबंधी कोल्हटकरांनी अतिशय सहानुभूतीने गडकऱ्यांना ज्या तपशीलवार मार्मिक सूचना केल्या त्या 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकांत पृ. १२४–५ वर आढळतील.

३१ जुलै १९१४ रोजीं गडकऱ्यांनी कोल्हटकरांना 'वधूपरीक्षा' नाटकाची छापील प्रत मिळाल्याचें कळविलें आहे सदर पत्र 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकांत पृ. ११० वर आढळेल. या पत्रांत गडकऱ्यांनी प्रथमच आपल्या गुरूशीं बरीच अनुचित सलगी केली आहे. "पुस्तकाचें बहीरंग इतकें सुंदर साधलें आहे की प्रथम हें एखादें इंग्रजी पुस्तक आहे असा भास होतो. आजवर आपल्या नाटकांतली इंग्रजी वळणाविचाराचीं वाक्यें वाचतानांच काय तो असा ग्रह होत असे. वधूपरीक्षेच्या बाबतींत बहिरंगापासूनच या ग्रहाचा जन्म होतो.... प्रस्तुत पुस्तकांत मी आपणाला कोणतें साह्य केलें तें मला माझ्या पूर्वजन्मींच्या संचिताइतकेंच अज्ञात आहे. या आपल्या विनोदपूर्ण चमत्कारापुढे नाटकांतील सारे चमत्कार नित्यव्यवसायाइतकेच साधे वाटल्यावाचून राहणार नाहीत." शैली अप्रतिम आहे यांत शंकाच नाही. पण निदान कोल्हटकरांचा तरी गडकऱ्यांनी असा उपहास करावयास नको होता. १९१२ च्या डिसेंबरच्या अखेरीस 'प्रेमसंन्यासा' ची अर्पणपत्रिका लिहिणाऱ्या गडकऱ्यांच्या वृत्तींत दीड वर्षामध्ये हा जो बदल घडून आला तो लक्षणीय आहे. गडकऱ्यांची ही वृत्ति यापुढे अधिकच तीव्र होत गेली असें दिसतें.

तरी सुद्धा "रा. रा. गडकऱ्यांचे अलीकडील लेख मला बरेच आवडले" असा संतोषाचा उद्‌गार कोल्हटकरांनी २०–५–१५ रोजी लेल्यांना पाठविलेल्या पत्रांत काढला आहे. (पत्र १३२). कोल्हटकरांचें गडकऱ्यांच्या बाबतींतील हेंच सौहार्द अखेरपर्यंत कायम राहिलेलें दिसतें. पण गडकऱ्यांनी मात्र 'सहचारिणी' नाटकाच्या प्रकरणांत कोल्हटकरांशी अतिशय अश्लाध्य वर्तन केलें. याचा उल्लेख गुर्जरांच्या संदर्भांत येऊन गेला आहे. गडकऱ्यांची पूर्वीची (म्हणजे 'प्रेमसंन्यास' नाटकाची अर्पणपत्रिका लिहिण्याच्या वेळची ) वृत्ति आणि १९१८ सालची वृत्ति यामध्ये जी विसंगती होती तिने कोल्हटकरांच्या ह्रदयाला जखम केली, आणि तिच्या वेदना कालान्तराने कमी झाल्या तरी नाहीशा झाल्या नाहीत. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी कोल्हटकरांनी लेल्यांना १५–५–२१ रोजीं जें पत्र लिहिलें (पत्र १५६) त्यांत त्यांनी आपल्या मनांत दडपून ठेवलेल्या साऱ्या भावना मोकळेपणाने प्रकट केल्या आहेत. "खुद्द रा. गुर्जरांचे मत सहचारिणी नाटक मराठी हास्यरसोत्पादक नाटकांत पहिले आहे व परिवर्तन नाटक सर्वोत्कृष्ट झाले आहे असे प्रथम होते. ते मागाहून रा. गडकऱ्यांमुळे बदलले. परंतु रा. गडकरी हे किती आग्रही असत हे त्यांच्या मते वधूपरीक्षा अगदीच टाकाऊ आहे या एकाच गोष्टीवरून सिद्ध होते. (वधूपरीक्षेच्या बहिरंगासंबंधीं गडकऱ्यांनी लिहिलेला मजकूर वर त्यांनी ३१ जुलै १९१४ रोजी लिहिलेल्या पत्रांत आला आहे.) कै. गडकऱ्यांशी मी

चांगल्या तऱ्हेने वागत असता त्यांना आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात काही दिवस मजविषयी वैर वाटावे हा दैवदुर्विलास आहे. त्या वैरास माझे वर्तन यत्किंचितही कारण झाले नाही ही मला समाधान मानण्यास जागा आहे. त्यांचे ठायी मजविषयी एका तऱ्हेची ईर्ष्या उत्पन्न झाली होती व तिला जवळच्या तोंडपुज्यांकडून पोषण मिळाले होते. नाटके लिहिण्यात माझी द्रव्यदृष्टी मुळीच नसती तरी सुद्धा ती ईर्ष्या प्रकट झाली नसती असे नाही. कै. गडकरी किंवा इतर स्नेही अथवा जनता पुष्कळदा किती क्षुल्लक हेतूनी प्ररित होते याचा मला आजपर्यंत जो अनुभव आला आहे त्यावरून मी त्यांच्या कलाकडे लक्ष न देता माझ्या ध्येयाकडेच लक्ष द्यावे हे सर्वथा उचित आहे." (पत्र १४६, १२–५–१९२१)

गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर सव्वादोन वर्षांनी कोल्हटकरांनी सदर पत्र लिहिलें आहे. १९१४ च्या जुलै अखेरपासून कोल्हटकरांविषयीं गडकऱ्यांच्या वृत्तीमध्ये जो चमत्कारिक बदल झाला, आणि 'सहचारिणी' व 'जन्मरहस्य' नाटकांच्या प्रयोगापर्यंत सतत अधिकाधिक कटु आणि विकृत होत गेला, त्यामुळे कोल्हटकरांसारख्या कमालीच्या शांत स्वभावाच्या धीरगंभीर पुरुषाच्या मनालाही इंगळ्या डसल्या आणि त्या वेदना त्यांच्या मनातून कधीच कायमच्या नष्ट झाल्या नाहीत. व्यवहारांतील वधूपरीक्षेच्या वेळीं प्रथम बहिरंगाचा (म्हणजे वधूच्या बाह्य रूपाचा) विचार करतात त्याप्रमाणें 'वधूपरीक्षा' नाटकाच्या पुस्तकाच्या बहिरंगाचाच गडकऱ्यांनी विचार केला, आणि अंतरंगाकडे पूर्ण दुर्लक्ष केलें. ज्यांच्या 'कलावती वाणी' चा स्वतः गडकऱ्यांनी आपल्या 'महाराष्ट्रगीतां' त गौरव केला आहे, त्या भाषाप्रभु कोल्हटकरांना गडकऱ्यांच्या या मार्मिक कोटींतील इंगित कळणार नाही असें शक्य तरी कसें आहे? गडकऱ्यांच्या कोटींतील तीक्ष्ण डंख त्यांना जाणवलाच. नुसता जाणवला नाही, तर झोंबला. "आपणांस त्या पुस्तकाचे (म्हणजे 'वधूपरीक्षा' नाटकाच्या पुस्तकाचें) बाह्यांगच का होईना, आवडल्याचे वाचून आनंद झाला" असे त्यांनी १८–१२ १९१४ रोजीं गडकऱ्यांना लिहिलेल्या पत्रांत सौम्य खोचकपणाने लिहिलें आहे.

स्वतःच्या नाटकावर इतरांनी टीका केली तर गडकरी कमालीचे अस्वस्थ होत असत. गडकऱ्यांना १९०७ सालापासून ज्यांनी अगदी जवळून पाहिलें होतें त्या केशवराव दात्यांनी 'गर्वनिर्वाण' नाटकावर भोवतालच्या माणसांनी प्रतिकूल टीका केल्यामुळे गडकरी किती विलक्षण अस्वस्थ झाले होते यासंबंधीं दिलेल्या आख्यायिकेचा उल्लेख मागे येऊन गेला आहे. "इतकेंच नव्हे तर काही काही मंडळी त्यांची त्यावेळी चेष्टाच करीत असल्याचें खुद्द गडकरी मास्तरनी अगदी चिडून जाऊन महाराष्ट्र मंडळींत सांगितलें आहे" हें केशवराव दात्यांचें वाक्य येथे मुद्दाम पुनरुक्त करीत आहे. स्वतःच्या कृतीवर झालेल्या प्रतिकूल टीकेच्या बाबतींत कमालीच्या हळव्या असलेल्या गडकऱ्यांनी कुत्सित टीका कोणाच्या नाटकावर केली? तर 'प्रेमसंन्यास' नाटकाच्या निमित्ताने ज्यांच्या चरणीं त्यांनी माथा ठेविला होता, आणि कृतज्ञतेच्या अश्रूंनी ज्यांचे 'परमपूज्य' चरण त्यांनी ओलेचिंब केले होते त्या आपल्या 'परमपूज्य लेखनगुरू' च्या— कोल्हटकरांच्या— नाटकावर! 'प्रेमसंन्यास' नाटकाला जें उज्ज्वल यश प्राप्त झालें तें यश त्यांच्या मस्तकांत तर शिरलें नसेल ना? ते काहीही असो! गडकऱ्यांच्या मनांत गुरूविषयीं ईर्ष्या उत्पन्न होणें हा दैवदुर्विलास आहे यांत शंकाच नाही.

⁕

पु. रा. लेले, वि. सि. गुर्जर, आणि गडकरी या तीन निकटवर्ती मित्रांशीं कोल्हटकरांचे जे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते ते शिथिल होऊन त्यांच्यामध्ये जो दुरावा निर्माण झाला त्याची ही कहाणी अतिशय खेदजनक आहे. नाटककार या नात्याने निरनिराळ्या नाटकमंडळ्यांशीं त्यांचा जो संबंध आला त्याचाही

इतिहास असाच आहे. 'वीरतनय' हें कोल्हटकरांचें पहिलें नाटक किर्लोस्कर मंडळीने रंगभूमीवर आणलें. यानंतर 'मूकनायक' 'गुप्तमंजूष' 'मतिविकार' आणि 'प्रेमशोधन' हीं त्यांचीं नाटकें किर्लोस्कर मंडळीनेच रंगभूमीवर आणलीं. फक्त कोल्हटकरांचींच नाटकें करण्याचा मक्ता किर्लोस्कर मंडळीने घेतला आहे. अशा प्रकारची टीकाही 'मतिविकार' रंगभूमीवर आल्यावर अनेकांनी केल्याचें 'रंगभूमि' मासिकांतच नमूद आहे. कोल्हटकरांनी २३-८-१९०९ रोजीं जें पत्र पाठविलें (पत्र १८) त्यांत पुढील वाक्य आहे– "अलीकडे नाट्यसृष्टीचे पूर्वीइतके कौतुक वाटत नाही. याचे एक कारण वाढते वयोमान व दुसरे कारण नाटक-मंडळ्यांचा प्रत्यक्ष अनुभव हे असावे." नाटक मंडळ्यांचा अनुभव म्हणजे किर्लोस्कर मंडळीचा अनुभव असें समजावें. प्रस्तुत पत्र (पत्र १८) लिहिण्याच्या वेळीं आलेला ताजा अनुभव म्हणजे किर्लोस्कर थिएटरचें उद्घाटन २१ ऑगस्ट १९०९ रोजी झालें. उद्घाटनाच्या पूर्वी समारंभाची तारीख १५–२० दिवस आगाऊ कळविण्याचें शंकरराव मुजुमदारांनी कबूल केलें होतें. परंतु प्रत्यक्षांत मात्र समारंभाची निमंत्रणपत्रिका कोल्हटकरांनी १९–८ रोजीं म्हणजे समारंभाच्या अगोदर फक्त दोनच दिवस मिळाली. या गोष्टीचें कोल्हटकरांना फार वैषम्य वाटलें असलें पाहिजे हें या पत्रावरून उघड दिसतें. नाटककार या नात्याने कोल्हटकरांचा किर्लोस्कर मंडळीशीं सतत तेरा वर्षे संबंध होता. असें असल्यामुळे मंडळीच्या इतिहासांतील एका अतिशय महत्त्वाच्या प्रसंगीं मंडळीचे मॅनेजर शकरराव मुजुमदार यांनी कोल्हटकरांना फार अगत्याने आणि मानाने वागवावयास हवें होतें. काही अडचणीमुळे निमंत्रणपत्रिका पोस्टाने रवाना होण्यास उशीर झाला असला तर तार पाठवावयास हवी होती. मंडळीने कोल्हटकरांविषयीं दाखविलेली ही अक्षम्य अनास्था कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नाही. नारायणराव जोगळेकरांच्या मृत्यूची बातमी मंडळीने ताबडतोब कोल्हटकरांना कळवावयास नको होती काय? जोगळेकरांचा मृत्यू १५-११-१९११ रोजीं झाला. पण १७-१२-११ पर्यंत तरी या बाबतींत मंडळीकडून त्यांना काहीच कळलें नव्हतें असें पत्र ७७ वरून दिसतें. अगदी साधा शिष्टाचार एवढ्या प्रतिष्ठित नाटककाराच्या बाबतींतही न पाळणाऱ्या कंपनीला म्हणावें तरी काय?

'सहचारिणी' नाटकाच्या बाबतींत गंधर्व नाटक मंडळीचा जो वाईट अनुभव आला त्याचा उल्लेख पत्र १४९ मध्ये आहे. गंधर्व मंडळीकडून जें वर्तन घडलें तसेंच वर्तन केशवराव भोसले यांच्याकडूनही घडल्याचा उल्लेख पत्र १५० मध्ये आहे. 'वधूपरीक्षा' नाटकाच्या अस्सल प्रतीवरून महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक अण्णासाहेब कारखानीस यांच्याशीं आलेल्या वैमनस्याचा उल्लेख 'आत्मवृत्त' पृ. ८४ वर आढळेल.

नाटक मंडळ्यांचे कोल्हटकरांना जे वाईट अनुभव आले त्यांच्यापैकी काहींचा वर उल्लेख केला आहे. आणखी काही निवडक अनुभवांचा उल्लेख त्यांच्या आत्मवृत्ताच्या आधाराने करतो.

'वीरतनय' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळीं नगर येथे कोल्हटकर व त्यांचे काही स्नेही किर्लोस्कर मंडळीच्या बिऱ्हाडीं राहिले असतां मडळींतील काही प्रमुख गृहस्थांनी त्यांचा मुद्दाम अपमान केल्यामुळे कोल्हटकर आपल्या स्नेह्यांसमवेत मंडळीच्या बिऱ्हाडासमोरच एक बंगला घेऊन तेथे राहावयास गेले. (आत्मवृत्त, दुसरी आवृत्ती, पृ. १४). १८९६ सप्टेंबरमध्ये 'वीरतनयां' चा प्रयोग मुंबईस झाला. किर्लोस्कर मंडळीच्या सेक्रेटरींनी प्रयोगाचें समक्ष आमंत्रण कोल्हटकरांना केलें नाही. प्रयोगाच्या दिवशीं अगदी संध्याकाळीं एका 'किरकोळ' मनुष्याकडून प्रयोगाचें निमंत्रण पाठविल्यामुळे कोल्हटकरांना राग आला, आणि ते स्नेह्यांसह तिकिट काढून नाटकाला गेले आणि बाहेर प्रेक्षकांमध्ये बसले (आत्मवृत्त, पृ. १७). किर्लोस्कर मंडळीमध्ये जेवणाच्या पंक्तींतही मानाचीं पानें ठरलेलीं असत. मानाचें पहिलें पान नाटककाराचें असे. पण एकदा मुजुमदारांनी पहिलें पान पटकावलें. दुसऱ्या दिवशींही असेंच घडलें. तिसऱ्या दिवशीं कोल्हटकरांनी आपलें जेवण मुख्य पंक्तीच्या अगोदरच उरकून घेतलें, आणि संभाव्य

मानहानी टाळली. (आत्मवृत्त, पृ. ३४). नाटकाच्या ठरलेल्या रॉयल्टीची रक्कम देण्याच्या बाबतींत टाळाटाळ करण्याचे प्रकार किर्लोस्कर मंडळीसारख्या मातबर कंपनीकडून व्हावेत याचें नवल वाटतें. (आत्मवृत्त, ४७, ५८, ६०).

ज्या किर्लोस्कर मंडळीसाठी कोल्हटकरांनी पाच नाटकें लिहिलीं त्या मंडळीची ही अशी वागणूक! आता मासिकाच्या संपादकाच्या वागणुकीचें दिग्दर्शन करतो. मनोरंजन मासिकाचे संपादक काशिनाथ रघुनाथ मित्र यांचे आणि कोल्हटकरांचे संबंध अगदी जिव्हाळ्याचे होते. तात्यासाहेब केळकरांच्या ‘तोतयांचे बंड’ या नाटकाचें अतिशय विस्तृत परीक्षण कोल्हटकरांनी १९१४ सालीं ‘मनोरंजना’ च्या एकूण पाच अंकांमध्ये केलें. तसेंच १९१७ सालीं ‘मनोरंजनाच्या’ च्या १ ते ५ या अंकांमध्ये त्यांनी ‘नाट्यकलारुक्‌कुठार’ कर्ते ठोसर यांच्या ‘प्रेमाभास’ या नाटकाचें असेंच विस्तृत परीक्षण केलें. तसेंच ‘मनोरंजनां’ त त्यांच्या अकरा कविता प्रसिद्ध झाल्या. इतरही काही लेख वेळोवेळीं 'मनोरंजनां' त प्रसिद्ध झाले. (आत्मवृत्त, पृ. ३४ पाहा.) असे उभयतांचे संबंध असतां १९१४ सालीं ‘वधूपरीक्षा’ नाटकाच्या छपाईच्या निमित्ताने त्यांच्यांत व संपादक मित्र यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. “माझ्या मनांतील अढी अजून दूर होत नाही.” असें त्यांनी १९१८ सालीं आत्मवृत्तांत लिहून ठेवलें आहे. (आत्मवृत्त, पृ. ६५-६६).

शिवराज संगीत मंडळीचे मालक गोविंदराव टेंबे, नूतन संगीत मंडळीचे मालक रामभाऊ कुंदगोळकर, भारत नाटक मंडळीचे मालक अप्पा टिपणीस इत्यादि नाटक मंडळ्यांच्या मालकांकडे थकलेल्या बाक्यांपैकी १९१८ सप्टेंबर मध्ये निर्वाणीची पत्रें पाठवूनही एक पै देखील वसूल झाली नाही. यामुळे या सर्व प्रतिष्ठित मालकांचे व कोल्हटकरांचे संबंध बिघडले. अण्णासाहेब कारखानीसांनी ‘वधूपरीक्षा’ नाटकाच्या प्रयोगाच्या परवानगीबद्दल फक्त १०३ रुपये ४ आणे दिल्यामुळे त्यांच्याविषयींही कोल्हटकरांचें मन शुद्ध राहिलें नाही.

“अशा मनःस्थितीत या सर्वांच्या संपर्कापासून दूरगावीं राहणेंच त्यांच्या व माझ्या स्वस्थतेच्या दृष्टीने श्रेयस्कर आहे असा उद्विग्नतेचा उद्‌गार काढून कोल्हटकरांनी ऋणानुबंधाच्या ताटातुटीच्या या खेदकारक प्रकरणावर पडदा टाकला आहे. (आत्मवृत्त, पृ. १३-१-१३२).

*

नाटककार म्हणून कोल्हटकर महाराष्ट्राला परिचित झाले ते ‘वीरतनय’ नाटकाच्या निमित्ताने १८९६ सालीं. त्याच्यापूर्वी ते टीकाकार म्हणून प्रसिद्धीला आले होते. ‘विक्रमशशिकला’ या नाटकावरील त्यांची टीका १८९३ सालीं प्रसिद्ध झाली.

त्यांच्या ‘वीरतनय’ नाटकावर कडक प्रतिकूल टीका ‘विविधज्ञानविस्तारां’ त आल्यावर ‘वीरतनयाची ढाल’ या मथळ्याचें उत्तर त्यांनी १८९८ सालीं ‘विविधज्ञानविस्तारां’ तच दिलें. यानंतर मात्र आपल्यावर झालेल्या टीकेला त्यांनी जाहीर उत्तर दिलें नाही. त्यांच्या ‘गुप्तमंजूष’ नाटकावर ‘नाट्यकलारुक्कुठारां’ त स. ना. ठोसर यांनी अतिशय कुत्सित उपहासप्रचुर टीका केली तरी त्यांनी त्या टीकेला उत्तर दिलें नाही. पण त्यांच्या मनांत हें शल्य रुतून राहिलें होतें. ठोसरांच्या ‘प्रेमाभास’ या नाटकावर झणझणीत टीका लिहून १९१७ सालीं कोल्हटकरांनी आपल्या मनांतलें हें शल्य काढून टाकलें.

लेल्यांना लिहिलेल्या पत्रांमध्ये मधून मधून कोल्हटकरांचे टीकाविषयक विचार प्रकट झाले आहेत. "वीरतनय बाहेर आल्यापासून मी टीका करितांन विशेषतः नाटकावर टीका करताना, अत्यंत सौम्य भाषा वापरीत आलो आहे.... ज्या पुस्तकांसंबधाने कडक भाषा वापरली आहे त्यासंबंधाने सदसद्विवेकबुद्धीस साक्ष ठेवून सौम्य भाषा वापरण्यासारखी नव्हतीच. माझ्या टीकेची तीव्रता हल्ली इतकी नाहीशी झाली आहे की, मी टीकेकरता आलेल्या पुस्तकांची अवास्तव स्तुती करतो असा माझ्या स्नेह्यांचा मजवर आरोप आहे." (पत्र ४३, १–१०–१०).

"कोणत्याही लेखावर हत्यार उपसावयाचे वेळीं आपल्या रक्तबिंदूपासून असंख्य राक्षस निर्माण करणाऱ्या अहि नामक दैत्याची मला नेहमी आठवण येते. बहुशः प्रत्येक कडक लेखाचा कल दुसरे कडक लेख उत्पन्न करण्याकडे असतो. तरीपण मला या बाबतींत पुन्हा ढाल पुढे करण्याचा प्रसंग येणार नाही, अशी आशा आहे असे कोल्हटकरांनी १८९८ सालीं 'वीरतनयाची ढाल' या आपल्या लेखाच्या शेवटीं म्हटलें होतें. आपलें हें म्हणणे त्यांनी खरें करून दाखविलें. 'गुप्तमंजूषा' वर ठोसरांनी जहरी टोका केली तरी कोल्हटकरांनी त्या टीकेची दखल घेतली नाही. तें काम पुढे लेल्यांनी केलें. 'गुप्तमंजूषा' नंतर कोल्हटकरांनी जीं नाटकें लिहिलीं त्यांच्यावर झालेल्या कडक प्रतिकूल टीकेला स्वतः कोल्हटकरांनी उत्तर दिलें नाही. 'प्रेमशोधन' नाटकावर रा. सा. कानिटकरांनी केलेल्या झणझणीत टीकेला तितकेंच झणझणीत उत्तर दिलें तें लेल्यांनीच. कोल्हटकरांनी जाहीरपणें एक अक्षरही उत्तरादाखल लिहिलें नाही. पण लेल्यांना लिहिलेल्या खाजगी पत्रांतही त्यांनी कडवटपणा प्रकट केला नाही. लेल्यांनी प्रेमशोधनावरील आपल्या लेखाचें हस्तलिखीत अवलोकनासाठी कोल्हटकरांकडे पाठविलें होतें याला पत्र ५० मध्ये पुरावा उपलब्ध आहे. रा. सा. कानिटकरांच्या 'कुटुंबासंबंधाच्या अनुभवाचा' उल्लेख वगळण्याची त्यांनी लेल्यांना विनंती केली आहे. तथापि एकंदरींत लेल्यांनी रा. सा. कानिटकरांना दिलेलें उत्तर कोल्हटकरांना आवडलेलें दिसतें. (पत्र ५०). एक गोष्ट खरी की स्वतःच्या नाटकावर दुसऱ्याने लिहिलेली अनुकूल टीका नियतकालिकाकडे पाठविण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला आहे. (पत्र ४१). इतकेंच नाही तर आपल्या कवितेची विनाकारण स्तुति न करण्याची सूचना त्यांनी वरेरकरांना केली आहे. (पत्र १५८)

आपल्या नाटकांवर टीकाकारांनी वेळोवेळीं फारच कडक प्रतिकूल टीका केल्यामुळे कोल्हटकरांची वृत्ति या बाबतींत हळवी झालेली दिसते. जाहीर वर्तमानपत्री टीकेचें राहूं द्याच. पण खाजगी रीतीने केलेल्या टीकेच्या बाबतींतही ते किती हळवे झाले होते याचा पुरावा पत्र १०० मध्ये आढळेल. "रा. केळकर मजबद्दल काय म्हणाले हे कळण्याची फार इच्छा आहे. त्याचा मी आपणांवर फारसा परिणाम होऊ देणार नाही व ती गोष्ट कोणासही सांगणार नाही असे मी कबूल करितो." पत्र १०१ मध्ये याच बाबतींत आणखी एक वचन आहे. "रा. रा. केळकर यांचें म्हणणें मला कळल्यास तुमची काही हरकत नसेल तर मला जरूर कळवावे. त्याबद्दल मला काहीशी हुरहुर लागली आहे."

इतरांनीं आपल्या नाटकावर केलेल्या टीकेच्या बाबतींतील कोल्हटकरांचा हळवेपणा दिवसानुदिवस वाढतच गेला, आणि शेवटीं त्याचें पर्यवसान आत्मगुणावमानांत झालें. प्रतिकूल टीकेच्या बाबतींत खाडिलकरांची वृत्ती आणि कोल्हटकरांची वृत्ती यांच्यामध्ये महदन्तर आहे. 'मानापमान' नाटकापासून टीकाकारांनी खाडीलकरांवर टीकेची जी झोड उठवली ती अगदी बेसुमारच! खाडिलकरांच्या 'मानापमान' व 'विद्याहरण' या नाटकांवर जे टीकालेख आले त्यांच्यांतील झणझणीतपणाच्या तुलनेने कोल्हटकरांवर झालेल्या टीका कितीतरी सौम्यच म्हणाव्या लागतील. पण कितीही प्रखर टीका झाली तरी खाडीलकर अगदी निर्विकार, निर्लेप, निरंजन राहिले. त्यांनी त्या


टीकांकडे लक्षच दिलें नाही. अशा टीका खाडीलकर वाचीतच नसत. इतकेंच नव्हे तर त्या बाबतींत ते कुणालाही काहीही विचारीत देखील नसत असें एकदा पु. रा. लेले माझ्याजवळ म्हणाले होते. 'आत्मगुणावमान' हा शब्द मी नुकताच वापरला आहे. हा शब्द कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुन्तल' नाटकांत आला आहे. आत्मगुणावमान म्हणजे स्वतःच्या ठायीं असलेल्या वास्तविक गुणांच्या बाबतींतही साशंक राहणें आणि स्वतःकडे कमीपणा घेणें. कोल्हटकर आपल्या नाटकांमध्ये असलेल्या वास्तविक गुणांच्या बाबतींतही 'प्रेमशोधना' नंतर असेच साशंक आणि संकोची वृत्तीचे बनले याला त्यांनी लेल्यांना पाठविलेल्या पत्रांमध्ये भरपूर पुरावा आहे. अप्पा टिपणीसांच्या 'मत्स्यगंधा' नाटकाचा प्रयोग चांगला झाला आहे आणि तें लोकप्रिय होत आहे असें समजल्यावर त्यांना आनंद झाला हें खरें आहे. पण आपलें नवीन नाटक ('वधूपरीक्षा') चांगलें होईल की नाही या शंकेने त्यांचे मन अस्वस्थ झालें आहे. "माझें नाटक चांगलें होईलच अशी खात्री मलाही वाटत नाही.... मला तर फार शंका आहे (पत्र ९०). "शिवाय माझें नाटक चांगले होईलच अशी हमी मला कशी देतां येणार?" (पत्र १४१). आपल्या नाटकापासून गंधर्व मंडळीला अर्थिक लाभ मुळीच झाला नाही या विचाराने ते अस्वस्थ झाले आहेत. (पत्र १४९). आपलीं नाटकें पैसा मिळवून देणारीं नसल्यामुळे गेलीं काही वर्षे नाटकमंडळ्या आपल्याशीं बेपर्वाईने वागत आल्या आहेत हा विचार त्यांच्या मनाला त्रस्त करीत आहे. (पत्र १५०).

'प्रेमशोधना' पासून नुसत्या प्रतिकूल टीकेमुळे कोल्हटकर हळवे व संकोची बनले असें नसून एकंदरींतच त्यांची वृत्ती अंतर्मुख व संकोची बनत गेली असें दिसतें. आपल्या हेतूच्या बाबतींत कोणाच्याही मनांत शंका येऊं नये यासाठी ते फार जपून वागूं लागले. 'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत कारखानिसांना पाठविण्याच्या निमित्ताने जें प्रकरण घडलें तें याची साक्ष देईल. (पत्र ११०). 'वधूपरीक्षा' नाटक आपण केवळ भारत नाटक मंडळीसाठीच लिहिलें असें जाहिरातींत प्रसिद्ध झाल्यामुळे आपल्याविषयीं इतर कंपन्यांचा गैरसमज होईल या कल्पनेने ते असेच अस्वस्थ झाले. (पत्र १०६). सर्वांना संतुष्ट ठेवण्याचीच तळमळ यांतून दिसून येते. आपण खऱ्या अर्थाने यशस्वी व लोकप्रिय नाटककार कधीच नव्हतो या विचाराची टोचणी पुढे पुढे त्यांच्या मनाला लागली. (पत्र १५६) याचें कारण त्यांच्या वृत्तींत झालेला बदल हेंच होय. वि. सी. गुर्जर आणि गडकरी या परम मित्रांनी 'सहचारिणी' नाटकाच्या बाबतींत जी कुचेष्टा आरंभिली तिच्यामुळेही त्यांची ही बदललेली वृत्ति अधिकच उत्कट व तीव्र झाली असेल. 'सहचारिणी' नाटक अयशस्वी ठरलें हें खरें आहे. पण त्यामुळे कोल्हटकरांनी इतकी खंत करण्याची जरूर नव्हती. केवळ 'शारदा' व 'मूकनायक' या नाटकांमुळे भाऊराव कोल्हटकरांच्या पश्चात् किर्लोस्कर कंपनी टिकाव धरून राहिली; 'शारदा' नाटकाच्या खालोखाल 'मूकनायक' नाटक किर्लोस्कर मंडळीची इभ्रत टिकविण्यास कारण झालें असें गोविंदराव टेंबे यांनी 'मूकनायक' नाटकाच्या यशाचें गुणगान केलें आहे. ( 'माझा जीवनविहार' पृ. ८८). हें नाटक १९०१ सालीं प्रथम रंगभूमीवर आलें. नवीन गावांतील मुक्काम सुरू करतांना पहिला खेळ 'मूकनायक' लावण्याचा किर्लोस्कर मंडळीचा प्रघात असे असें पु. रा. लेले एकदा माझ्याजवळ बोलल्यांचें चांगलें आठवतें. १९१३ ते १९१५ या तीन वर्षांच्या अवधींतील कागदोपत्री पुरावा मजजवळ आहे. किर्लोस्कर मंडळी नवीन मुक्कामाचा पहिला खेळ बहुतकरून 'मूकनायक' हाच लावीत असे हें लेल्यांचें म्हणणे अगदी बरोबर आहे. १९१३ सालीं किर्लोस्कर मंडळीचे सोलापूर, पंढरपूर, मिरज, आणि कोल्हापूर या गावांतील मुक्काम मूकनायकाने सुरू झाले. गंधर्व मंडळीचा मुहूर्ताचा पहिला प्रयोग मूकनायक हाच होता. (३ सप्टेंबर १९१३). गंधर्व मंडळी फुटून निघाल्यावर अवशिष्ट किर्लोस्कर मंडळीने मूकनायक हाच पहिला खेळ केला. (१९ जुलै १९१३). १९१४ सालीं म्हापसे आणि पणजी येथील मुक्काम मूकनायकानेच सुरू झाले. १९१५ सालीं हैदराबाद, औरंगाबाद, कोल्हापूर हे मुक्कामही मूकनायकानेच सुरू झालें. हा तपशील देण्याचें कारण स्पष्ट करतो. प्रेमशोधनानंतर कोल्हटकरांच्या नाटकावर जी कडक टीका

झाली तिच्यामुळे त्यांनी इतकें खिन्न व्हावयास नको होतें. मूकनायकाच्या यशाचा व लोकप्रियतेचा पुरावा त्यांच्यासमोर होताच की! ‘विद्याहरण’ नाटकावर अतिशय जहरी टीका झाली तरी ती टणकपणाने पचवून अवघ्य तीन वर्षांनी ‘स्वयंवर’ नाटकांत खाडिलकर यशाच्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झाले. हा सारा मनोवृत्तीचा महिमा आहे. कोल्हटकरांच्या बाबतींत हें व्हावयाचें नव्हतें!



श्री. कृ. कोल्हटकर



श्री. कृ. कोल्हटकर यांचे हस्ताक्षर



पु. रा. लेले

P. R. Lele
B. A., LL. B.
Author & Journalist

डॉ. रा. शं. वाळिंबे M.A., Ph.D
पुणे ४

TARABAG A/12,
BOMBAY 4.
१जा|१| 196५


सप्रेमनमस्कार.

सूर्यग्रहणाचा काळ मंत्रसाधनेला अनुकूल असतो. तितके पवित्र नसले तरी मला अगत्याचे वाटणारे जे एक काम आहे ते मी या प्रसंगी करतो.

(१) माझ्याजवळ माझ्या प्रसिद्ध झालेल्या लेखांची जीं जीं कात्रणें आहेत तीं माझ्या पश्चात् आपण मागून घेऊन जावे.

(२) कोल्हटकर, खाडिलकर, देवल, वामणगांवकर, रेगे, माधवराव टिपणीस, माडखोलकर, यांची पत्रेंहि आपण घेऊन जावे.

(३) माहितीची टांचणें इतस्ततः विखुरलेली आहेत. निरनिराळ्या पुस्तकांत माहिती लिहिलेली आहे. छोट्या मोठ्या चोपड्यांत (notebook) माहिती नमूद केलेली


सांपडेल. तीजर (अथवा जिलकी)
हालो आणतां आली तर तीहि आपण
मागून घेऊन जावें,

आपल्याशि विषय त्या साधनांच्या
योग्य उपयोग करणारा दुसरा कोणीहि
माझ्या माहितींत नाहीं. सबब पूर्ण
विचारांतीं, सावधानचित्ताने मी या
सगळ्यांवर आपल्या एकट्याच्या लक्ष
हस्तगत करीत आहे.

आज तरी निदान माझी बुद्धि
क्षोभित अथवा विचलित झाली आहे
असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. अकूल-
हशारीनें मी हें पत्र स्वतः लिहितें आहे
व या खालीं सही माझीच आहे.
बहुत काय लिहिणें. आपणांस परमेश्वर
अशा मनोगीचें यश देवो! लोभ असावा.

पु. रा. लेले

श्री. पु. रा. लेले यांचें पत्र

१

खामगाव २५-१-०९

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. माझ्या लेखांपासून मला जे काही लाभ झाले आहेत त्यात नवीन स्नेह्यांची जोड हा मी एक मोठा लाभ समजतो. आपणांशी घडून आलेला नवीन स्नेह दिवसेंदिवस वृद्धिगत होत जाईल अशी आशा आहे. आपला गुरू होण्याची माझी पात्रता आहे असे मला वाटत नाही.

वऱ्हाडात रा. रा. रामभाऊ लेले या नावाचे शाळाखात्यात एक गृहस्थ आहेत त्यांचे आपण संबंधी आहात काय? असल्यास आपली भेट येथे होण्याचा मागेपुढे संभव आहे. एखाद्या सुट्टीत आपले वऱ्हाडात येणे झाल्यास येथे येण्याची विनंती आहे.

मूकनायक नाटकावर 'सरस्वतीमंदिर' मासिक पुस्तकात सुमारे ४-५ वर्षांपूर्वी एक टीका आली होती. इतर टीका झाल्या असल्यास मला माहीत नाहीत.

मूकनायकासंबंधाने आपणांस ज्या सूचना करावयाच्या असतील त्या अवश्य कराव्या. त्या जरी पुढे आळसामुळे मजकडून अमलात आल्या नाहीत तरी त्यांच्या योग्य विचार करण्याचे मी अभिवचन देतो.

कळावे, लोभाची वृद्धी व्हावी ही विनंती.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

२

खामगाव ३०-१-०९

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. माझ्या लेखांमुळे मला ज्या स्नेह्यांची प्राप्ती झाली ते साहजिकच मजपेक्षा तरुण व कमी अनुभवाचे आहेत. परंतु त्यामुळे आमच्या स्नेह्यला कोणत्याही प्रकारे कमीपणा येत नाही. मला आदरापेक्षा प्रेम फार आवडते. त्या शिवाय संभाषणात व पत्रव्यवहारात मोकळेपणाने राहात नाही.

माझ्या गेल्या पत्रात औपचारिक असे काहीच नव्हते. जे जे मी लिहिले होते ते सर्व अंतःकरणपूर्वकच होते. आपल्यासारख्यांचा गुरु होण्याची माझी योग्यता नाही असेच मला वाटते. आपला मित्र होण्याची माझे अंगी पात्रता असली म्हणजे झाले. त्याहून माझी अधिक इच्छा नाही.

आपली येत्या मे महिन्यात गाठ पडण्यासारखी आहे. मी त्या महिन्यात ८-१० दिवस तरी पुण्यास जाईन. आपले गाव पुण्याजवळ असल्यास आपणांस तेथे येता येईल. एका भेटीने जितकी ओळख होण्यासारखी असते तितकी अनेक पत्रांनी होत नाही.

आपले चरित्र व भावी महत्त्वाकांक्षा कळण्याची फार इच्छा आहे. तरी पुढील पत्रात सवडींप्रमाणे त्याबद्दल सविस्तर माहिती देण्याची कृपा करावी व आपला फोटो असल्यास मजकडे त्याची एक प्रत धाडावी. माझा फोटो मजपाशी शिल्लक नाही. 'किर्लोस्कर संगीत मंडळी' या नावाचे एक लहान पुस्तक त्या मंडळीकडे चार आण्यांस मिळते. त्यात माझा फोटो आहे.

मूकनायकाची दुसरी आवृत्ती लवकर काढावी लागेल असे वाटत नाही. सबब आपल्या सूचना सवडीप्रमाणे आल्या तरी चालेल.

कळावे, लोभ असावा ही विनंति.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

३

खामगाव ६-२-०९

आशीर्वाद विशेष

तुमचे पत्र पावले. त्या पत्राप्रमाणे अक्षरशः वागण्याचा मी संकल्प केला आहे हे तुमच्या लक्षात आले असेलच.

रंगभूमीच्या अंकात मुजूमदार व नानासाहेब जोगळेकर यांच्यामध्ये असलेला फोटो माझा नाही. कारण मी किर्लोस्कर मंडळींबरोबर कधी फोटो काढविला नाही. तो फोटो बहुधा मंडळीच्या मालकांपैकी एक गृहस्थ रा. रामभाऊ किंजवडेकर यांचा असावा.

रा. रा. गोविंदराव देवल यांचा पत्ता :—हरिपूर (सांगली जवळ), संस्थान सांगली. आमचे मूळचे राहाण्याचे गाव कोकणातील नेवरे हे आहे. त्यापूर्वीचेही गाव नेवऱ्याजवळचे कोळेत हे होते असे कळते. मी कधीही कोकणात गेलो नसल्यामुळे मी यांपैकी एकही गाव पाहिले नाही.

माझे पणजे नेवरे सोडून वाई मुक्कामी राहावयास आले. कै. वा. महादेवशास्त्री कोल्हटकर हे माझे चुलत आजे. त्यांनी अथेल्लोचे मराठीत भाषांतर केले असून हे वक्तेही चांगल्यापैकी होते. यांनी माझे सख्खे चुलते रा. ब. वामनराव कोल्हटकर यांस दत्तक घेतले. माझे वडील सुमारे ४० वर्षांपूर्वी वाई सोडून नोकरीच्या निमित्ताने वऱ्हाडात आले. ते प्रथम उमरावतीस शिक्षक होते. त्यानंतर मुलकी खात्यात शिरून हळूहळू चढत चढत ते सबजज्ज झाले. ते १८९७ साली निवर्तले. तेव्हा त्यास १२५ रु. पेन्शन होते.

तुम्ही माझे मूळ रहाण्याचे गाव विचारल्यामुळे मी तुम्हास ही सर्व माहिती दिली आहे. असे असता तुम्ही मला स्वतःसंबंधाने सर्व तपशीलवार माहिती का कळवू नये? पुढील पत्री ती कळवाल अशी आशा आहे.

मुंबई येथे फणसवाडीत जगन्नाथाचे चाळीत तिसऱ्या मजल्यावर माझे परम मित्र रा. रा. विठ्ठल सीताराम गुर्जर राहातात. याचे गद्यात्मक लेख तुम्ही मनोरंजनात वाचिले असतील. तुमचा उभयतांचा परिचय व्हावा अशी माझी इच्छा आहे. तरी फुरसद सापडल्यास त्यांची भेट घ्यावी.

आम्हास एक सूचना करावीशी वाटते. ती हीच की तुम्हास वाङ्मयाचा नाद असल्यास त्याच्या मागे विद्यार्थिदशेत तरी फार लागू नये. मी एल्. एल्. बीचा अभ्यास करीत असताना वीरतनय नाटक लिहिल्यामुळे त्या परीक्षेत तीनदा नापास झालो. त्यापूर्वी कधीही मला अपेश मिळाले नव्हते. माझ्या काही मित्रांस हाच अनुभव आला आहे. सबब तुम्हास मुद्दाम सुचविले आहे.

कळावे हे आशीर्वाद

तुमचा<br>श्री. कृ. कोल्हटकर

⁕

४

खामगाव १३–२–०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र येऊन चार दिवस झाले. परंतु कामाची अतिशय गर्दी असल्यामुळे ताबडतोब उत्तर पाठविता आले नाही, याचा राग नसावा.

माझे बंधू चि. रा. दिगंबर कृष्ण कोल्हटकर हे आपल्याच कॉलेजातून गणित विषय घेऊन बी. ए. झाले. ते पी. इ. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिले येऊन त्यांना दोनतीन बक्षिसे मिळाली होती व Intermediate च्या परीक्षेतही ते दुसऱ्या वर्गात बरेच वर आले होते. शिवाय दोन्ही परीक्षांत त्यास गणितात फार मार्क मिळाले होते. त्यामुळे रे. मॅकिकन साहेबांची त्यांजवर फार मर्जी होती. बी. ए. च्या वर्गात असताना मात्र त्यांचे बहुतेक दिवस आजारात गेल्यामुळे ते परीक्षेत तिसऱ्या वर्गात आले.

रा. गुर्जर यांस तुम्ही भेटलात हे चांगले झाले. त्यांचा स्वभाव भिडस्त असल्यामुळे ते कदाचित तुम्हांस मानी वाटले असतील. पण हा ग्रह दिवसेंदिवस कमी होत जाऊन अखेरीस नाहीसा होईल अशी माझी खात्री आंहे.

रा. देवलांच्या स्वभावाबद्दल तुम्ही माझे मत विचारिता. पण त्यांच्याशी तुमचा पत्रव्यवहार होऊन त्यांजबद्दल तुमचे जे मत होईल ते पाहून नंतर मी आपले मत देणे ठीक होईल. याचे कारणही तुम्हांस आपोआपच पुढे कळून येईल.

रा. देवलांचे वय पन्नाशीच्या किंचित् वर असावे. त्यांची अंगकाठी बरीच मजबूद आहे. त्याचे मराठी भाषेवरील प्रभुत्व तुम्हास त्यांच्या नाटकांवरून परिचित आहेच. ते वर्तनाने फार करारी आहेत. नाटकविषयाशिवाय फलज्योतिष, सामुद्रिक वगैरे विषयांचाही त्यांना नाद आहे. ते अत्यंत रसिक आहेत ते निराळे सांगावयास नकोच.

खामगाव येथील लोक फारसे रसिक नसताही येथे गेल्या दोन महिन्यांत दोन नाटकमंडळ्या आल्या. प्रथम स्वदेशहितचिंतक मंडळी आली. तिचा ‘मूकनायक’ नाटकाचा प्रयोग फार सरस वाटला. पूर्वी या कंपनीत केशव भोसले या नावाचा इसम असे. त्यावेळी हा प्रयोग यापेक्षाही चांगला वठत असे असे सांगतात. हल्ली नाट्यकलाप्रवर्तकमंडळी येथे आपले प्रयोग करीत आहे. या मंडळीतील रा. गोपाळराव मराठे याचे काम सुप्रसिद्ध असून आपल्याही अवलोकनात आले असेलच. या मंडळीत ‘सवाई गंधर्व’ या टोपण नावाचा एक नवीन मुलगा आला आहे. बैठकीचे गाणे चांगले गातो. अजून रंगभूमीवर उत्तम काम करू लागण्यास अवकाश आहे. रंगभूमीवर एकंदरीने बालगंधर्वच श्रेष्ठ म्हटला पाहिजे.

मध्यंतरी माझी प्रकृती खोकल्यामुळे किंचित् नादुरुस्त झाली होती. आता बरी आहे.

कळावे, हे आशीर्वाद

आपला
श्री कृ. कोल्हटकर

⁕

५

खामगाव १९-२-०६

आशीर्वाद विशेष.

तुमचे १७-२-९ चे पत्र पावले. रा. देवलांस तुम्हांस पत्र पाठविणे असल्यास जरूर पाठवावे. त्यांजकडून उत्तर न येण्याचे काही कारण नाही. माझा त्यांच्याशी पत्रव्यवहार नसल्यामुळे मला या बाबतीत अनुभव नाही. पण उत्तर न धाडण्याइतके ते असभ्य असतील असे मला वाटत नाही.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळी सौभद्र, रामराज्य-वियोग, संतापशमन, तारा व शेक्सपियरच्या नाटकांची इतर भाषांतरे (विकल्पविमोचन, प्रियाराधन, प्रेमगुंफा आदि करून) करीत असतात. रा. गोपाळराव मराठे यांस जरी रा. जोगळेकरांसारखी शास्त्रीय गाण्याची माहिती नाही तरी गाण्याचा व्यवस्थितपणा, सुंदर व विभ्रमयुक्त अभिनय यांच्या साहाय्याने त्यांचे काम फारच चांगले होते. इतके वयातीत असता त्यांचे शरीरसौष्ठवही अजून बरेच कायम राहिले आहे.

मालविकाग्निमित्राचे कर्ते रा. वर्दे माझ्या परिचयाचे नाहीत. त्यांचे नाटकही मी वाचिले नाही.

गेल्या १|| महिन्यात स्वदेशहितचिंतक मंडळीचे अनेक प्रयोग मंडळीच्या व पाहुण्यांच्या फार आग्रहामुळे पहावे लागल्यामुळे बरीच जाग्रणे होऊन ती मला अजून भोवत आहेत. नेहमी पेंगल्यासारखे होते. अंगात मुळीच उत्साह राहिला नाही यामुळे कधीकधी तुमच्या पत्रांची उत्तरे उलट डाकेने न आल्यास राग नसावा.

येथून मुंबईच्या मेलला मिळणारी गाडी रात्री ७-४० वाजता निघते. मी आपली पत्रे नेहमी त्यापूर्वी १-१|| घंटे लिहीत असतो. परंतु हल्ली मला नेहमी संध्याकाळचे ७ वाजेपर्यंत कचेरीत राहावे लागते. त्यामुळे

घरी परत येईपर्यंत डाकेची वेळ निघून जाते. हेही एक कारण माझ्या अनियमितपणचे आहे. पूर्वी मी नेहमी उलट डाकेने पत्रे पाठविण्याची खबरदारी घेत असे.

माझ्या नाटकासंबंधाच्या सूचनेची वाट पाहात आहे.

क. आशीर्वाद

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁜

६

खामगाव २४-२-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. रा. गुर्जर कोकणात निघून गेल्याचे तुम्ही लिहिल्यामुळे मी त्यांना कशेळीच्या पत्त्यावर पत्र लिहिले आहे. 'अमृत पुलिन' हे पुस्तक मी अजून वाचिले नाही. ते कोणी लिहिले आहे व कोणत्या विषयावर लिहिले आहे हे पुढील पत्री कळवावे. व मूकनायकासंबंधाने तुम्ही सूचना करणार आहात तीही कळवावी. डाकेची वेळ झाली, सबब पुरे करितो.

कळावे हे आशीर्वाद

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁜

७

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले पावले. 'अमृतपुलिन' या कादंबरीचा सारांश देण्यात तुम्हांस विनाकारण श्रम पडले. तुमचे पत्र आल्यावर लवकरच मनोरंजनाच्या बक्षीस पुस्तकात ते पुस्तक मजकडे आले.

'डाकेची वेळ होत आली म्हणून पत्र पुरे करितो' हे वाक्य जशास तसा मोबदला देण्याच्या हेतूने मुळीच लिहिले नव्हते. हल्ली मला कचेरीतून येण्यास रोज उशीर होत असल्यामुळे हे वाक्य मला प्रत्येक पत्रातच लिहावे लागणार आहे. सबब त्याबद्दल राग नसावा.

रा. गुर्जर हे अजून विद्यार्थिदशेतच आहेत. त्यांना हल्ली जो काही द्रव्यलाभ होत असेल तो 'मनोरंजना' करिता लेख व पुस्तके लिहून होतो.

माझी प्रकृती बरी आहे. परंतु रोज वाढत्या उन्हाळ्याचा परिणाम शरीरावर सुद्धा होऊ लागला आहे. तुम्हांस वऱ्हाडच्या उन्हाळ्याची नीटशी कल्पना नसेल. या दिवसांत कोणत्याही गोष्टीकरिता उत्साह वाटत नाही. दिवसभर अंगातून धारा चालल्या असतात. माझ्या पायास व हातास या दिवसात भेगा पडून फार त्रास होतो.

येत्या मे महिन्यात येथेच राहाण्याचा विचार आहे. मी गेल्या वर्षापासून स्वतःकरिता घर बांधीत आहे. ते ३-४ महिन्यांत पुरे करण्याचा विचार आहे.

कळावे हा आशीर्वाद.

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. चिकित्सकाचे माजी एडिटर रा. तेलंग निवर्तल्याचे दुःखदायक वर्तमान तुम्ही वाचिले असेलच. ते माझे सहाध्यायी व मित्र होते. त्यांच्या मरणाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली यात संशय नाही.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

८

खामगाव १०-३-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र ता. ७ रोजी पावले.

गेल्या आठवड्यात येथील काही वकिलांचे इतरांशी तंटे उपस्थित होऊन ती प्रकरणे फौजदारी खटल्यापर्यंत येऊन पोहोचली होती. त्या गडबडीत मी होतो. काल त्या सर्व भांडणांचा आपसात निकाल झाला.

रा. गुर्जर यांचे वडील-उदार दामोदर नाटकाचे कर्ते-बी. बी. सी. आयच्या ऑफिसात नोकर असून त्यांना १२५ रु. पगार मिळतो. रा. गुर्जर हे लेखनद्वारा जे पैसे मिळवितात ते स्वतःच्याच कमी खर्चून टाकितात. इंटर-मिजिएट परीक्षा पास होऊन त्यांना ४-५ वर्षे झाली. परंतु दुर्दैवाने त्यांना अजून बी. ए. च्या परीक्षेस अखेरपर्यंत बसावयास मिळाले नाही. प्रत्येक वर्षी अभ्यास चांगला असूनही परीक्षेच्या पूर्वी किंवा ती चालत असता त्यांच्या प्रकृतीस कोणत्या तरी तऱ्हेची विकृति एकदम होऊन त्यांची परीक्षा चुकत आली आहे. त्याचे वय हल्ली सुमारे २५-२६ वर्षांचे असावे. माझे ३७ वर्षांचे आहे. आम्हांमध्ये इतके अंतर असता यांचा माझा स्नेह तुमच्या माझ्या स्नेहाप्रमाणेच माझ्या लेखांमुळे झाला.

वीरतनयाच्या दुसऱ्या आवृत्तीत तुम्हाला जो फरक आढळून आला तो माझ्या संमतीवाचून प्रकाशकांनी केलेला दिसतो. बाकी तो फरक काही अंशी चांगलाच झाला आहे असे म्हटले पाहिजे. वीरतनयाची किंवा इतर कोणत्याही माझ्या नाटकाची हस्तलिखित प्रत मजजवळ नाही. रा. रा. गो. वा. बापटांची नाटकेही मजजवळ नाहीत. मतिविकारासंबंधाने त्यांनी काही थोड्या सूचना केल्या होत्या, पण त्यांपैकी फारच थोड्या मला अमलात आणिता आल्या. त्या हल्ली माझ्या स्मरणातही नाहीत.

आपण केलेली सूचना वाचून संतोष झाला. तिजसंबंधाने माझा खुलासा खाली लिहिल्याप्रमाणे आहे:—

केयूर हा भेकड होता ही गोष्ट खरी आहे. स्मशानात भुताखेतांच्या गोष्टी ऐकून त्याला जी भीती वाटली तशी भीती कित्येक शूर पुरुषांसही वाटत असल्याचे दाखले आहेत. विक्रांताशी मल्लयुद्ध करण्याच्या विचाराने त्याची जी गाळण उडाली तिजमुळे मात्र त्याचा भेकडपणा पूर्णपणे प्रत्ययास येतो. परंतु तो एकटा असताना त्यास जी भीती वाटे ती दुसऱ्याच्या समागमे असताना अंशतः तरी दूर होते हा त्याच्या स्वभावातील विशेष आहे. प्रतोदाने दुसऱ्या अंकात ओळख दिल्यावर तो घाबरतो, परंतु विकंठाची प्रतोदाबरोबर थट्टा करिताना तो कचरत नाही. विक्रांताशी मल्लयुद्ध करावयाच्या कल्पनेने त्यास प्रथम भीती वाटते. परंतु प्रतोद आपल्या साह्यास राहाणार आहे या विचाराने त्या भीतीची तीव्रता नाहीशी होते. त्याचप्रमाणे तिसऱ्या अंकात एकटा असताना जे शब्द विक्रांतापाशी काढण्याचे त्यास धैर्य झाले नसते तेच शब्द ससैन्य असताना धीटपणे उच्चारण्यास तो कचरला नाही हे त्याच्या स्वभावास धरूनच झाले. निदान तुमचा आक्षेप प्रथमदर्शनी जितका खरा वाटतो तितका वरील गोष्ट ध्यानात घेतली असता वाटणार नाही असे वाटते.

वीररसास हास्यरस विघातक आहे खरा. पण प्रतोदाने ज्याप्रमाणे हास्यरसाची धिक्काराशी योजना केली आहे त्याप्रमाणे केल्यास तो तितका प्रतिकूल वाटणार नाही.

तुम्ही इतक्या बारकाईने वाचन करिता हे पाहून संतोष होतो. तुमच्या आक्षेपास मी वर उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे तो सर्वासच समाधानकारक वाटेल असे मात्र नाही.

येत्या ईस्टरच्या सुट्टीत बहुतकरून माझे स्नेही रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर येथे ७-८ दिवस घालविण्याचे उद्देशाने येतील असे वाटते. कळावे हे आशीर्वाद.

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

९

खामगाव १२-३-०९

आशीर्वाद विशेष,

तुमचे पत्र पावले. तुमची प्रकृती बिघडली आहे हे पाहून चिंता वाटते. तुम्ही रोज काही तरी व्यायाम करीत असता का? करीत नसल्यास यापुढे तरी करीत जावा. मी स्वतः बरीच वर्षे प्रकृतीकडे दुर्लक्ष करीत असे. परंतु अलीकडे नियमाने रोज व्यायाम करीत असल्यामुळे प्रकृती निरोगी राहाते.

पूर्वी आर्योद्धारक नाटकमंडळी नावाची एक amateur मंडळी असे. तिच्यात रा. देवल, रा. पाटकर वगैरे काही प्रसिद्ध नट असत. ही मंडळी अथेल्लो वगैरे गद्य नाटकेच करीत असे. ही मंडळी २५-३० वर्षांपूर्वी झाली. त्यानंतर रा. देवल किर्लोसकर मंडळीतील नटांस अभिनयशिक्षण देत असत. यापुढे त्यानी केवळ नाटक-लेखनावरच पैसे मिळविले. ग्रंथकर्तृत्वाचा धंदा त्यांच्याप्रमाणे चांगल्या रीतीने केलेला ऐकिवात नाही.

रा. वासुदेव नारायण डोंगरे यांची एक नाटकमंडळी किर्लोस्कर मंडळीच्या आधीच्या अमदानीत होती. त्यांनी संगीत मालतीमाधव, शाकुंतल, इंद्रसभा, रंगी नायकीण इत्यादी काही नाटके केली होती. पण ती किर्लोस्करांच्या नाटकांच्या मानाने फार कमी प्रतीची होती. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे हे गृहस्थ सदरहू गृहस्थांहून निराळे असून त्यांची नाटकमंडळी नसे. परंतु चंद्रसेना, चंद्रहास, भीमसिंग आणि पद्मिनी, जरठोद्वाह ही त्यांची नाटके माझ्या मते बऱ्याच वरच्या प्रतीची झाली आहेत.

वीरतनयाची शोकपर्यवसायी प्रत मजपाशी बरीच वर्षे होती. परंतु इतर टाकाऊ कागदाबरोबर तीही फाडली गेली. शंभुसेनास चतुर्भुज करून नेले यापलीकडे त्याचा वाईट शेवट केला नव्हता असे वाटते. किंवा फत्तेसिंगाच्या हातून त्याचा वध करविला असावा. याबद्दल माझे मत असे आहे की प्रतिनायकास अंती भारी दंड केल्याने प्रेक्षकास त्याजबद्दल अनुकंपा उत्पन्न होते. व असे होणे इष्ट नसते. यामुळेच विकंठ व केयूर यांच्या शिक्षा संशयात ठेविल्या आहेत. आपले मत माझ्या मताहून भिन्न दिसते.

मतिविकाराचा नायक निःसंशय मनोहर व नायिका सरस्वती आहे. येथील वकिलांत भांडणे झाली ती आपसांतली नव्हती. त्यांचा संबंध या वर्गाच्या बाहेर होता. व त्यांचे स्वरूप राजकीय नसून खाजगी होते.

मी किर्लोस्कर मंडळीचे रामराज्यवियोग पाहिले नाही परंतु जोगळेकर व बालगंधर्व अनुक्रमे वसिष्ठ व कैकेयी ही कामे करीत असावेत असा माझा समज आहे.

कळावे. हे आशीर्वाद

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१०

खामगाव २२-३-०९

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. मीही तुमच्याप्रमाणेच आजारी आहे. गेल्या २-३ महिन्यांपासून मला रात्रीची झोप येत नाही. त्यामुळे कोणत्याही कामास उत्साह वाटत नाही. गेल्या १०-१२ दिवसांत कोणासही पत्र लिहिले नाही यावरून माझ्या स्थितीचा तुम्हास अजमास करिता येईल. मी एकही पत्र लिहिले नाही असे लागोपाठ ४ दिवस आजपर्यंत गेलेले मला आठवत नाहीत.

येथे मुरादखा नावाचा प्रसिद्ध बीनकार व देवलची सर्कस आली आहे. वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे. हे आशीर्वाद

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

११

खामगाव १-४-०९

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्र पावली. दोन्ही पत्रांतील तुमची विचारसरणी वाचून आनंद झाला. मी मनोहर व सरस्वती यास नायक नायिका म्हटले यांचे कारण सर्व नाटकात त्यांच्या इतक्या प्रमुख व्यक्ति दुसऱ्या नाहीत. याच दृष्टीने गुप्तमंजूषात कैलास व सौदामिनी हीं नायकनायिका होत. चकोर व चंद्रिका यांचा विवाह ही नाटकातील प्रमुख गोष्ट आहे खरी. पण ती घडून येण्यास कारण मुख्यत्वेकरून मनोहर व सरस्वतीच आहेत. शिवाय त्यांच्या स्वभावापुढे चकोर व चंद्रिका यांचे स्वभावही फिक्के वाटतील असे वाटते.

मूकनायकाचे मला तीनच अंक करावयाचे होते. तुम्ही सुचविल्याप्रमाणे जर मी ते केले असते तर पृष्ठसंख्या विषम झाली असती. शिवाय प्रत्येक अंकाचा आरंभ व अंत जितके चटकदार व्हावयास पाहिजे तितके ते झाले नसते. तुम्ही जे विचार सुचविले आहेत ते मलाही सुचले होते. पण ते मला चांगल्या रीतीने

अंमलात आणता येईनात. दोन अंकांच्या मध्ये बरेच दिवस गेले असता चालतात, परंतु दोन प्रवेशांमध्ये गेलेले विलग दिसते असे तुम्ही म्हणता परंतु शाकुंतलाच्या चवथ्या अंकात, एका प्रवेशात कण्वऋषि आश्रमात नसलेले, दुसऱ्या प्रवेशात ते त्यानंतर बरेच दिवसांनी परत आलेले असा प्रकार दिसेल. शेक्सपियरमध्ये तर असे प्रकार जागोजाग दिसतील.

तथापि तुम्ही केलेले विवेचन फार मार्मिक आहे. हे कळविण्यात संतोष वाटतो.

मनोहर नायक व सरस्वती नायिका हे मजप्रमाणेच रा. बापटांचेही मत आहे.

मुरादखां हा प्रसिद्ध विनकार आहे. तो बीन हे वाद्य फार चांगले वाजवितो.

माझे धाकटे बंधूंनी ३-४ वर्षांमागे पुनर्विवाह केला. त्यांचे द्वितीय कुटुंब हल्ली फुफ्फुसाच्या बिकाराने बरेच आजारी आहे.

माझी सौभद्रावरील टीका सुमारे ४ वर्षामागे विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झाली. नक्की अंक पाहिजे असेल तर मागाहून कळवीन.

माझी प्रकृति हल्ली पूर्वीपेक्षा किंचित् बरी आहे. मला गेल्या वीस वर्षांपासून इसब व त्वचेचा रोग जडला आहे. यामुळे उन्हाळ्यात व हिवाळ्यात हातांस व पायांस फार त्रास होतो.

कळावे हे आशीर्वाद.

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१२

खामगाव २३-६-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. परंतु शारीरिक व मानसिक व्याधि व घरगुती व्याप यामुळे ताबडतोब उत्तर धाडण्यास झाले नाही.

पुण्यास मला जी थंडी झाली ती अजून शरीरातून गेली नाही. तिच्या जोडीला खोकला सुरू झाला आहे. २-४ दिवसांत प्रकृति पूर्ववत् होईल असे वाटते.

मे महिन्यात करावयाची कामे हातून न झाल्यामुळे मानसिक त्रास फार होत आहे. ती कामे होई तो पर्यंत मनाला पूर्ण स्वस्थता मिळावयाची नाही, व मनाला स्वस्थता मिळेपर्यंत ती कामे धड व्हावयाची नाहीत. या अन्योन्याश्रयामुळे जिवाची मात्र तारांबळ उडून गेली आहे.

अजून येथे पाऊस सुरू झाला नाही. पाऊस येईपर्यंत कामास मंदीच आहे.

किर्लोस्कर व नाट्यकलाप्रवर्तक या मंडळ्यांच्या सौभद्राबद्दल तुमच्या प्रमाणेच माझे मत आहे.

वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे हे आशीर्वाद.

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

❋

१३

खामगाव ७-७-०९

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. पहिले पत्र आल्यानंतर मजकडे बरेच पाहुणे येऊन गेले. त्यांच्या पाहुणचारामुळे उत्तर पाठविण्यास झाले नाही. हल्लीही पाहुणे आहेतच.

माझी सर्दी नाहीशी झाली आहे. पण खोकला अजून गेला नाही.

तुमचे सौभद्राच्या टीकेवरील मत पुढील पत्री कळवावे.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळीचे एका मॅनेजरांनी एका गृहस्थामार्फत मूकनायक करण्याची परवानगी मागितली आहे. माझ्या शर्ती त्यास कबूल होतील असे वाटत नाही.

'आता मी भगिनी कोणत्या म्हणूं?' हे वाक्य राहिले तरी चालेल असे वाटते. तुमचे मत काय आहे? चकोर विहारास अध्यापिकेचे वय १७-१८ असल्याबद्दल सांगतो ते केवळ त्याची उत्कंठा वाढविण्याकरिता असे म्हणता येईल.

लवकरच 'सुदाम्याच्या पोह्यां' पैकी २-४ मुष्टि लिहिण्याचा विचार आहे. सिद्धीस जाईल तेव्हा खरा.

येथे १-२ दिवसांत बेळगावकर स्त्रीनाटकमंडळी येणार आहे. पण कोणतीही नाटके न पाहण्याचा संकल्प केल्यामुळे त्यांची नाटके मला पाहाता येणार नाहीत.

कळावे हे आशीर्वाद.

तुमचा<br>
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

खामगाव १८-७-०९

आशीर्वाद विशेष,

तुमचे पत्र पावले. 'सुदाम्याचे पोहे' लवकरच रा. मित्र यांजकडून स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणार आहेत. त्या मालेतील आणखी २-४ लेख जर लवकरच मजकडून तयार झाले तर ते त्याच पुस्तकांत प्रसिद्ध होतील.

पुण्याचे लेलेशास्त्री एक आधुनिक कवितेचे पुस्तक प्रसिद्ध करीत आहेत. त्यांत माझी काही स्फुट कविता प्रसिद्ध होणार आहे.

गेल्या डिसेंबर व जानेवारी महिन्यांत मी स्वदेशहितचिंतक मंडळींची बरींच नाटके पाहिली. त्यामुळे झालेल्या जागरणांनी माझी झोप नाहीशी होऊन फार त्रास झाला. त्यामुळे पुन्हा नाटक न पहाण्याचा मला संकल्प करावा लागला. त्यानंतर येथे २-३ मंडळ्या आल्या. पण मी त्यांच्या एकाही नाटकात गेलो नाही.

हल्ली माझी प्रकृति बरी आहे. खोकलाही परवापासून मावळल्यासारखा झाला आहे.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळीपाशी मी मूकनायकाबद्दल पाचशे रुपये मागितले आहेत. ही रक्कमच येवढी मोठी आहे की ती देणे त्या मंडळीस परवडणार नाही. अर्थात् किर्लोस्कर मंडळीचेही त्यापासून काही नुकसान होण्यासारखे नाही.

माझे एक मेव्हणे रा. रा. श्रीधर अनंत भागवत फर्ग्युसन कॉलेजात बी. एस्‌सी. चा अभ्यास करीत आहेत. त्यांस माझा नमस्कार सांगावा.

किर्लोस्कर मंडळींचे नवे नाट्यगृह केंव्हा उघडणार? या मुक्कामास तरी ते खुले झाल्यास बरे होईल.

येथे पाऊस चांगला पडत आहे. कोर्टाचे काम अजून जारीने सुरू झाले नाही.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आर्शीवाद.

तुमचा
श्री. कृ. कोल्हटकर

❋

खामगाव २५-७-०९

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. तुम्ही ज्या वीरतनयाच्या प्रयोगास गेला होता त्याच प्रयोगास रा. नरसिंह चिंतामण केळकर हे गेले होते. त्यांस नवीन वीरतनयाचे अवसान व अभिनय आणि रा. बोडसांचा अभिनय व नेपथ्यचातुर्य ही फार आवडली असे त्यांच्या पत्रावरून दिसते .

मूकनायकाची परवानगी नाट्यकला प्रवर्तक मंडळीने प्रथम एका मॅनेजरांच्या मार्फत मागितली होती. त्यानंतर त्यांजकडून दुसरे पत्र आले नाही. यावरून त्यांनी त्याचा नाद सोडून दिला असावा असे दिसते. या संबंधाने तुम्हास काही नवीन बातमी कळल्यास मला सवडी प्रमाणे कळवावी.

माझ्या बहिणीचे वय लग्नाचे वेळी अगदी लहान नसून १३-१४ वर्षांचे असावे. त्या बाबतीत मला माझ्या मातुःश्रींच्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागले. या बहिणीहून वडील अशी माझी जी दुसरी बहीण आहे ती एका कऱ्हाडे वरास दिली आहे. तिचा प्रथम वाग्निश्चय करून नंतर प्रौढावस्थेत तिचे लग्न केले.

रा. गुर्जर यांजकडून मला वारंवार पत्रे येत असतात. 'सुदाम्याचे पोहे' स्वतंत्र पुस्तक रूपाने छापून निघत आहेत हे त्यांच्याच खटपटीचे फळ आहे. मी तुम्हांस त्यांचा पत्ता कळविला आहेच.

नवीन नाटकगृह उघडण्याच्या समारंभाची तारीख १५-२० दिवस अगाऊ कळविण्याचे रा. शंकरराव मुजुमदार यांनी कबूल केले होते. पण अजून कळविले नाही. जरी मला आगाऊ कळविले असते तरी मला आपल्या कामाची व्यवस्था करून येता आले नसते. गेल्या चार वर्षात म्हणजे मी येथे राहाण्यास आल्यापासून आजपर्यंत माझे काम चालवण्याची तसदी दुसऱ्या कोणत्याही वकिलास देण्याचा सुदैवाने प्रसंग आला नाही. येथे येण्यापूर्वीही माझी हीच वहिवाट होती.

येथे हल्ली बेळगावकर स्त्रीनाटकमंडळीचे प्रयोग चालू आहेत. या मंडळींतील स्त्रियांची कामे करणाऱ्या एक दोन बायका विभ्रमाभिनयादिगुणांत वाखाणण्यासारख्या आहेत असे कळते. पुरुषाचे काम करणारी एक स्त्री चांगली गाणारी असून इतर स्त्रिया सरासरीच आहेत असेही कळते.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे. हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

१६

खामगाव ८-८-०९

आशीर्वाद विशेष,

तुमची दोन्ही पत्रे पावली. अजून नाटकगृह उघडण्याच्या दिवसासंबंधाने मला सूचना आली नाही. आल्यावर कळवीन. नाटकगृह फार चांगले रंगविले आहे असे ते समक्ष पाहून आलेल्या मनुष्याने सांगितले. त्याने मूकनायकाचा पहिला प्रयोगही पहिला होता. काही काही पद्यास पाचपाच सातसात वेळा वन्समोअरे झाली व किर्लोस्कर मंडळीस अतोनात पैसा मिळत आहे असे त्याने कळविले.

मतिविकार आज होणार आहे असे तुम्ही कळविता. ते झाले असल्यास त्यास झालेले उत्पन्न, लोकमत वगैरे माहिती सवडीप्रमाणे कळवावी.

रा. काडगावकर याचे गाणे मी पुणे येथे एकदा खाजगी बैठकीत ऐकिले होते. व ते मला त्या वेळी बरे वाटले होते.

तुम्हास बरेच दिवसांत पत्र न लिहिण्याचे कारण माझ्या घरी वै. शा. सं. धोंडशास्त्री ज्योतिषी हे पाहुणे आले होते. या गृहस्थांनी वेध घेण्याचे एक नवे यंत्र स्वतःच्या कल्पकतेच्या जोरावर तयार केल्याबद्दलचा मजकूर तुम्ही केसरीत व इंदुप्रकाशात वाचिला असेलच. तसे यंत्र कदाचित् इंग्रजी वेधशाळेत असावे असे वाटते. तसे असले तरी शास्त्रीमजकुरांचा प्रयत्न स्तुत्य असून उत्तेजनास पात्र आहे. ते हल्ली त्या यंत्राकरिता एक वेधशाळा बांधण्याच्या विचारात असून तिजकरिता पैसा गोळा करीत आहेत. येथे त्यांस ३३ रु. मिळाले. वेधशाळा झाल्यावर त्यांचे हल्लीचे यंत्र मी विकत घेणार आहे. ते काल अकोल्यास गेले.

माझी प्रकृती हल्ली चांगली आहे. मात्र हल्ली इसबाचा प्रादुर्भाव होण्याची चिन्हे दिसत आहेत. डॉक्टरांजवळची पिचकारी बिघडल्यामुळे बरेच दिवसांत कॅर्बालिक ॲसिडचे दूषित भागात Injection मिळाले नाही.

वरकड मजकूर आनंदरूप आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. नाट्यकलाप्रवर्तक मंडळीच्या मूकनायकाबद्दल बातमी कळली असल्यास पुढील पत्री कळवावी.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१७

खामगाव १६-८-०९

आशीर्वाद विशेष,

तुमचे १०-८-९ चे पत्र पावले. रा. काडगावकर शास्त्रीय गाण्याच्या दृष्टीने रा जोगळेकरांपेक्षा बऱ्याच कमी दर्जाचे असावेत असे वाटते. मात्र त्यांच्या आवाजात रा. जोगळेकरांच्या आवाजापेक्षा कमी अनिश्चितपणा आहे. हे गृहस्थ पूर्वी किर्लोस्करमंडळीत येण्याचे घाटत होते. न येण्याचे कारण काय झाले ते कळले नाही.

रा. हल्याळकरांस वीरतनयाची परवानगी २०० रुपयांस दिली आहे. परवानगी देऊन बरीच वर्षे (म्हणजे १०-१२ वर्षे) झाली. रुपये वसूल होण्यास मात्र त्रास बराच पडून फिर्यादीही कराव्या लागल्या.

“तिसरा प्रश्न विलासला खात्रीने सुटेल” हे भाषण नंदिनीशी त्याचे जे सख्य होते त्यास उद्देशून असावे असे वाटते. मी गुप्तमंजूष नाटक बऱ्याच वर्षात वाचिले नसल्यामुळे खात्रीने सांगवत नाही.

काल नागपूरचे डॉ. गद्रे येथे मजकडे पाहुणे होते. त्यामुळे काल पत्र पाठविण्यास झाले नाही.

परवा ‘सुदाम्याच्या पोह्यां’ चा पहिला फॉर्म सुधारून पाठविला त्यात ‘साक्षीदार’ व ‘कुलूप’ हे दोन लेख असून ‘शिमगा’ हा लेख अर्धा आला आहे.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१८

खामगाव २३-८-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे ता. १८-८-९ चे पत्र पावले. त्याच दिवशी किर्लोस्कर मंडळीची निमंत्रणपत्रिकाही पोचली. अवधि फारच अल्प असल्यामुळे मला समारंभाकरिता जाता आले नाही. गेलो असतो तर त्यापासून मला सुख किती झाले असते याची शंकाच आहे. अलिकडे नाट्यसृष्टीचे पूर्वीइतके कौतुक वाटत नाही. याचे एक कारण वाढते वयोमान व दुसरे कारण नाटकमंडळ्यांचा प्रत्यक्ष अनुभव हे असावे.

सामाजिक नाटकमंडळीचे ‘त्राटिका’ हे नाटक मी २-३ वर्षांपूर्वी नागपूर येथे पाहिले होते. त्यावेळी मंडळी बरीच होतकरू वाटली होती. वीरतनयाचा गद्य प्रयोग करण्याची परवानगी त्यांनी त्या वेळी मागितल्याचे मला स्मरते.

‘रमणी’ याचा अर्थ ‘lady–love’ असा केल्यास नंदिनी खुद्द विलासाचीच रमणी होती, व या त्यांच्या संबंधावरच कैलासनाथाने टोमणा मारला आहे असे दिसते.

ग्रंथकर्त्याने एकाद्या कंपनीला नुस्ती प्रयोग करण्याची परवानगी दिली असल्यास तिला ती दुसऱ्या कंपनीस देता येत नाही. नाटकांचे सर्व हक्क विकले असल्यास गोष्ट निराळी. रा. खाडिलकरांनी ‘कीचकवध’ इत्यादी नाटकांचे सर्व हक्क महाराष्ट्र नाटकमंडळीस विकले असल्यामुळे तिला मात्र प्रयोगांची परवानगी दुसऱ्या कंपन्यांस देता येते व दुसऱ्या कंपन्यांच्या प्रयोगास प्रतिबंध करिता येतो. मी किर्लोस्कर मंडळीस किंवा इतर कंपन्यांस फक्त प्रयोग करण्याची परवानगी दिली आहे.

‘नाट्यकलाप्रवर्तक’ मंडळीत रा. काडगावकर नवेच आले असल्यामुळे त्यांना तूर्त काम देत नसावेत. एक महिन्याच्या विश्रांतीनंतर त्यांची कामे सुरू होतील असे दिसते.

बरेच दिवसांत इकडे पाऊस न पडल्यामुळे लोक हवालदील झाले आहेत. आणखी आठपंधरा दिवस पाऊन न आल्यास चोहोकडे हाहाकार उडून जाईल.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१९

खामगाव २९-८-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे २४-८-९ चे पत्र पावले. माझ्या मागील पत्रात २२ वी तारीख घालावयाची असून ती चुकीने २३ वी पडली होती, असो.

नाटक मंडळ्यांबद्दल मी जे मागील पत्रात लिहिले होते. त्याचा अर्थ इतकाच की एखाद्या नाटकमंडळीशी प्रथमच ओळख झाल्यावर नवीनपणामुळे तिचे जे कौतुक वाढते ते परिचयाने कमी कमी होत जाते. नाटकमंडळ्यांत अशिक्षित मनुष्यांचाच भरणा विशेष असल्यामुळे व त्यास सभ्य चालीरीतींची फारशी ओळख नसल्यामुळे त्यांजविषयी फाजील प्रेमबुद्धी वागविणारास त्यांचा लवकर वीट येतो. इतर नाटक मंडळ्यांपेक्षा किर्लोस्कर मंडळीत या बाबतीतही सुधारणा आढळून येईल.

सामाजिक मंडळी वीरतनयाचा गद्य प्रयोग करिताना पद्ये गाळून त्याबद्दल त्याच अर्थाचा गद्य मजकूर घालणार होती. हे काम मजकडेच सोपविण्यात येणार होते. पण मी ते करण्याचे नाकारिले.

मालतीमाधवात व उत्तररामचरितांत रमणीस्पर्शाने रमण सावध झाल्याचे जे प्रसंग भवभूतीने घातले आहेत तसे कालिदासाने घातलेले आठवत नाहीत. या प्रसंगात माझे मते एक प्रकारची रमणीयता आहे.

तिसरा प्रश्न वास्तिविक दुसऱ्याच्या रमणीच्या दंडासंबंधानेच आहे. पण तो संदिग्ध शब्दांनीच केलेला असल्यामुळे त्या संदिग्धतेचा फायदा घेऊन कैलासनाथाला विलासाच्या मर्मस्थलावर प्रहार करण्यास काहीच हरकत येत नाही. कदाचित् त्याच्या भाषणाचा राग येऊन कोणी त्याचा जबाब मागितला असला तरी “नंदिनी विलासाची बालपणापासून मैत्रीण असल्यामुळे त्यास तिच्या दंडाचे ज्ञान असणे यात विशेष काही नाही. व माझा ते भाषण करण्यात कोणताही विपरीत हेतू नव्हता” असे म्हणण्यास त्याची तयारीच रहाती.

कैलासनाथाचे तोंडी वादग्रस्त वाक्य घालताना माझा तरी याहून निराळा व गूढ हेतु नव्हता.

येथे गेल्या ५-६ दिवसांपासून चांगला पाऊस पडत आहे.

आज रोजी सुदाम्याच्या पोह्याच्या १५ वी व १७ वी अशा दोन्ही मुष्टि संपवून रा. मित्रांकडे पाठविल्या. त्या प्रथम मंनोरंजनात येऊन नंतर निराळ्या पुस्तकात येतील.

आजरोजी बडोदे येथे भरणाऱ्या साहित्य-परिषदेच्या सेक्रेटरीकडून एक विनंतिपत्र आले. त्यात त्यांनी नाटकावर किंवा विनोदावर एखादा निबंध लिहून पाठविण्याबद्दल लिहिले आहे. मी काही वर्षांपूर्वी एक निबंध मराठी भाषेवर लिहिला होता तोच साफसूफ करून परिषदकेडे पाठविण्याचा विचार आहे. परिषदेच्या बैठकीच्या पूर्वी आलेले निबंध छापण्यात येणार आहेत.

कळावे, हा आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

२०

खामगाव ५-९-०९

आशीर्वाद विशेष,

तुमचे पत्र पावले. ८ दिवसांपूर्वी मतिविकार नाटक झाले, व ते बरे झाले इतकी बातमी मला दुसऱ्यांकडून कळली होती. तुमच्या पत्रांत सविस्तर माहिती वाचावयास मिळाली. ती वाचून प्रत्यक्ष प्रयोग पहाण्याचा किंचित् अनुभव आला.

पेटी तबला रिझर्व्ह खुर्च्यांच्या पुढे ठेवितात ही योजना चांगली नाही. ती मागेपुढे मंडळीस काढून टाकावी लागेल.

सरोजिनी दुसऱ्या प्रवेशाच्या आरंभी चिंतामग्न असल्यामुळे तिने प्रथम येऊन नंतर पडदा वर जावा ही आपली सूचना बरी आहे. किर्लोस्कर मंडळीची वहिवाट बहुधा देखाव्याचे सोईकरिता पडली असावी.

मनोहर पैसे जमविण्याकरिता गेलेला असल्यामुळे त्याला चंद्रिकेचा म्हाताऱ्याशी त्याच्या मागे जो विवाह झाला त्यास प्रतिकार करिता आला नाही. पण यावरून ती बातमी त्याला परत येण्यापूर्वी मुळीच कळली नव्हती असे मात्र होत नाही. ती बातमी त्यास कळली असून ती त्याला चकोरास कळविताही आली असती. परंतु ती कळविल्याने चंद्रिकेस फायदा न होता चकोराच्या अभ्यासात मात्र व्यत्यय आला असता. माझ्या मते यांत विसंगती नाही.

येथे एक फाटक नावाचे योगी आले आहेत. गळा जाड करणे, पोट पातळ करणे, श्वास दाबून धरणे इत्यादी काही साधने त्यास साधली आहेत असे ऐकितो. आज सकाळी त्यांचे योगावर सप्रयोग व्याख्यान होणार म्हणून मी व्याख्यानास गेलो होतो. पण २-३ घंटे शिळ्या गोष्टींत घालवून व्याख्यात्याने प्रयोगाबद्दल प्रेक्षकांची निराशाच केली. त्याचे घरी गेल्यास प्रयोग पाहाण्यास मिळतील. पण आता ती इच्छाही उरली नाही.

सुदाम्याच्या पोह्यांच्या प्रसिद्ध झालेल्या मुष्टींत तीन मुष्टींची भर घातली आहे. एकंदर अठरा लेख असून पृष्ठसंख्या १२५-१५० पर्यंत होईल.

गेल्या आठवड्यांत येथे फार पाऊस पडला.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

२१

खामगाव १२-९-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र काल मिळाले. गेल्या आठवड्यात एका स्नेह्यांच्या घरी गोकुळ अष्टमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ तीन रात्री जाग्रणे झाली. त्यामुळे जीव त्रासून गेला आहे. हे पत्र लिहितानाही झोपेच्या डुलक्या येत आहेत.

‘एकमेकावरी’ ही प्रकाशकाची चूक आहे. मूकनायकाच्या विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झालेल्या स्वरूपात ‘एकमेकापरी’ हाच शब्द आहे. व रंगभूमीवरही तोच शब्द म्हणतात.

‘क्षाम’ हा शब्द ‘सुकलेला,’ ‘कोरडा’ या अर्थी योजिला आहे. ‘क्षुत्क्षामकंठ’ यावरून तो घेतला आहे.

“ताई, आताशा....” या वाक्यात ‘आताशा’ हा शब्द पंध्रवड्यापेक्षा अधिक कालाचे अर्थी योजिला आहे. त्याने तो अर्थ व्यक्त होत नसल्यास त्याबद्दल दुसरा शब्द घालावा लागेल.

परवापासून मी आपल्या ज्योतिषावरील निबंधाची शुद्ध प्रत करण्यास सुरवात करणार आहे. काम फार त्रासाचे असल्यामुळे त्याबद्दल चिंता वाटत आहे. शिवाय या महिन्यात मला बडोद्याच्या साहित्य-परिषदेकरिता निबंधही लिहून पाठवावयाचा आहे. परंतु या महिन्यात दोन दोन दिवसांच्या दोन सुट्या आल्या आहेत. त्यामुळे वेळेची कमतरता पडेल असे वाटत नाही. ज्या दिवशी मी या दोन निबंधांतून सुटेन तो सुदिन!

पुढील महिन्यात तुमच्या पत्रांस मजकडून वेळेवर उत्तर गेले नाही तर त्याचा राग नसावा.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

२२

खामगाव १७-९-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. रा. देवलांकडून आलेल्या पत्रात काय मजकूर आहे हे कळविण्यासारखे असल्यास कळवावे.

तुम्ही सुट्टीत कोठे जाणार आहात? सुट्टी किती दिवसांची आहे? ज्या गावास जावयाचे आहे त्यापैकी खामगाव आहे काय? मी जरी हल्ली निबंधाच्या नकला करण्यात गुंतलो आहे तरी तुम्ही येथे आल्यास मला आनंद होईल.

रंगभूमीचा नुकताच निघालेला अंक तुमच्या वाचण्यात आलाच असेल. पण तुम्हांला आपले नाटकविषयक विचार व्यक्त करण्यास 'रंगभूमी' हे चांगले साधन होईल.

अजून मजकडून लिहिण्याचे काम विशेष झाले नाही, त्यामुळे मनास फार उदासीनता आली आहे. पुढील पत्रात याहून निराळा मजकूर मला लिहिता येईल अशी आशा आहे.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

२३

खामगाव ६-१०-०९

आशीर्वाद विशेष. तुमचे ता. ५ चे पत्र पावले.

गेल्या दीड महिन्यांत मी आपल्या ज्योतिषविषयक निबंधाचा पहिला व सर्वात महत्त्वाचा भाग व साहित्यपरिषदेकरिता मराठी वाङ्मयावर निबंध शुद्ध लिहून काढिले. व त्याशिवाय सुदाम्याच्या पोह्यातील १६ वा, १७ वा, व १८ वा लेख आणि मनोरंजनाच्या दिवाळीच्या स्पेशल अंकाकरिता एक लहान गोष्ट लिहिली. हे सहा लेख लिहिण्याकरिता अनेक जाग्रणे करावी लागली, व परिश्रमही फार पडले. त्यामुळे अतोनात शीण आलेला आहे. यापुढे १ महिना विश्रांती घेण्याचा विचार केला आहे.

या विश्रांतीच्या अवधींतही अगदी स्वस्थ बसता येईल असे नाही. कारण येथे हल्ली स्वदेश-हितचिंतक नाटकमंडळी आली आहे. व तिचे मालक मला त्यांच्या कवींनी केलेली ४ नाटके दाखविणार आहेत. या नाटकांत एक नाटक कै. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांचे 'सौभद्र' हे असून दुसरे त्यांनी गेल्या साली बसविलेले 'कुंजविहारी' आहे. बाकीची दोन नाटके त्यांचे नवीन कवि रा. ठाकरे यांनी लिहिलेली. 'सीताशुद्धि' व 'मंगळतारा' ही आहेत. याच ठाकऱ्यांनी काही दिवसांमागे 'रुक्कुठारा' वर प्रतिटीका लिहिली होती हे आपणास माहीत असेलच.

बडोद्यास साहित्यपरिषदेकरिता जावयांचा विचार आहे, पण मी तिकडे मुंबईच्या रस्त्याने न जाता अंमळनेर रस्त्याने जाईन. यामुळे तुमची भेट होण्याचा संभव नाही.

येथील वाचनालयात चार पत्रे बंद केली व ज्या सभेत त्या संबंधाने ठराव झाला त्या सभेचा मी अध्यक्ष होतो ही गोष्ट खरी आहे. परंतु तो ठराव पास करण्यावाचून इलाजच नव्हता हे येथील परिस्थिती माहीत असलेला कोणताही मनुष्य कबूल करील. येथील वाचनालयात सरकारी ग्रँट १५ रुपयांची आहे. व त्या मानाने खाजगी वर्गणी इतकी कमी जमते की सरकारी ग्रँटवर पाणी सोडून चालण्यासारखे नाही. शिवाय वर्गणीदारांत बरेच सरकारी नोकर आहेत. त्यांना आपली नावे काढून घ्यावी लागली असती. ठराव एकमताने पास झाला हा त्याच्या आवश्यकतेचा उत्तम पुरावा आहे. येथील सबडिव्हिजनल ऑफिसकडून पत्र आले तेव्हाच हा ठराव करण्यात आला. वाचनालयाने आपण होऊन तो केला नाही.

“जलधर घनतर” हे पद मल्हार रागातील आहे असे वाटते.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. रंगभूमीच्या गेल्या अंकात रा. बापटांचा निबंधाचा भाग वाचनीय आहे. या शिवाय ‘मोहनतारा’ वरील टीकेचा अवशिष्ट भाग, गेले संमेलनाची हकीकत, वगैरेही काही लेख आहेत.

श्री. कृ. कोल्हटकर

२४

खामगाव ३१-१०-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे २६-१०-९ चे पत्र वाचले.

मी येथे २७ व्या तारखेस रात्री येऊन पोहोचलो. बडोदा येथे २३-२४-२५-२६ या तारखांस होतो. ते दिवस फार गडबडीचे गेले. तेथे मकरपुरा राजवाडा, नजरबाग, पदार्थसंग्रहालय व भोवतालचा बाग, लक्ष्मीविलास राजवाडा व आसमंतातील प्रदेश इत्यादी रम्य स्थळे पाहिली. श्री. शिरके, इंदूरचे श्री. किबे, काशीबाई हेरलेकर वगैरे मंडळींशी ओळखी झाल्या. एकंदर बडोद्याची ही खेप फार आनंदात गेली. संमेलनाची हकीकत तुम्ही वृत्तपत्रात वाचिली असेलच.

स्टेशनवर उतरल्यापासून तो निघेपर्यंत सर्व व्यवस्था फार उत्तम ठेविली होती. संमेलनाच्या अखेरच्या दिवशी महाराजांनी सर्व पाहुण्यांस संध्याकाळी एक पार्टी दिली. तिचीही व्यवस्था वाखाणण्यासाठी होती.

दसऱ्याची स्वारी व दरबार ही सुद्धा फार प्रेक्षणीय होती.

मी संमेलनाकरिता लिहिलेला निबंध व रा. केळकरांचा निबंध विविधज्ञानविस्ताराच्या येत्या अंकात येणार आहेत.

स्वदेशहितचिंतक नाटकमंडळी उद्या येथून, यवतमाळास जाणार. आज रात्री त्यांना माझ्या घरी जेवावयास बोलाविले आहे. उद्यापासून पुन्हा ज्योतिषावरील निबंध शुद्ध लिहिण्यास हाती घेणार. तो एका महिन्यात पुरा होईल असा अंदाज आहे. त्यानंतर नव्या नाटकातील पद्ये करावयास घेणार. ती पुढील महिन्यापर्यंत पूर्ण करून नंतर काही वर्षे विश्रांती घेण्याचा विचार आहे.

वरकड मजकूर ठीक आहे.

क. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

२५

खामगाव १०-११-०९

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मी हल्ली खोकल्यामुळे आजारी आहे. म्हणून तुमच्या पत्राचे थोडक्यातच उत्तर देतो.

मी स्वदेशहितचिंतकमंडळीच्या कोणत्याही नाटकात फेरफार केला नाही. ‘कुंजविहारी’ नाटक गेल्या साली येथे बसत असता. कर्त्यास मात्र काही सूचना केल्या होत्या.

माझे नवीन नाटक विषमविवाहासंबंधाने (अननुरूप दांपत्यांच्या लग्नासंबंधाने) आहे. त्यातील दोन प्रमुख पात्रे जुळी आहेत. ही योजना किर्लोस्कर मंडळीत करिता घेण्यासारखी नसल्यामुळे ते नाटक त्या मंडळीकडून बसविण्यात येईल की नाही याची शंका आहे. स्वदेशहितचिंतक मंडळी बसविणार आहे.

मी उदयिक रात्री अकोल्यास जाऊन परवाचे रोजी सर्व बंधूंसह खामगावी परत येणार.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

२६

खामगाव ८-१-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. सबंध नाताळभर व त्यानंतरही ३-४ दिवस दोन घंट्यांचीही सारखी विश्रांती न घेता अहोरात्र निबंध लिहीत बसलो होतो. पण मध्यंतरी अनेक शंका आल्या. त्यांचे समाधान करून घ्यावे लागले म्हणून, व स्पष्टीकरण व नवीन भाग म्हणून पदोपदी पूर्वी लिहिलेल्या भागात भर घालावी लागली म्हणून, व अनेक भागांची फिरवाफिरव करावी लागली म्हणून, मला दोन भाग लिहिण्यास अंदाजापेक्षा चौपटीने वेळ लागला. अजून एक भाग व्हावयाचा आहे. पण तो सोपा असल्यामुळे चालू महिन्यातच बहुतकरून पुरा होईल. तूर्त झालेल्या श्रमांचा परिहार करण्याकरिता विश्रांति घेत आहे. १२ दिवसांत मुळीच झोप न मिळाल्यामुळे सध्या दिवसभर पेंगल्यासारखे वाटत आहे.

निबंध संपविल्यानंतर रा. गोपाळ वामन बापट यांच्या नाटकविषयक निबंधास प्रस्तावना लिहावयाची आहे. तो निबंध स्वतंत्र पुस्तकरूपाने लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

निबंध व प्रस्तावना संपल्यानंतर मी आपले नवे नाटक एकदा वाचून पाहीन व त्यानंतर त्याचा गोषवारा आपणास लिहून कळवीन. सध्या त्याचे संविधानक माझ्या स्मृतीत पुसटपुसट होऊन गेले आहे.

एक महिन्यापूर्वी रा. जोगळेकर येथे येऊन गेले. किर्लोसकर मंडळी नाशकाहून बहुतकरून जळगावास येईल. त्यांनतर नवे नाटक बसविण्याबद्दल विचार होणार आहे. सध्या रा. खाडिलकरांचे संगीत मानापमान व रा. गडकरी यांचे ‘प्रल्हादचरित्र’ बसवीत आहेत असे ऐकितो.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

२७

खामगाव १८-१-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मी अलीकडे पाहुणचाराच्या गडबडीत असल्यामुळे मला पत्र लिहिण्यास झाले नाही. माझे घर हल्ली नातलगांनी व स्नेह्यांनी गजबजून गेले आहे. अलीकडे जाग्रणे एकसारखी होत गेल्यामुळे फार थकवा आला आहे. शिवाय कार्यबाहुल्यामुळे हातून लिहिण्याचे काम मुळीच झाले नाही.

मी हल्ली हिंदूंच्या ज्योतिर्गणितावर निबंध लिहीत आहे. तो या महिन्याच्या अखेरीस पूर्ण करण्याचा विचार आहे.

रा. जोगळेकर, रा. मुजूमदार, रा. बोडस, रा. गडकरी हे गेल्या रविवारी येथे आले. ते आज पहाटे परत जळगावी गेले. माझे नवे नाटक तीन चार महिन्यांनी—अर्थात् पद्ये झाल्यानंतर—बसविण्यास घेणार आहेत. रा. गडकऱ्यांचे नाटक बहुतेक वाचिले. काही प्रवेश फार चांगले साधले आहेत, व पहिला प्रयत्न या दृष्टीने नाटक उत्तम झाले आहे. कर्ता उत्तेजनास सर्वथा पात्र आहे असे म्हणण्यास हरकत नाही. रा. बापटानी प्रस्तावना लिहिण्याची मला विनंती केली हा एक प्रकारे माझा बहुमान झाला असे मी समजतो. त्यांच्या निबंधास शोभेशी प्रस्तावना मला लिहिता येईल की काय एवढीच शंका आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

२८

खामगाव ३१-१-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. गेल्या शनिवारी मी अमरावतीस गेलो होतो तो आज सकाळी परत आलो. या प्रवासामुळे पूर्वी झालेल्या जाग्रणात भर पडली. माझी हल्लीची स्थिति तुम्ही पाहिली असती तर तुम्हांस कीव आली असती. ती पूर्ववत् होण्यास २-४ महिने तरी लागतील. या अवधीत मजकडून तुमच्या पत्रास वेळेवर उत्तरे न गेल्यास वाईट वाटू देऊ नये.

प्रल्हादचरित्रात मूळच्या पौराणिक कथेत विशेष फेरफार केलेला दिसला नाही. शेवटचा अंक अजून माझ्या वाचनात आला नाही.

नवीन नाटकाचे कथानक रंगभूमीवर येण्यापूर्वी आपणास सविस्तर कळविण्यात येईल याबद्दल खात्री असू द्यावी.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

२९

खामगाव १०-२-१०

आशीर्वाद विशेष.

हल्ली प्रकृती किंचित् बरी आहे. परंतु अजून पूर्वी सारखी झाली नाही. रंगभूमीचा अंक वाचून पाहिला. त्यात तुमची टीका आली आहे. ती अंक हाती पडल्याबरोबर वाचून टाकिली. चांगली झाली आहे. मात्र मुद्रणदोष फार झाले आहेत. हा तुमचा पहिलाच प्रयत्न दिसतो. याच्या पुढील प्रयत्न बरेच चांगले निघावे असा अंदाज या लेखावरून करण्यास हरकत नाही. माझे मत नेहमी पक्षपाताचे असते असा माझ्या स्नेह्यांचा समज झाल्यासारखा दिसतो. व त्यात कदाचित् तथ्यही असेल. म्हणून येथेच आटपते घेतो.

येथे प्लेग सुरू झाला आहे २-४ दिवसांतच झोपडीवर जावे लागणार. या दिवसांत माझ्या सारख्यास झोपडीवर बराच त्रास होईल अशी भीति वाटते.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

३०

खामगाव २०-२-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. तुमच्या टीकेसंबंधाने मला विशेष काहीच कळविण्यासारखे नव्हते. नाटकाचा काळ, नाटकाचे कर्तृत्व कालिदासाचे असावे किंवा नाही, वगैरे मुद्यांसंबंधाचे विवेचन मला मनोरंजक वाटले, व दोन चार अपवादक स्थलांशिवाय इतर ठिकाणची भाषा बरीच सुबोध व अकृत्रिम वाटली. इतकेच तुम्हास कळविण्याजोगे आहे.

आज दोनचार स्नेह्यांस नवीन नाटक वाचून दाखवून चालींच्या योजनेसंबंधाने त्यांचा सल्ला घेणार आहे. ईस्टरच्या सुट्टीपूर्वी सर्व पद्ये तयार करण्याचा संकल्प केला असून अजून एक पद्यही झाले नाही, किंवा चालींचीही योजना झाली नाही. शिवाय पद्यरचनेस जी स्फूर्ती लागते तिचीही या खेपेस अनुकूलता नाही. त्यामुळे फार शंका वाटत आहे. बहुतेक दिवस आळसात चालले आहेत.

वरकड मजकूर विशेष नाही. प्लेग जरा दबल्यासारखाच झाला आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

३१

खामगाव २२-४-१०

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. मी अलीकडे बरेच दिवस नवीन नाटकांची पदे करण्यात व त्यांच्याचाली किर्लोस्कर मंडळीस देण्यात गुंतलो होतो. शिवाय माझ्या पायांत नुकतेच Carbolic aeid डॉक्टरकडून सोडवून घेतले, त्यामुळे पायांची चाळण होऊन उत्साहही राहिला नाही. असो.

आमची सुट्टी मे महिन्याच्या १५ व्या तारखेस सुरू होऊन जूनच्या १५ वीस संपणार. मे महिन्याचे २०वे तारखेस माझ्या मधल्या मुलाची व पुतण्याची मुंज उरकून टाकण्याचा विचार आहे. त्यानंतर ४-५ दिवसांनी मला पुण्यास जाता येईल. कदाचित् आप्तांकडे कार्ये निघाल्यास आणखीही काही दिवस येथे राहावे लागेल. येथून मुक्तता झाल्याबरोबर मी प्रथम पुण्यास जाऊन तेथून मित्रमंडळींचा आग्रह पडल्यास माथेरान वगैरे ठिकाणी जाईन. गेल्या साली ज्योतिषाचा निबंध व पाचवे नाटक मजजवळ धूळ खात पडलेले इतर काही लेख तयार होऊन त्यापैकी काही प्रसिद्धही झाल्यामुळे मला बरेच समाधान वाटत आहे व यंदाच्या सुट्टीचा पूर्ण उपभोग घेण्याचा विचार आहे.

तुम्ही लिहिल्याप्रमाणे हिरण्यकशिपूची भूमिका काहीशी कीचकाच्या वळणावर गेली आहे. 'गर्वनिर्वाण' (म्हणेच प्रल्हादचरित्र) नाटक किर्लोस्कर मंडळीकडून पुढे येईल की नाही याची शंका वाटते.

कारण रा. गडकरी व किर्लोस्कर मंडळी यामध्ये चांगलेच वितुष्ट पडले असून ते त्या मंडळीतून कायमचे निघून गेले आहेत.

'मानापमान' नाटकाचे संविधानक रा. जोगळेकरांनी मला सांगितले होते. पण ते हल्ली विसरून गेलो आहे. ते 'All's well that ends well' या नाटकाच्या संविधानकासारखे काहीसे आहे येवढे मात्र आठवते.

माझ्या नाटकाची वहीच तुमच्याकडे पाठविण्याचा विचार होता. पण ती काही दिवस तरी पाठविता येणार नाही. म्हणून त्याचे संविधानक संक्षेपाने येथे देत आहे. नाटक प्रसिद्ध होण्यापूर्वी ते कोणास सांगू नये.

नाटकाचे नाव 'प्रेमशोधन' आहे. एका राजास नंदन व कंदन असे दोन जुळे मुलगे होते. नंदन हा मागाहून जन्मल्यामुळे वडील ठरून गादीचा वारस ठरला. त्यामुळे कंदन त्याचा वैरी ठरला. दुसऱ्या एका राजास मोहिनी व इंदिरा या दोन मुली होत्या. मोहिनी व कंदन यांचे बालपणापासून परस्परांवर अत्यंत प्रेम असताही नंदनाचा मोहिनीशी त्याच्या वडिलांनी त्याच्या इच्छेविरुद्ध विवाह लाविला. विवाहाच्याच दिवशी कंदन एकाएकी नाहीसा झाला, त्यामुळे त्याच्या बापाने हाय खाल्ली, व थोड्याच दिवसात तो मरण पावला. नंदन व मोहिनी यांची परस्पराविषयी अरुची असल्यामुळे ती परस्परांशी भावंडाप्रमाणे वागू लागली. नंदनाने राज्याचा अर्धा हिस्सा भावाचा म्हणून ठेवून दिला.

कंदन शहर सोडून गेला तो लवकरच अरण्यात एका भिल्लाच्या टोळीचा नाईक झाला. व त्याने थोड्याच वर्षांत इंदिरेच्या बापाचे राज्यहरण करून बापलेकीस अरण्यास पिटाळून लाविले व आपल्या भावाच्या जागी आपली स्थापना करून कोणास संशय न येता त्याची गादी व स्त्री एकदम हरण करण्याचा घाट घातला. त्याकरिता त्याने प्रथम आपल्या मरणाची खोटीच बातमी उठविली. नंदनाने पदभ्रष्ट मंदाराची (इंदिरेच्या बापाची) अरण्यात भेट घेण्याचे ठरविल्यामुळे व परत येईपर्यंत आपण आजारी आहोत अशी ग्वाही फिरविण्याबद्दल अमात्यास सांगितल्यामुळे कंदनाच्या बेतास दुजोरा आला. त्याने मोहिनीची एकांतात गाठ घेऊन तिला आपले बेत कळविले.

इकडे नंदन वेष बदलून मंदाराच्या झोपडीकडे गेला. त्याने इंदिरेस पाहाताच त्याचे तिजवर मन बसले. अशा स्थितीत कंदनाच्या मृत्यूचे वर्तमान कळविल्यास आपल्या हेतूविषयी शंका उत्पन्न होईल (कारण कंदनाचा व इंदिरेचा विवाह करण्याचे उभयतांच्या वडिलांनी ठरविले होते.) म्हणून तो काही दिवस अज्ञातवासातच तेथे राहिला. एके दिवशी कंदन आपल्या साथीदारांसह तेथे आला. त्याच्या व नंदनाच्या झटापटीत नंदनास निसटता वार लागून तो बेशुद्ध पडला. इंदिरेस पाहाताच कंदनाचेही प्रेम तिजवर बसले व तिचे हरण करण्याचा त्याचा निश्चय झाला. एके दिवशी त्याने नंदनास उचलून मारण्याकरिता एका अंधारकोठडीत ठेविले व आपण त्याचे जागी जाऊन पडला. इंदिरेने त्याचे कृत्य ताबडतोब ओळखिले व त्याचा तीव्र निषेध करून नंदनास परत आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने त्यास परत आणिले. थोडा वेळ लोटला असता तर त्याच्या सेवकाने (त्याचे नाव तडाग) वध केला असता. यापुढे कंदनाने राजरोसपणे मंदारापाशी तिच्याबद्दल आपली वाग्दत्त वधू म्हणून मागणी घातली व ती त्यास मान्य करावी लागली. इंदिरेचे आपणावर प्रेम आहे हे माहीत असताही कंदनाच्या हक्काच्या आड येऊ नये म्हणून नंदन स्तब्ध राहिला. ते पाहून इंदिरेनेही नाइलाज म्हणून बापाच्या म्हणण्यास रुकार दिला. परंतु लग्न

झाल्याबरोबर प्राणत्याग करण्याचा निश्चय केला. तो कंदनास कळताच त्याने उदारपणाने तिला वचनमुक्त केले.

इकडे मोहिनीस जेव्हा कळले की आपले कपट नंदनास त्याच्या मारेकऱ्याकडून कळले तेव्हा त्याचा वध करण्याकरिता तिने त्याच मारेकऱ्यास पाठविले. त्याचा बेत कंदनास कळला तेव्हा त्याने नंदनाच्या जागी आपण उभा राहून प्राण देण्याचे ठरविले व तो निश्चय अमलातही आणला. हे वर्तमान मोहिनीस कळल्यावर तिनेही आत्महत्या केली. अखेरीस नंदनाचा इंदिरेशी नगरास परत आल्यावर मंदाराच्या हस्ते विवाह लागला.

नंदनास प्रेमाची प्राप्ती झाली, व कंदनाची प्रेमामुळे चित्तशुद्धी झाली या दोन गोष्टींवरून नाटकाचे नाव ठेविले आहे.

क. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. आपले पत्र पावले. रा. जोगळेकर, बोडस, परपुरे, रामा डवरी, राजाराम, हे इसम अनुक्रमे नंदन, कंदन, मंदार, नंदिनी, मोहिनी व तडाग यांची कामे करणार आहेत. संविधानकाचा काळ निश्चित नाही. पद्ये ७५ झाली असून पूर्वीच्या नाटकांतल्यापेक्षा सोपी झाली आहेत असे सर्वांचे मत आहे. याहून अधिक समक्षच सांगेन.

मानापमान अजून लिहून झाले नाही. किर्लोस्कर मंडळी मे अखेर पुण्यास जाणार. मी मेच्या २१-२२ तारखेच्या सुमारास मुंबईस येईन. कोठे उतरेन हे सध्या सांगता येत नाही. मुंबईस १-२ दिवस राहून व ज्योतिषावरील निबंध प्रकाशकाच्या स्वाधीन करून नंतर पुण्यास जाईन.

मोहिनीस नंदनाचा वध करण्यावाचून इलाज नव्हता.

मोहिनी जिवंत आहे तोपर्यंत लग्न करावयाचे नाही असाच नंदनाचा निश्चय असून तो त्याने अखेरपर्यंत पाळिला आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

❈

३५२ रस्त्यांची पेठ
पुणे २८-५-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पात्र पावले. परंतु मुंबई सोडल्यापासून इसब व ताप यांनी पिच्छा पुरविल्यामुळे मी सारखा पडून होतो. हे दिवस अगदी फुकट गेले. कोणास पत्र लिहिण्यासही झाले नाही. हल्ली प्रकृती बरी आहे.

तुम्ही विचारपूर्वक ज्या सूचना केल्या आहेत त्या वाचून आनंद झाला. परंतु त्या अमलात आणिता येत नाहीत. याची कारणे अशी :

अहमदनगरास खेळ व्हावा अशी तुमची इच्छा रा. जोगळेकरांस कळविली. परंतु त्यांचे म्हणणे असे पडले की नगरचे लोक व मंडळी यांचा परस्पराबद्दल आदर नाही. त्यामुळेच तेथे पहिला प्रयोग होणे श्रेयस्कर नाही. पहिला खेळ रंगाच्या तालमीऐवजी व्हावयाचा आहे. पुण्यास जो पहिला खेळ व्हावयाचा तो येथे आल्यानंतर १ महिन्याने व रा. केळकर, खाडिलकर यांच्या समोर बऱ्याच तालमी झाल्यानंतर व्हावयाचा आहे. हे कळल्यावर माझेही मत तसेच पडले. नगरचे नाटकगृह चांगल्यापैकी आहे. वीरतनयाचा पहिला प्रयोग तेथेच झाला.

रा. केळकर हल्ली येथे नसून साताऱ्यास लग्नाकरिता गेले आहेत. त्यांची व माझी अजून भेट झाली नाही.

रा. बापटांच्या सूचना मी फारच थोडे फेरफार करून तुर्त अमलात आणणार आहे.

आता तुमच्या सूचनासंबंधाने :

पत्र वाचल्यानंतर २ घंटेपर्यंत नंदन शोकांतमग्न आहे व शोकाचा वेग कमी झाल्यावर मग अमात्याचे व त्याचे भाषण सुरू होते असे मी दाखविणार आहे. यामुळे शोकाच्या पद्याची जरुरी उरली नाही. पहिला प्रवेश फारच लांबला आहे अशी रा. जोगळेकरांची आधिच कुरकुर आहे. सबब भाग वाढविण्यास त्यांची कबुली मिळेल असे वाटत नाही. तथापि सवडीप्रमाणे एखादे पद्य पुण्यास प्रयोग होण्यापूर्वी घालता आल्यास पहातो.

बालगंधर्वास दोन तीन पदे ओळीने घातल्यास चालेल. पण रा. जोगळेकरांस मुळीच चालणार नाही. त्यांना या गोष्टींचा कंटाळा असतो हा माझा अनुभव आहे. चंडीचा व विहंगाचा प्रवेश बराच हास्योत्पादक असल्यामुळे तो प्रेक्षकांच्या गर्दीत जाण्यापेक्षा नंदनाचे लांबलचक आत्मगत भाषण गेलेले काय वाईट?

पद्यांची यादी बरोबर असावीशी वाटते. काही पद्ये यादीत येण्यासारखी असून आली नाहीत असे वाटते. पण या संबंधाने मतभेदास जागा आहे.

आजारामुळे मला संमेलनासही हजर रहाता आले नाही.
आजपर्यंत उद्दिष्ट कार्यापैकी हातून एकही कार्य झाले नाही.
उद्या सातार्‍यास जाण्याचा विचार आहे. १-२ दिवसांत परत येईन.
रा. बापट बहुधा परत गेले असतील. तेथे आले नाहीत हे एका अर्थी बरेच झाले.

येथे पंढरपुरकर बोवा म्हणून एक कथेकरी आहेत. त्यांच्या मुलाचा आवाज हा सुस्वर असून तानांची वगैरे तयारीही चांगली आहे. तालांचे ज्ञान मात्र बेताचेच आहे. त्याच्या संबंधाने मंडळींची बर्‍याच दिवसांपासून खटपट चालू आहे. परंतु अजून यश येत नाही.

आज क्विनीन घेतल्यामुळे डोके फिरत आहे. सबब पुरे करितो.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

३३

खामगाव ३-७-१०

आशीर्वाद विशेष.

प्रेमशोधन नाटकाचा प्रयोग २५ व्या तारखेस नगरला झाला. तालमीत वाटले होते त्यापेक्षा तो चांगला वठला असे रा. बोडस व मुजुमदार यांचे पत्रावरुन दिसते. बालगंधर्वास चाली चांगल्या न पडल्यामुळे त्यांचे काम फार कमी प्रतीचे होते असे कळते. नाटकातील पहिला, दुसरा, तिसरा व शेवटच्या प्रवेशाशिवाय पाचवा अंक हे भाग बरे होतात. काही भागात सुधारणा करण्याबद्दल सूचना आल्या आहेत. परंतु मी येथे आल्यापासून सारखा सर्दी व खोकला यांनी आजारी असल्यामुळे लिहिण्याचे काम मुळीच होत नाही. बारीक तापामुळे डोळ्याचीही आग होत आहे. अशा स्थितीत सुधारण करणे शक्य नाही. रा. बापटांच्या निबंधास प्रस्तावना लिहावयाची आहे. ती लौकर कशी तयार करिता येईल याच विवंचनेत मी हल्ली आहे.

पुणे येथे १ महिना तालमी करून नंतर प्रयोग करावयाचा आहे. तुमचा रा. शंकरराव मुजुमदार यांशी परिचय असल्यामुळे तुम्हांस तालमी पाहावयास काहीच प्रत्यवाय येणार नाही.

नंदनास एखादे पद, बालंगधर्वास २ पदे, व विहंगास २ पदे करावयाची आहेत. पण तूर्त तेही शक्य नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

३४

खामगाव २८-७-१०

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. माझे मेहुणे रा. गोळवलकर हे जबलपूर येथे बरेच आजारी असल्याकारणाने बऱ्याच काळजीत होतो. त्यामुळे उत्तर धाडिले नाही. हल्ली त्यांची प्रकृती किंचित् बरी आहे असे कळते. तथापि त्यांजकडून आज तार आल्यास मी आजरात्री जबलपुरास त्यांजकडे जाईन. व परत रविवारी येईन. तेथे जाणे रहित झाल्यास २-३ दिवसांत नाटकात दुरुस्ती व पद्ये करून सोमवारी पाठवून देतो.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. बापटांच्या निबंधची प्रस्तावना पाठवून दिली आहे. ज्योतिषावरील निबंधाबद्दल अजून रा. यंद्यांकडून जवाब आला नाही. महाराष्ट्र मंडळीच्या नाटकासंबंधाने अजून फारसा विचार केला नाही. हल्ली प्रकृती बरी आहे. खोकला मात्र थोडा आहे.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

३५

खामगाव ३-८-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पोचले. माझ्या मेहुण्यांकडून पत्र किंवा तार न आल्यामुळे मी त्यांच्याकडे जाण्याचा बेत रहित केला. त्यांची प्रकृती किंचित् बरी आहे असे पत्र सुमारे आठवड्यापूर्वी आले होते. त्यानंतर त्यांच्याकडील समाचार कळला नाही.

नवीन नाटकात मला जे फेरफार थोडक्यात करिता आले ते करून व पाच पद्ये जास्त घालून नाटक गेल्या शनिवारी मंडळीकडे पाठवून दिले. फेरफार मंडळीस कितपत मानवले हे अजून कळले नाही. कदाचित् ते तुमच्या पहाण्यात आलेही असतील. पाच पद्यांपैकी दोन इंदिरेस १ नंदनास व २ विहंगास घातली आहेत.

तुम्ही तालमी पहावयास जाता हे ठीक आहे. पण त्यामुळे अभ्यासात व्यत्यय येऊ नये येवढीच स्नेहभावाची सूचना आहे.

पाचव्या अंकातील शेवटचा नाच मीच घातला आहे. नाचाचे पद भरतवाक्याऐवजी घातले आहे.

'मतिविकारा' च्या गेल्या प्रयोगाबद्दल माहिती असल्यास मला कळवावी.

तुम्ही मागील पत्रात ज्या विनंतीबद्दल लिहिले आहे ती पुस्तक कर्त्याने पाठविले असता त्यास काय लिहावयाचे याबद्दल की काय? अशा प्रसंगी जो मजकूर लिहावयाचा असतो तो केवळ औपचारिक असतो, व तो परिस्थितीप्रमाणे भिन्नभिन्नही असतो. यापेक्षा यासंबंधाने जास्त लिहिण्यासारखे नाही.

मनोरंजनाच्या येत्या दिवाळीच्या अंकाकरिता लिहावयाची गोष्ट आज संपविली. २-३ दिवसांत पाठवून देईन. दुःखपर्यवसायी झाली आहे. आता यापुढे ३-४ महिने काही न लिहिण्याचा संकल्प आहे. महाराष्ट्रनाटक मंडळी करिता नाटकही यंदा लिहिता येईल असे वाटत नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

※

३६

खामगाव १३-८-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले रा. खाडिलकरांनी केलेला बदल मला मान्य आहे. परंतु मोहिनीच्या मृत्यूचे वर्तमान कळेपर्यंत इंदिरेशी विवाह करण्याचे नंदनाने कबूल करणे त्याच्या शीलास शोभणार नाही असे वाटते. पण या बद्दल त्यांनी काही तरी योजना केली असेलच.

बायकांना दागिन्यांची जी अतोनात हौस असते तिचे दुष्परिणाम हे दिवाळीच्या अंकांकरिता लिहिलेल्या गोष्टीचा विषय होत. गोष्ट रा. मित्र यांस फार पसंत पडली असे ते कळवितात.

बापटांच्या निबंधाच्या प्रस्तावनेत नाटकविचारात कथानक, शील, रस व कृती यांचा विचार का करावा लागतो याचे दिग्दर्शन केले आहे. ती प्रस्तावना कदाचित यापूर्वी तुमच्या अवलोकनात आलीही असेल. ज्योतिषावरील निबंध छापण्याचे रा. यंदे यांनी कबूल केले आहे असे रा. मित्र लिहितात.

गेल्या वर्षात ज्योतिषावरील निबंध सुधारून लिहिला व त्याची नक्कल करविली. 'याचक', 'म्हातारपणाचे फायदे' व 'चित्रगुप्ताचा जमाखर्च' या मुष्टि लिहिल्या, व सुदाम्याच्या पोह्याच्या स्वतंत्र पुस्तकाची प्रुफे तपासली, मराठी भाषेवरील निबंध बडोद्याच्या संमेलनाकरिता सुधारून लिहिला. 'लेखनकलेतील स्थित्यंतरे', 'गाणारे यंत्र' व नवीन गोष्टही लिहिली. याशिवाय प्रेमशोधनाची पद्यावलि लिहिली. इतके काम मी साऱ्या जन्मात कोणत्याही एका साली केले नव्हते. यानंतर बरेच दिवस अवश्य विश्रांती पाहिजे आहे. तथापि विविधज्ञानविस्ताराकरिता एक टीका लिहावयाची आहे. पण ती लिहिल्यानंतर मात्र १-२ वर्षे मला विश्रांति देण्याबद्दल मी महाराष्ट्र मंडळीस विनंति करणार आहे.

१९, २० व २१ या तारखांस मला सुट्टी आहे. नवीन नाटकाच्या पद्यांच्या स्वरात मजकडून सुधारणा होण्यासारखी असेल तर मी ती सुट्टी ह्या नाटकाप्रीत्यर्थ घालविण्याचा विचार केला आहे. व त्याबद्दल रा. मुजुमदारास लिहिलेले आहे. त्यांचे अनुकूल पत्र आल्यास मी (२० वे तारखेस प्रेमशोधन असल्यास रा पिंपळीकर व शेंबेकर या दोन स्नेह्यांसह) गुरुवारी रात्री येथून निघून शुक्रवारी सकाळी ११ वाजता पुण्यास येईन. माझ्या चुलत्यांकडेच उतरेन. तुम्ही मंडळीत शोध केल्यास शुक्रवारी संध्याकाळी त्यांचेकडे भेटेन. माझ्या येण्याने फायदा होण्यासारखा नसल्यास मात्र येणार नाही. नाटकाच्या गद्यासंबंधाने माझा अर्थात् काही उपयोग होण्यासारखा नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

३७

खामगाव २९-८-१०

आशीर्वाद विशेष.

येथे गेल्या सोमवारी पहाटे सुखरूप येऊन पोहोचलो. आल्यावर असे आढळून आले की चालू महिन्याच्या २७, २८ व २९ तारखांस सुट्या आहेत. याशिवाय ३० व्या तारखेच्या कामाची मला व्यवस्था करिता येण्यासारखी होती. म्हणून या सुट्यांत मी पुण्यास यावे की काय असे रा. मुजुमदार यांस पत्र पाठवून विचारिले. त्यांचे उत्तर आले की ता. ३ सप्टेंबर रोजी नव्या नाटकाचा खेळ असल्यामुळे त्यापूर्वी १-२ दिवस येऊन तोपर्यंत राहाण्यास सवड असली तर जरूर यावे. या पत्रावरून पुण्यास पुन्हा जाण्याचा बेत रहित केला व हे एका अर्थी माझ्या पथ्यावरच पडले. कारण हल्ली मला सर्दी व खोकला झाला आहे. ती कदाचित् प्रवासाने बळावली असती.

कल्याणास एका मित्राचे घरी उतरलो होतो. तेथे मंगलाचरणाकरिता दुसरे पद करून पाठविले. 'अभिधाना देत' या पदात थोडा फेरफार करून ते मोहिनीला दुसऱ्या अंकात म्हणण्याकरिता पाठवून दिले आहे. ही पदे पोहोचल्याचे किंवा मंगलाचरणाच्या पदाची चाल लागली की नाही याबद्दल काहीच वर्तमान कळले नाही. तरी तुम्ही पुन्हा तालमीस जाल तेव्हा रा. बोडसांकडून याबद्दल खुलासा काढून मला कळवावा. आपण ज्या तातडीने एखादे काम करितो ती तातड इतरांत दिसली नाही तर मनास बरे वाटत नाही.

रा. मुजुमदार यांनी किर्लोस्कर मंडळीकरिता सेक्रेटरी पाहिजे अशा अर्थाची जाहिरात दिली आहे. असे करण्याचे कारण काय? ते स्वतः नोकरी सोडणार की काय? त्यांच्या तोडीचा इसम मिळणे मुष्किल आहे.

रंगभूमीचा नवा अंक मिळाला. चांगला आहे. इतर कामांप्रमाणे हे मासिकही रा. मुजुमदार फार चांगल्या रीतीने चालवीत आहेत.

नव्या नाटकाचा प्रयोग कसा वठतो व लोकांस कसा काय वाटतो याबद्दल साद्यंत वर्तमान ताबडतोब कळवावे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

३८ खामगाव ५-९-१०

आशीर्वाद विशेष.

आज कचेरीतून येण्यास फार उशीर झाला. त्यामुळे तुमच्या पत्रास सविस्तर उत्तर पाठविता येत नाही. प्रयोग चांगला झाला हे पाहून संतोष होतो. तुमच्या मताप्रमाणेच रा. गडकरी व रा. शंकरराव यांचे मत आहे. रा. केळकरांचे मत अजून आले नाही. मी आज रा. शंकररावांस एकदोन सूचना केल्या आहेत, त्या तुम्हांस कशा वाटतात ते कळवावे. विषदीकरण ही चूक माझ्या पूर्वीच लक्षात आली होती. माझ्याकडे प्रुफे न आल्यामुळे राहिली. रा. खाडिलकर मजबरोबर नसून माझ्या धाकट्या बंधूंबरोबर शिकत होते.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

३९ खामगाव २१-९-१०

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. तुम्हांकडून प्रयोगाबद्दल सविस्तर माहिती मिळाली ती वाचून समाधान वाटले. नाटकातील चालींविषयी ओरड का असावी याचे कारण मला व माझ्या स्नेह्यांस कळत नाही. मोहिनी व नंदन यांच्या चाली चांगल्या आहेत हे खुद्द मंडळीही कबूल करीत आहे. बालगंधर्वांनी मला ज्या काही चाली दिल्या त्यांवरच त्यांची काही पदे झालेली आहेत. असे असता व त्यांचा आवाज फार सुंदर असता त्यांना बेताचीच वन्समोअरे मिळतात याचे कारण जितक्या उत्साहाने पदे म्हणण्यात यावीत तितक्या उत्साहाने म्हटली जात नाहीत हे असावे. खुद्द रा. जोगळेकरांना पहिल्या प्रयोगास ज्या पदांना वन्समोअर मिळाली नाहीत त्या पदांना चवथ्या प्रयोगास मिळावी (अशी पदे तीन आहेत) यावरून तोच निष्कर्ष निघतो. ज्या चाली मी कुंजविहारी नाटकातील घातल्या आहेत त्या इकडे फारच लोकप्रिय झालेल्या आहेत. मला असे वाटते की चाली जसजशा बसत जातील व त्या जसजशा उत्साहाने म्हणण्यात येतील तसतशा त्या लोकप्रिय होत जातील.

रा. बोडस, चिंतोबा व रामभाऊ यांच्या एकाही पदास वन्समोअर मिळाले नाही असे तुमच्या पत्रावरून दिसते. असे का व्हावे? त्यांना एकही चाल चांगली पडली नाही की काय?

किर्लोस्कर मंडळीकडून जी प्रत येईल तिच्यात गाळलेल्या मजकुरापैकी काही भाग व मोहिनी व नंदनास घालावयाची स्वगत भाषणे घालून व इतर फेरफार करूनच मी पुस्तके छापविणार आहे. पुस्तक

लवकर छापवावे अशा सूचना येत आहेत.

तुमच्या भविष्याबद्दल जे पत्र पाठविणार आहात त्याची व तुमच्या लेखाची वाट पहात आहे. पत्र लांब असले तरी हरकत नाही. लेखावर मी आपला अभिप्राय सवडीप्रमाणे कळवीनच. प्रलिमिनरीतील तुमचे पेपर कसे गेले ते कळविले नाही. पुढील पत्री कळवावे.

रा. बोडस इतके आजारी असता नाटक झाले ही गोष्ट चांगली झाली नाही. त्यांची प्रकृती कशी आहे हे पुढील पत्री कळवावे.

'त्याग वाटे' व 'योग्य संसारपथ' या पदांच्या स्थानांची अदलाबदल झाली हे चांगले झाले.

गेल्या आठवड्यातील महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे कै. महादेव गोविंद रानडे यांची इंग्रजी सहाव्या व सातव्या इयत्तातील दोन essay books मला मिळाली. त्यांचे बुद्धिवैभव व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व त्यांमध्येही चांगले दिसून येत आहे. मी त्यावर लवकरच एक निबंध लिहिणार आहे व ते शेवटपर्यंत प्राणापलीकडे जपून ठेवणार आहे. रानड्यांचे त्या इयत्तांवरील इंग्रजी भाषेचे शिक्षक (मुंबई येथे) कोण होते याचा शोध तेथे लागण्यासारखा असल्यास लावून मला त्यांचे नाव कळवावे. त्य शिक्षकाचे निबंधावर शेरे आहेत व initials ही आहेत. परंतु त्यावरून नाव कळत नाही. Essay books १८५८ व १८५९ सालची आहेत.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

४१ खामगाव २३-९-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचा निबंध व पत्र पावले. कचेरीतून येण्यास फारच उशीर झाल्यामुळे घाईने पत्र लिहित आहे. निबंध आज परत पाठविला आहे. चांगला साधला आहे. परंतु प्रसिद्ध न झालेल्या पुस्तकावर विविधज्ञानविस्तार टीका छापीत नसतो. शिवाय माझ्यावर नाटकातील अनुकूल टीका मीच पाठविणे प्रशस्त दिसले नसते. केसरीतच थोड्याशा फेरफारांसह प्रसिद्ध करावी. विहंग व चंडी यांचा संबंध विषम विवाहाचे गैरफायदे दाखविण्यात झाला आहे. शिवाय जागोजाग प्रधान पत्रांच्या मनातील वृत्तींशी व संविधानकाशीही त्यांचा संबंध आहे. इंदिरा नंदनास कंदन समजत होती. तेव्हा तिने त्याची कंदन म्हणून निंदा आरंभिली. परंतु स्वतःचीच निंदा करणे त्यास कठिण वाटून त्याच्या तोंडातून कंदनासंबंधाने स्वाभाविकपणे स्तुती झाली असा कथाभाग आहे. या संबंधाने लेखात दुरुस्ती करावी.

गाडीची वेळ झाली. माझे कालचे पत्र पोचले असेलच.

क. लो. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

४२ खामगाव २५-९-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. initials बरोबर कळत नाहीत. नाव कळल्यावर ती उकलतील. तुम्ही जी सूचना करणार आहात ती ताबडतोब कळवावी. तुम्ही टीकेच्या प्रसिद्धीबद्दल परस्पर विविधज्ञानविस्ताराच्या व्यवस्थापकांस विचारण्यास माझी काही हरकत नाही. त्यांजकडून काय उत्तर येईल हे मी तुम्हास पूर्वीच कळविले आहे. मला वाटते ती टीका रंगभूमीत यावी. तिला तेथे स्थळ मिळण्यास हरकत येणार नाही. इंदिरेच्या पदांपैकी 'ग्रहण अजि असुवरिचे' 'आश्रया या गृहा' या पदांस वन्समोअर अवश्य व्हावयास पाहिजे. शिवाय मी मागाहून करून पाठविलेल्या पदांपैकी 'घाली विधि कसा दारुण घाला' हे पद इंदिरा म्हणत नाही. ते म्हटले असते तर हटकून वन्समोअर झाले असते. यापुढे नवीन पदे करण्याचा मनस्वी कंटाळा आला आहे. आजपत्राचे पाकीट जवळ नसल्यामुळे व रविवारी पोष्टात मिळत नसल्यामुळे कार्डच पाठविलेले आहे.

क. हे. आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

४३ खामगाव १-१०-१०

आशीर्वाद विशेष. तुमचे पत्र पावले.

आजच्या प्रयोगाची हकीकत शक्य तितकी लवकर कळवावी. यापुढे प्रयोगाचे वर्तमान कळविण्याची तसदी तुम्हाला पडणार नाही. कारण पुणे येथे प्रेमशोधनाचा यापुढे प्रयोग होणार नाही असे कळते.

लिहिण्याच्या धंद्यावर चरितार्थ भागविणे हिंदूस्थानात, निदान महाराष्ट्रात तरी, अशक्य आहे असे तुमच्याप्रमाणेच माझेही मत आहे. मुंबई किंवा पुणे यासारख्या मोठ्या शहरांत राहून ज्या मार्गाने तुमच्या सारख्या बुद्धीच्या व कलाच्या मनुष्यांचा चरितार्थ चांगल्या रीतीने चालू शकेल असा मार्ग म्हणजे एकाद्या कॉलेजात प्रोफेसरी मिळविणे हा होय. व त्या करिता मुंबई येथे शिकविण्या धरून एम. ए. ची परीक्षा द्यावी लागेल. एलएल. बी. ची परीक्षा देऊन मुंबई येथे एखाद्या नामांकित वकिलांची मदत मिळविता येईल तर याहीपेक्षा उत्तम. एम. ए. किंवा एलएल. बी. मोठ्या शहरातून होऊन पैसे मिळविण्याकरिता तुम्हाला काही वर्षे चांगली मेहनत करावी लागेल. पण त्याला इलाज नाही. कुटूंबासंबंधाने तुमचे जे कर्तव्य आहे ते पार पाडण्याकरिता अवश्य तितके श्रम तुम्हास घेतले पाहिजेत.

माझी स्वतःची एकदा तुमच्याप्रमाणेच स्थिती झाली होती. मी व्यवहारमूढ व मुखदुर्बल असल्यामुळे माझे पुढे कसे होईल याबद्दल मला व माझ्या आप्तांस फार काळजी वाटत असे. परंतु कोणत्याही धंद्यात प्रामाणिकपणे, दक्षपणे, व मेहनतीने काम केल्यास हटकून यश येते अशी माझी खात्री झाली आहे. वऱ्हाडात अजून वकिलीत पैसे बरे मिळतात. या धंद्यांत लबाडी केलीच पाहिजे असा माझा स्वतःचा अनुभव नाही. म्हणून माझी तुम्हास अशी सुचना आहे की, प्रथम वकिलीची परीक्षा पदरात पाडून झाल्यावर वाङ्मयाकडे

लक्ष पुरवावे. मलाही कायद्याबद्दल व कोर्टाबद्दल मनस्वी तिटकारा असे. पण तो हळूहळू नाहीसा झाला. जोपर्यंत कुटुंबाच्या पोटापाण्याची नीट व्यवस्था लागली नाही तोपर्यंत वाङ्मयाकडे लक्ष लागत नाही, असा माझा अनुभव आहे.

माझी प्रकृतीही तुमच्यासारखीच होती. पण आयुःक्रम नियमितपणे चालवीत गेल्यास प्रकृती सुदृढ जरी झाली नाही तरी निकोप होऊन आपण स्वीकारलेल्या धंद्यात यश मिळविण्याच्या मार्गात शारीरिक विघ्न येण्याचे कारण नाही.

मोठ्या शहरात राहण्याचा आग्रह असेल तर एखाद्या कॉलेजात प्रोफेसर किंवा Servants of India चा मेंबर होऊन त्याचे उत्पन्नाचे जोडीस लेखनद्वारा उत्पन्न मिळविणे कठीण नाही. मला वाटते तुम्हांस हाच मार्ग सर्वांत पसंत पडेल.

तुम्ही मला जी सूचना केली आहे ती करण्यापूर्वी माझे कोणते वर्तन तुमच्या समोर होते हे मला माहीत नाही. परंतु वीरतनय बाहेर आल्यापासून मी टीका करिताना, विशेषतः नाटकावर टीका करिताना, अत्यंत सौम्य भाषा वापरीत आलो आहे असे तुमच्या नजरेस येईल. ज्या पुस्तकांसंबंधाने कडक भाषा वापरली आहे. त्यासंबंधाने सदसद्विवेकबुद्धीस साक्ष ठेवून सौम्य भाषा वापरण्यासारखी नव्हतीच. माझ्या टीकेची तीव्रता हल्ली इतकी नाहीशी झाली आहे की मी टीकेकरता आलेल्या पुस्तकांची अवास्तव स्तुती करितो असा माझ्या स्नेह्यांचा मजवर आरोप आहे.

माझे मत असे आहे की, ईश्वरानेच मनुष्यास ज्या शक्ती दिल्या आहेत त्यांचा पूर्ण उपयोग करणे हे त्याचे कर्तव्य आहे व हे कर्तव्य मी आजपर्यंत शक्य तितके बजावीत आलो आहे. या विचारामुळे अनेकदा खिन्न मनःस्थितीतही मला समाधान वाटत आले आहे. माझ्या टीका सहीनिशी प्रसिद्ध होत नसल्यामुळे त्यामुळे मजविरुद्ध काहूर उठण्याचा संभव नाही. व जरी काहूर उठले तरी जोपर्यंत आपले मन आपणास टोचीत नाही तोपर्यंत त्याबद्दल वाईट वाटण्याचेही कारण नाही. तुम्ही म्हणता की टीका न करिता केवळ स्वतंत्र रचनेवर कीर्ती मिळविण्याचे साधन मजपाशी आहे हे जरी खरे असले तरी टीकालेखनही साधन असल्यास ते कां चालवू नये? माझ्या काही टीका कोणी लिहिल्या हे माहीत नसताही त्यासंबंधाने अनेक स्थळी अनुकूल उद्‌गार आले आहेत. जर माझ्या टीका खरोखरच वाचनीय असतील तर केवळ टीकांना भिऊन मी त्या प्रसिद्ध करू नये की काय? ईश्वरदत्तशक्तींपैकी मी जर एका शक्तीचा उपयोग केला व दुसरी तशीच पडू दिली तर त्या शक्तींची काटकसर केल्यासारखी होईल काय? व त्यांचा हिशेब आपणांस देता येईल काय? लोकांची टीका नेहमी क्षणभंगुर असते. पण आपण केलेल्या अपव्ययापासून आपणांस नेहमी पश्चात्ताप होतो. आपण नेहमी आपल्या शक्तीप्रमाणे लिहीत असावे. चांगले असल्यास ते टिकेल, वाईट असल्यास ते नामशेष होईल असे माझे मत आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

४४

खामगाव १२-१०-१०

आशीर्वाद विशेष.

तुम्ही मला जो सल्ला विचारिला होता व सूचना केली होती त्याविषयी मी तुम्हास एक पत्र पाठविले होते पण ते पोचले की नाही हे कळले नाही. ते पत्र पाठविल्यानंतर माझा वेळ फार गडबडीत गेला. माझे कुटूंब ८-१० दिवस बरेच आजारी होते. त्यानंतर ५-७ दिवस माझे घरी पाहुण्यांची बरीच गर्दी झाली होती. आजच मी किंचीत् मोकळा झाल्यासारखा झालो आहे. परंतु गेल्या ४-५ दिवसांत जाग्रणे झाल्यामुळे फार थकवा आला आहे.

रा. नरसोपंतांना रानड्यांच्या शिक्षकाबद्दल मी आज लिहीत आहे. तुम्ही त्यांजकडे जाण्याची आवश्यकता नाही. मुंबईहूनही एक गृहस्थ चौकशी करून मला कळविणार आहेत.

प्रिलिमिनरीचा निकाल चांगला झालेला पाहून आनंद झाला. तुम्ही खटपट केल्यास सेकंड क्लासमध्ये खात्रीने याल असे वाटते.

प्रेमशोधनाच्या शेवटच्या प्रयोगाचे काहीच वर्तमान कळले नाही.

'योग्य कानन' यातील वादग्रस्त ओळ 'ईच्या राहि शरीरीं' पाहिजे. व 'ह्रदयसरी' असेच बालगंधर्वांच्या पदांत आहे. त्याची व रा. रा. जोगळेकरांची चूक आहे.

ज्योतिषावरील निबंध दिलेवर छापण्यास सुरवात होणार.

प्रेमशोधनाची वही किर्लोसकर मंडळीकडून येईपर्यंत ते छापविण्याविषयी कोणताच विचार कायम करिता येत नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

४५

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. 'घाली विधि कसा' हे पद बालगंधर्वांनी म्हणावे याबद्दल मी ५—७ दिवसांपूर्वी रा. मुजुमदार यांस पत्र लिहिले आहे. त्याच पत्रात नाटकाची प्रयोगाबरहुकूम प्रत पाठविण्याविषयीही पुन्हा लिहिले आहे. मुंबईच्या मुक्कामाकरिता प्रती तयार होत नाहीत. पण मला त्याबद्दल विशेष फेरफार केल्यावरच नाटक प्रसिद्ध करणे बरे.

नाताळच्या सुट्टीत मला तिकडे येता येणार नाही. बहुधा त्या सुट्टीत नवे नाटक लिहावे लागेल. ते न लिहिल्यास अलाहाबादेस जाईन.

ज्योतिषावरील निबंध लांबणीवर पडण्याचे कारण इतकेच की रा. यंदे यांजपाशी प्रसिद्ध करण्याचे बरेच काम तुंबल्यामुळे त्यांना तो पुढील जूनपर्यंत हाती घेता येत नाही.

मी अलीकडील रिपोर्ट वाचीत नसल्यामुळे व पूर्वीचे रिपोर्ट काळजीने न वाचल्यामुळे तुमच्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही.

गेल्या दिवाळीत जाग्रणे फार झाली. त्याचा परिणाम पूर्णपणे नाहीसा होण्यास आणखी १५-२० दिवस गेले पाहिजेत.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

४६ खामगाव १९-१०-१०

आशीर्वाद विशेष. तुमचे पत्र पावले.

मला यंदा अतिशय लिहिणे झाल्यामुळे जो शिथिलपणा आला आहे त्यामुळे तुम्ही लिहावयास सांगितलेले नवीन पद लिहिता येणार नाही. शिवाय नवीन चालही घालण्यासारखी नाही. म्हणून ‘घाली विधी कसा दारुण घाला’ हेच पद पुस्तकात ठेवावे लागले. त्याची चाल इतकी चांगली आहे की ते चांगले म्हटल्यास त्यास वन्समोअर मिळण्याची खात्री वाटते. ती चाल अजून रंगभूमीवर आलेलीही नाही. तुमच्या इतर सूचना एका प्रवेशकाच्या किंवा विष्कंभाच्या द्वारे अमलात आणण्याचा विचार आहे. मात्र तो घातल्यास मोहिनीचे आत्मगत भाषण घालता येणार नाही. व नंदनाचे तरी घालता येईल की काययाची शंकाच आहे. नाटक मोठे होता कामा नये. या गोष्टीस फार जपले आहे.

‘ऋणमोचना’ हा शब्द ‘कर्ज फेडण्याच्या क्रियेस’ या अर्थी योजिला आहे. ओळीतील शेवटेच शब्द ‘कर्म ना’ हेच आहेत.

‘हा स्वभाव’ याची चाल प्रसंगास अनुरूप आहे. परंतु भैरवीचा नेहमी इष्ट ग्रह होत नसतो यामुळे ती चाल त्या प्रसंगी बरी दिसत नसावी.

पुस्तक डिसेंबरपर्यंत निघेल की काय याची शंका वाटते. अजून रा. मुजुमदारांकडून हल्ली प्रयोग होतो याप्रमाणे लिहिलेली प्रत आली नाही व पुढे केव्हा येणार हे सांगवत नाही. ती आल्यावर मला नक्कल करण्यास १ महिना व दुसरी एक नक्कल करवून घेण्यास १५ दिवस तरी लागतील. प्रत लवकर आल्यास मी तुमच्याकडे पाठवीनच. उशीराने आल्यासही पाठवीनच. कारण मग मंडळीच्या मुंबईच्या मुक्कामास पुस्तक प्रसिद्ध होणे अशक्यच होईल. घरातील सर्व मंडळींची प्रकृती चांगली आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

४७ खामगाव २५-१०-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. 'घाली विधि' या पदाची चाल फारच सुंदर आहे, याबद्दल खात्री समक्ष भेटीअंतींच करिता येण्यासारखी आहे. ते पद म्हणणे केवळ पात्राच्या मर्जीवर आहे. पदे गाळण्याची किर्लोस्कर मंडळींत पात्रांस जी मुभा असते तिजकडे लक्ष्य पुरविल्यास माझ्या सूचनेचा आदर होण्याचे फारसे चिन्ह दिसत नाही. तुम्ही पाहिजे तर बालगंधर्वास किंवा रा. मुजुमदारांस याबद्दल लिहून पहावे.

अजून मंडळीकडून नाटकाची प्रत आली नाही. यामुळे डिसेंबरपर्यंत नाटक छापून निघेल की काय याची शंका आहे.

तुम्ही ज्या गोष्टीबद्दल मला विचारिले आहे ती सिद्ध होईल असा संभव दिसतो.

दिवाळीकरिता बऱ्याच नातलगांस व स्नेह्यांस येथे बोलाविले आहे. हल्ली मी त्याच गडबडीत आहे.

रा.रा.वासुदेवराव आपटे यांच्या 'मराठी भाषेतील संप्रदाय व म्हणी' या पुस्तकावर मी टीका लिहिली आहे. ती तुम्हांस विविधज्ञानविस्ताराचे नोव्हेंबर किंवा डिसेंबरच्या अंकात वाचावयास मिळेल.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❈

ता. क. ज्योतिषावरील निबंध पुढील ऑगस्ट महिन्यापर्यंत प्रसिद्ध करिता येत नाही असे रा. मणेरीकरांचे पत्र आले आहे. मी तोपर्यंत वाट पहाण्यास तयार आहे असे उत्तर धाडिले आहे.

श्री. कृ. कोल्हटकर

❈

४८ खामगाव १९-११-१०

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. परंतु गेल्या आठवड्यात पाहुण्यांची बरीच गडबड असल्यामुळे उत्तर धाडण्यास झाले नाही. पाहुण्यांपैकी एक रा. रा. विनायकराव केळकर येथील कोर्टावरील डिस्ट्रिक्ट व सेशन जज्ज, हे होत. व दुसरे रा. इनामदार, रुक्कुठाराची प्रस्तावना लिहिणारे हे होत. उभयतां दुसरीकडे उतरले होते. पण

ते मजकडे फराळास आले होते.

'घाली विधि कसा' या पदाबद्दल काहीच उत्तर आले नाही.

तुम्हास परीक्षेत पूर्ण यश यावे अशी इच्छा आहे. परीक्षा झाल्यावर सवड झाल्यास येथे ८-१५ दिवस येऊन जावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

४९ खामगाव २७-११-१०

आशीर्वाद विशेष. तुमचे पत्र पावले.

रा. शंकरराव मुजुमदारांकडून काल पत्र आले. त्यात त्यांनी 'प्रेमशोधना' चे पहिल्या दोन अंकांची नक्कल लवकरच पाठविण्याचे कबूल केले आहे. त्याबरोबरच मिरजेचे कारभारी रा. आगाशे यांच्या त्या नाटकासंबंधी सूचनाही येणार आहेत. त्यांची 'मतिविकार' नाटकावरील रंगभूमीत आलेली मार्मिक टीका तुमच्या वाचण्यात आलीच असेल.

'मतिविकारा' वर दुसरी टीका रा. केळकर यांची होय. ती अजमासे तीन वर्षांपूर्वी ज्ञानप्रकाशाच्या ५-६ अंकांत आली होती. शारदा नाटकावर एक टीका मासिक मनोरंजनात व दुसरी विविधज्ञानविस्तारात याप्रमाणे दोन टीका ८-९ वर्षांपूर्वी आल्या होत्या. पहिली रा. रा. विनायक बाळकृष्ण पंडित यांनी लिहिलेली असून दुसरी सांगलीचे वकील रा. रा. अभ्यंकर यांनी लिहिली होतो. याशिवाय विस्तृत टीका झाल्याचे माझ्या पाहण्यात नाही. शारदेवरील दोन्ही टीका जरा अनुदारपणाच्या व कडक भाषेत लिहिलेल्या आहेत.

कलेच्या दृष्टीने शारदा नाटकात माझ्या मते संविधानकाची गुंतागुंत जितकी बहारीची झाली आहे तितका तिचा उलगडा झाला नाही. नायिका व नायक यांजवर संकटे साहजिक रीतीने उद्‌भवली आहेत. परंतु त्या संकटांचा परिहार तितक्या साहजिक रीतीने झालेला नाही. उदाहरणार्थ पहारेकऱ्याची अचानक मदत होणे व नायकाने नायिकेची एकदम डोहाजवळ येऊन सुटका करणे या गोष्टी मुद्दाम घडविल्यामुळे व पूर्वीच्या भागातून उत्पन्न न झाल्यामुळे त्यापासून व्हावे तितके आश्चर्य उत्पन्न होत नाही.

गेल्या आडवड्यात ज्ञानप्रकाशात आलेली रा. रा. गोविंदराव कानिटकरांची प्रेमशोधनावरील कडक टीका व तिला 'विमला' नावाच्या स्त्रीने दिलेले मर्यादेचे पण सणसणीत उत्तर तुम्ही वाचले असेलच. रा. कानिटकरांनी कित्येक गोष्टींचा विपर्यास केला आहे तो तुमच्या ताबडतोब लक्ष्यात येईल.

पौराणिक गोष्टीवर लिहिलेल्या नाटकावर कर्त्याचा हक्क असतो. त्याची भाषणे व पद्ये दुसऱ्यास छापता येणार नाहीत. पण त्याच संविधानकावर दुसरे नाटक लिहिण्यास अर्थात् काहीच हरकत नाही.

रा. रा. गुर्जर हे १ महिन्यापूर्वी कोकणात गेले असे कळते. परत आले की नाही काही माहीत नाही.

संगीत नाटकापेक्षा गद्य नाटक अधिक चित्तवेधक झाले पाहिजे असे माझेही मत आहे. व महाराष्ट्र नाटकमंडळीकरिता लिहावयाच्या नाटकात विशेष मनोवेधकत्व आणण्याचा विचार आहे.

माझ्या टीकेचा पहिला अर्धा भाग विविधज्ञानविस्ताराच्या नवेंबरच्या अंकात व दुसरा अर्धा भाग डिसेंबरच्या अंकात येणार आहे.

रा. रा. गोपाळ वामन बापट (सब जज्ञ, नरसिंगपूर, मध्यप्रांत) यांजकडून नाटके मागविण्यास काही हरकत नाही. पत्र वरील पत्यावर पाठवावे.

'घाली विधि कसा' या पदाबद्दल काही कळले नाही.

क. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. माझी शापसंभ्रमावरील टीका विविधज्ञानविस्तारात १८९३ साली प्रसिद्ध झाली.

तुम्ही पेपरमध्ये केलेली चूकी हस्तदोषाने झाली असावी असा परीक्षकाचा ग्रह होण्याचा संभव आहे. 'तुषारकरकेसरी' हा रुपकालकारच असावासा वाटतो.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

खामगाव ४-१२-१०

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे व टीका पावली. पहिल्या पत्रास ताबडतोब उत्तर पाठवावयाचे. परंतु कचेरीतून घरी आल्यावर जवळ एकही पाकीट किंवा तिकीट नाही असे दिसून आले. व दुसरे दिवशी तुम्ही मुंबईस नसावे असे वाटले. म्हणून उत्तर पाठविता आले नाही.

कुंजविहारीत रमणाचे काम गोरेच करितात. त्या नाटकाची पद्यावली मजपाशी होती. ती मी उमरावती येथील माझ्या चुलत बंधूकडे पाठविली आहे. काही दिवसांनी परत येईल. प्रेमशोधनाच्या पद्यांकरिता मी बऱ्याच चाली त्या नाटकातून घेतल्या आहेत. ते नाटक ज्यांनी केले आहे त्यांचेच म्हणजे रा. वरेरकरांचे ‘संजीविनी’ नावाचे दुसरे नाटक १७-१२-१० रोजी मुंबईच्या रंगभूमीवर प्रथमतःच येणार आहे. तुम्ही तेथे त्या तारखेपर्यंत असल्यास ते तुम्हास पाहावयास मिळेलच.

कुंजविहारीचा शेवट करिताना व ते दुरुस्त करिताना माझी काहीशी मदत झाली आहे. त्यामुळे तुम्हास त्या नाटकाबद्दल जी माहिती पाहिजे आहे ती मजकडून मिळेल. त्या नाटकाचे कर्ते बरेच प्रेमळ आहेत. त्यांस तुम्ही भेटल्यासही चालेल.

येत्या नाताळात अलाहाबादेस न जाता येथेच राहून प्रेमशोधनाची प्रेसकरिता प्रत तयार करण्याचा व ज्योतिषावरील निबंधाची अखेरची दुरुस्ती करण्याचा विचार आहे. तुम्ही त्या वेळी येथे असल्यास बरे पडेल. माझ्या विचाराबद्दल त्यास मी कळवीनच.

अजून सहाव्या नाटकाचे संविधानक चांगले जुळले नसल्यामुळे ते लिहिण्याचा विचार पुढील मे महिन्यापर्यंत तहकूब ठेवावा लागत आहे.

रा. कानिटकरांच्या टीकेवरील तुमची प्रतिटीका चांगली झाली आहे. तिजमधील त्यांच्या कुटुंबासंबंधाच्या अनुभवाचा उल्लेख वगळावा हे बरे. व काही कडक शब्दही गाळावेत. बाकी काही लिहिण्यासारखे नाही.

टीका आज परत पाठवून देत आहे. कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. ‘मराठी संपद्राय व म्हणी’ या वरील माझ्या टीकेचा अर्धा भाग विविधज्ञानविस्ताराच्या नोव्हेंबरच्या अंकात आला आहे.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

५१

खामगाव १५-१२-१०

आशीर्वाद विशेष.

तुमच्या दोन्ही पत्रांस इतक्या दिवसांत एकही उत्तर न पाठविण्याचे कारण पहिल्या पत्रात फक्त एकच प्रश्न उत्तर पाहिजे असा होता. तो हा की ज्ञानप्रकाशात तुमच्या लेख घेतील की नाही. माझी त्या ऑफिसात निकट ओळख कोणाशीच नाही. दुसरे पत्र येण्यापूर्वी मी तापाने अंथरुणास खिळून अत्यंत अशक्त झालो आहे. कल्पना व तर्कशक्ति ही अत्यंत वाढली असून स्मरण जवळजवळ नष्ट झाले आहे. यापुढे माझ्याकडून पंधरा-दिवस तीन वार पर्यंत माझी पत्रे मुळीच येणार नाहीत. कारण पत्र लिहिली की ताप वाढतो.

तुमचा पूर्ण पत्ता मी बरा झाल्यावरही प्रत्येक पत्रात देत जावा. कारण माझी स्मरणशक्ती नेहमीच फार अशक्त आहे.

येथे प्लेग सुरू झाला आहे. आम्ही लवकरच झोपडीवर जाऊ. मी बरा झाल्याबरोबर लागलीच अकोल्यास जाईन व जानेवारीत परत झोपडीत रहावयास येईन.

तुमचे मताप्रमाणेच माझेही आहे. सविस्तर मजकूर पुढील पत्री.

तुम्हास नाटकाची दुरुस्ती करण्यासाठी आलेच पाहिजे. जानेवारीचे ११ तारखेपासून चार दिवस सुट्टी आहे.

कळावे हे आ.

श्री. कृ. कोल्हटकर

*

५२

खामगाव २६-१-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले अजून उन्निद्रता कायम आहे व डोक्याला थोडे श्रम पडल्यास ताबडतोब प्रकृती बिघडते, म्हणून नाटकाची दुरुस्ती एप्रिल महिन्यावर टाकावी लागली आहे. रा. मुजुमदारांचा विशेष आग्रह पडल्यास पद्यावलि मात्र लवकर काढण्याचा विचार आहे. तुमचे या बाबतीत काय मत आहे.

प्रेमशोधनाचा पहिला प्रयोग. मुंबई येथे चांगला झाला असे रा. मुजुमदारांच्या पत्रावरून दिसते. तुम्ही चौकशी करून लोकमत कळ कळविल्यास बरे होईल.

प्रकृतीस बरे वाटल्यावर तुमच्या मागील प्रश्नांची उत्तरे पाठवीन.

मध्यंतरी इसबाचा उद्‌भव झाला होता. हल्ली बरा आहे.

लॉजिक हा ऐच्छिक विषय घेतलेला एकच माझ्या ओळखीचा विद्यार्थी आहे. त्याच्या वेळची सर्व पुस्तके त्याने कोणास तरी देऊन टाकिली आहेत. तरी Sidgwick च्या पुस्तकाविषयी त्यांच्याकडे चौकशी करितो.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत मराठी व्याकरणाचे निबंध व जोशीकृत प्रौढबोध व्याकरण माझ्या येथील एका स्नेह्यास पाहिजे आहेत. तेथील एखाद्या दुकानदारास ती पुस्तके माझ्या पत्यावर व्ही. पी. ने पाठविण्यास सांगावे.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

५३

खामगाव २८-१-११

आशीर्वाद विशेष.

हल्ली प्रकृती बरी आहे. रात्रीची झोप येऊ लागली आहे. इसब उद्‌भवल्यामुळे मला त्रास होत आहे. दोनचार दिवसांत जाईल.

लोकांची पद्यावलीबद्दल इतकी ओरड आहे की मला ती छापवावी लागणार असे दिसते. तुमच्याकडे ती पाठविल्यास तुम्ही छापविण्याचे काम कराल की काय ते कळवावे. मुंबईवैभव छापखान्यात दरासंबंधाने व किती दिवसांत पद्यावली छापून तयार होईल याची चौकशी करावी.

माझ्या मते मतिविकाराच्या संविधानकात जर कोठे कौशल्य असेल तर ते ज्या प्रवेशात चकोर व तरंगिणी मनोहराचे मन पत्र घेऊन जाण्याविषयी वळवितात व तरंगिणीचा निश्चय मनोहराच्या आश्रमात राहाण्याचा होतो त्या प्रवेशात आहे. ता प्रवेश लिहीपर्यंत मला नाटकाच्या शेवटाविषयी काळजी होती. पण तो लिहिल्याबरोबर ती दूर होऊन पुढील भाग फार सोपा गेला. त्यापूर्वीचा प्रवेश म्हणजे चकोराचे सोंग उघडकीस येऊन विहाराचे व तरंगिणीचे भांडण होते व ती निघून जाते तोही माझ्या मते बरा झाला आहे.

विहार चंचल दाखविला आहे याचे कारण त्याशिवाय नाटकाचा इष्ट शेवट झाला नसता. मनोहराचा स्वभाव अगदी विरुद्ध असल्यामुळे ता विशेष खुलून दिसतो. सरस्वतीचा स्वभाव प्रथम इतका कडक दाखविला आहे. याचे कारणे पुढे ती फारच दीन झालेली पाहून दया उत्पन्न व्हावी. आनंदरावांचा स्वभाव नेभळा दाखविल्याचे कारण धर्माभिमानी मंडळींची नाटकाशी सहानुभूती रहावी व अर्धवट सुधारकांविषयी कीव उत्पन्न व्हावी. ज्याप्रमाणे विहाराचा प्रतिज्ञाभंग हे नाटकाचे प्रथम अंग आहे त्याप्रमाणेच

आनंदरावची फजिती हेही आहे. एकाने विधवांनी आजन्म ब्रह्मचर्य पाळणे किती कठिण आहे हे reductioad absurdum ने सिद्ध होते तर दुसऱ्याने पुरुषांनी वयस्क विधवेशी लग्न न करता लहान मुलीशी विवाह केल्याने कसा परिणाम होतो हे दाखविले आहे. तरंगिणीच्या हातून अखेरीस कपट व्हावयाचे असल्यामुळे ती सत्यप्रिय दाखविली नाही. हरिहर शास्त्र्यांच्या पुराणाचा प्रवेशही माझ्या मते बरा साधला आहे. या प्रवेशात रावणाची कथा त्याच्या तोंडून वदविली आहे. याच्या उलट विहार मुलींना शिकवितांना रामकथेचे विवरण करीत आहे, व चकोर चंद्रिकेस भेटावयास गेला असताही त्याचे तोडीं रामाची उक्ती आहे.

मी मतिविकार फार दिवसांत पाहिले किंवा वाचिले नसल्यामुळे याहून अधिक त्याविषयी लिहिता येत नाही.

पुढील पत्रांत प्रयोगांबद्दल माहिती यावी.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

५४

खामगाव १०-२-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. त्यानंतर माझे घरी एक लहानशी चोरी झाली. तिच्या गडबडीत काही दिवस गेले व काही दिवस पद्यावली दुरुस्त करण्यात गेले. म्हणून उत्तर पाठविण्यास झाले नाही. शिवाय तुम्ही कदाचित बडोद्यास असाल हा संशयही अंशतः माझ्या मौनास कारणीभूत झाला.

तुमच्या पत्रात रा. मुजुमदारांचा इरादा पद्यावली........तयार ठेवण्याचा असल्याबद्दल जो मजकूर होता त्यामुळे जरा माझी गडबड उडाली. कारण मी रा. मुजुमदारांना ती छापण्याबद्दल तोपर्यंत स्पष्ट परवानगी दिली नव्हती. फक्त तुम्हास तसदी द्यावी लागेल इतकेस लिहिले होते. शिवाय पत्रात बरेच फेरफार केलेले कळवावयाचे होते म्हणून त्यांना पद्यावली मजकडून गेल्याशिवाय प्रसिद्ध न करण्याबद्दल ताबडतोब तार केली व पद्यावली शुद्ध लिहून काल त्यांजकडे धाडून दिली. ती पोचण्यापूर्वी प्रती निघाल्या असल्यास मला फारच वाईट वाटेल. तुम्हांस याबद्दल काही कळले असल्यास मला कळवावे. प्रुफे मजकडे पाठविण्याबद्दलही मी कळविले आहे.

माझ्या उजव्या पायाच्या गुडघ्यांत ४-५ महिन्यांपासून दुखत असल्याचे मी तुम्हास कळविले असेलच. ते हल्ली वाढले असून मी हल्ली एका पायाने लंगडाच झालो आहे.

मी Methods of Ethics बद्दल लिहिले होते. पण अजून उत्तर आले नाही.

माझा गाऊन बरीच वर्षे दिसत नाही व माझ्या स्नेह्याच्यापाशीही तो नाही. माझ्या बरोबरीचे इसम आता ४०-४२ वर्षांचे आहेत. त्यांपाशी असण्याचा संभव नाही.

शारदा नाटकाबद्दल मी लिहिले होते त्यापेक्षा अधिक काहीच लिहिण्यासारखे नाही.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

५५

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. त्यापूर्वीच्या तुमच्या दोन पत्रांना मी उत्तर पाठविले असता ते कसे पोचले नाही हे कळत नाही. मी जी सुधारलेली पद्यावली रा. मुजुमदारांकडे पाठविली हाती तीच अखेर छापविण्यात आली. मात्र गेल्या शनिवाराकरिता घाईघाईने १००० प्रती काढाव्या लागल्यामुळे त्यांची प्रुफे मला तपासता आली नाहीत. पुढील ४००० प्रतींची प्रुफे तपासून पाठविली. संविधानकाचा सारांशही काहीसा चुकीचा होता, तोही सुधारला आहे. आता तूर्त तरी माझ्या मागचा नाटकाच्या प्रसिद्धीबद्दलचा लकडा सुटल्यासारखा झाला आहे.

गेल्या ५-६ महिन्यांपासून माझ्या उजव्या पायाचा गुडघा दुखत आहे हल्ली ते दुखणे बरेच विकोपास गेले आहे, ते इतके की बरेच वेळा मला लंगडल्याशिवाय चालता येत नाही. यामुळे nervous exhaustion ही बरेच होते. इलाज चालू आहेत.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

५६

खामगाव २५-२-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. तुम्हास आज बी. ए. हे उपपद लाविताना फार संतोष वाटत आहे.

रा. गुर्जरांचे प्रयोगासंबंधाने फार वाईट मत झाले. फेरफारावर त्यांचा फार कटाक्ष आहे. पद्यावली प्रसिद्ध झाली ही गोष्टही त्यांस पसंत नाही. मला वाटते ज्या १००० प्रती मजकडे प्रुफे येण्यापूर्वी छापिल्या आहेत त्या विक्रीस ठेवण्यापेक्षा जाळून टाकाव्या हे बरे; व श्री. रा. मुजुमदारांस त्याप्रमाणे कळविलेही होते. त्या प्रती विक्रीस आहेत की नाहीत हे कळले नाही. सबब ते पुढील प्रत्री कळवावे.

मी पहिल्या प्रुफात जे फेरफार केले होते त्यावरहुकूम फेरफार तुम्ही पद्यावलीत केले हे चांगले झाले. मला दुसरी प्रुफे मिळाल्यापासून एक घंट्याच्या आत ती दुरुस्त करून पाठवावी लागली. म्हणून चुका राहिल्या असाव्यात.

चंद्रहासाची कथा कोणत्या पर्वात आहे हे मलाही माहीत नाही.

गुडघ्यातील दुखणे rheumatic आहे असे वाटते. उन्हाळ्यात जर ते पूर्णपणे नाहीसे झाले तर माझा संशय खरा होईल. व जर ते तसेच राहिले तर मे महिन्यात डॉ. भाजेकरांना दाखवीन. गेल्या २-४ दिवसांत दुखणे बरेच कमी आहे.

हल्ली मी ज्योतिषावरील निबंधात गुंतलो आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

५७

खामगाव ८-३-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र व निबंध मिळाला. निबंध आज परत पाठवीत आहे. इंग्रजी शब्दांबद्दल मराठी शब्द सुचविले आहे. एक दोन स्थळी वाक्ये दुर्बोध झाली आहेत किंवा विरोधाचा भास होत आहे, तेथे खुणा केल्या आहेत.

हल्ली येथ कमिशिनर साहेब आल्यामुळे parties होत आहेत. त्यामुळे काल पत्र पाठविण्यास वेळ झाला नाही. शिवाय पायाच्या आजारामुळे उत्साह नाही. यामुळे पत्र लिहिण्यास एखादे वेळी विलंब होतो.

मुंबईहून त्रिवेदी नावाच्या एका गुजराथी गृहस्थाने व संजगिरी नावाच्या एका शेणवी गृहस्थाने प्रेमशोधनाबद्दल मला अभिनंदन पत्रे पाठविली आहेत. ती लागोपाठ आल्यामुळे ती रा. मुजुमदारांच्या किंवा इतर स्नेह्यांच्या प्रेरणेने लिहिण्यात आली असावी अशी शंका येते.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

५८

खामगाव २१-३-११

आशीर्वाद विशेष.

तुम्ही पाठविलेली मानापमान नाटकाची पद्यावली व त्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाबद्दल सविस्तर माहितीचे पूर्ण असे पत्र ही पावली. नाटक लोकप्रिय झाले हे पाहून आनंद झाला. इदुप्रकाशातही अनुकूल लेख आला आहे या नाटकाबद्दल माझ्या स्नेह्यांपैकी एखाद्याच्या विरुद्ध तुम्हाला लिहावे लागेल असे तुम्ही लिहिता, त्याचा अर्थ बरोबर कळला नाही. मानापमान नाटकासंबंधाने लिहिण्याचा तुमचा विचार आहे काय? रा. बापटांविरुद्ध काही लिहावयाचे आहे काय? किंवा रा. गुर्जरांविरुद्ध?

माझ्या चुकांबद्दल लिहिण्यास प्रत्यवाय का असावा? आपले खरे मत प्रकट करण्याला केव्हाच हरकत नाही. मात्र लेखात उपहासपर दृष्टी नसावी.

माझे पुण्यास येणे सुट्टी सुरू झाल्यावर म्हणजे अर्थात् मे महिन्याच्या १५ व्या तारखेनंतर होणार.

पुढील पत्रांत मानापमानातील पद्यांविषयी तुमचे मत कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

५९

खामगाव १३-४-११

आशीर्वाद विशेष.

तुमची तिन्ही पत्रे पावली.

मी आपल्या पत्रात ‘उपहासपर टीका नसल्यास ती करण्यास काही हरकत नाही’ असा जो मजकूर लिहिला होता तो तुमच्या संबंधाने नसून एकंदर टीकांसंबंधाने सामान्य नियम म्हणून दिला होता. तुम्ही माझा उपहास कराल असे मला स्वप्नातही वाटणार नाही.

मतिविकाराच्या प्रती रा. रा. लक्ष्मण गणेश महाजन यांच्या जवळ शिल्लक असतील. नसल्यास मला मे महिन्यात त्याची दुसरी आवृत्ती काढिली पाहिजे.

ज्योतिषावरील निबंधात सर्व सुधारणा होऊन तो छापण्यास तयार झाला आहे. मे महिन्याचे १६ वे तारखेस छापण्यास सुरुवात होईल. आकृति पाठवून दिल्या आहेत. त्यांची संख्या १५ आहे.

उपान्त्य प्रवेश अजून लिहिला नाही. पुढील महिन्यात लिहिणार आहे. त्यात बहुतकरून तडाग, विहंग वगैरे नीच पात्रांच्याच तोंडून कथानक वदवावे लागेल असे वाटते. इतर भागातही अजून सुधारणा व्हावयाच्या आहेत. Press Copy मे महिन्याच्या १५ तारखेच्या आत तयार व्हावी असा अंदाज आहे.

नवीन नाटकासंबंधाने अजून काही विचार झाला नाही. याचे मुख्य कारण अजून पायास बरे वाटत नाही हे होय. ज्योतिषावरील निबंध, प्रेमशोधन व मतिकार छापविण्याकरिता मला मे महिन्याच्या सुट्टीत मुबईस रहावे लागेल, तेव्हा प्रकृती डॉक्टरास दाखवून औषधोपचार सुरू करण्याचा विचार आहे. हल्ली येथील डॉक्टरांचे औषध चालू आहेच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✳

६०

खामगाव २६-४-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. केसरीतील टीका वाचली. तिच्यात दाखविलेले दोष मला अर्थातच कबूल नाहीत. तुम्ही तिला जे उत्तर पाठविणार आहात त्याच्याशी माझा मुळीच संबंध नसलेला बरा. तुम्ही केसरीकडे ते पाठविल्यास ते प्रसिद्ध होईल असे वाटते. वाटल्यास रा. केळकरांस एखादे पत्र पाठवावे. नाट्यहंसाच्या.......तारीख माहीत नाही........

आम्ही नुकतेच गावात रहावयास आलो.

हल्ली हातून काही काम होत नाही, त्यामुळे अस्वस्थता वाटत आहे. मे महिन्यापर्यंत 'प्रेमशोधन' तपासून होते की काय याची शंका वाटू लागली आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

६१

खामगाव १३-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मी येथून या महिन्याच्या १५ व्या तारखेस निघून १६ ला सकाळी मुंबईस पोहोचेन. मोहन बिल्डिंगमध्ये राहीन. खोलीचा नंबर अजून कळला नाही. पत्र पाठविणे झाल्यास मनोरंजन ऑफिसच्या पत्त्यावर पाठवावे.

नवीन नाटकाचे संविधानक अजून जुळले नाही; व म्हणून या सुट्टीत ते लिहिता येईल असे वाटत नाही. बाकी 'सत्वपरीक्षा' नाटकाच्या जाहिरातीमुळे ते नाटक लिहिण्याचे लांबणीवर पडण्याचे कारण नाही.

'प्रेमशोधना' ची शुद्ध प्रत तयार झाली. मोहिनीचे विषप्रशना पूर्वीचे आत्मगत भाषण घातले आहे. तडाग, पुष्करिणी, विहंग व चंडी यांचा मत्सरमूलक प्रवेश गाळिला आहे. आता नाटकात बीभत्स भाग राहिला नाही असे वाटते. तुम्ही मुंबईस आल्यावर सर्व प्रत वाचावयास मिळेलच.

मला या सुट्टीत पुणे येथे २-३ दिवसांपेक्षा अधिक वेळ रहाता येणार नाही.

वरकड मजकूर भेटीअंती. कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

६२

दि एम्पायर हिंदु हॉटेल,
हॉर्नबी रोड, फोर्ट, बॉम्बे
२२ मे १९११

आशीर्वाद विशेष.

प्रेमशोधन छापण्यास सुरवात झाली. निबंध छापण्यास आज सुरवात होणार. आज संमेलनाचा पहिला दिवस आहे.

पत्र पाठविणे झाल्यास वरील पत्त्यावर पाठवावे.

आज गडबड असल्यामुळे येथेच संपवितो.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

६३

खामगाव ७-७-११

आशीर्वाद विशेष.

मी तुमच्या मुंबईच्या पत्त्यावर एक पत्र पाठविले होते ते पोचले असेलच. त्यात तुम्हास वऱ्हाडात येण्याबद्दल लिहिले होते. काल तुमचे मिरजेहून पत्र आले. त्यानंतर येथील डॉ. पारसनीस यांस भेटलो. त्यांचेही मत खामगावची हवा मिरजेप्रमाणेच आहे असे पडले. तरी तुम्ही सवडीप्रमाणे इकडे येण्याचे करावे.

प्रेमशोधनाचे मुखपृष्ठ अजून छापावयाचे राहिल्यामुळे प्रती तयार झाल्या नाहीत. एक न बांधलेली प्रत मी रा. मुजुमदारांकडे सुमारे २० दिवसांपूर्वी पाठविली होती. पण ती त्यांस पोचली की नाही हे कळले नाही. ती प्रत तुमच्या वाचण्यात आली असेलच.

ज्योतिषांवरील निबंधाच्या चवथ्या फॉर्मास तीन आठवडे झाले तरी तो अजून छापून निघाला नाही. याच वेगाने निबंधाचे काम चालल्यास तो पूर्ण होण्यास ४-५ महिन्यांपेक्षाही अधिक काळ लागेल असे वाटते.

माझा गुडघा हल्ली पूर्वीपेक्षा बऱ्याच चांगल्या स्थितीत आहे. त्यांस सायनो-हेटीस हा विकार आहे. संधिवात नाही; त्यामुळे पावसाळ्याचा त्यावर काही परिणाम होत नाही.

येथे रुक्कुठारकर्ते रा. ठोसर २ दिवसांकरिता आले होते. रा. जठारांकडे उतरले असून मजकडे जेवावयास आले होते.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

६४

खामगाव २०-८-११

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. परंतु गेल्या पंधरवड्यात येथे पाहुण्यांची गर्दी असल्यामुळे ताबडतोब उत्तरे धाडता आली नाहीत. जाग्रणेही फार झाली.

मी हिंद एजन्सीला प्रेमशोधनाच्या २००० प्रती ८२५ रुपये रोख व २५ प्रती यांचे मोबदल्यात विकल्या आहेत. रुपये हप्तेबंदीने येणार आहेत. २५ प्रती स्नेह्यांस द्यावयाकरिता मिळावयाच्या आहेत. ही गोष्ट कोणास कळविण्याचे कारण नाही.

पद्यावलींच्या प्रती कदाचित् हिंद एजन्सीच विकत घेईल. न घेतल्यास जे तिचे नुकसान होईल तिजबद्दल मी अर्थात् जबाबदार नाही. पद्यावलीची विक्री पुस्तकामुळे कमी झाली तरी मला वाईट वाटणार नाही.

निबंध जानेवारीपर्यंत तयार होत नाही. झाल्यानंतर प्रकाशक रा. यंदे हे जाहिरात देतीलच.

मी तुमचे पहिले पत्र आल्यानंतर रा. रा. जोगळेकरांस पत्र लिहिले आहे. त्याचा इष्ट परिणाम न झाल्यास माझा निरुपाय आहे.

५ व्या नाटकाचे काम यंदाचे साली अर्थात् हाती घेता येत नाही.

कळावे, हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

६५

खामगाव २५-८-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. प्रती काल मिळाल्या. आज रोजी ७ प्रती ७ इसमांच्या नावाने पाठवीत आहे.

निबंध संपण्यास अजून ५-७ महिने अवधी आहे असे रा. गोपाळराव यांस कळवावे.

प्रेमशोधनाचे प्रयोग कसे चालले आहेत हे सवडीप्रमाणे कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ.कोल्हटकर

⁕

६६

खामगाव ३-९-११

आशीर्वाद विशेष.

तुमची होन्ही पत्रे पावली. रा. पेठे यास राग येण्याचे कारण नाही. ज्या गृहस्थांस प्रती पाठविण्याचे मी ठरविले होते त्यांच्या यादीत त्याचे नाव आहे, व त्यांचे पूर्ण नाव मला ताबडतोब कळले असते तर मी आपल्या प्रतीबरोबरच त्यांची प्रत पाठविली असती. मला त्यांचे पूर्ण नाव ठोसर वकिलांकडून जेव्हा कळले तेव्हा मजजवळच्या सर्व प्रती खपून गेल्या होत्या. कारण मला किती प्रती स्नेह्यांकडे पाठवाव्या लागतील याचा नीट अंदाज नसल्यामुळे मी हिंद एजन्सीशी २५ प्रतींबद्दल मात्र करार केला होता. परंतु त्या सर्व प्रती तेव्हाच संपून गेल्या, व प्रस्तावनेत ज्यांचे आभार मानिले आहेत त्यांपैकी दोघांस व माझ्या संबंध्यांसही देण्यास मजपाशी प्रत शिल्लक राहिली नाही. म्हणून पुन्हा काही प्रती मी विकत घेतल्या आहेत व एक पत्र उदयिक मी रा. पेठ्यांकडे पाठवितो. तुमचे पत्र आले नसते तरी मी त्यांजकडे प्रत पाठविणार होतो.

हे पत्र रा. पेठे यास दाखवावे. म्हणजे त्यांचा राग दूर होईल अशी खात्री आहे. मुंबईहून एक स्नेही येथे आले. त्यांजकडून असे कळले की रा. राजहंसांबद्दल मुंबईत वाईट कंड्या उठल्या आहेत. त्यांच्या मुळाशी सांजवर्तमानातील बातमी आहे असे दिसते. त्या कंड्या उघड उघड खोट्या आहेत अशी माझी खात्री आहे, व त्या स्नेह्यास मी त्याप्रमाणे सांगितलेही. मला वाटते की त्या पत्राच्या संपादकांवर अब्रुनुकसानीची फिर्याद केल्यास अशा भलत्या कंलत्या आपोआप नाहीशा होतील.

कळावे, हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

६७

खामगाव १०-९-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. सांजवर्तमानाच्या कोणत्या अंकात रा. राजहंसांबद्दल मजकूर आहे हे मलाही माहीत नाही. मुंबईत चोहोंकडे ती बातमी पसरली आहे. तेथील कोणा तरी गृहस्थास लिहिल्यास खुलासेवार हकीकत कळेल.

रा. खाडिलकर यांस पाठवावयाची प्रत मी रा. केळकरांच्याच पत्त्यावर (रा. खाडिलकरांचा पत्ता माहीत नसल्यामुळे) पाठविली होती. ती त्यांस मिळाली की नाही हे विचारून मला कळवावे.

रा. खाडिलकरांचे दुसरे संगीत नाटक बसविण्यास सुरुवात झाली की काय? नाटक किती लिहिले गेले आहे? ते किती दिवसांनी बाहेर येणार?

किर्लोस्कर मंडळी व रा. गुर्जर यांजमधील द्वेष दिवसेंदिवस विकोपास जात असलेला पाहून फार वाईट वाटते. रा. गुर्जरांकडून मंडळीसंबंधाने व रा. खाडिलकरांसंबंधाने जे वर्तन घडले ते अशा प्रकारचे होते की पुन्हा त्यांजमध्ये सलोखा होण्याची आशाच वाटत नाही. माझा स्वभाव असा आहे की मला द्वेषाचा संपर्क सहन होत नाही व द्वेषापासून सुखही होत नाही. किर्लोस्कर मंडळी ज्याप्रमाणे माझ्याशी स्नेहभावाने वागते त्याप्रमाणे रा. गुर्जरही वागतात. असे असल्यामुळे उभयतांस परस्परांबद्दल तीव्र भाषा वापरताना पाहून मनास फार वाईट वाटते. बरे, अशा स्थितीत एका पक्षाचा स्नेह पार तोडून टाकणे तरी रास्त होईल का? हातून अनुचित कृत्य घडल्यावर जर स्नेह्यांनी टाकिले तर सुधारणा होण्याचा संभव आहे किंवा स्नेह्यांनी पूर्ववत् स्नेह कायम ठेवून सुधारण्याचा प्रयत्न केला तर आहे? रा. गुर्जरांऐवजी माझ्या एखाद्या निकट संबंध्याकडूनच असे वर्तन घडले असते तर मी त्याचा संबंध तोडून टाकण्यास तयार झालो असतो का? निदान उभयपक्षांमध्ये साधारण स्नेह्याचे एखादे बंधन असल्यास द्वेषाची तीव्रता काही तरी कमी होईल अशी माझी खात्री आहे.

अलीकडे माझे डोके इतके हलके झाले आहे की अगदी थोडावेळ विचार केल्यास ते गरम होऊन जाते व क्षुल्लक कारणानेही त्याचा समतोलपणा बिघडून जातो. हा सारा गेल्या दोन वर्षांतील दगदगीचा व जाग्रणांचा परिणाम असावा. निबंध बाहेर आल्यावर मला काही वर्षे पूर्ण विश्रांती घ्यावी लागेल असे दिसते.

तुमच्या पत्रांची उत्तरे वेळेवर न जाण्याचे एक कारण ही सांप्रतची मनःस्थितीच होय. हल्ली साधे पत्र लिहिणेही अत्यंत अवघड वाटते. कोर्टाच्या कामाची दगदग पूर्ववत् मुळीच सहन होत नाही व वाचनाला आवश्यक अशी एकाग्रताही दुःसाध्य वाटते.

श्री. कृ. कोल्हटकर

*

खामगाव २५-९-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. त्याचे उत्तर जाईपर्यंत तुमचे मन अस्वस्थच रहाणार असे तुम्ही लिहिल्यावरून हे पत्र ताबडतोब लिहीत आहे.

रा. मुजूमदार यांनी रा. गुर्जरांबद्दल जो मजकूर तुमच्या पत्रात लिहून पाठविला होता त्याबद्दल त्यांस कोणत्याही तऱ्हेचा दोष देता येत नाही; कारण रा. गुर्जर यांचे त्यांच्याशी वर्तनच तसे झाले. त्याचप्रमाणे रा. गुर्जर यांचे वर्तन कसेही असले तरी जोपर्यंत ते मजशी मित्रत्वाने वागतात तोपर्यंत मलाही त्यंच्याशी तसेच वागले पाहिजे. त्यांचे वर्तन मला पसंत नाही असे मी त्यास कळविले आहेच. पण याच्याही पलीकडे निष्ठुरपणाने वागणे मला अशक्य वाटते. अशा स्थितीत दोन्ही पक्षांकडून एकमेकांसंबंधाने कटु भाषा वापरलेली पत्रे मला यावी यात नवल नाही. व त्यासंबंधाने कोणालाही दोष देता येत नाही. मात्र यात मजकडेही कोणता दोष येत नाही अशी माझ्या स्नेह्यांची खात्री झाल्यास मला समाधान वाटेल.

वरील प्रकारात तुमचा काही संबंध नाही. केवळ तुमच्या पत्रात रा. शंकररावांनी लिहिलेला मजकूर मला लागण्यासारखा होता यात तुम्हांस वाईट वाटण्यासारखे काही नाही. त्या मजकुराबद्दल रा. शंकररावांसही दोष देता येत नाही हे मी वर लिहिलेच आहे.

रा. खाडिलकरांचे नवे नाटक बसविण्यास सुरुवात झाली की काय येवढाच माझ्या प्रश्नाचा भावार्थ होता. ते पूर्ण झाले नसावे असे मलाही वाटत होतेच. पूर्ण झाले नसले तरी बसविण्याची सुरुवात होण्यास कोणतीच हरकत नाही.

रा. खाडिलकरांबद्दल मला अत्यंत आदर वाटत आहे. याचे मुख्य कारण त्यांची असामान्य कल्पकता. त्यांच्या पहिल्या संगीत नाटकांतील कवितेबद्दल माझे तितके अनुकूल मत नाही. परंतु दुसऱ्या नाटकात त्यासंबंधाने फार सुधारणा होईल अशी माझी खात्री आहे; व हे माझे मत मी अनेकांपाशी बोलूनही दाखविले आहे. राजकीय बाबतीत त्यांचा व माझा अर्थातच मतभेद आहे. परंतु तो असूनही त्यांजबद्दल मला इतका सप्रेम आदर वाटतो की तसा आदर रा. केळकरांशिवाय इतर कोणाही त्या पक्षाच्या गृहस्थाबद्दल वाटत नाही. याचे कारण ते नाटकरचनेच्या कामात माझ्याच मताचे आहेत व त्यांनी प्रेमशोधन बसवितांना फार मदत केली हेही अंशतः असावे.

रा. गणपतराव भागवतांनी आत्महत्त्या केल्याबद्दलचा मजकूर तुमच्या वाचण्यांत आला असेलच. माझा महाराष्ट्रमंडळीशी विशेष परिचय होण्यास कारण रा. भागवतच झाले, व त्यांजकडून मला अधून मधून स्नेह्याच्या नात्याने पत्रेही येत असत. यामुळे त्यांच्या मृत्यूमुळे मला स्वतःला अत्यंत खेद झाला आहे. ते माझे जरा दूरचे नातेवाईकही होते.

वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

६९

खामगाव १९-९-११

आशीर्वाद विशेष.

रा. गुर्जर यांनी पोलीस कमिशनर यांस पत्र पाठविल्याबद्दलची माहिती खोटी आहे असे मला खात्रीलायक कळले आहे. हे वर्तमान रा. जोगळेकर, रा. शंकरराव वगैरे मंडळींस कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

७०

खामगाव १३-१०-११

आशीर्वाद विशेष.

१०-१०-११ चे तुमचे पत्र आज पावले. मी ८-१० दिवसांपूर्वी तुम्हांस हुबळीच्या पत्त्यावर जे पत्र पाठविले ते तुम्हास पोहोचले असे त्या पत्रावरून दिसते. परंतु गेल्या शतकातील प्रमुख मराठी कादंबरीकार, त्यांचे गुणावगुण व त्यांचे प्रमुख ग्रंथ यासंबंधी मी तुमचे मत विचारले होते, त्यासंबंधाने त्या पत्रात काही मजकूर नाही. यावरून तुम्ही ज्या पत्राबद्दल लिहिता ते तेच पत्र किंवा दुसरे कोणते याबद्दल काहीच कळत नाही. ते पत्र तुम्हास मिळाले असल्यास मला तुमचे मत कळवावे.

रा. गुर्जरांचा तुमच्याबद्दल गैरसमज होण्याचे काही कारण नाही. ते हल्ली कोकणातून मुंबईस परत आले आहेत. ज्योतिषावरील निबंधाची फक्त ९६ पृष्ठे आतापर्यंत झाली आहेत.

वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

७१

खामगाव १७-१०-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मला विविधज्ञानविस्ताराच्या दरबारच्या अंकाकरिता मराठी कादंबऱ्यांचा इतिहास लिहावयाचा आहे; व त्याकरिता प्रमुख मराठी कादंबरीकार, त्यांचे उत्तम ग्रंथ व उभयतांचे गुणदोष याबद्दल तुमचे मत विचारले होते. तरी सवडीप्रमाणे ते कळवावे.

ज्योतिषावरील निबंध पुढील जून महिन्यापर्यंत पुरा होत नाही. त्यानंतरही मला बरीच वर्षे पूर्ण विश्रांती घ्यावी लागणार. कारण प्रकृती फार अशक्त झाली आहे. आज पहाटे ४ वाजता पोटात कसेसेच होऊन डोके वेगाने फिरू लागले. हल्ली प्रकृती पूर्ववत् आहे. विविधज्ञानविस्ताराचा निबंध हातून पार पडला म्हणजे मिळविली असे वाटते.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. सवड झाल्यास मराठी पुस्तकांची छापलेली एखादी यादी पाठवून द्यावी.

श्री .कृ. कोल्हटकर

*

७२

खामगाव २८-१०-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. तुमची प्रकृती सुधारल्याबद्दल कळवावे व सवडी. प्रमाणे इकडे यावे, म्हणजे मनास हुशारी वाटेल. मी हल्ली 'मराठी कथात्मक वाङ्मय' हा निबंध लिहिण्यात गुंतलो आहे. तो १०-११-११ चे आत पाठवावयाचा आहे. तोपर्यंत माझे पत्र तुम्हास येणार नाही. तुमच्या सूचनांचा अवश्य विचार करीन.

प्रेमशोधनाची किंवा दुसऱ्या कोणत्याही नाटकाची हस्तलिखित प्रत मजपाशी नाही. केव्हाच त्या प्रती फाडून टाकिल्या आहेत.

'धर्माचे आलोकन करित तयाच्या उदरीं' याचा अर्थ 'सूर्य जगतावरील धर्माची तपासणी करीत गगनोदरांत भ्रमण करीत आहे' असा आहे.

मनोरंजनाकरिता 'संपादिका' या नावाची गोष्ट पाठविली आहे. तुम्हास कदाचित् ऑफिसात वाचावयास मिळेल.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

※

७३

खामगाव २०-११-११

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. पण मी निबंधलेखनात मग्न असल्यामुळे ताबडतोब उत्तर देता आले नाही. आज निबंध पाठविला. गेल्या दीड महिन्यात फार श्रम पडले; व ७५-१०० पुस्तके चाळावी लागली. काल रात्री २ वाजेपर्यंत जाग्रण झाले. आज फारच थकल्यासारखे वाटत आहे.

नानासाहेब जोगळेकरांच्या मृत्युवार्तेने फार वाईट वाटले. किर्लोस्कर मंडळीची फार मोठी हानी झाली. परंतु अजून बालगंधर्व, बोडस ही मंडळी धीर न सोडता एकोप्याने वागल्यास पूर्वीच्या दोन प्रसंगांइतका हा प्रसंग जाणवणार नाही. नानासाहेबांच्या जागेकरिता जी उमेदवार मंडळी आहे त्या सर्वांत हल्याळकरांचे मंडळींतील चिंतूबोवा हे पहिल्या प्रतीचे येतील. ते किर्लोस्कर मंडळीस मिळाल्यास कंपनी लवकरच सावरेल असे वाटते. त्याशिवाय बेडेकर, गोरे, धारप, काडगावकर इत्यादी इतर मंडळीही आहे. त्यापैकी कोण मिळतो हे पहावे. कोणीही मिळाला तरी तो नानासाहेबांसारखा प्रेमळ, उदार, मोकळ्या मनाचा असणे शक्य नाही.

गडकरी यांच्या नाटकाबद्दल माझेही फार चांगले मत आहे. ही गोष्ट त्यांजकडून तुम्हांस कळली असेलच.

मला बादशहाच्या आगमनाप्रीत्यर्थ मिळणाऱ्या सुट्टीत मुंबईस येता येणार नाही. माझे येणे झाले असते तरी दगदग फार होऊन परत वेळेवर येणे झाले नसते.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

※

७४

खामगाव ३०-११-११

आशीर्वाद विशेष

तुमचे पत्र पावले. मला अजून किर्लोस्कर मंडळीचे पुढे करावयाच्या व्यवस्थेबद्दल काही पत्र आले नाही, व येईल असा संभव नाही. तुम्हांस काही बातमी कळल्यास मला कळवावी.

कंपनीस दोनचार महिने सुट्टी घेतलीच पाहिजे असे मला वाटत नाही. हल्याळकराचे कंपनीतील चिंतुबोवा, बेडेकर किंवा गोरे यांच्यासारख्या एखादा जुना नट मिळेल तर शाकुंतल, सौभद्र, शारदा, वीरतनय, मृच्छकटिक, शापसंभ्रम या सारखी जुनी नाटके प्रथमपासून चालू ठेवण्यास हरकत नाही. स्त्रीपात्री मुलगा गेल्याने जितकी हानी होते तितकी या प्रसंगी होण्याचे कारण नाही.

आमच्या कोर्टास दरबारकरिता ७ डिसेंबर पासून १२ डिसेंबरपर्यंत सुट्टी आहे. परंतु गाड्या मिळण्याची वानवा व तेथे रहाण्याची गैरसोय होण्याचा संभव, यामुळे मी मुंबईस जाण्याचा बेत रहित केला आहे. त्या सुट्टीत मी बहुधा नागपूर येथील माझे चुलते आजारी आहेत त्यांस भेटण्याकरिता जाईन. मुंबईस यंदा गेलोच तर नाताळात जाईन.

माझी प्रकृती बरी आहे. कधी कधी झोप मात्र यावी तशी येत नाही.

कळावे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

७५

खामगाव ८-१२-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मी अलीकडे सुदाम्याच्या पोह्यातील १९ वा लेख लिहिण्यात गुंतलो होते. तो आताच संपला.

महाराष्ट्रमंडळीकरिता नाटक लिहिण्याचा प्रयत्न मी येत्या मे महिन्यात करणार आहे. त्यापूर्वी आरंभ करणे शक्य असल्यास जरूर करीन. परंतु माझ्या डोक्याच्या अनुकंपार्ह स्थितीवरून ते शक्य दिसत नाही.

रा.रा. लेले यांचा आवाज जरा बारीक आहे असे ऐकितो पण रा. जोगळेकरांचा आवाजही प्रथम बारीकच होता.

आज रात्री मी नागपुरास जाईन. व तेथे दोन दिवस राहून परत येईन. नाताळात मुंबईस जाण्याचा विचार आहे. तोपर्यंत तुम्ही तेथे आल्यास भेट होईलच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

७६

खामगाव १२-१२-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे ता. ११-१२-११ चे पत्र पावले.

मी काल नागपुराहून परत आलो. आजचा उत्सव चांगल्या रीतीने पार पडला.

किर्लोस्कर मंडळीकडून रा. जोगळेकरांच्या मृत्यूनंतर घडलेल्या वृत्ताबद्दल एक कार्ड माझ्या नावाने आले होते. पण ते पोस्टमनच्या चुकीने रा. कोठारे नावाच्या वकीलाकडे रवाना झाले. असे मला त्याजंकडून काल कळले. त्यांनी ते पत्र परत केले असे ते म्हणत होते. पण ते मला अजून मिळाले नाही.

'रंगभूमी' च्या गेल्या अंकात तुम्ही मजबद्दल जे उद्‌गार काढिले आहेत त्यांवरून तुमचा मजविषयीचा आदर चांगला व्यक्त होतो. पण त्यास मी मुळीच पात्र नाही असे मला वाटते. तो लेख वाचताना मला फारच लाज वाटली व माझे वाचन संपताच तो मी कुलपात कोंडून ठेविला. तुमच्या लेखात सत्याचा काही अंश असेलही, पण त्याने पिशाचरूप टीकाकारांच्या हातात चांगले कोलीत दिल्यासारखे होईल. माझा स्वतःचा उपहास झाल्यास मला फारसे वाटणार नाही, पण तुम्हांस स्वतःस त्यापासून फार त्रास होईल. व त्यास मी कारण झालो असे मला वाटून माझ्याही मनास बराच त्रास होईल. हातून गेलेला लेख परत आणिता येत नाही, हे खरे आहे. पण यापुढील लेख तरी जपून लिहिण्याची तुम्हास सूचना आहे.

विविधज्ञानविस्ताराचे दिल्ली दरबारानिमित्त दोन अंक निघावयाचे होते. त्यांपैकी डिसेंबरचा अंक निघालाच. पुढील जानेवारीचा अंक व फेब्रुवारीचा अंक मिळून एक जोड अंक निघणार आहे. त्यापैकी पूर्वोक्त अंक दरबारचा आहे. त्यात माझ्या निबंध 'मराठी कथात्मक वाङ्मय' व रा. आपटे, रा. साने, रा. केळकर यांचे निबंध येणार आहेत.

मनोरंजनाचा दरबारचा अंक जानेवारीच्या १० तारखेच्या सुमारास निघणार. त्यात माझी गोष्ट 'संपादिका' (संयोगिता नव्हे) येणार व त्यातच माझा विनोदी लेख म्हणजे 'सुदाम्याच्या पोह्यां' पैकी १९ वी मुष्टि 'आमचे बैठे खेळ' हा येणार. हा लेख पूर्वीच्या मुष्टीपेक्षा बराच मोठा झाला आहे. वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

७७

खामगाव १७-१२-११

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मनोरंजनात येणाऱ्या गोष्टीची पेजप्रुफे काल परत पाठवून दिली. बाकीच्या लेखांची प्रुफे अजून आली नाहीत.

माझे नागपुरचे चुलते बहुधा येथे नाताळात येतील. व या कारणाने मला त्या सुट्टीत मुंबईस येता येणार नाही असे वाटते. आलोच तर शेवटच्या दोनचार दिवसांकरिता येईन.

गेल्या चार दिवसांत मला कोर्टातील काम फारच करावे लागले, व प्रुफेही तपासावी लागली. शिवाय एका स्नेह्याच्या घरी लग्न असल्यामुळे जाग्रणेही झाली. पुढील आठवड्यात चांगली विश्रांती मिळेल असे वाटते.

गोष्टीत चार चित्रे येणार आहेत. चित्रांसुद्धा गोष्टीस १५ पृष्ठे लागतील.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. मला किर्लोस्कर मंडळीकडून पत्र येऊन ते एका स्नेह्याकडे चुकीने गेले होते ही गोष्ट खरी नसून केवळ त्या स्नेह्याची गप्प होती. अजून मला मंडळीकडून काहीच वर्तमान कळले नाही.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

७८

खामगाव २८-१२-११

आशीर्वाद विशेष.

मी ४-५ दिवसांपासून सर्दीने आजारी आहे. पहिले २ दिवस फार जड गेले. आता प्रकृती पुष्कळ बरी आहे. मी आज रात्री मेलने मुंबईस येईन. तुम्हास भेटेनच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

७९

खामगाव ९-२-१२

आशीर्वाद विशेष.

मी गेल्या महिन्यात पत्र न पाठविण्याचे कारण मी मुंबईहून आल्यापासून सारखा आजारी आहे. रात्रीची झोप येत नाही. त्यामुळे फार त्रास होतो. सर्व अंग फुटले असून तडतडते, त्यामुळे जिवास स्वस्थता वाटत नाही. कधी कधी बारीक तापही येतो. काही दिवसांपासून त्रिफळा सुरू केला आहे. व टब बाथ इत्यादी बाह्य उपचार सुरू आहेत. हल्ली प्रकृती पूर्वीपेक्षा किंचित् बरी आहे, पण उन्हाळा सुरू झाल्याशिवाय व झोप येऊ लागल्याशिवाय बरे वाटणार नाही. दुपारी किंचित् झोप येते पण कचेरीत काम करावे लागत असल्यामुळे झोप मिळत नाही. पहाटे चार वाजल्याच्या पुढे बरी झोप येते. पण सकाळी कामे असल्यामुळे झोप घेता येत नाही. माझी अशी स्थिती असताही घरातील सर्व मंडळींस दोनदा आप्तांच्या लग्नमुंजीकरिता दुसरीकडे पाठवावे लागले. गेल्या १॥ महिन्यासारखा हालाचा काळ मी कधीही काढिला नाही.

या पुढेही माझ्या पत्रात अनियमितपणा राहिल्यास त्याबद्दल वाईट वाटू देऊ नये.

रा. गडकऱ्यांच्या नाटकाची जाहिरात पाहिली. त्यास पूर्ण यश येवो येवढीच इच्छा आहे.

अजून मनोरंजनाचा व विविधज्ञानविस्ताराचा अंक निघाला नाही. गेल्या १॥ महिन्यात प्रुफांचीही दगदग बरीच पडली.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

८०

खामगाव २८-२-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. पण त्यास उत्तर मला ताबडतोब पाठविता येईना. कारण हाताची बोटे लिहावयाच्या स्थितीत नव्हती.

१ महिन्यापूर्वी मी टब बाथ घेणे सुरू केले. त्यामुळे लवकरच सर्वांगावर इसबाचे व इतर फोड उठून त्यामुळे प्रत्येक भाग अडून गेला. बारीक तापही येणे सुरू झाले. कडक पथ्यामुळे अशक्तताही आली. हल्ली बहुतेक फोड खपल्या पडून बरे झाले आहेत. व तापही अलीकडे आला नाही. उन्निद्रता मात्र अजून पूर्णपणे नाहीशी झाली नाही. ८-१० दिवसांत चांगले बरे वाटावयास लागेल असे वाटते.

आजारातून उठल्यावर मला बरीच वर्षे पूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. एखादा उन्हाळा घेऊन भागणार नाही. महाराष्ट्र मंडळी मला तूर्त तरी आपल्या वचनातून मुक्त करील तर मजवर फार उपकार होतील.

महाराष्ट्र मंडळीकरिता तुम्ही एखादे नाटक लिहित आहात काय? तसा काही प्रकार असावा असे तुमच्या पत्रावरून दिसते.

रा. गडकऱ्यांचे नाटक कसे काय झाले? मंडळीस काही वर्षे चांगले उत्पन्न देईल काय?

मनोरंजनातील व विविधज्ञानविस्तारातील माझे लेख तुम्ही वाचिले असतीलच. त्याबद्दल तुमचे काय मत झाले हे कळण्याची इच्छा आहे.

तुमचा येथे एप्रिलचे २० च्या तारखेच्या सुमारास येण्याचा विचार आहे हे पाहून आनंद होतो. तोपर्यंत माझीही प्रकृती पूर्ववत होईल अशी आशा आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁜

८१

खामगाव ८-३-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. 'प्रेमसंन्यासा' बद्दल तुमचे जे मत आहे तसेच रा. गुर्जर यांचेही आहे. त्यात विनोद फार चांगला साधला आहे, व त्यामुळे ते लोकप्रिय झाले आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. यामुळे कर्त्यास उत्तेजन येईल. माझी प्रकृती आता बरी आहे. तरी अजून झोप चांगली येत नाही. त्यामुळे कोणत्याही गोष्टीबद्दल उत्साह वाटत नाही. उन्हाळा चांगला सुरू झाल्यावाचून पूर्ण बरे वाटणार नाही.

येथील एक कोर्ट पुढील महिन्यापासून बंद होणार. त्यामुळे माझे बरेच नुकसान होईल असा अंदाज आहे.

वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁜

८२

खामगाव १५-३-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. रा. गडकऱ्यांचा हल्लीचा पत्ता कळवावा.

ज्ञानप्रकाशातील 'प्रेमसंन्यासा' वरील टीका वाचली. बरी आहे. टीकाकार कोण असावे याबद्दलचा तुमचा तर्क कळवावा. रा. काणेकर हे आहेत की काय? किंवा रा. श्रीपादराव वर्दे?

माझी प्रकृती दिवसेंदिवस सुधारत चालली आहे. काल रात्री झोप चांगली लागली.

'संत सखूबाई' हे नाटक मी वाचले नाही, फक्त पाहिले आहे, व प्रयोगावरून झालेले मत पुस्तकास लागू होणार नाही. प्रयोग पाहून झालेले माझे मत असे आहे-विठोबास नायिकेच्या स्थानी बसवून त्याजकडून जे प्रकार घडविले जातात ते अयोग्य आहेत. नायकाच्या वर्तनात फरक पडतो, त्यास सबळ कारण दाखविलेले नाही. नायिकेच्या सासूचा स्वभाव चांगला साधला आहे. नायकाचाही पूर्व भागातील स्वभाव चांगला वठला आहे. पहिला प्रवेश फार लांबलचक वाटला. नाटकातील भाषा—विशेषतः स्त्रियांच्या तोंडची—परिपाठातील व चांगली आहे. पत्रांची कामे फार चांगली वठतात. नायिकेचे काम फार हृदयद्रावक वाटते. परंतु मूळ पुस्तकात नायिकेच्या भाषणात किती करुणरस आहे याची शंका आहे. करुणरसाचे बहुतेक श्रेय अभिनयाकडे असावे असे वाटते. एकंदरीत प्रयोग मनोरंजक वाटतो. रुक्कुठारकर्त्यांनी 'प्रेम संन्यासा' वर इंदुप्रकाशात सुरू केलेली टीका तुमच्या वाचण्यात असेलच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

८२(अ)

खामगाव २४-४-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र येऊन दिवस झाले. परंतु विशेष वर्तमान कळविण्यासारखे नसल्यामुळे व अनेक विवंचनांमुळे ताबडतोब उत्तर धाडिले नाही. यांपैकी एक विवंचना माझ्या कुटुंबाच्या आजाराची होती. १०—१२ दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबास हिवताप येऊ लागला तो २—३ दिवसांपूर्वीपर्यंत टिकला. इतक्या अल्पकालीन आजारामुळेही अंगी बरीच अशक्तता आली आहे. हल्ली प्रकृति चांगली आहे. या मुदतीत मी मलकापूर येथे माझे स्नेही नागपूरचे डॉ. गद्रे यांस भेटण्याकरिता व खांडवा येथे माझे स्नेही रा. रा. हरी शिवराम मुंजे सब जज्ज, यांस भेटण्याकरिता गेलो होतो. परत आल्यापासून माझ्या घरात एका स्नेह्याच्या मुलीचे लग्न व्हावयाचे आहे त्याची गडबड सुरू आहे. याशिवाय दोघा होतकरू नाटककारांनी आपल्या कृती मजकडे सूचनांकरिता व अभिप्रायाकरिता पाठविल्या आहेत, त्यांचीही विवंचना मागे आहेच.

यंदाचे उन्हाळ्याचे सुट्टीत प्रथम २—३ दिवस मुंबईस घालवून नंतर पुणे, सिहंगड व महाबळेश्वर घेऊन पुढे फुरसद सापडल्यास बेळगाव येथे जाण्याचा विचार आहे. किर्लोस्कर मंडळी त्या दिवसांत बेळगाव येथे राहणार आहे. वरील कार्यक्रमात बदलही होण्याचा संभव आहे.

तुम्ही एप्रिलमध्ये इकडे आला नाही हे एका दृष्टीने बरेच आहे. कारण येथे हल्ली मनस्वी उकाडा होत आहे तो कदाचित् थंड हवेतील रहिवाशास सहनही होणार नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हाटकर

ता. क. माझी प्रकृती चांगली आहे. बाथ हल्ली सोडून दिला आहे. पुन्हा जूनमध्ये सुरू करीन.

विविधज्ञानविस्तारात कांदबऱ्यांवरील निबंध प्रसिद्ध झाल्यापासून अनेक मासिकांचे अंक व कादंबऱ्या आल्या. त्यांजवर मते देता देता पुरेवाट झाली आहे.

रा. रा. गुर्जर यांचे कुटुंब निवर्तल्याचे तुम्हांस कळले असेलच. ते कशेळीस गेले आहेत.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

८३

खामगाव ७-५-१२

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही कार्डे पावली. पहिले कार्ड येण्यापूर्वी नुकतेच मी तुमच्या मुंबईच्या पत्त्यावर पत्र पाठविले होते, ते तुम्हास पोहोचले असेलच.

माझी प्रकृती पूर्ववत् झाली आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही.

माझी सुट्टी या महिन्याचे १५ वे तारखेस सुरू होऊन पुढील महिन्याचे १५ वे तारखेस संपणार. मी प्रथम मुंबईस जाऊन २—३ दिवस राहीन व नंतर १—२ दिवस पुण्यास राहून नंतर महाबळेश्वरास ८ दिवसांकरिता व बेळगावास ४ दिवसांकरिता जाईन, व पुन्हा परत पुणे-मुंबईकडे येईन. इंदुप्रकाशात लवकरात लवकर फॉर्म निघण्याची तजवीज झाल्यास मला मुंबईस बरेच दिवस घालवावे लागतील. वरील कार्यक्रमात परिस्थितिपरत्वे फेरफार होतीलच.

कळावे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

८४

खामगाव २५-५-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. कालपर्यंत मी घराजवळची एक जागा खरेदी घेण्यात गुंतलो असल्यामुळे तुम्हास पत्र लिहिण्यास बनले नाही.

मला कचेरीचे काम मनस्वी असते. ह्याशिवाय ज्योतिषावरील निबंधाची प्रस्तावना, सूचि व परिशिष्टे तयार करावयाची आहेत. मी आजपर्यंत लिहिलेली सर्व नाटके मोठ्या सुट्ट्यांत लिहिली. पुढील मे महिन्यापर्यंत नवीन नाटक होणे शक्य नाही. ते तयार होईल तेव्हा ते रा. टिपनिसांच्या कंपनीशिवाय महाराष्ट्र ना. मं. व शाहूनगरवासी ना. मं. यांस देण्याचे कबूल केले आहे. एवंच माझे नाटक १ वर्षात झाले तरी त्यापासून रा. टिपनिसांस फारसा फायदा नाही.

अजून नवीन नाटकाचे संविधानकही तयार नाही. ते तयार होण्यास ५—६ महिने लागतील.

रा. खाडिलकरांचे रा. टिपनिसांबद्दल अनुकूल मत झाले हे पाहून संतोष होतो.

येथे अजून चांगला पाऊस पडला नाही. उष्मा फार होत आहे.

क. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

८५

खामगाव १३-७-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मला मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकाकरिता एक लेख लिहावयाचा आहे. शिवाय ज्योतिषावरील निबंधाची प्रुफे तपासावी लागतील. कचेरीचे कामही रोज इतके पडते की संध्याकाळी मनस्वी थकवा येतो. अशा स्थितीत व प्रकती साधारणच असताना माझ्या हातून नवीन नाटक लिहिणे जाणे कितपत शक्य आहे याचा तुम्हीच विचार करावा. तुम्ही किंवा रा. टिपणीस येथे आलात तर त्यात मला आनंदच आहे. परंतु त्याने नाटकलेखनास काय सहाय्य होईल? माझे मन अधिक व्यग्र होईल इतकेच काय ते. डिसेंबरपूर्वी नाटक लिहिणे मुळीच शक्य नाही.

रा. गुर्जर यांची १—२ नाटके मनोरंजनात प्रसिद्ध झाली आहेत, व रा. गडकरी यांचे एक नाटक रंगभूमीत आले आहे. त्यापैकी दोन नाटके तरी प्रयोगरूपाने येण्यासारखी आहेत. त्याबद्दल रा. टिपणीस यांस सूचना करून पहावी.

इकडे अजून चांगला पाऊस पडत नाही, म्हणून लोक काळजीत आहेत. आणखी आठवडा जर असाच गेला तर दुष्काळच पडेल.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

८६

खामगाव २४-७-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. माझी प्रकृती काळजी बाळगण्यासारखी नाही. एखादे वेळी अंग दुखते, व नवीन नाटकाच्या संविधानकाच्या चिंतनामुळे रात्री कधी कधी १२—१ वाजेपर्यंत झोप येत नाही, इतकेच काय ते. नाटकाचा लकडा पाठीमागचा सुटल्यास प्रकृती पूर्ववत् होईल यात संशय नाही. मला माझ्या कुटुंबाच्या प्रकृतीबद्दल विशेष काळजी वाटते. कपाळदुखी व बारीक ताप यामुळे कुटुंबाची प्रकृती बरीच क्षीण झाली आहे. आज मी सर्व मंडळी अकोल्यास पाठवून देत आहे.

यंदाची साहित्य संमेलनाची बैठक ऑक्टोबर अखेर अकोला येथे भरणार आहे. तुम्हास त्या प्रसंगी येण्याची इच्छा असल्यास अवश्य यावे. तुम्ही प्रथम येथे आल्यास तुम्ही व मी मिळून अकोल्यास जाऊ. पाहुण्याचे आदरातिथ्य बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होणार असे दिसते. तुमची येण्याची इच्छा असल्यास एक निमंत्रणपत्रिका तुमच्याकडे पाठविण्यास मी सेक्रेटरीस कळवीन.

महाराष्ट्र मंडळीचे मार्फत रा. कारखानीस यांचे पत्र आले आहे. त्यात त्यांनीही गद्य नाटक लिहून देण्याची आग्रहाची विनंती केली आहे. सामाजिक मंडळीतर्फेही दोन पत्रे आली. अंगी सामर्थ्य बेताचेच व त्यावर मागण्या फार, अशी स्थिती झाल्यामुळे मी भांबावून गेलो आहे. शिवाय होतकरू ग्रंथकारांच्या हस्तलिखित प्रती येत आहेत व मासिकांकडून लेखांबद्दल मागणीही येत आहे. मी सर्वांस नकार देत आहे. पण त्यांच्या पत्रांची उत्तरे देता-देताच नाकी नऊ आले आहेत.

नाटकाबद्दलचा आग्रह तुम्ही तूर्त सोडून दिलेला पाहून समाधान वाटते. नाताळापर्यंत मला नाटक लिहिता येईल असे वाटते तोपर्यंत ज्योतिषावरील निबंधातून व मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकातून मोकळे होण्याचा विचार आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

८७

खामगाव १-८-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. माझ्या कुटुंबाच्या प्रकृतीबद्दल विशेष काळजी करण्याचे कारण नाही. कारण हल्लीचे आजार (कपाळदुखी व बारीक ताप) लग्नापूर्वीपासून आहेत. विश्रांती मिळाल्यास बरे वाटेल अशी खात्री वाटते. स्वयंपाकाकरिता मी अलीकडे एक गुजराथी इसम ठेविला असून शिवाय एक गडी व मोलकरीणही कामास आहे. म्हणून कुटुंबास विश्रांती मिळण्यास हरकत नाही. हल्ली माझे सर्व कुटुंब अकोल्यास आहे. ८—१० दिवसांनी परत येईल.

संविधानकाबद्दल विचार चालू आहे. नाताळापर्यंत नाटक पुरे होईल अशी आशा वाटते. माझे एक स्नेही ज्योतिषी आहेत. त्यांनी आणखी तीन वर्षे डोक्याचे कोणतेही काम न करण्याबद्दल लिहिले आहे. परंतु मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकाकरिता कबूल केलेले लेख, गद्य नाटक लिहिण्याचे कबूल केले आहे ते व ज्योतिषाचा निबंध ही पूर्ण केल्याशिवाय मला विश्रांति घेता येत नाही.

मला वाटते की मनुष्यास आपले सर्व विचार व्यक्त करण्याची जेवढी साधने अनुकूल असतील त्या सगळ्यांचा त्याने उपयोग केला पाहिजे. गोष्टी किंवा मुष्टी लिहिल्या नाहीत तर ते विचार आपल्या मोठ्या कृतीत घुसावयास पाहातील. मी जर सुदाम्याचे पोहे लिहिण्यास सुरुवात केली नसती तर नाटकांतून हास्यरसाचा अतिरेक होऊन इतर रसांची घाण झाली असती. मी ते लिहिण्यास आरंभ करण्याचे कारण हेच. त्या तऱ्हेच्या लेखनपद्धतीत त्यांस यशही बरेच आले आहे. माझी शेवटची दोन नाटके होण्यापूर्वीच माझ्या एका रसिक मित्राचे असे मत होते की माझ्यामागे जर कोणते लेख टिकलेच तर ते सु. पो. च होत. ईश्वराने दिलेल्या सर्व शक्तींचा उपयोग करून त्यांपैकी कोणत्या शक्तीचा अत्यंत उपयोग होईल हे पाहाण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. 'पति हाच स्त्रीचा अलंकार' ही गोष्ट रा. गणपतराव भागवत व इतर काही गृहस्थांस फार आवडली होती. गेल्या वर्षातील गोष्ट तर बऱ्याच जणास पसंत पडली असे दिसते. या गोष्टी जर खऱ्या असतील तर नाटकाशिवाय इतर लेखनपद्धतींकडे आपली काही शक्ती खर्च करण्यास काय हरकत आहे?

चित्रमयजगतातील प्रेमशोधनावरील टीका वाचली. रा. खाडिलकरांचीच दिसते. त्यांची मते माझ्या मतांच्या अगदी विरुद्ध, या दृष्टीने ती टीका फारच शांत डोके ठेवून लिहिलेली दिसते. एकंदरीत मला टीका पसंत पडली.

इकडे पाऊस चांगला पडत आहे. दुष्काळाची भीती गेली.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

खामगाव २०-८-१२

आशीर्वाद विशेष,

तुमचे पत्र पावले. गेल्या पंधरा दिवसांपासून माझा मुख्य कारकून आजारी असल्यामुळे माझा बहुतेक वेळ कचेरीच्या किरकोळ कामाच्या विवंचनेतच जातो व त्यामुळे पत्रे लिहिण्यालाही वेळ सापडत नाही. पूर्वी मजकडे असलेला परंतु मध्यंतरी नोकरीतून सुटलेला असा एक कारकून मी हल्ली मदतीस घेतल्यामुळे हल्ली कामाची विशेष धांदल नाही. पण मुख्य कारकून कामावर येईपर्यंत मनाला पूर्ववत् स्वस्थता येणे शक्य नाही.

लेख लिहिणे अर्थातच बंद आहे. वेळात वेळ काढून मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकाकरिता दोन मुष्टी पाठवून दिल्या. एक गोष्ट लिहावयास घेतली होती, परंतु ती अजून पुरी व्हावयाची राहिलीच आहे. तिचा विषय अहिंसा असल्यामुळे ती लवकर पुरी झाली तरी दिवाळीच्या अंकात घेणार नाहीत. माझे गद्य नाटक दिवाळीपूर्वी तयार होणार असा रा. रा. आप्पासाहेब टिपनिसांचा समज असल्याबद्दल रा. शिंदे यांजकडून कळते. तसा समज असल्यास तो चुकीचा आहे. निदान नाताळपर्यंत वेळ लागेल.

लहान गोष्टी लिहिण्यात माझा मूळ हेतू असा होता की एखादी मोठी कादंबरी लिहिण्यास ज्या भाषेची जरूर भासते ती भाषा हस्तगत करण्याचा प्रयत्न करावा. परंतु तशी भाषेची सफाई मला कधी साध्य होईल असे वाटत नाही. माझी भाषा तुटक आहे. ती भाषा नाटकास योग्य असेल, परंतु कादंबरीलेखनास मुळीच योग्य नाही असे मला वाटते. मात्र नाटके लिहिण्यासही स्वभावपरिपोष, संविधानचातुर्य या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या अंगी येण्यास अशा लघुकथा लेखनाचे साह्य होईल असे मला वाटते. शिवाय आपल्या मनात नाटकात आणण्यासारख्या अशा अनेक गोष्टी व विषय खेळत असतात. त्यांना व्यक्त करण्यासही त्यासारखे दुसरे साधन नाही.

येथील जुन्या भागात गेल्या १॥ महिन्यापासून पटकीचा उपद्रव सुरू आहे. त्यामुळे मी घरातील सर्व मंडळीस बाहेरगावी पाठविले आहे. नवीन भागांत अजून एकही केस झाली नाही. शिवाय प्रतिबंधक उपाय रोज चालू आहेतच.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

❋

८९

खामगाव १३- ९-१२

आशीर्वाद विशेष

तुमची सारी पत्रे पोचली. माझे कालचे घाईने लिहिलेले कार्ड पोचले असेलच.

मत्स्यगंधा नाटक इतके उत्तम झाले आहे हे वाचून फार संतोष झाला. परंतु त्याचा प्रयोग पहाण्याचा योग मला लवकर येईलसे वाटत नाही. याची कारणे अशी.

माझे कुटुंब अकोला येथे दोषी तापाने ७—८ दिवस फार आजारी होते. आता ताप नाही. पण क्षीणता फारच आहे. मला आज उद्या व परवा अशी तीन दिवसांची सुट्टी आहे. या सुट्टीत मला जाता आले असते तर अकोल्यास जावयास पाहिजे होते. कारण माझ्या कुटुंबाचा व मुलांचा त्या संबंधाने फार आग्रह आहे. परंतु नाइलाजामुळे तेथे किंवा पुण्यास मुळीच जाता येत नाही. हल्ली मी कामाखाली चिरडून गेलो आहे. मनोरंजनाकरिता १ गोष्ट व २ मुष्टी पाठविल्या. त्यांची प्रुफे अजून तपासावयाची आहेत. याशिवाय ज्योतिषाच्या निबंधाची प्रुफे २—३ दिवसांनी येत असतात. तो निबंध आक्टोबर १५ चे पूर्वी संपविण्याचा रा. यंदे यांनी विचार केला आहे, व त्याचा मला फायदा घेतला पाहिजे. प्रत्येक फॉर्म तपासण्यास २—३ दिवस लागतात. कारण तो तपासताना तो विषय ग्रंथातून पुन्हा अवलोकावा लागतो. कचेरीच्या दिवसात तर फारच धांदल होते. याशिवाय निबंधाची प्रस्तावना व परिशिष्टे लिहिण्याचे काम सुरू आहे. ते काम आक्टोबर १५ चे पूर्वी मला संपविले पाहिजे. ही सुट्टी गेली की रविवारशिवाय एकच दिवसाची सुट्टी पुढील महिन्यात आहे. रा. रा. अप्पासाहेब टिपणीस व तुम्ही यांचा इतका आग्रह होत असता मी न येणे अशक्य आहे. परंतु कधी कधी अशक्य गोष्टही करावी लागते. तुम्ही, रा. टिपणीस व इतर स्नेही याबद्दल मजवर रागावणार नाही अशी खात्री आहे.

मी ज्योतिषाच्या निबंधातून मोकळा होतो न होतो तोच मला गद्य नाटक लिहिण्यास हाती घ्यावे लागले. याप्रमाणे डिसेंबरपर्यंत मला एक क्षणभरही फुरसत नाही.

येथील कॉलरा हल्ली संपत आला आहे. तुम्ही येण्यास हरकत नाही पण बोलायला वेळ किती मिळेल याची शंका आहे. सर्व मंडळीस माझा नमस्कार सांगावा.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. तुमची रंगभूमीतील टीका वाचली. ठीक आहे.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

खामगाव १-१०-१२

आशीर्वाद विशेष

तुमचे पत्र पावले. येथील हवा पूर्णपणे निवळली असून माझी व कुटुंबाची प्रकृतीही चांगली आहे. कुटुंबाचा अशक्तपणा दिवसेंदिवस कमी होत आहे.

निबंध सपाट्याने छापत आहे. मी हल्ली परिशिष्टे, उपोद्घात, प्रस्तावना, शुद्धिपत्रही तयार करण्याच्या गडबडीत आहे. आणखी १०-१५ दिवसांनी सर्व निबंध छापून निघेल असा अंदाज आहे. त्यानंतर १०-१५ दिवस पूर्ण विश्रांती घेऊन नंतर नवीन नाटक लिहिण्यास हाती घेता येईल. तोपर्यंत त्याचा विचार करिता येत नाही.

रा. टिपणीस यांनी रा. गुर्जरांकडून एका नाटकाची परवानगी घेतली आहे असे कळते. रा. गडकऱ्यांकडूनही त्यांचे अप्रसिद्ध नाटक पुरे करून घेण्याचा त्यांचा विचार होता असे कळते. शिवाय 'मत्स्यगंधा' नाटकही चांगले लोकप्रिय झाल्याचे दिसत आहे. असे असता त्यास नाटकाची उणीव का भासावी हे कळत नाही. रा. केळकरांच्या नवरदेवाच्या जोडगोळीवरून त्यांचे नवीन नाटकही चांगले असावे असे वाटते. ते रंगभूमीवर कसे वठेल हे मात्र सांगता येत नाही.

रा. टिपनिसांचे 'कृतांतकृति' ही बसत आहे असे ऐकितो.

माझे नाटक चांगले होईलच अशी खात्री मलाही वाटत नाही. मग इतरांस का वाटावी? ते डिसेंबरपूर्वी संपविण्याचा विचार मात्र कायम आहे. त्यासंबंधाने रा. टिपनिसांची व तुमची निराशा न होवो म्हणजे झाले. मला तर फार शंका वाटत आहे.

मत्स्यगंधेवर ज्ञानप्रकाशात ५-७ दिवसांपूर्वी एक टीका आली होती. ती कोणी लिहिली होती हे कळवावे. तसेच ज्ञानप्रकाशात 'दामिनी' नाटकावरही २-३ महिन्यापूर्वी एक अनुकूल टीका आली होती, ती कोणी लिहिली होती हेही माहीत असल्यास किंवा चौकशी करून कळवावे.

किर्लोस्कर मंडळी मोडून तिच्या दोन मंडळ्या होणार असे कळते. यासंबंधाने तुम्हास काही माहिती असल्यास कळवावी.

कळावे, हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

❊

९१

खामगाव १७-१०-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले.

रा. टिपनीस हे ‘राधामाधव’ नावाचे नवीन नाटक बसवीत असून ते बरंच लोकप्रिय होण्यासारखे आहे हे वाचून आनंद झाला. नाटकांच्या महर्घतेमुळे त्यांच्या हातून विपुल व चांगली ग्रंथरचना होत आहे ही गोष्ट त्यांस फार भूषणास्पद आहे.

किर्लोस्कर मंडळीस पुन्हा स्थैर्य आले आहे हे पाहून संतोष होतो.

ज्ञानप्रकाशात अलीकडे मत्स्यगंधेवर ज्या टीका आल्या त्यांच्या कर्त्यांच्या नावाचा तुम्हास अंदाज असल्यास तो कळवावा.

मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकात माझी एक गोष्ट येणार आहे. तिचे नाव ‘गरीब विचारे पाडस’. ही गोष्ट अहिंसेच्या तर्फे लिहिली आहे एक मुष्टीही येणार आहे. तिचे नाव ‘यांत्रिक चमत्कार’ हे आहे. दुसरी मुष्टी ‘भाषा व इतिहास’ या नावाची डिसेंबरच्या अंकात येणार आहे. मी ही नावे तुम्हास कळविली असावीत असे तुमचे पत्र येण्यापूर्वी मला वाटत होते.

येथे प्लेग सुरू होण्याची चिन्हे अजून तरी दिसत नाहीत.

रोज ढग येतात, परंतु पाऊस येत नाही. पिके चांगली नाहीत. याचा अनिष्ट परिणाम कोर्टाच्या कामावरही झाला आहे.

कळावे, हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

९२

खामगाव २१-१०-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. अजून मी प्रस्तावना, उपोद्‌घात, अनुक्रमणिका, परिशिष्टे व सूची यांच्याच गडबडीत आहे. हे काम जरी थोडे आहे तरी गेल्या चार वर्षाच्या एकसारख्या लेखनव्यवसायामुळे इतका थकवा आला आहे की काम अत्यंत मंद गतीने चालले आहे. मी निबंधातून पूर्णपणे मोकळा होण्यास अजून १५-२० दिवस लागतील त्या नंतर नाटक लिहिण्यास आरंभ करावयाचा.

मी इतके महिने सतत नव्या नाटकाच्या संविधानकाविषयी विचार करीत आहे, तरी त्यास अजून यावे तसे गोंडस व व्यवस्थित रूप येत नाही. कदाचित् निबंधाचा ध्यास सुटल्यावर त्याचा एकाग्रतेने विचार होऊन थोड्या अवकाशात त्याची रचना पूर्ण होईल. पण हल्ली त्याबद्दल बरीच काळजी वाटत आहे.

रा. रा. केळकरांच्या नाटकाबद्दलाचा मजकूर वाचून वाईट वाटले. अशा स्थितीत रा. टिपणीस यांनी झुंजारराव, हॅमलेट इ. जुनी नाटके बसविण्यास घ्यावी हे बरे. २-३ तरी नवी नाटके मिळत तोपर्यंत हीच स्थिती कायम राहाणार.

इकडे रोज ढग येत असून पाऊस मुळीच पडला नाही, त्यामुळे लोक हवालदिल झाले आहेत. याचा कोर्टाच्या कामावर इतका अनिष्ट परिणाम झाला आहे की वकिली सुरू केल्यापासून इतके वाईट दिवस कधी पाहिले नाहीत. ही स्थिती पुढेही राहिल्यास यंदाचे वर्ष फार वाईट जाईल.

आमच्या सर्वांच्या प्रकृति चांगल्या आहेत. यंदाच्या हिवाळ्यात मागील वर्षाप्रमाणे माझे अंग फुटून त्रास होतो की काय हे पाहावयाचे आहे.

कळावे हे आशीर्वाद

रा. रा. टिपणीस, प्रधान वगैरे मंडळीस माझा नमस्कार सांगावा.

श्री. कृ. कोल्हटकर

*

९३

खामगाव २१-११-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले.

रा. गडकरी हे प्रि. परांजपे यांच्या बरोबर मला भेटण्याकरिता येणार आहेत. प्रि. परांजपे हे मात्र येथे वर्गणी गोळा करण्याकरिता येतील. रा. गडकरी हे एक नवीन नाटक लिहीत आहेत. ते भारत नाटकमंडळीकरिता लिहीत असावेत असे मला वाटले होते, पण रा. गडकरी हे रा. टिपनीस यांस प्रतिकूल असल्याचे तुमच्या पत्रावरून दिसून आले. असो.

नवीन नाटकाचे संविधानक रोज रोज बदलत आहे. तोच प्रकार पात्रांच्या स्वभावांचाही. त्यांस कायमपणा येईपर्यंत तुम्ही बहुधा येथे याल.

स्केचची वाट पाहात आहे.

मी नाताळात येथेच राहून नाटक लिहीन म्हणतो. प्रकृतीमुळे मुंबईस जावे लागले तरच जाईन. उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करण्याचा प्रथम बेत होता तो अर्थातच रहित केला आहे.

आमच्या धंद्यास आलेली मंदी अजून कायमच आहे. चालू महिना व पुढील महिना काहीसा बरा जाईल, कारण या महिन्यात मुदतीच्या बऱ्याच फिर्यादी दाखल कराव्या लागतील. जानेवारी पासून काम बरेच कमी होईल अशी भीती आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

खामगाव ३-१२-१२

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. त्यानंतर येथील सबजज्ञ रा. रा. सुभेदार हे पुण्यास जावयाचे असून त्यांच्या ओळखीचे तेथे कोणी नसल्यामुळे त्यांची तेथे सोय करण्याच्या मी गडबडीत होतो. त्यासंबंधाने मी तुम्हांस पुण्याच्या पत्त्यावर पत्र पाठविले होते. परंतु दुसऱ्याच दिवशी तुमचे मुंबईहून पत्र येऊन तुम्ही पुणे सोडिल्याचे कळले. म्हणून रा. गडकरी, रा. भावे इत्यादिकांस पत्रे लिहावी लागली. काल संध्याकाळी रा. भावे यांची तार आली व कालच रात्री रा. सुभेदार पुण्यास निघून गेले.

यंदा डिसेंबरच्या दि. १५ पासून बरेच दिवस सारखी सुट्टी मिळण्याची आशा होती. परंतु त्यासंबंधाने आता निराशा झाली आहे. म्हणून नाताळाच्या पूर्वी नाटक लिहिता येईल की काय याची जबरदस्त शंका आहे. तथापि प्रयत्न करितो. नाटक नाताळांत लिहावे लागले तर मला खामगाव सोडून जाता येणार नाही. नाताळापूर्वीच लिहिणे झाल्यास मात्र मुंबईस किंवा इतरत्र जाता येईल.

तुमची इतरांशी ओळख करून देण्यासंबंधाने तुम्ही मला जे लिहिले ते कबूल आहे.

इंदुप्रकाशात भारतनाटकमंडळीसंबंधाने 'प्रेषित' या सदराखाली एक लेख आला आहे. तो तुमचाच आहे काय?

वरकड मजकूर भेटीअंती.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

९५

खामगाव २-१-१३

आशीर्वाद विशेष.

मी आज सकाळी येथे येऊन पोहोचलो. रा. रा. अप्पासाहेब टिपणिसांनी सुचविल्याप्रमाणे पहिला प्रवेश राणी, धरंधर व भार्गव यांचा लिहिण्याचा विचार झाला आहे. बहुधा येत्या रविवारी लिहून पाठवून देईन.

नाद्रेवगडे, संस्थान सांगली येथून लक्ष्मीबाई पळूसकर या सहीने एक पत्र आले आहे. त्यात तिने 'प्रेमशोधन' नाटकाची एक प्रत पाठविण्याबद्दल विनंती केली आहे. हे पत्र खरोखरच स्त्रीने पाठविले की काय याबद्दल शंका आहे. तिची सविस्तर हकीकत मला कळावी या हेतूने मी तिला पत्र पाठवीत आहे. शिवाय गांधर्वमहाविद्यालयात रा. रा. विष्णू दिगंबर पळूसकर यांची कोणी आप्त बाई वरील गावी आहे, की काय अशाबद्दल चौकशी करून मला कळवावे. माझ्या पत्रास त्या गावाहून उत्तर आल्यास मी तुम्हास कळवीनच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁜

९६

खामगाव ९-१-१३

आशीर्वाद विशेष.

तुमच्या पत्राची मी वाटच पहात होतो. पत्र वाचून समाधान वाटले. नाटकाची प्रतही पावली.

मी तुम्हास कळविल्याप्रमाणे १॥ सीन लिहून तयार आहे. परंतु त्याची स्वच्छ प्रत करण्यास अजून वेळ मिळाला नाही. येत्या सोमवारपर्यंत पाठवितो. तो मागाहून बसला तरी हरकत नाही.

रा. कारखानीसांचा इसम नक्कल करण्याकरिता आल्यास त्यास भारत मंडळीची प्रत मिळाली तर फार सोय होणार आहे. रा. टिपणीसांस तुम्ही याबद्दल विचारून पाहावे. तुम्ही आज जी प्रत मला पाठविलीत ती सुधारण्याकरिता मला येथे पाहिजे आहे. व त्या प्रतीकरिता महाराष्ट्र मंडळीचा इसम येथपर्यंत बोलाविणे रास्त होणार नाही.

रा. रा. जयवंत यांचे मत वाचून अत्यंत समाधान वाटले. तोपर्यंत मला नाटकाबद्दल बरीच उद्विग्नता आली होती. अजूनही ते रंगभूमीवर कसे वठते याची काळजी आहेच.

रा. मोरमकरांचे आज केरळकोकिळच्या अंकाबद्दल पत्र आले. तो अंक मी. रा. गुर्जरांकडून आणिलेल्या पुस्तकासह ७-८ दिवसांत तुमच्याकडे पाठवितो. तुम्ही त्यांस द्यावा.

कळावे हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

✻

९७

खामगाव १३-१-१३

आशीर्वाद विशेष.

आज व काल घरात पाहुणे असल्यामुळे संकल्पाप्रमाणे १॥ प्रवेशाची नक्कल करण्यास झाले नाही. सबब अस्सल प्रतच पाठवीत आहे. तिची नक्कल करवून शक्य तितक्या लवकर ती परत पाठवून द्यावी. त्या प्रवेशाबद्दलचे तुमचे मतही कळवावे.

भार्गवांच्या स्वगत भाषणापैकी अर्धा भाग पहिल्या प्रवेशानंतर घातला आहे. व बाकीचा भाग हल्ली आहे तेथेच ठेविला आहे.

नाटकात करावयाच्या इतर सुधारणाही लवकरच पाठवून देतो.

तालमी कुठपर्यंत आल्या आहेत हे वरचेवर कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. रा. अमृतलाल, मगनलाल व रा. नारायणजी यांस माझा प्रेमपूर्वक नमस्कार सांगावा. कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✻

९८

आशीर्वाद विशेष.

सोबतच्या सुधारणा अंमलांत आणून कागद परत पाठविणे. रा. केळकर कोणापाशी काय बोलले ते ताबडतोब कळविणे.

क. हे आशीर्वाद

१७-१-१३

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

९९

खामगाव १८-१-१३

आशीर्वाद विशेष.

मी काल भार्गव व धुरंधर यांचा प्रवेश पाठविला तो पावला असेलच. तो व पूर्वी पाठविलेला १॥ प्रवेश इतक्यात पाठवू नये. कारण सबंध नाटकच मी सोमवारी तुमच्याकडे पाठवून देतो. म्हणजे महाराष्ट्र मंडळीस नक्कल करून घेता येईल.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१००

खामगाव १९-१-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. मला वाटते की श्रीपती व म्हाळसा यांचा प्रवेश आहे तेथेच ठेवावा. नायक व नायिका यांचा पहिल्या अंकातील प्रवेश विशेष उठावदार झाला नाही. शिवाय श्रीपतीने म्हाळसेला पाहिल्यानंतर तिला भेटल्याशिवाय फार वेळ जाऊ देणे इष्ट नाही. पहिल्या अंकास अशा चटकदार प्रवेशाची फार जरूर आहे. या कारणांकरितां मला वाटते की तो प्रवेश आहे तेथेच राहू द्यावा.

नाटकाची प्रत मी सुधारली आहे. सुधारणा तांबड्या शाईने दाखविल्या आहेत. त्या सुधारणा भारत मंडळीच्या प्रतीत करवाव्या. नाटकाची प्रत महाराष्ट्र मंडळीकडून नक्कल होईपर्यंत तेथेच राहू द्यावी. व नंतर मजकडे परत पाठवून द्यावी. मी यापूर्वी जे दोन प्रवेश लिहून पाठविले तेही तूर्त तुमच्यापाशीच राहू द्यावे. प्रतीबरोबर परत पाठवावे. प्रत उद्या पाठवीत आहे.

रा. गुर्जरांचे पुस्तक परत पाठविण्यास मला अजून एक आठवडा लागेल. सबब केरळकोकिळचा अंक प्रतीबरोबर उद्याच पाठवून देतो. तो रा. मोरमकरांकडे पोहोचवावा.

रा. केळकर मजबद्दल काय म्हणाले हे कळण्याची फार इच्छा आहे. त्याचा मी आपणांवर फारसा परिणाम होऊ देणार नाही व ती गोष्ट कोणासही सांगणार नाही असे मी कबूल करितो.

भार्गव व धुरंधर यांच्या सुधारलेल्या प्रवेशाबद्दल तुमचे मत कळविणे. रा. नानाभाई जयवंत यांनी नाटक वाचिले काय? वाचिले असल्यास त्यांचे मत कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✻

१०१

खामगाव २२-१-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. रा. गडकऱ्यांच्या प्रकृतीबद्दलचे वर्तमान वाचून काळजी वाटत आहे. त्यांच्या खुशालीचे वर्तमान वरचेवर कळवावे.

रा. रा. केळकर यांचे म्हणणे मला कळल्यास तुमची काही हरकत नसेल तर मला जरूर कळवावे. त्याबद्दल मला काहीशी हुरहुर लागली आहे.

मी नाटकात सुधारणा करीत असताना माझे जे दुसरे वाचन झाले त्याचे प्रसंगी माझे त्याबद्दल पूर्वीपेक्षा बरेच अनुकूल मत झाले हे कळविण्यास संतोष वाटतो.

हल्ली येथे थंडी जरा कमी आहे. मला यंदा थंडीपासून विशेष त्रास झाला नाही. प्रकृती उत्तम आहे. इसब मुळीच झाला नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✻

१०२

खामगाव २८-१-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. त्रिवेणीचे स्वगत भाषण मी पाठविण्यास तयार आहे. मात्र सध्या कोर्टाचे व इतर काम अतिशय पडत असल्यामुळे ते पाठविण्यास ८-१५ दिवस लागतील. लवकर पाठविता आल्यास पाठवीनच. श्रीपती व म्हाळसा यांचा प्रवेश दुसऱ्या अंकात घालावा की काय याबद्दल शंका आहे. तुम्ही सर्व मंडळींनी विचार करून ठरवावे.

नाटक हल्ली मंडळीस आवडू लागले आहे याचा अर्थ मला कळला नाही. सबब खुलासा करावा.

रा. रा. गडकऱ्यांच्या प्रकृतीबद्दल काळजी वाटत आहे. स्वतःची अधिक काळजी घेण्याविषयी मजकडून त्यांस कळवावे. त्यांचा लेख मला फार आवडला. त्यातील काही भाग अत्यंत बहारीचे झाले आहेत.

गौहरजान, सरस्वतीबाई व सत्यबाला या तिघींचे किंवा निदान दोघींचे गाणे ऐकण्याचा सुयोग एखाद्या शनिवारी किंवा रविवारी येण्याचा संभव असल्यास मला कळवावे. पुन्हा अशी संधी येणार नाही.

‘वधूपरीक्षा’ नाटकाचा पहिला प्रयोग ८-२-१३ रोजी आहे अशी एक कंडी उडली आहे. तिच्यात किती तथ्य आहे ते कळवावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❈

१०३

खामगाव ३१-१-१३

आशीर्वाद विशेष.

यासोबत त्रिवेणीचे आत्मगत भाषण पाठवीत आहे. पावल्याचे उत्तर यावे. अस्सल प्रतीवर या भाषणापुरती जागा असल्यास हे तिच्यावरच लिहून ठेवावे. जागा नसल्यास हा कागद त्या प्रतीत टाचून ठेवावा.

म्हाळसा व श्रीपती यांचा प्रवेश आहे तेथेच राहू द्यावा. गौहरजानचा रविवारी जलसा असल्याबद्दल मला रा. अप्पासाहेब टिपणीसांची तार आली होती. पण मला येता येणार नाही. म्हणून मी त्यांस कळविले आहे.

ता. ८-२-१३ शनिवारी रोजी मला पुतण्याच्या मुंजीकरिता उमरावतीस जावयाचे आहे. दोन दिवस राहून परत येईन.

कोणकोणत्या इसमांकडे कोणकोणती कामे दिली आहेत हे पुढील पत्री विस्ताराने कळविणे. तालमी कोठपर्यंत आल्या आहेत हेही कळविणे. त्रिवेणीच्या स्वगत भाषणांत ‘उदार इच्छेचेच अपत्य’ असे शब्द आले आहेत. ते बरे न वाटल्यास त्यांजबद्दल ‘उदार इच्छेचेच फळ’ हे घालावे. स्वतःच्या प्रकृतीस जपावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१०४

खामगाव ६-२-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. तुमचा पत्ता बदललेला दिसतो. तुम्ही एकट्यानीच बिऱ्हाड बदलले की मिस्टर ठक्करनींही बदलले?

मला ‘वधूपरीक्षा’ नाटकाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रयोगाला मुंबईस येता येईल असे वाटत नाही. याचे एक कारण असे की, मला ईस्टर पर्यंत मोठी सुट्टी नाही. शिवाय मला अलीकडे जाग्रणापासून व प्रवासापासून फार त्रास होतो.

महाराष्ट्र मंडळीने नाटकाची नक्कल केल्याबरोबर माझी प्रत मजकडे पाठवून द्यावी.

वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. नाटक आवडल्याबद्दल मला रा. भाऊसाहेब जयवंतांकडून लिहून आले होते.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१०५

खामगाव १२-२-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र उशीराने मिळाले. कारण मी मुंजीकरिता उमरावतीस गेलो होतो.

विदुराच्या कण्यांबद्दल सुदामजीचे पोहे पाहिजेत. ती उघड चूक आहे. 'हृदयाचे पृथक्करण' याबद्दल 'मनाचे पृथकरण' हे शब्द घालावे.

पार्थिवाच्या तोंडी धुरंधरास उद्देशून 'बाळासाहेब' हे संबोधन घालावे. मात्र हे नाटकात चोहोकडे घालावे लागेल.

त्रिवेणीचे सर्व आत्मगत भाषण तुम्ही मला लिहून पाठविले असते तर मला ते वाढविता आले असते. त्याशिवाय मी जरा घोटाळ्यात पडलो आहे. सबब ते ताबडतोब पाठवावे.

महाराष्ट्र मंडळीकडून व नंतर काही दिवसांनी चित्ताकर्षक मंडळीकडून नक्कल होईपर्यंत प्रत तेथेच ठेवावी.

वाराणशीच्या तोंडी तुम्हीच एखादे वाक्य घालावे.

ईस्टरमध्ये येण्याबद्दल पुढे कळवीन.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१०६

खामगाव २४-२-१३

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. आज सकाळी तुमचे दुसरे पत्र मिळाले. त्यापूर्वी 'कुंजविहारी' कर्ते रा. वरेरकर यांची अभिनंदनपर तार आली होती. तुम्ही आपल्या पत्रात प्रयोगादाखल बराच खुलासा केला आहे. परंतु विनोदी पात्रांची कामे कशी होतात हे कळविले नाही. तरी ते पुढील पत्री कळवावे.

'वधूपरीक्षा' नाटकाची प्रत मी मागाहून केलेल्या सर्व फेरफारांसह रा. रा. कारखानीस यांजकडे कोल्हापूर येथे शक्य तितक्या लवकर पाठवून द्यावी. पोचल्याबद्दल पोष्टाची पावती मागवावी.

मी हे नाटक मुद्दाम भारत मंडळीकरिता लिहिले असे जे जाहिरातींत प्रसिद्ध केले त्यावरून मजविषयी बराच गैरसमज होण्यासारखा आहे. पण माझी स्थिती तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी झाली आहे.

त्रिवेणी व धुरंधर यांच्या विहिरीजवळच्या प्रवेशाचे दोन भाग केल्याने रंगाचा बिघाड होईल असे वाटते. त्रिवेणीच्या तोंडावर पाण्याचे बिंदू असल्याचे कारण नाही. फक्त भिजलेल्या वस्त्राच्या रंगाचे कोरडे वस्त्र अंगावर असले व रंगभूमीवरील उजेड जरा कमी केला म्हणजे भागेल असे वाटते. अजून तुम्ही केलेले फेरफार मला मिळाले नाहीत. मिळाल्यावर मी आपले मत कळवीन.

संविधनाक फार घाईने लिहिलेले दिसते. त्यामुळे समजण्यास फार अवघड जाते. मला हल्ली फुरसत नसल्यामुळे ते सुधारता येणार नाही. तुम्हीच पुन्हा एकवार ते काळजीपूर्वक वाचून तपासावे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

१०७

खामगाव २७-२-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र पावले. महाराष्ट्र मंडळीकडे प्रत पाठविण्याबद्दल तुम्हाला लिहिण्याचे कारण इतकेच की प्रत पाठविण्याबद्दल रा. गडकरी यांजकडून कोल्हापुराहून मला लिहून आले होते व त्यांच्या सांप्रतच्या क्षीणावस्थेत त्यांच्या मनाचा हिरमोड करणे मला (बरे) वाटले नाही. त्या गोष्टीचा जाहिरातीशी काही संबंध नाही.

जाहिरातीबद्दल अजून महाराष्ट्र मंडळीकडून काहीच लिहून आले नाही. आल्यावर खुलासा कळविता येईल.

त्रिवेणीने ओल्या वस्त्राच्या रंगाचे वस्त्र आत नेसून वर कोरड्या वस्त्राच्या रंगाचे वस्त्र नेसावे. वरील वस्त्र सैल नेसले तरी चालेल. कारण तिला एके ठिकाणीच उभे रहावयाचे असते. उडी टाकल्याबरोबर तिने वरील वस्त्र फेडून टाकावे. हे होण्यास पुरेसा वेळ धुरंधरचे भाषण, त्याची उडी, व त्याचा अदृश्य त्रिवेणीस वर ओढण्याचा प्रयत्न, यामुळे खात्रीने मिळेल. धुरंधरचे डोके वर दिसून तो विहिरीच्या अदृश्य पायऱ्यांवर पडलेल्या त्रिवेणीस सावध करण्याचा प्रयत्न करितो आहे असे दाखविले तरी चालेल. इतक्या वेळात त्रिवेणीस दुसरे लुगडेही नेसता येईल.

विश्वेश्वरशास्त्रांच्या तोंडी एखादे लहानसे आत्मगत भाषण घालूनही ही अडचण दूर करण्यासारखी आहे. परंतु त्यानेही रंगाचा बिघाड होईल. त्यापेक्षा वर सुचविलेली योजना अमलात आणिली असता बरे पडेल.

संविधांनकात फेरफार करण्याइतकी मला फुरसद मिळाल्यास मी ते सुधारून पाठवीन.

ईस्टच्या सुट्टीत येण्याबद्दल सध्या काहीच लिहिता येत नाही. ते बऱ्याच गोष्टींवर अवलंबून आहे. त्याबद्दल मागाहून कळवीन.

प्रयोगाबद्दल रा. रा. भाऊसाहेब जयवंतांचे पत्र आले होते. त्यातील मत इतके अनुकूल आहे की ते वृथास्तुतीप्रमाणे वाटण्यासारखे आहे. पण ते रा. जयवंतांचे खरे मतच आहे हे त्यांच्या प्रत्येक स्नेह्यास कबूल करावे लागेल.

तुम्ही इकडे एप्रिलमध्ये आल्यास चांगलेच होईल.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

१०८

खामगाव २८-३-१३

आशीर्वाद विशेष

मी काल तुम्हाला पाठविलेले पत्र पोचले असेलच. त्यात काही गोष्टी चुकून लिहावयाच्या राहिल्या होत्या. प्रयागपंडित त्रिवेणी आपली मुलगी असल्याबद्दल जाहीर करितो तेव्हा धुरंधर ती ब्राह्मणाची मुलगी असल्याबद्दल आपली खात्री असल्याचे बोलून दाखवितो की काय? तसे असल्यास ते ठीक नाही. 'आपली मुलगी आहे म्हणूनच तिच्या अंगी पवित्रता, सौजन्य इत्यादी गुण आहेत' अशा अर्थाचे वाक्य पाहिजे. सबब याप्रमाणे दुरुस्ती करावी. वधूपरीक्षा या नावातील दोन शब्द जाहिरातींत निराळे छापतात. ही चूक आहे हे तुम्हांस सांगावयास नकोच. मी मुंबईस असताना जो काळा जरीकाठी रुमाल रा. अप्पांच्या मार्फत घेतला होता त्याची किंमत कळवावी.

क. हे आशीर्वाद

श्री. कृ. कोल्हटकर

*

१०९

खामगाव २-२-१३

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. रा. रा. आप्पासाहेब टिपणीस यांचेही पत्र पोचले. त्यात जाहिरातीतल्या वाक्याबद्दल खुलासा होता, व त्यांनी ते वाक्य काढून टाकण्याचेही कबूल केले आहे. सबब त्यासंबंधाने गैरसमजाला काही जागा राहिली नाही. विहिरीजवळचा प्रवेश कायम केला हेही चांगले झाले. मी ईस्टरच्या सुट्टीत तिकडे येण्याचा प्रयत्न करितो. माझी प्रकृती हल्ली उत्तम आहे.

खंडेरावाच्या सहीपासून विनोद कसा उत्पन्न करावयाचा याचा खुलासा केला नाही. तो पुढील पत्री करावा.

तुम्ही भार्गवाच्या आत्मगत भाषणासंबंधाने केलेल्या सूचना योग्य आहेत. परंतु त्या भाषणाची नक्कल मजजवळ नाही. त्यामुळे त्या सूचनांचा विचार करिता येत नाही. तुमच्याकडून नक्कल आल्यानंतर मी त्या अमलात आणण्याचा विचार करीन.

आत्मगत भाषणाकरिता नाटकाची सबंध प्रत किंवा तिच्यापैकी कोणताही कागद पाठविण्याचे कारण नाही. फक्त त्या भाषणाची कोणाकडून तरी नक्कल करून पाठवून द्यावी. नाटकाची अस्सल प्रत शक्य तितक्या लवकर कोल्हापुरास रा. कारखानीस यांजकडे पाठवून द्यावी. त्यांजकडे प्रत पाठविण्याचा माझा प्रथम विचार नव्हता. फक्त रा. गडकरी यांच्या क्षीण झालेल्या प्रतीकडे पाहून मी आपला विचार बदलला आहे हे तुम्हांस पूर्वीच कळविले आहे. असे असता मजकडे दोष कसा येतो हे कळत नाही. प्रत पाठविण्याबद्दठ मी त्यांस कबूल केले आहे. सबब प्रत लवकर पाठवून द्यावी. त्या कामी एक दिवसाचाही उशीर झाला तर माझ्या हेतूविषयी महाराष्ट्र मंडळीच्या मनात विनाकारण शंका उत्पन्न होईल. शिवाय त्यांजकडे प्रत जाण्यास जितका उशीर होईल तितका उशीर त्यांजकडून ती परत येण्यासही लागेल. प्रत मजकडे लवकर परत आल्यास मला तिच्यात आणखी सुधारणा करता येईल.

पार्थिव, अमला व तारा यांचा प्रवेश घालण्याचे कारण असे होते की भार्गवाची पहिल्या व देवळाजवळच्या अशा दोन्ही प्रवेशांत जी काम आहेत त्यांचेमध्ये त्यास विश्रांती मिळावी. तुम्ही मधील प्रवेश काढून टाकिला आहे असे तुमच्या पत्रावरून कळते. आता भार्गव पडद्यात जाऊन लागलीच बाहेर येतो की काय? तसे होत असल्यास इष्ट नाही.

पुस्तकात फोटो घालावे की काय हे अजून मी ठरविले नाही. घालावयाचे झाल्यास कोणत्या प्रसंगाचे घालावे याचा निर्णय प्रत परत येईपर्यंत करिता येत नाही. तुमच्या मतें असे जे प्रसंग असतील ते कळवावे. म्हणजे त्याचा विचार करिता येईल. पहिल्या अंकातील त्रिवेणीचा हात पाहण्याचा, दुसऱ्या अंकातील विहिरीजवळचा, तिसऱ्या अंकांतील प्रयाग, म्हाळसा व खंडेराव यांचा प्रसंग, चवथ्या अंकातील तुरंगाचा व पाचव्या अंकातील प्रयाग व त्रिवेणीचा हे प्रसंग बरे आहेत. पाचांपेक्षा अधिक फोटो घ्यावयाचे असल्यास किंवा वरील सूचनेसंबंधाने काही फेरफार सुचवावयाचे असल्यास मला कळवावे.

कालच्या व आजच्या प्रयोगाबद्दल तुमचे पत्र येईलच.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

✳

११०

खामगाव ३-३-१३

आशीर्वाद विशेष.

आज नाटकातील पहिली पृष्ठे मिळाली. त्यातील आत्मगत भाषण तुमच्या सूचनांच्या धोरणाने सुधारून १-२ दिवसांत ती पृष्ठे रा. कारखानिसांकडे पाठवून देतो. तुम्हीही नाटकाचा बाकीचा भाग त्यांजकडे ताबडतोब पाठवून द्यावा. नाटक त्यांजकडे जाण्यात मजकडून जी दिरंगाई होत आहे तिजमुळे मजवर पक्षपाताचा विनाकारण दोष येणार आहे. या दोषापेक्षा अंधळेपणाचा आरोप शतपट पुरवला.

कालच्या व परवाच्या प्रयोगाबद्दल मला अजून काही कळले नाही. ईश्वराची मर्जी.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✳

१११

खामगाव २३-३-१३

आशीर्वाद विशेष.

मी अकोल्यास गेले १५-१६ दिवस असल्यामुळे आपली व इतर स्नेह्यांची पत्रे उशीराने मिळाली. रा. कारखानिसांचे पत्र आले त्यात त्यांनी नाटकाची प्रत १५-३-१३ रोजी पावल्याचे कळविले आहे. त्या प्रतीबरोबर आपण त्रिवेणीची आत्मगत भाषणे व मागाहून कळविलेले इतर फेरफार पाठविले असतीलच.

माझ्या बंधूंच्या मृत्यूमुळे माझी झालेली हानी कशाने भरून निघणार नाही. त्यामुळे जे व्यवसायशैथिल्य अंगीं आले आहे ते नाहीसे होण्यास ५-७ महिने तरी लागतील.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

✳

११२

खामगाव ८-४-१३

आशीर्वाद विशेष.

आपली तार व पत्र हीं पावलीं. आज सकाळच्च्या गाडीने आपल्या येण्याची वाट पाहिली. परंतु त्यानंतर लागलीच आपले पत्र येऊन न येण्याचा खुलासा झाला.

आपण येथे आल्यास मला आनंद होणार आहे. परंतु उन्हाळा इतका भयंकर आहे की आपल्या प्रकृतीस तो मानवणार नाही. सबब या वेळी न येणेच इष्ट होणार आहे.

माझी प्रकृती चांगली आहे. मनावर मात्र उद्वेगाची छाया आहे. ती आणखी २-४ महिने तरी तशीच रहाणार. उद्वेगामुळे कोणत्याही गोष्टीचा उत्साह वाटत नाही.

काल रोजी एन. एस. देसाई या आपल्या स्नेह्याचे आपले नावे एक कार्ड आले. काल आपली तार आली नसती तर ते मी मुंबईस पाठविणार होतो. त्या कार्डातील मजकूर :- I shall feel obliged if you will return immediately the two books on Roman Law & Pollock as I want them badly.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

*

११३

खामगाव २४-४-१३

आशीर्वाद विशेष.

तुमचे पत्र येऊन बरेच दिवस झाले. परंतु विशेष वर्तमान कळविण्यासारखे नसल्यामुळे व अनेक विवंचनांमुळे ताबडतोब उत्तर धाडिले नाही. यापैकी एक विवंचना माझ्या कुटुंबाच्या आजाराची होती. १०-१२ दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबास हिवताप येऊ लागला तो २-३ दिवसांपूर्वीपर्यंत टिकला. इतक्या अल्पकालीन आजारामुळेही अंगीं बरीच अशक्तता आली आहे. हल्ली प्रकृती चांगली आहे. या मुदतीत मी मलकापूर येथे माझे नागपूरचे स्नेही डॉ. गद्रे यांस भेटण्याकरिता व खांडवा येथे माझे स्नेही रा. रा. हरी शिवराम मुंजे सबजज्ञ, यांस भेटण्याकरिता गेलो होते. परत आल्यापासून माझ्या घरात एका स्नेह्यांच्या मुलीचे लग्न व्हावयाचे आहे त्याची गडबड सुरू आहे. याशिवाय दोघा होतकरू नाटककारांची आपल्या कृति मजकडे सूचनांकरिता व अभिप्रायाकरिता पाठविल्या आहेत. त्यांचीही विवेचना मागे आहेच.

यंदाचे उन्हाळ्याचे सुट्टीत प्रथम २-३ दिवस मुंबईस घालवून नंतर पुणे, सिंहगड व महाबळेश्वर घेऊन पुढे फुरसद सापडल्यास बेळगाव येथे जाण्याचा विचार आहे. किर्लोस्कर मंडळी त्या दिवसांत बेळगाव येथे राहाणार आहे. वरील कार्यक्रमात बदलही होण्याचा संभव आहे.

तुम्ही एप्रिलमध्ये इकडे आला नाही हे एका दृष्टीने बरेच झाले. कारण येथे हल्ली मनस्वी उकाडा होत आहे. तो कदाचित थंड हवेतील रहिवाशास सहनही होणार नाही.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. माझी प्रकृती चांगली आहे. बाथ हल्ली सोडून दिला आहे. पुन्हा जूनमध्ये सुरू करीन.

विविधज्ञानविस्तारात कादंबऱ्यावरील निबंध प्रसिद्ध झाल्यापासून अनेक मासिकांचे अंक व कादंबऱ्या आल्या. त्यांजकडे मते देता देता पुरेवाट झाली आहे.

रा. रा. गुर्जर यांचे कुटुंब निवर्तल्याचे तुम्हास कळले असेलच. ते कशेळीस गेले आहेत.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

११४

खामगाव १३-५-१३

आशीर्वाद विशेष.

आपली दोन्ही पत्रे पावली. आपण गेल्यापासून मी जरा गडबडीत होतो. त्यामुळे उत्तर धाडण्यास वेळ झाला नाही.

अजून माझा नक्की बेत ठरला नाही. मी कदाचित् मुंबई, पुणे, महाबळेश्वर या ठिकाणी जाऊन या महिन्याच्या २५ व्या तारखेस येथे परत येईन. व नंतर २७ व्या तारखेस पुन्हा येथून जाईन.

रा. माधवराव टिपणीस गेल्यामुळे वधूपरीक्षेचा खेळ होण्यास काही हरकत आली नाही. तो निर्विघ्नपणे पार पडला. मी मुंबईस आल्यास आपणास भेटेनच.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

११५

खामगाव १४-७-१३

स. न. वि. वि.

आपले पत्र पावले. आपणांस परीक्षेत यश आले नाही हे कळले. या परीक्षेत पास होणे बरेच सोपे असल्यामुळे नापास झाल्याबद्दल वाईट वाटण्याचे कारण नाही.

चि. बापू व चि. बाबा हल्ली अकोला येथे हायस्कूल बोर्डिंगातच रहात आहेत. पत्र पाठविणे झाल्यास त्या पत्त्यावर पाठविणे.

मी येथे तिकडून परत आल्यावर काही दिवस बारीक तापाने अजारी होतो. त्यानंतर उन्निद्रतेमुळे ४-५ दिवस त्रास झाला. हल्ली प्रकृती चांगली असून झोपही चांगली येते.

मी मनोरंजनाकरिता एक कविता लिहून पाठविली आहे. ती येत्या अंकात प्रसिद्ध होईल. यापेक्षा अधिक लेखन व्यवसाय हल्ली शक्य नाही. याचे कारण लेखनाला फुरसद मिळत नाही हेच होय. कचेरीच्या कामाशिवाय अकोला येथील इस्टेटीच्या व्यवस्थेचे काम करावे लागते. रोज ५-७ पत्रे लिहावी लागतात. त्याखालीच रिकामा वेळ निघून जातो.

किर्लोस्कर मंडळीसबंधाने सर्व वर्तमान कळले. फार वाईट झाले. पुन्हा जमवाजमव करण्यास रा. रा. मुजुमदार यांस फार त्रास पडेल, व त्रास पडूनही नीट जुळेल की काय याची शंकाच वाटते. वेगळे होणाऱ्या इसमांनी नवीन कंपनी काढली तरी तिचे नाव जुन्या कंपनीइतके पुढे येणे शक्य नाही. अजूनही आपसात समज होण्यास अवसर आहे. झाल्यास उत्तम होईल.

मी काही दिवसांपूर्वी रा. रा. गडकरी यांजकडे त्यांची पुस्तके पाठविली, ती त्यांस पोचली की नाही हे त्यांजकडून कळले नाही. त्या पुस्तकांबरोबर रा. रा. टेंभे यांचेही एक पुस्तक पाठविले होते तेही त्यांजकडे रवाना झाले की नाही हे कळले नाही. माझे स्नेही रा. रा. शेंबेकर वकील यांचे नाटक रा. रा. खाडिलकरांच्याकडे आहे, ते त्यांजकडून आणून परत पाठवण्यास रा. रा. गडकरी यांस मी लिहिले होते. त्याचे काय झाले हेही कळलें नाही. रा. रा. गडकरी भेटल्यास वरील गोष्टीबद्दल त्यांस विचारून मला सवडीप्रमाणे कळवावे.

रा. रा. अप्पासाहेब टिपनीस हे सौ. गिरिजाबाई केळकरांचे 'पुरुषांचे बंड' हे नाटक लौकरच बसविणार आहेत. नाटक चांगले झाले आहे.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

*

११६

खामगाव २२-७-१३

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. मला हा मायना व 'तू' व 'तुम्ही' याबद्दल 'आपण' असे लिहिण्याची इतकी सवय झाली आहे की आपणांस लिहिलेल्या बहुतेक प्रत्येक पत्रात त्या संबंधाने झालेल्या चुका मला दुरुस्त कराव्या लागल्या आहेत. याचे कारण आपली योग्यता माझ्याहून कमी नसल्याची जाणीव हेच होय. शिवाय आपण दिवसेंदिवस वयाने अधिकच होत जाणार. स्वतःचा मुलगा मोठा झाला म्हणजे आपण त्यासंबंधाने सुद्धा 'तुम्ही' किंवा 'आपण' असेच शब्द वापरतो. असे असता आपणांसंबंधानेही तेच शब्द वापरल्यास आपणास राग येण्याचे काही कारण नाही. या बाह्य उपचारांनी अंतःस्थ भावनांत काहीच अंतर पडणार नाही हे आपणांप्रमाणे मलाही मान्य आहे.

रा. बाबूराव जोशी हे परीक्षेत पास झाले हे कळविण्यास संतोष वाटतो. त्यांस क्लास मात्र मिळाला नाही.

रा. रा. टेंभे, रा. रा. बोडस व रा. रा. राजहंस यांनी काढिलेल्या नवीन कंपनीत जुन्या कंपनीतील कोणकोण इसम गेले हे कळण्याची इच्छा आहे. तरी सवडीप्रमाणे कळवावे.

ज्योतिषावरील निबंध आटपत आला आहे. १०-१२ दिवसांत पूर्ण होईल.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❋

११७

खामगाव १९–८–१३

सा. न. वि. वि. आपली दोन्ही पत्रे पावली.

आपण रोमन लॉ मध्ये थोड्या मार्कांनीच नापास झाला हे वाचून वाईट वाटले. असो, पुढील खेपेस आपण खास पास होणार असे यंदाच्या निकालावरून भाकीत करण्यास हरकत नाही.

माझ्या कवितेबद्दलचे आपले मत मला मान्य आहे.

रा. टिपनीसांनी 'भाऊबंदकी' खेळ दोनदा केला ही गोष्ट खरी आहे. पण तो खेळ दोन्ही कंपन्यांच्या हक्कांचा कायमचा निकाल व्हावा म्हणून केला असावा असे वाटते.

हल्ली मला कचेरीच्या व खाजगी कामाखाली, विशेषतः खाजगी पत्रांखाली वेळ मिळत नाही. रोज ५-७ पत्रे लिहावी लागतात.

सौ. गिरिजाबाई केळकरांचे नाटक 'पुरुषाचे बंड' मागील शनिवारी पाहिले. बरे झाले आहे.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

११८

खामगाव २९-१०-१३

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. परंतु मी हल्ली व्यवसायबाहुल्याखाली चिरडून गेलो असल्यामुळे उत्तर पाठविण्यास जरा उशीर होत आहे. याचा राग नसावा.

वऱ्हाडात यंदा प्रथम पाऊस चांगला पडला. परंतु शेवटी मनाजोगा पाऊस न झाल्यामुळे पिकांचे नुकसान झाले. आमच्या धंद्याला यंदा विशेष तेजी राहाणार नाही अशी भीति आहे.

इतर व्यवसाय अनेक असल्यामुळे यंदा दिवाळीच्या अंकाकरिता एकही लेख पाठविण्यास झाले नाही.

गेल्या २ महिन्यांपासून 'तोतयाच्या बंडा' वर टीका लिहीत आहे. तिच्या पूर्वार्धात नाट्यरचनेचे शास्त्र व कला द्यावयाची आहेत. व उत्तरार्धात त्या शास्त्राचे नियम विषयीभूत नाटकास लावावयाचे आहेत. पण अजून पूर्वार्धच संपला नाही. याचेही कारण इतर व्यवसायच.

महाराष्ट्र व भारत या मंडळ्यांच्या खटल्यांचा निकाल पंचमार्फत होणार. अकोल्याचे रा. गुप्ते वकील यांस उभयतांनी पंच नेमिले आहे.

हल्ली भारत मंडळी येथेच आहे. 'वधू-परीक्षे' च्या प्रयोगात बरीच सुधारणा दिसून आली. येथे प्रयोग बराच लोकप्रिय झालेला दिसतो.

माझी प्रकृती सध्या बरी आहे. मुले हल्ली येथे आली आहेत.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

११९

खामगाव १६-११-१३

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. गेल्या १०-१५ दिवसांपासून मी कचेरीच्या व खाजगी कामाखाली इतका चूर होऊनच गेलो होतो की मला त्या अवधीत अत्यंत जरूरीच्या १-२ पत्रांशिवाय कोणत्याही पत्रास उत्तर पाठविण्यास सवड झाली नाही.

‘खटल्याचे दोन विरुद्ध मार्ग’ हे शब्द मी खटल्याचे दोन विरुद्ध ‘शेवट किंवा निकाल’ या अर्थी योजिले आहेत. ‘खटल्याचे’ याबद्दल ‘खटल्यापासून निघणारे’ हे शब्द घातल्यास माझा अर्थ अधिक चांगल्या रीतीने व्यक्त होईल. Remedy या शब्दाचे योग्य भाषांतर ‘इलाज’ या शब्दाने होईल असे वाटते. पण त्याबद्दल ‘मार्ग’ हा शब्दही चालेल.

Individualism या शब्दाचे भाषांतर ‘व्यक्तिवाद’ ‘व्यष्टिवाद’, ‘व्यक्तिस्वातंत्र्यवाद’ या शब्दांनी करिता येईल असे वाटते. या शब्दांवरून इतर शब्द साधावयास हरकत नाही.

‘तोतयाच्या बंडा’ वर मी जी टीका लिहीत आहे त्याचा (तिचा) पूर्वार्ध इतका विस्तृत होणार आहे की त्यातील तत्त्वे थोडक्यात देण्यासारखी नाहीत. तीच तत्त्वे उत्तरार्धात टीकाविषयीभूत नाटकास लावावयाचा विचार आहे.

मी ऐका स्नेह्यास संविधानक कसे असावे हे समजावून सांगत असता मला एक चांगल्यापैकी संविधानक सुचले होते. पण त्यावर नाटक लिहिण्यास मी मोकळा नाही. त्यावर तो स्नेही नाटक लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे व तो न साधल्यास मात्र ते काम मजकडे सोपविणार आहे. अर्थातच त्यावर नाटक लिहिण्याची तूर्त तरी मला आशा दिसत नाही. आपणांस कळलेली बातमी निराधार आहे.

मतिविकाराच्या पद्याचे गद्य तयार झाले आहे. मंडळी परवा मलकापुरास गेली. ते नाटक तेथेच बाहेर आणण्याचा त्यांचा विचार आहे.

दर वर्षाप्रमाणे यंदाही मला थंडीपासून त्रास होण्यास सुरवात झाली आहे.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

*

१२०

खामगाव १९-१२-१३

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. मी नाताळच्या सुट्टीत मुंबईस जाणार नाही. जबलपुरास जाणार आहे.

महाराष्ट्र व भारत मंडळींसंबंधाने आलेला समग्र निकाल मला कळला नाही. फक्त भारतमंडळीस भाऊबंदकीची परवानगी मिळाली एवढेच कळले. हल्ली भारतमंडळी मुंबईसच आहे तेव्हा रा. रा. अप्पासाहेब टिपणीसांकडून आपणांस समग्र खुलासा कळेलच.

मनोरंजनात जानेवारीपासून मेपर्यंत माझी तोतयाच्या बंडावरील टीका प्रसिद्ध व्हावयाची आहे. तिच्यातील पूर्वार्ध फारच मोठा झाला आहे. म्हणजे त्यालाच ५० पृष्ठे लागतील. उत्तरार्ध ८-१० पृष्ठांचाच होईल. याशिवाय मनोरंजनातच २-३ महिन्यांत तुलसी रामायणावर माझी एक लहान टीका प्रसिद्ध होईल. याशिवाय विविधज्ञानविस्तारात आगगाडीवर एक लहानशी कविता व 'महात्मा' व 'देवयानी अर्थात विद्यासाधन' या पुस्तकांवर एक लहानशी टीकाही दिली आहे. याशिवाय 'पुरुषाचे बंड' व 'नाटक्याचे तारे' या नाटकांस प्रस्तावना लिहाव्या लागल्यामुळे मी गेले १-२ महिने सारखा गुंतलो होतो. या नाताळच्या सुटीत 'वधूपरीक्षा' नाटक छापण्याकरिता तयार करण्याचा विचार आहे व साधल्यास मनोरंजनाच्या वसंत अंकाकरिता एखादा विनोदी लेखही लिहीन. जानेवारीपासून जरा मोकळेपणा मिळेल अशी आशा आहे.

मी दिलेल्या संविधानकावर माझे स्नेही नाटक लिहिणार की काय हे पुढील मे महिन्यापर्यंत समजेल. त्यांनी नाटक लिहिले नाही तर मला आणखी १-२ वर्षे नवे नाटक लिहिण्यास उत्साह येईल असे वाटत नाही.

यंदा माझी प्रकृती चांगली आहे.

यंदा निघालेल्या व निघत असलेल्या दिवाळ्यांचा आमच्या धंद्यावरही बराच परिणाम झालेला दिसतो. पुढील १-२ वर्षे बरीच वाईट जातील असे वाटते.

वरकड मजकूर ठीक आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१२१

खामगाव २६-२-१४

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. आपली प्रकृती बरी आहे हे वाचून समाधान वाटले.

रा. अमृतलाल टक्कर यांजविषयी वर्तमानपत्रद्वारा कळले होते. यंदा त्यांजबरोबर रा. हरिभाऊ देवही Servants of India चे मेंबर झाले. दोघेही गृहस्थ त्या कामास पूर्णपणे योग्य आहेत.

वसंत अंकात माझा एक विनोदी लेख व टीकाही येणार आहेत. विनोदी लेख 'साहित्य परिषदेची तयारी' हा आहे. टीका तुलसीरामायणावर आहे. याशिवाय इतर कोणतेही लेख द्यावयाचे राहिले नाहीत.

तो. बं. चा पूर्वार्ध लांबला आहे ही गोष्ट कबूल आहे. परंतु उत्तरार्ध कळण्यास पूर्वार्ध देण्याची जरूरच होती.

माझे दोन्ही वडील मुलगे यंदाही entrance परीक्षेस बसले होते. वडिलाचे पेपर बरे गेले नाहीत. धाकट्याचे पेपर बरे गेले आहेत. चि. बाबूशिवाय इतर लहान मुलांच्या परीक्षा होऊन ते पास झाले. वडील मुलगे उद्या परवा येथे येतील.

धंद्याचे मान सरासरी आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून मला रात्री मुळीच झोप येत नाही. त्यामुळे नेहमी थकल्यासारखे वाटते. यामुळे लेखनाकडेही लक्ष लागत नाही. मला पूर्ण विश्रांतीची फार जरूर आहे.

मी काल संध्याकाळीच पत्र लिहिणार होतो. परंतु कचेरीतून येण्यास उशीर झाल्यामुळे काल लिहिणे झाले नाही. आजही तसे होऊ नये म्हणून कचेरीत जाण्यापूर्वी ११ वाजता घाईघाईने हे पत्र लिहीत आहे.

क. लो. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❋

खामगाव १०-४-१४

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. अलीकडे माझ्यामागे कचेरीचे काम इतके असते की मी रोज सकाळी ७ वाजेपासून संध्याकाळी ७-७॥ वाजेपर्यंत सारखा त्यात गुंतलो असतो असे म्हटले तरी चालेल. शिवाय आपले पत्र आले तेव्हा मी व रा. रा. शेंबेकर 'वधूपरीक्षा' नाटक सुधारण्यात गुंतलो होतो. जरूरीचे काही काम उरले होते ते मला या आठवड्यात एकट्यास करावे लागले. यामुळे आपल्या पत्रास उत्तर पाठविण्यास विलंब लागला. मजकडून उत्तर जाण्यास विनाकारण उशीर होत नाही याचा आपणांस अनुभव आहेच.

पुरुषांच्या बंडावरील आपले अनुकूल मत वाचून आनंद झाला. पण आपले तोतयाच्या बंडासंबंधाने जितके प्रतिकूल मत आहे तितके माझे नाही.

भारत मंडळीचा मी येथे जो वधूपरीक्षेचा प्रयोग पाहिला त्यात मला फारसा बेजबाबदारपणा दिसला नाही त्यापुढील प्रयोगांत काहीसा दिसून आला असे कळले. हल्ली बेजबाबदारपणा दिसत असल्यास त्यास माझी अर्थातच मुळीच संमती नाही.

येथे महाराष्ट्र नाटक मंडळींचा वधूपरीक्षेचा प्रयोग पाहिला. धुरंधर विश्वेश्वरशास्त्री, भार्गव, यमुना, राणी ही कामे चांगली झाली. न्यायाधीशाचे भाषण फार स्पष्ट व खणखणीत असते, परंतु अभिनय जरा कमी आहे. त्रिवेणीचा अभिनय चांगला आहे. परंतु सोंग बोजड दिसते. त्या दिवशी बहुतेक मंडळींचे आवाज बसल्यामुळे, प्रेक्षक फार थोडे असल्यामुळे, व नायिकेच्या इसमास ताप आल्यामुळे प्रयोग नेहमीइतका वठला नाही. कोतवालाचे काम बरे होते. माझे मत कोणासही कळवू नये.

यंदाची प्रांतिक सामाजिक परिषद पुण्यास मेच्या १७-१८ व्या तारखांस होणार आहे. त्या वेळी तेथे जाण्याचा विचार आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❋

१२३

खामगाव १-५-१४

स. न. वि. वि.

आपली सर्व पत्रे पोचली. रा. रा. रामभाऊ कुंदगोळकर यांनी नवीन कंपनी काढिली असून त्यांना मास्तर कृष्णा वगैरे गानकुशल नटांचे साहाय्य मिळाल्याचे वाचून संतोष झाला.

सदरहू कंपनीस वीरतनय, मूकनायक व प्रेमशोधन या नाटकांच्या प्रयोगाची परवानगी मी खालील अटींवर देण्यास तयार आहे.

१. प्रत्येक नाटकामागे ५०० रुपये म्हणजे तिन्ही नाटके मिळून १५०० रुपये द्यावे लागतील. परंतु तिन्ही नाटकांची परवानगी एकदम घेतल्यास व सर्व रक्कम मे व जून या महिन्यांत आल्यास तिन्ही नाटकांबद्दल १२०० रुपये पडतील. २. सर्व पात्रांनी - निदान मुख्य पात्रांनी तरी - मजपासून प्रथमतः चाली घ्याव्या. ३. पात्रांची योजना योग्य असावी. मी मे महिन्याचे काही दिवस तरी पुण्यास रहाणार असल्यामुळे पात्रांच्या योजनेसंबंधाने सूचना व चाली मला समक्ष देता येतील. ४. मी पुण्यास मे च्या १५ तारखेच्या सुमारास येईन, व रा. रा. केळकरांकडे उतरेन.

शौर्य या गुणाचा मन व हृदय या दोहींशी संबंध येतो, त्यास प्रेरणा हृदयाकडू मिळते व त्याचे धाडस वगैरे भाग मनाचे गुण असतात.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁂

१२४

खामगाव २१-८-१४

स. न. वि. वि. आपले पत्र पावले. मी आपली व रा. रा. खाड्ये यांची प्रत आपणाकडेच पाठविणार होतो. पण पत्ता माहीत नसल्यामुळे पाठविली नाही. भारत मंडळीतील ज्या नटांना प्रती पाठवावयाच्या त्यांच्या नावाची यादी मी रा. रा. गुर्जर यांजकडे पाठविली आहे. पण काही नावे संपूर्ण नाहीत. सबब ती त्यांना सांगण्याची कृपा करावी. मी गेला १। महिना तापाने आजारी आहे. हल्ली प्रकृती बरीच चांगली आहे.

क. लो. अ. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. चि. बाबा अकोला येथे हायस्कूलमध्ये आहे.

⁂

खामगाव ३-९-१४

स. न. वि. वि. आपले पत्र पावले.

प्रकृति दिवसेंदिवस सुधारत आहे. परंतु पूर्णपणे सुधारण्यास आणखी १-२ महिने लागतील.

आपणांकडून भारतमंडळीतील नावे कळल्याबद्दल रा. रा. गुर्जरांनी लिहिले होते. मागाहून गणेश व विश्वेश्वरशास्त्र्यांचे व श्रीपतीचे काम करणारे इसम यांची नावेही आपणांस विचारण्यास मी त्यांस लिहिले होते. ती नावे आपणांस माहीत असल्यास सवडीप्रमाणे त्यांस कळवावी.

रा. रा. बाबूराव जोशी हे यंदा फर्स्ट एलएल. बी. च्या परीक्षेत नापास झाले.

मी प्रस्तावनेत १९१२ हे सालच लिहिल्याचे आठवते. १९१३ साल कसे पडले हे कळत नाही. चूक माझ्या नजरेस फार उशिरा म्हणजे पुस्तक हाती पडल्यावर आली.

मध्यंतरी मला दाढ व कपाळ दुखण्यामुळे फार त्रास होत होता. पण तो औषधामुळे आहे असे दिसल्यामुळे तूर्त औषध बंद केले आहे. काही दिवसांनी पुन्हा ते सुरू करावे लागेल.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

*

खामगाव १०-१२-१४

सा. न. वि. वि.

आपले पत्र ७-१२-१४ रोजी पावले. परंतु काहीसे कार्यबाहुल्यामुळे व काहीसे अनिश्चयामुळे आपल्या पत्रास ताबडतोब उत्तर धाडण्यास झाले नाही. असो.

अजूनही मुंबईस जाण्यासंबंधाने माझा नक्की बेत होत नाही. याला अनेक कारणे आहेत. पंरतु मुख्य कारण असे की माझ्या कारकुनाच्या मनातूनही नाताळांत बाहेर गावी जाण्याचे आहे. त्याने जर सर्व सुट्टी बाहेर काढिली तर मला येथून हलता येईल असे वाटत नाही. तो काही दिवसांपुरताच गेला तर बाकीचे दिवस मला मुंबईस घालविता येतील. मी येथून हललो तर मुंबईसच जाईन येवढे मात्र ठरल्यासारखे आहे.

परीक्षेपूर्वी आपली प्रकृती बरीच बिघडली होती हे वाचून वाईट वाटले. परीक्षेत यश आले तर त्या आजारापासून विशेष अकल्याण झाल्यासारखे होणार नाही.

माझी प्रकृती आता पुष्कळच सुधारली आहे. मी रोज सकाळी ५-६ मैलांची सहल करावयास जात असतो माझ्या डाव्या डोळ्यातून अजून पाणी जात असते, व त्यामुळे वाचण्यास व लिहिण्यास त्रास पडतो. येवढी गोष्ट वजा केल्यास आजाराचे परिणाम आता विशेष दिसण्यासारखे नाहीत.

कचेरीचे काम अगदीच बेताचे असते.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁎

१२६

खामगाव २०-१२-१४

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. आपण एल. एल. बी. ची परीक्षा पास झालात हे आपल्या पत्रात व आज सकाळी ज्ञानप्रकाशात वाचून फार आनंद झाला. आता आपल्या मागे परीक्षांची दगदग न राहिल्यामुळे आपली प्रकृती चांगली सुधारण्यास हरकत नाही.

माझे चुलते येथे लवकरच येणार आहेत. ते येथे आल्यावर त्यांचे मत पाहून नंतर मला नाताळातील कार्यक्रम कायम करावा लागेल. त्यांचे मत विरुद्ध पडल्यास मला येथून हलता येणार नाही. शिवाय जरी मी येथून निघालो तरी मला मुंबईत रहाता येणार नाही. कारण माझ्या बंधूबरोबर कोकणात दापोली वगैरे २-४ ठिकाणी जाण्याचे मी कबूल केले आहे. मला मुंबईस फार तर ४-५ तास घालविता येतील. सबब आपण बडोद्यास जाण्यास यापुढे उशीर करू नये.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁂

१२७

खामगाव १३-१-१५

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. आपली माधवाश्रमात भेट झाली त्याच्या दुसरेच दिवशी कोकणात निघून गेलो. बोट मुळीच लागली नाही. उलट बोटीचा प्रवास सुखकर वाटला. मात्र बोटीवर चढण्याची व उतरण्याची दगदग फार पडते असा अनुभव आला. पुन्हा कोकणात जाण्यास विशेष उल्हास वाटणार नाही. असो. आम्ही हरणई बंदरात उतरून पालगड, दापोली, तालसुर, असूद व आंजर्ले ही गावे ५-६ दिवसांत उरकली व मुंबईस ३० व्या तारखेस परत आलो. जमिनीवरील प्रवास बहुतेक बैलगाडीचाच झाला. प्रदेश नवीन असल्यामुळे मनास बरीच करमणूक झाली. परंतु जमिनीवरील प्रवास घाईघाईने उरकावा लागल्यामुळे त्यांतही दगदग झाली.

मुंबईस परत आल्यावर ४-५ दिवस राहून येथे ४ थे तारखेस परत आलो.

हल्ली येथे कापसाच्या गाड्या विक्रीकरिता पुष्कळ येत असतात. पण अजून कापसाचा भाव फारसा चढलेला नाही व पुढे चढण्याची आशा नाही. त्यामुळे कोणत्याही धंद्यास हल्ली मुळीच तेजी नाही. येथील सावकार लोक गडबडले असल्यामुळे तेजीमंदी वगैरे सट्टे बंद आहेत. कुणबी सर्वस्वी सावकारांवर अवलंबून असल्यामुळे त्यांचीही स्थिती समाधानकारक नाही. यामुळे सर्व धंदे हल्ली बंद पडल्यासारखेच

आहेत. हल्ली महाराष्ट्रमंडळी येथे आहे. भारत मंडळीतील वाराणशीचे काम करणारा मुलगा हल्ली या कंपनीत आहे. यामुळे हल्लींचे कंपनीचे वधू-परीक्षा नाटक पूर्वीपेक्षा चांगले होते. ते नाटक उमरावतीस बरेच आवडले असे मंडळीच्या सांगण्यात आले. येथील एका वकिलाने ते उमरावतीस पाहिले, तोही असेच सांगत होता. हल्ली कंपनीचे प्रयोग पुस्तकाबरहुकूम होत असून प्रयोगास ४।।-५ तास लागतात.

गेल्या शनिवारी मी सत्त्वरीक्षा नाटक पाहिले. सर्व पात्रांची कामे चांगली झाली. परंतु येथील मंडळीस नाटक विशेष आवडले नाही असे दिसले. नाटकातील हास्यरस ४-५ स्थलांशिवाय अगदी फिका वाटतो. याचे कारण कृत्रिमता हे असावे असे वाटते. शोकरस बरा साधला आहे. पण त्यातही मधून मधून कृत्रिम भाषणे असल्यामुळे विरस होतो. मूळ कथानकात केलेले काही फेरफार चांगले वाटले. उदाहरणार्थ आईबाप दास्यात आहेत तोपर्यंत अन्नग्रहण न करण्याची रोहसेन प्रतिज्ञा करितो, व त्यामुळे उपासमार होऊन तो मरतो, तारामतीचे आपल्या धन्याशी अनुचित वर्तन असल्यामुळेच तिला मुलगा नकोसा होऊन तिने त्याला ठार मारिले असा तिजवर आरोप येतो, वगैरे काही फरक चांगले झाले आहेत. पण काही प्रकार अनुचितही दिसून येतात. उ. तारामतीच्या गळ्यात एका जवाहिऱ्याने खोटाच कंठा बांधिला असता त्याची किंमत (वीस लाख रुपये) तो हरिश्चंद्राच्या सत्यप्रतिज्ञत्वामुळे देते. हरिश्चंद्र हीन अवस्थेस पोहोचला असता काही चोर त्यास आपल्या टोळीत सामील होऊन काशीचे राज्य मिळविण्याचा उपदेश करितात व तो उपदेश तो ऐकत नाही, विश्वामित्राचा क्रूरपणा अखेरपर्यंत न टिकता नाटकाच्या मध्यापासूनच त्याच्या पश्चात्तापास सुरवात होते, वगैरे काही गोष्टी रसविघातक वाटतात. असो. हे माझे मत चुकीचे असल्याचा बराच संभव आहे. ते कोणासही कळवू नये.

माझ्या प्रकृतीत प्रथम प्रथम जितक्या सपाट्याने सुधारणा झाली तशी आता होत नाही. यामुळे आजाराची राहिलेली कसर कायमचीच होऊन बसते की काय अशी काळजी वाटते. कदाचित् उन्हाळ्यात अधिक सुधारणा झाल्यास न कळे.

वरकड मजकूर विशेष नाही.

कळावे, लोभ असावा हे विनंती.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❋

१२८

खामगाव २५-२-१५

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. गेल्या सहामाहीत एका न्यायाधीशाचा मृत्यू व इतरांच्या बदल्या यामुळे येथील कचेरीच्या कामात अव्यवस्था होऊन इतके काम तुंबले की त्याकरिता एक नवीन कोर्ट येथे स्थापन करावे लागले. त्यामुळे नवे काम कमीं असूनही माझी इतकी धांदल होते की दुसरे कोणतेही काम करावयास सवड होत नाही. यामुळेच पत्रांची उत्तरेहि वेळेवर जात नाहीत. असो.

मी सायलस मार्नर ही कादंबरीही वाचिली आहे. पण ती इतक्या वर्षांपूर्वी की ती चांगली आहे यापलीकडे तिचा कोणताच ग्रह मनावर राहिलेला नाही.

चि. बापू हा हल्ली येथेच आहे. त्याचे कारण नागपूर येथे मनस्वी प्लेग असल्यामुळे तेथील कॉलेजे बंद आहेत हे होय. तो उन्हाळ्याच्या सुट्टीत येथेच राहील असे वाटते. मी पुण्यास जाईन किंवा उत्तर हिंदुस्थानात हे अद्यापि ठरलेले नाही.

रा. रा. बाबूराव जोशी हे येत्या मार्च महिन्यात पुन्हा बसणार आहेत. तेही येथेच आहेत. गेल्या ४ महिन्यांत माझ्या प्रकृतीत सुधारणा नाही. उन्हाळ्यात झाल्यास पाहू.

चि. बाबा यंदा पुन्हा येत्या मार्चमध्ये मॅट्रिकच्या परीक्षेस बसणार.

वरकड मजकूर विशेष नाही.

क. लो. आहे वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

⁎

१२९

खामगाव १३-४-१५

सा. न. वि. वि.

आपले ७-४-१५ चे पत्र पावले. मजकूर समजला. कोर्टाच्या कामाची तारांबळ किंचित् कमी झाली आहे. पंरतु आता अपिलाच्या कामास लवकर सुरवात होणार असल्यामुळे ती पूर्वीपेक्षाही वाढण्याचा संभव आहे.

हल्ली माझी प्रकृती उष्णतेमुळे किंचित् बिघडली आहे. जिभेस व घशास सूज आल्यामुळे जेवताना व बोलताना त्रास होतो. रोज सकाळी ४-५ मैल सहल करावयास जात असतो.

मी यंदाच्या सुट्टीत डेहराडून येथे बंधूंसह राहावयास जाणार आहे. तेथून माझ्या चुलत्यांबरोबर आम्ही हरिद्वार, कनखल, हृषीकेश व मसुरी या ठिकाणी जाऊ तिकडच्या हवेने माझ्या प्रकृतीस फायदा होईल अशी आशा आहे.

कदाचित् घरची इतर मंडळी यंदा पुण्यास राहील. चि. बापू कोठे रहाणार हे अजून ठरले नाही. चि. बाबा यंदा मॅट्रिक परीक्षेस बसला होता. त्याचे पेपर चांगले गेले असून त्यास पास होण्याची उमेद वाटत आहे.

सायलस मार्नरपैकी मला काही आठवेलसे वाटत नाही. आपण आठवण केल्यास पाहीन.

विविधविज्ञानविस्ताराच्या मार्चच्या अंकातील ग्रहगणितावरील टीका मी लिहिली आहे. या शिवाय मनोरंजनाच्या अंकाकरिता रा. रा. गुर्जरांच्या अत्याग्रहारून 'चित्रकार' हा लेख घाईघाईने लिहिला आहे. आता पुढे वर्षभर निव्वळ विश्रांती घेण्याचा विचार आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❈

१३०

खामगाव २८-४-१५

सा. न. वि. वि.

आपले २१-४-१५ चे पत्र पावले. येथे अपीलाचे काम सुरू झाले आहे. परंतु मजकडे अजून फारसे आले नाही. हल्ली येथे दिवाणी तीन कोर्टे आहेत. त्यांपैकी सबजज्ञ कोर्टास व मुनसफ कोर्टास स्मॉलकॉज कोर्टाचा व इतर अधिकार आहेत.

माझे चुलते डेहराडून येथे २-३ महिने रहाण्यास गेले आहेत. त्यांनी जाण्यापूर्वी सुट्टी सुरू झाल्याबरोबर तिकडे निघण्याचे मजकडून वचन घेतले. त्यामुळे मला कोणत्याही संमेलनास हजर रहाता येणार नाही.

मनोरंजनाचा वसंत अंक अजूनही निघाला नाही. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात निघणार असे जाहिरातीत होते.

लेखनासंबंधाने आपण खुशाल विचारावे. मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीन. हल्ली मला या संबंधाने फार पत्रे येतात. ही गोष्ट खरी आहे. पण आपला इतरांपेक्षा वरचा हक्क आहे.

माझी मंडळी यंदा पुण्यास किंवा त्या बाजूस जाणार नाही. माझ्या भाच्याचे खानदेशात लग्न आहे. तिकडे त्यांस पाठवावे लागेल.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३१

खामगाव ९-५-१५

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. मी मुंबईस साहित्य परिषदेकरिता जाणार नाही. डेहराडून येथे जाण्याकरिता १५ व्या तारखेस येथून निघेन. महाराष्ट्र मंडळीने मुंबईस वधूपरीक्षेचा प्रयोग केल्याबद्दल मला काही माहीत नाही.

वरकड मजकूर विशेष नाही.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३२

खामगाव २०-५-१५

सा. न. वि. वि.

मी उत्तर हिंदुस्थानातून येथे १३ व्या तारखेस परत आलो. प्रकृती काहीशी सुधारली आहे. Priorty यास मराठीत 'अग्रता' म्हणतात. Title deeds यास शब्द माहीत नाही. स्त्रीलिंगी व पुल्लिंगी असे दोन कर्ते असल्यास क्रियापद पुल्लिंगी अनेकवचनी असते. व त्यांचा पुढे 'हीं' हे नपुंसकलिंगी सर्वनाम असल्यास क्रियापदही अर्थातच नपुंसकलिंगी अनेकवचनी असते.

देशाटन व आवेष्टन असे शब्द पाहिजेत.

आपल्या चोपड्या पावल्या. त्यांत जे फेरफार मी करावे अशी आपली इच्छा आहे ते आपणा स्वतःस सहन करिता आले असते. मला ते करिता येतील की काय याची शंका वाटते. मी अजून चोपड्या वाचल्या नाहीत. वाचल्यावर काय ते कळवीन. वाचावयास सवड किती लवकर सापडले हे सांगवत नाही. कारण येथे उष्मा अत्यंत होत असून कचेरीचे कामही बरेच आहे.

चि. बाबाचा निकाल आजच कळला. तो यंदाही नापास झाला. रा. रा. बाबूराव जोशांच्या परीक्षेचा निकाल होण्यास अजून बराच अवकाश आहे.

चि. बापू नागपुरात ५-६ दिवसांपूर्वीच गेला.

रा. रा. गडकऱ्यांचे अलीकडील लेख मला बरेच आवडले.

क. लो. अ. हे. वि.

आपला<br>
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३३

खामगाव १२-८-१५

साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आपले पत्र पावले.

माझी प्रकृती मागील वर्षापेक्षा बरीच सुधारली आहे. पंरतु सुधारणेचे मान इतके अल्प व मंद गतीचे असते की दर महिन्यास सुधारणा झाल्यासारखी वाटत नाही. कायमची सुधारणा होणे अशक्य वाटते. कधीकधी तर पुन्हा त्याच विकाराचा attack. होतो की काय अशीही भीती वाटते.

अग्र म्हणजे foremost point यापासून अग्रता preferance या अर्थी शब्द झाला असावा. हक्‌नामा हा शब्द बरा आहे. हक्कपट हा धेडगुजरी समास असल्यामुळे कर्णकटु वाटतो. देशाटण व आवेष्टण असे प्रयोग मराठीत आढळतात. परंतु ते चुकीचे होत.

चि. बाबा हा यंदा मॅट्रिकचा अभ्यास खाजगीच करीत आहे. त्याला हायस्कुलात घेतले नाही. रा. रा. बाबूराव जोशी First LL. B. परीक्षेत पास झाले हे कळविण्यास आनंद वाटतो.

कामाची तारांबळ दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. गेले चारपाच महिने पदरमोड चालली आहे. रा. रा. गडकऱ्यांचे अलीकडील सर्व लेख मला आवडले. नावे आठवत नाहीत.

गंधर्वमंडळीची नाटके बालगंधर्वांचा आवाज बसल्यामुळे बंद पडली होती; ती आता पुन्हा सुरू झाली आहेत, असे वर्तमानपत्रातून कळते. मला कंपनीकडून या बाबतीत पत्र आले नाही.

मी आपल्या चोपड्या दोनदा वाचल्या. जे दोष सुधारण्याकरिता आपण त्या मजकडे पाठविल्या ते दोष आपणासही सुधारिता येण्यासारखे आहेत. असे असता मी ते दोष सुधारण्यात विशेष काय आहे हे मला कळत नाही. ते सुधारण्याकडे माझे मनच घेत नाही. ते दोष फार महत्त्वाचे नाहीत. त्यांपेक्षा काही महत्त्वाचे दोष आहेत ते असे-१ क्षुल्लक मुद्याचा फार विचार करणे. उदाहरणार्थ पृष्ठ २-३-४ वरील कृष्ण वर्णासंबंधाने, पृष्ठ ७-८ वरील आईच्या स्थितीसंबंधाने, पृ. १०-११ वरील तिच्या अश्रुपातासंबंधाने, पृ. १९-२० वरील मातृवियोगासंबंधाने. २ हास्य व करुण या रसांचे मिश्रण विसंगत वाटते. ३ काव्यापेक्षा तात्त्विक ज्ञान अधिक प्रमाणात असल्यामुळे रूक्षता भासते. ४ कृत्रिमता. हे दोष असल्यामुळे लेख पुरा करण्याचा किंवा छापून काढण्याचा आपला विचार असेल असे वाटत नाही. मग क्षुल्लक दोष मजकडून सुधारण्याबद्दल इतका आग्रह का?

इकडे पाऊसपाणी ठीक आहे. तथापि पिके हाती पडेतोपर्यंत लोक असेच हवालदिल रहाणार यात शंका नाही.

क. लो. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

१३४

खामगाव २३-८-१५

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले.

Priority in time यासही अग्रता हा शब्द समर्पक होईल असे वाटते. हक्कपट हा धेडगुजरी शब्द नाही असे धरून चालले तरी त्याजपेक्षा हक्कनामा हा शब्दच बरा वाटतो.

वरकड मजकूर विशेष नाही.

क. लो. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३५

खामगाव २२-९-१५

सा. न. वि. वि.

आपले ता. १५-९-१५ चे पत्र पावले. विश्वगुणादर्शपरिशिष्टांत माझे नाव आल्याबद्दल मी रा. रा. मोरमकरांजवळ आश्चर्य व्यक्त केले होते. कवींमध्ये नाव आल्याबद्दल केले नव्हते. माझे नाव एकदाच आले असून तेही नाटककारांमध्ये आले नाही. जे ज्या स्थानी आले आहे त्या स्थानी ते देण्यात कवीचा काहीतरी हेतु असावा.

विविधज्ञानविस्ताराच्या पुढील अंकात आधुनिक नाटककारांवर लेख येणार असून त्यात मजबद्दल काही मजकूर आहे असे रा. रा. मोरमकरांकडून कळते.

वधूपरीक्षेचे गुजराथी भाषांतर तयार झाले आहे. लवकरच प्रसिद्ध होईल.

आपल्या लेखाच्या वह्या मी आज रोजी आपणाकडे परत करीत आहे.

‘चंद्रिका’ मासिकाच्या पाचव्या अंकात माझ्या लेखाची याद आली आहे. ती आपण पाहिलीच असेल. ती संपादकाच्या पत्रावरून मीच पाठविली होती.

क. लो. अ. हे. वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. रा. रा. गुर्जर यांस माझा नमस्कार सांगावा. माझी प्रकृति बरी आहे.

⁂

१३६

खामगाव १८-१२-१५

साष्टांग नमस्कार विनंती विशेष.

आपले पत्र पावले. आपली वकिली कशी चालली आहे याबद्दल आपण एकाही पत्रात लिहिले नाही. परंतु आता नाताळात समक्ष भेटीत सर्व गोष्टींचा उलगडा होईलच. मी येथून २२ व्या किंवा २३ व्या तारखेस निघेन असे वाटते. तेथे माधवाश्रमात उतरेन.

माझी प्रकृती हल्ली बरी आहे. मात्र मानसिक श्रम फार पडल्यास बिघडत असते. नाताळात शक्य तितका वेळ विश्रांतीत व करमणुकीत घालवण्याचा विचार आहे.

कदाचित १-२ दिवसांकरिता मुंबईहून पुण्यास जाईन. रा. रा. शंकरराव मुजुमदारांचे यासंबंधाने आग्रहाचे पत्र आले आहे.

हल्ली हंगाम असून तो शेतकऱ्यांस चांगला जात असल्यामुळे धंदा पूर्वीपेक्षा बरा चालला आहे. जानेवारीपासून मंदावेल अशी भीती आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁂

१३७

खामगाव ११-११-१७

सा. न. वि. वि.

आपले तारीख १०-११-१७ चे पत्र पावले. आपल्या स्नेह्यांस जी माहिती पाहिजे आहे ती मला पुरविता येत नाही. ती पुरविण्याची साधनेही मजपाशी नाहीत. कारण येथील पुस्तकालय अगदी लहान आहे. ती माहिती आपणास मुंबई येथेच मिळू शकेल.

मी यंदा दोन नाटकांचे गद्यभाग लिहिले आहेत. त्यांची monodoly च देण्याचा विचार आहे. कोणत्या कंपनीस हे अजून ठरले नाही. 'सह चारिणी' व 'परिवर्तन' ही त्यांची नावे असून 'दोन बायकांचा दादला' व 'स्त्रीपुरुषांचे समान हक्क' हे त्यांचे विषय आहेत. संगीत रूपे देण्यास २-४ महिने लागतील.

चि. बाबा (माझा वडील मुलगा) येथेच असतो. चि. बापूही कॉलेज बंद झाल्यामुळे येथे आला आहे.

नाटकांसंबंधाने वर विलेली माहिती कोणासही कळवू नये.

आम्हा सर्वांच्या प्रकृती ठीक आहे.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३८

खामगाव १७-७-१८

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. मला सहचारिणीच्या पहिल्या प्रयोगास पुण्यास रहाता आले नाही याचे कारण मला बळवंतमंडळीकरिता 'जन्मरहस्या' तील पदे करून द्यावयाची होती हे होय. त्या नाटकाच्या हल्ली त्या मंडळीकडून तालमी सुरू आहेत. परंतु गेल्या १०-१२ दिवसांत तिकडील काहीच वर्तमान कळले नाही.

माझे चुलते रा. रा. वामनराव कोल्हटकर यांस येथे ५-७-१८ रोजी येथे देवाज्ञा झाली तेव्हापासून दुखवट्याच्या पत्रांना उत्तरे देणे वगैरे कामात मी चूर आहे.

प्रो. खाड्यांस बिलायतेला जाण्यापूर्वी माझे सर्व लेख, नाटके वगैरे मजकडे रजिष्टर्ड बुक पोष्टाने परत पाठविण्याची विनंती करावी.

माझी प्रकृती ठीक आहे. पाऊस मुळीच नाही. ढग मात्र येत असतात.

क. लो. अ. हे वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१३९

खामगाव १८-९-१८

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. प्रो. खाड्ये यांनी नाटकांशिवाय इतर लेख परत पाठविले ते पावले. नाटकांच्या प्रती मजपाशी शिल्लक नाहीत. सबब मी प्रो. खाड्यांस पाठविलेल्या प्रती त्यांनी परत पाठविल्यास बरे होईल. मी त्यांस जन्मरहस्याची प्रत पाठविताना त्याबद्दल लिहिणार आहेच. आपणही त्यांना पत्र लिहिणार असल्यास मजतर्फे त्यासंबंधाने विनंती करावी. प्रती सावकाश आल्या तरी चालेल.

मी. प्रो. खाड्यांकडे इतर नाटकांच्या प्रती ज्या कारणाकरिता पाठविल्या त्या कारणाकरिताच सहचारिणीची प्रत पाठविली. आपले नाव यादीत असताहि आपणाकडे प्रत न पाठविण्याचे कारण असे की प्रकाशकांकडून मला फक्त एकूण पन्नास प्रतीच मिळाल्या. त्यापैकी वीस प्रती रा. रा. बोडसांनी नटांकरिता ठेवून घेतल्या. बाकीच्या २९ प्रती रा. रा. खाडिलकर, रा. केळकर वगैरे ज्या स्नेह्यांनी मला गेल्या १-२ वर्षात आपल्या प्रती पाठविल्या होत्या त्यांना पाठविण्यात आल्या. याचा परिणाम असा झाला की माझ्या मुलांस व भावंडांसही मला प्रती देता आल्या नाहीत. सहचारिणीच्या अधिक प्रती पाठविण्याबद्दल व तितक्या प्रती जन्मरहस्याच्या प्रतींतून कमी करण्याबद्दल मी प्रकाशकांस लिहिले आहे. त्यांनी माझी विनंती मान्य केल्यास मी आपणांस दोन्ही नाटकांच्या प्रती जरूर पाठवीन. आपण मजपाशी मोकळ्या मनाने प्रत मागितली हे पाहून संतोष होतो. मजविषयी कोणत्याही प्रकारचा गैरसमज करून घेऊ नये. संशय आल्यास त्याचे मजकडून निराकरण करून घ्यावे.

सहचारिणी नाटक कोणास फारसे आवडले नसल्यामुळे ते न पाठविल्यामुळे मजवर फारसा रोष आला नसावा. जन्मरहस्य नाटक बऱ्याच जणांस आवडले असावे असे त्यांच्या उद्‌गारांवरून दिसते. ते आपणांस बरे वाटले हे वाचून फार आनंद झाला. आपले सविस्तर मत जरूर कळवावे. आपण आपले खरे खरे मत स्पष्टपणे कळविता अशी माझी खात्री आहे.

एक नाजूक काम आपणाकडे सोपवावेसे वाटते. शक्य वाटल्यास करावे. मी हल्ली एक लहानसे आत्मचरित्र एका गृहस्थाच्या आग्रहावरून लिहीत आहे. मी लहानपणी लिहिलेली दोन संगीत नाटके रा. रा. गडकरी यांच्या स्वाधीन काही वर्षांपूर्वी केली. ती पाठविण्याची त्यांस तसदी देणे त्यांच्या प्रकृतीच्या हल्लीच्या स्थितीत रास्त होणार नाही. सबब आपण ती नाटके त्यांजकडून मागून घेऊन मजकडे पाठविल्यास उपकार होतील. आम्हा सर्वांच्या प्रकृती ठीक आहेत. आपले 'दिव्य लावण्य' केव्हा बाहेर येणार?

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४०

खामगाव १-११-१८

सा. न. वि. वि.

गेल्या ऑक्टोबर पहिलीपासून जळगाव (जिल्हा-बुलढाणा, वऱ्हाड) येथे एक मुनसफ कोर्ट स्थापन झाले असून त्या कोर्टाकडे माझे बहुतेक काम गेल्यामुळे मी खामगाव सोडून जळगाव येथे वकिली करिता गेलो आहे. हल्ली ४-५ दिवसांकरिता मी दिवाळीच्या सुट्टीत येथे आलो आहे.

मी आपणाकडे परवाचे रोजी सहचारिणीची एक व जन्मरहस्याची एक या प्रमाणे दोन प्रती पाठविल्या आहेत. आपण हल्ली पुण्यासच आहात की काय याची शंका असल्यामुळे प्रती पुण्याच्या पत्त्यावर पाठविल्या असल्यामुळे त्या आपणास पोचतील की काय या बद्दल काळजी वाटते. ती पोच कळवून दूर करावी.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४१

जळगाव (जिल्हा बुलडाणा वऱ्हाड) १२-११-१८

सा. न. वि. वि.

आपले ता. ८-११-१८ चे पत्र पावले. मी गेल्या महिन्याच्या अखेरीस सहचारिणीची एक व जन्मरहस्याची एक अशा दोन प्रती आपणांकडे C/o Superintendent, New English School Boarding या पत्त्यावर पाठविल्या. त्या आपणांस पावल्या नाहीत असे आपल्या पत्रावरून दिसते. त्या प्रती आपणाकडे पाठवून देण्याबद्दल आपण आपल्या स्नेह्यांस लिहावे.

जन्मरहस्याच्या प्रती व सहचारिणीच्या जादा प्रती माझ्या हाती एकदमच आल्या. सबब नुस्ती जन्मरहस्याची प्रत पाठविणे शक्य नव्हते.

रा. खाड्यांकडे जन्मरहस्याची प्रत पाठविली आहे. त्यांनी निघण्यापूर्वी विलायतेतील पत्ता कळविला होता. त्यांस मी एक पत्रही लिहिले आहे. त्यात निदान गुप्तमंजूष व मतिविकार पाठवून देण्याची विनंती केली आहे.

हल्ली चोहोकडे साथीचा आजार असल्यामुळे अजून येथे वकिलीचे काम सुरू झाले नाही. आम्हां सर्वांच्या प्रकृती बऱ्या आहेत.

चि. बापू सुट्टीमुळे खामगावास आला आहे. आज तो तेथून जाणार आहे. इकडेही अभ्रे जमतात.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४२

जळगाव (जिल्हा - बुलढाणे, वऱ्हाड) १५-११-१८

सा. न. वि. वि.

आपले ता. १३-११-१८ चे पत्र पावले. त्यापूर्वीच्या आपल्या पत्रास मी पाठविलेले उत्तर पावलेच असेल.

आपणांस अखेरीस प्रती मिळाल्या हे पाहून समाधान वाटते. मत सवडीप्रमाणे कळवावे.

रा.रा. मायदेव यांच्या सूचनेवरून मी त्रोटक आत्मचरित्र लिहीत आहे. पण त्यांचे काम अलीकडे जवळजवळ बंदच पडल्यासारखे आहे. या आत्मचरित्रात माझ्या लेखासंबंधानेच माहिती बहुधा येईल. मागाहून विशेष व्यक्तिविषयक माहिती सुचेल तशी मधूनमधून घालण्याचा विचार आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४३

Confidential

जळगाव ता. ३१-३-१८

साष्टांग नमस्कार, विनंती विशेष.

आपले ता. २९-३-१९ चे पत्र पावले. आपण आपले जन्मरहस्यावरील मत कळविणार होता, ते अजून कळविले नाही. आपले स्नेही प्रो. खाड्ये यांस ते नाटक बरेच आवडले असावे असे काही दिवसांपूर्वी आलेल्या त्यांच्या पत्रावरून दिसते.

रा.रा. गुर्जर यांच्या कल्याणाचीच इच्छा मी नेहमी बाळगीत असता व तदनुसार माझे वर्तनही असता त्यांनी मजविषयी आपली गैरसमजूत करून घेऊन माझ्याशी वैर आरंभिले आहे. ते वैरच त्यांच्या अलीकडील लेखांतून व्यक्त होत असते. वैरास अशा प्रकारे वाट मिळून तरी ते कमी होईल अशी आशा करावयास हरकत नाही. मला अलीकडे असे अनेक प्रसंग आले असल्यामुळे त्या गोष्टीने मनास फार धक्का बसला नाही. रा. रा. गुर्जर निस्सीम स्नेही असताना किती प्रेमळ असू शकतात याचा मला चांगला अनुभव आला होता. ते निस्सीम वैरी झाले असता द्वेषाची मजल कोठवर नेऊ शकतात याचाही अनुभव घेण्यासारखा होता व तो हल्ली मिळत आहे ही गोष्ट वैचित्र्याच्या दृष्टीने इष्टच आहे.

'परिवर्तना'ची मजपाशी येथे जी प्रत आहे ती इतकी अवाच्य आहे की तिच्यातील काही भाग माझे मलाच कळतीलसे वाटत नाही. आपणास तर ते मुळीच उमगणार नाहीत. मी उन्हाळ्याच्या सुट्टीत मुंबई पुण्याकडे येईन, त्या वेळी समक्षच प्रत आपणांस दाखविल्याला बरे होईल. रा. रा. टिपणीस व रा. रा. शेट्ये हे आपणाप्रमाणेच माझे स्नेही आहेत, व त्यांनाही प्रत दाखविण्यास मुळीच हरकत नाही. पण नाटक प्रसिद्ध होईपर्यंत त्याचा फारसा बोभाटा होणे इष्ट नाही, व गंधर्व मंडळीस माझ्या नाटकाबद्दल जो वीट उत्पन्न झाला आहे त्यावरून ते नाटक लवकरच प्रसिद्ध होईल असे वाटत नाही.

आपणांस परिवर्तनासंबंधाने कोणत्या गोष्टी कळल्या आहेत ते जाणण्याची फार उत्कंठा वाटते. तरी त्या पुढील पत्री मला कळवाव्या. त्यापैकी ज्या मला माहीत असतील त्यात सत्याचा अंश किती आहे हे मीही आपणास कळवीन.

मी खामगाव सोडण्याचे कारण माझे तेथील उत्पन्न अगदी खालावले होते हे होय. येथे आल्यापासून उत्पन्न वाढले आहे खरे. तथापि दर महिन्यास उत्पन्नाची व खर्चाची तोंडमिळवणी करता करिता अजून नाकी नव येतात. हे महर्घतेचे दिवस गेले व सुबत्ता आली म्हणजे उत्पन्न आणखीही वाढेल असे वाटते. पण तूर्त केवळ आशेवर काळ कंठणे भाग आहे.

येथे आल्यापासून वाचनास फारच कमी वेळ मिळतो, व लेखनास तर मुळीच मिळत नाही. यामुळे गेल्या वर्षी अति श्रमामुळे थकलेल्या डोक्यास आपोआपच विश्रांती मिळत आहे.

चि. बापूची लवकरच बी. ए. ची परीक्षा होणार आहे. मी हल्ली येथे एकटाच आहे. बाकीची मंडळी खामगावास आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला<br>
श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. अवाच्य प्रतही वाचून काढण्याची आपणास उमेद असली तर मला कळवावे, म्हणजे मी ती पाठवून देईन. मात्र ती कोणास न दाखविता परत करावी.

श्री. कृ. कोल्हटकर

❋

१४४

Confidential

जळगाव ४-४-१९

सा. न. वि. वि.

आपले ता. २-४-१९ चे पत्र पावले. 'परिवर्तन' नाटक आज रोजी पाठवीत आहे. कबूल केल्याप्रमाणे तीन दिवसांत परत करावे, व आपले त्यावरील मतही कळवावे. नाटकाची प्रत रजिस्टर्ड बुकपोस्टाने पाठविण्यास विसरू नये.

नाटक आपणांस दाखविण्यास मी स्वतःच्या जबाबदारीवर तयार झालो. पण ते रा. टिपणीस व रा. शेट्ये यांस दाखविण्यापूर्वी गंधर्व मंडळीचे मालक रा. बोडस यांस विचारावे लागेल असे वाटते. रा. टिपणीस एक नाटकमंडळीचे मालक, व ते व. रा. शेट्ये नाटककार असल्यामुळे येवढी खबरदारी घेणे जरूर आहे असे मला वाटते. नाटककारांनी इतरांची नाटके वाचल्यास त्यातील एकही कल्पना नाटकात येऊ न देण्याचा त्यांचा निश्चय असला तरी त्यांना नकळत जो संस्कार होतो त्यामुळे ते अपरिहार्य होते असा माझा स्वतःचा अनुभव आहे. निदान रा. बोडस यांस तसे वाटल्यास त्यांस दोष देता येणार नाही. शिवाय माझे मत रा. टिपनिसांविषयी जितके निर्मळ आहे तितके रा. बोडसांचे असेल की काय याचीही शंका आहे. सबब आपण रा. टिपनीस व रा. शेट्ये यांस प्रत दाखविण्यापूर्वी रा. बोडस यांची परवानगी जरूर घ्यावी. माझी स्वतःची त्या गोष्टीस मुळीच हरकत नाही.

हल्ली येथे मजपाशी गुजराथी आचारी आहे. शिवाय रा. शंकरराव कारकूनही आहेत.

या नाटकाबद्दल आपण ज्या गोष्टी ऐकिल्या आहेत त्या कळविण्याविषयी अत्यंत उत्कंठा वाटत आहे. तरी त्या ताबडतोब कळविण्याची कृपा करावी.

क. लो. अ. हे वि.

ता. क. पत्रातील मजकूर कोणासही कळवू नये.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

⁂

१४५

जळगाव १५-४-१९

सा. न. वि. वि.

मी ह्या वेळेपर्यंत एकाही इसमाकडे 'परिवर्तन' नाटक पाठविले नव्हते. असे असता केवळ आपणाबद्दल माझ्या मनात असलेल्या स्नेह भावामुळे मी ते आपणांकडे पाठविले. आपणांस त्या नाटकासंबंधाने ज्या गोष्टी कळल्या होत्या त्या मला नाटकवाचनानंतर कळविण्याचे आपण कबूल केले होते व आपले झालेले बरेवाईट मतही आपणांकडून कळेल अशी मला अपेक्षा होती. परंतु आपण यांपैकी एकही गोष्ट केली नाही. फार काय पण प्रत पोचल्याचे पत्रही पाठविले नाही. मी जो आपणावर विश्वास ठेविला त्याच्या शतांशानेही मजवर विश्वास ठेवणे आपणास योग्य वाटले नाही. असो. आपल्या वर्तनाने मी जो बोध घ्यावा अशी आपली इच्छा होती तो बोध मी घेतला आहे. या पुढे मी आपणास एकाही पत्राने तसदी देणार नाही.

कळावे, लोभ असावा हे विनंती.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४५

जळगाव, वऱ्हाड ७-५-२०

सा. न. वि. वि.

आपले ता. ५-५-२० चे पत्र आताच मिळाले. आमची उन्हाळ्याची सुट्टी १५-५-२० रोजी संपणार. यंदाच्या परिस्थितीमुळे मला मुंबई पुण्याकडे फार दिवस घालविता येणार नाही असे वाटते. सुट्टीचे बहुतेक दिवस खामगाव, वर्धा व उमरावती येथे घालविण्याचा विचार आहे. त्या बाजूला आलोच तर ८-१० दिवसांकरिताच येईन.

मी येथून १५-५-२० रोजीच संध्याकाळी बहुधा खामगावास जाईन.

चि. बापू यंदा पहिल्या एलएल. बी. च्या परीक्षेस बसला होता, परंतु नापास झाला.

गणेशमंडळी हल्ली कोठे आहे? ती वधूपरीक्षेचे प्रयोग करीत असल्यास तिजकडे पैशाची मागणी करावयाची आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१४६

जळगाव, वऱ्हाड ता. १७-१-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. १४-१-२१ चे खिन्न मनःस्थितीत लिहिलेले पत्र पावले. आपण दोन महिन्यांपासून आजारी आहात ही गोष्ट मला माहीत नव्हती. आपले क्रॉनिकल किंवा टाइम्स पत्रांत आलेले लेख ज्यांनी वाचिले असतील त्यांचे लेखकाच्या बुद्धिसामर्थ्यावरून शरीरस्वास्थ्याबद्दलही अनुकूलच अनुमान होईल. Bronchitis ने अत्यंत अशक्तता येणे स्वाभाविक आहे. परंतु तो रोग प्राणघातक होईल ही आपली भीती निराधार आहे. आपले पुढील पत्र शरीराच्या व मनाच्या अधिक हुशारीच्या स्थितीत लिहिलेले येईल अशी आशा आहे.

खोकल्यावर Syrup of Vasaka हे औषध मला नेहमी वस्ताद आढळून आले आहे. आपण त्याचा ताबडतोब अनुभव घेऊन पाहावा.

शिवाजी व कल्याणची यवनी यांच्या कथेवर लिहावयाच्या नाटकाचे संविधानक तयार झाले आहे. २-३ महिन्यांत नाटक लिहून तयार होईल.

आपणांस पूर्णपणे बरे वाटेपर्यंत आपल्या प्रकृतीचे मान मला वारंवार कळविण्याबद्दल एखाद्या स्नेह्यांस सांगून ठेवावे. ईश्वर करो व आपणांस लवकर आराम वाटो.

कळावे हे विनंती.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

❊

१४७

जळगाव, वऱ्हाड ता. ३-२-२१

साष्टांग नमस्कार विनंती विशेष.

आपली दोन्ही पत्रे पावली. पहिल्या पत्रास उत्तर न जाण्याचे कारण केवळ प्रापंचिक विवंचना. मागील साली पिके बुडाल्यामुळे, कपाशीचा भाव फार कमी झाल्यामुळे, पूर्वीचा कापूस फार शिल्लक असल्यामुळे शेतकरी व मापकार लोकांची स्थिती फार चिंताजनक झाली आहे. त्या स्थितीचा परिणाम आमच्या धंद्यावरही झाला आहे. हल्लीच्या असहकारितेचीही त्यात भर पडली आहे. पुढील ८-१० महिने कसे निभावणार याची प्रत्येकास काळजी वाटत आहे. मी यंदा नाटक लिहिण्याचा व जुन्या लेखांची नवी आवृत्ती काढण्याचा जो विचार केला आहे ह्यास कारण हल्लीची परिस्थितीच होय.

माझ्या नाटकात काल्पनिक भाग यवनीसंबंधानेच काय तो घालावा लागणार आहे. ऐतिहासिक सत्याकडे शक्य तितके लक्ष्य पुरविण्याचा विचार आहे. नाटक तीन अंकांतच आटपण्याचा संकल्प आहे. पुढील उन्हाळ्याच्या अथवा त्यापूर्वीही लिहून तयार होईल असे वाटते.

आपली प्रकृती सुधारत आहे हे वाचून फार आनंद झाला. हल्ली हवा खराब झाली आहे. ती जरा निवळली म्हणजे सुधारणा झपाट्याने होईल. येथेही रोगराई बरीच आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

※

१४८

जळगाव, वऱ्हाड ता. ९-२-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. ७-२-२१ चे पत्र काल संध्याकाळी मिळाले. मी जे नाटक लिहिणार आहे त्याचे कथानक फार लहान असल्यामुळे ते संगीतच करावयाचे ठरविलेले आहे. गद्यनाटकमंडळीकडून संगीत नाटकमंडळीच्या इतका पैसा मिळणार नाही असे मलाही वाटते. एका नवीन निघू पहाणाऱ्या गद्य नाटकमंडळीकडून या नाटकाबद्दल मागणी आली होती. पण हे नाटक संगीत व्हावयाचे आहे असे सांगून मला त्यांची विनंती अमान्य करावी लागली. संगीत नाटक मंडळ्यांपैकी गंधर्वमंडळी हे नाटक करण्यास तयार नाही. इतर कोणत्याही मंडळीकडून monopoly करिता फारसे पैसे मिळणार नाहीत. पण मला या नाटकाचे सर्व हक्क द्यावयाचे नसून मर्यादित काळापुरता प्रयोगाचाच हक्क द्यावयाचा आहे व नाटकाच्या मोबदल्याचे मान त्याच्या लोकप्रियतेवरच ठेवावयाचे आहे. यामुळे मंडळीवर बोजा न पडता मलाही फायदा होईल असे वाटते. नाटक माझ्या इतर सर्व नाटकांहून लोकप्रिय व्हावे असे लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. तथापि त्याकरिता ऐतिहासिक व्यक्तींचे स्वभाव अन्यथा दाखविण्याचा किंवा प्रचलित चळवळींचा निर्देश करण्याचा विचार नाही. शिवाजीचे पात्र गद्यच ठेवावयाचे आहे. यवनी, तिचा पती, आबाजी सोनदेव हीच पात्रे संगीत रहातील. कदाचित् आबाजीसही गद्यच ठेवावे लागेल. बाजी मोहिल्यास प्रतिनायक करण्याचा विचार आहे. यवनीशिवाय तिची दासी व शिवाजीच्या स्त्रिया हीच कायती स्त्रीपात्रे राहातील. ती दासी व तिचा वल्लभ ही विनोदी पात्रे आहेत.

आपले सहचारिणीसंबंधाने मत बदलले हे वाचून समाधान वाटले. नवीन नाटकाच्या स्वरूपासंबंधाने परिस्फोट करू नये.

Oddity या शब्दास विक्षिप्तपणा, विक्षेप, व तऱ्हेवाईकपणा यापैकी कोणताही शब्द चालेल. Cynic चा बरोबर अर्थ उतरविणारा मराठी शब्द सापडणे कठीण आहे. दोषैक दृक्, माणूस घाण्या हा शब्द

चालण्यासारखा आहे. Bolshevism is the assertion of man over wealth यांचे भाषांतर 'संपत्तीहून मनुष्य श्रेष्ठ आहे असे प्रस्थापित करणे याचेच नाव बोल्शेव्हिझम्.'

माझी प्रकृती चांगली आहे.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

✳

१४९

जळगाव, वऱ्हाड ता. ५-३-२१

साष्टांग नमस्कार विनंती विशेष

आपले ता. ३-३-२१ चे पत्र आताच मिळाले. रा. गणपतराव बोडस पुन्हा गंधर्वमंडळीत गेले हे वाचून फार आनंद झाला. ते गेल्यापासून गंधर्वमंडळी बरीच फिक्की वाटत होती. याप्रमाणे त्याचे महत्त्व दिसून आल्यामुळे यापुढे कंपनी सोडून जाण्याचा त्यांस प्रसंग येणार नाही अशी आशा आहे.

आपण नाटकासंबंधाने मला जो सल्ला दिला आहे तो योग्य आहे यात शंका नाही. पण तो माझ्या मनःस्थितीमुळे मला घेता येणार नाही असे वाटते. सहचारिणी नाटक गंधर्वमंडळीस दिल्यापासून मला त्या मंडळीचा जो अनुभव आला त्यामुळे मला त्याच मंडळीस दुसरे नाटक देण्याविषयी विशेष हुरूप राहिलेला नाही. त्या नाटकाच्या तालमी मी पुण्यास कोणत्या मनःस्थितीत घेतल्या हे माझे मलाच माहीत. पुन्हा तसा प्रसंग मजवर येऊ नये अशी माझी उत्कट इच्छा आहे. ज्या कंपनीचे नाटकाबद्दल प्रेम नाही त्या कंपनीस नाटक द्यावयाचे नाही असा माझा तेव्हापासून निश्चय झाला आहे. त्यानंतर दुसऱ्याही एका कंपनीचा मला जो अनुभव आला त्याने त्या निश्चयास दृढताच आली. माझ्या नवीन नाटकसंबंधाने मी रा. नारायणरावांस विचारिले ते केवळ त्यास पूर्वी दिलेले एक वचन पाळण्याकरिताच. त्यांनी व रा. पंडितांनी नकार देताच मला एक प्रकारे माझी सुटका झाल्यासारखे वाटले. रा. नारायणराव जरी माझ्याशी अत्यंत सभ्यतेने वागत आले आहेत तरी त्यांस मनातून माझ्या नाटकाबद्दल मुळीच आदर वाटत नाही. त्यांना माझ्या नाटकांपासून मुळीच लाभ झालेला नाही हेही कबूल केले पाहिजे. रा. बोडसांना मजबद्दल आदर असेल, पण द्रव्यदृष्टीने तरी माझी नाटके घेण्यास ते कधी अनुकूल होणार नाहीत. मी 'सहचारिणी' व 'परिवर्तन' ही नाटके गंधर्वमंडळीवर लादून तिला सफई फसविले असा तिचा ग्रह अजून कायम आहे. 'परिवर्तन' नाटक बसविण्यास मंडळी जेव्हा घेईल तेव्हा तेही नाटक केवळ कर्तव्य म्हणूनच मी बसवीन. त्यात मला यत्किंचित्ही हुरूप वाटणार नाही. असा खरा प्रकार असता माझे नवीन नाटक त्या मंडळीस देण्यास मला हुरूप कसा वाटावा?

गंधर्वमंडळीस ३००० रुपये देऊन व 'सहचारिणी' व 'परिवर्तन' नाटकांची मोनॉपाली सोडावयाची असा संकल्प करून मी रा. नारायणराव व रा. पंडित यांजपाशी त्यासंबंधाने बोलणे काढिले होते. व त्यांनी त्यास आपली मान्यता दर्शविली. त्यासंबंधाने एक करारपत्राचा मसुदा तयार करून मी रा. पंडितांच्या

स्वाधीन केला व करारपत्र उभयतांच्या सह्यांनिशी मजकडे पाठविण्याचे रा. पंडितांनी कबूल केले. पण त्यानंतर त्या गोष्टींची त्यास आठवण देऊनही ते शब्दाला जागले नाहीत. अशा मनुष्याशी व्यवहार करण्यास कोणत्या स्वाभिमानी पुरुषास हुरूप वाटेल?

शिवाय माझे नाटक चांगले होईलच अशी हमी मला कशी देता येणार? नाटक पूर्ण झाल्यावर ते कसे वठेल याचा अंदाज करिता येईल. व ते घेण्यापासून फायदा होईल असे गंधर्व मंडळीस वाटल्यास तिलाही ते घेण्याचा विचार करिता येईल. शिवाय गेल्या १२-१५ दिवसांपासून मला निद्रानाशाचा जो विकार जडला आहे तो असाच पुढे कायम राहिल्यास नाटक यंदा पुरे होईल की काय याबद्दल जबरदस्त शंका वाटते.

सहचारिणीमुळे रा. बोडसांवर पक्षपाताचा दोषारोष करण्यात आला होता. तसा या नाटकामुळे त्यांजवर येऊ नये अशी इच्छा आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करिता मी आपण होऊन रा. बोडसांकडे अगर गंधर्वमंडळीच्या दुसऱ्या कोणत्याही इसमाकडे नाटकाबद्दल गोष्ट काढणे मुळीच इष्ट नाही असे आपणासही वाटेल. त्या नाटकाबद्दल मजकडे दोन संगीत कंपन्यांच्या या पूर्वीच मागण्या आल्या आहेत. त्यांपैकी एकीस किंवा दुसऱ्या एखाद्या कंपनीस ते कमी रकमेस देणेही मला बरे वाटेल. पण गंधर्वमंडळीकडे दातीं तृण धरून जाणे मला मरणाहून भयंकर वाटते.

येथील हवा कोरडी आहे. परंतु यंदा पाऊस फार कमी पडल्यामुळे धुरळा फार होऊन गलिच्छपणाही अतिशय वाढला आहे. त्यामुळे डास, चिलटे, ढेकूण इत्यादिकांची गर्दी होऊन झोप घेणे फार कठीण होऊन बसले आहे. यंदा उन्हाळ्याचे स्वरूपही बरेच उग्र होण्याची भीती आहे. यंदा उन्हाळ्याची सुट्टी भरपूर म्हणजे १॥ महिना मिळणार असा रंग दिसत आहे. तसे झाल्यास वऱ्हाडाबाहेर कोठेतरी मुबलक पाण्याच्या ठिकाणी जाऊन रहाण्याचा विचार आहे. वऱ्हाडात यंदा पाण्याची भयंकर टंचाई भासू लागली आहे.

क. लो. अ. हे. वि.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१५०

जळगाव, वऱ्हाड ता. ८-३-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. ४-३-२१ चे पत्र काल संध्याकाळी मिळाले. या पत्रापूर्वीच्या आपल्या पत्रास मी उत्तर पाठविले ते आपणांस यापूर्वीच पोचले असेल. आपण मला वेळोवेळी जी बातमी कळवीत आला आहात तिजबद्दल मी आपला ऋणी आहे, व योग्य संधी येताच तिचा मी उपयोगही करीन.

गंधर्वमंडळीकडून मजसंबंधाने जे वर्तन झाल्याचे मी आपणास मागील पत्रात कळविले होते तशाच मासल्याचे वर्तन रा. रा. केशवराव भोसल्यांचेही मजसंबंधाने घडले. मी आपणहून सहचारिणी व परिवर्तन नाटकासंबधाने त्यांजपाशी बोलणे काढिले असता त्यांनी मजसंबंधाने माझ्यामागे जे उद्‌गार काढल्याचे माझ्या कानावर आले व त्यांची जी बेपर्वाई मला प्रत्यक्ष पाहावयास मिळाली तिजवरून इतःपर आपण होऊन त्यांजकडे कोणत्याही नाटकासंबंधाने बोलणे काढावयाचे नाही असा मी निश्चय केला. म्हणून त्यांचे मजकडे नाटकासंबंधाने लिहून येईपर्यंत मला त्यांच्याशी त्याबद्दल पत्रव्यवहार सुरू करिता येणार नाही. नाटकमंडळ्यांकडून गेल्या काही वर्षात मजसंबंधाने जी बेपर्वाई दाखविण्यात आली तिच्या मुळाशी माझी नाटके विशेष उत्पन्नाची नसतात ही गोष्ट आहे हे मी जाणून आहे, व ते कारण नाहीसे केल्याशिवाय नाटकमंडळ्यांशी आपण होऊन पत्रव्यवहार करण्यात अर्थ नाही. माझे नवे नाटक शक्य तितके लोकप्रिय करण्याचा माझा विचार आहे. तसे ते झाल्याबद्दल आपणांसारख्या चारदोन स्नेह्यांची खात्री झाल्यावर चांगल्या नाटकमंडळ्यांकडूनही मजकडे त्याबद्दल मागण्या येऊ लागतील. हल्ली २-३ किरकोळ मंडळ्यांकडून मागण्या आल्या आहेत.

या नाटकाची कायमची मोनॉपली देण्याचा विचार नाही. ३-४ वर्षांच्या मोनॉपली ठराविक रकमेकरिता दिल्यास कंपनीचा फायदा होऊन माझेही नुकसान होणार नाही. पण या साऱ्या नाटक तयार झाल्यानंतरच्या गोष्टी आहेत.

मी आपले नाव कोणासही कळविणार नाही. आपणही माझ्या पत्रातील मजकूर गुप्त ठेवावा.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❈

१५१

जळगाव, वऱ्हाड २८-३-२१

सा. न. वि. वि.

मी शिमग्याच्या व ईस्टरच्या सुट्टीत खामगावास गेलो होतो. तेथे आपले ता. २२-३-२१ चे जळगावच्या पत्त्यावर पाठविलेले पत्र ता. २५-३-२१ रोजी मिळाले. मी खामगावहून आज दुपारी परत आलो.

आमची उन्हाळ्याची सुट्टी ता. १५-५-२१ पासून १५-६-२१ पर्यंत एक महिनाभर आहे. सुट्टी सुरू होण्यापूर्वी माझ्या नाटकाचे लेखन संपल्यास मी ताबडतोब मुंबई-पुण्याकडे येईन. लेखन सुट्टीच्या आरंभापूर्वी संपले नसल्यास मी वर्धेस माझ्या बंधूंकडे जाऊन तेथे ते संपवीन व नंतर त्या बाजूस येईन.

अरविंद मासिकाचे संपादक रा. भालेराव यांजतर्फे विविधज्ञानविस्ताराचे व्यवस्थापक रा. मोरमकर यांनीही त्या मासिकाकरिता लेख लिहिण्याची विनंती केली होती. त्यांच्या सारख्या किंवा आपणांसारख्या स्नेह्यांच्या इच्छेस मान देण्याची इच्छा असताही मजकडून ह्या मासिकास लेखनसहाय्य होत नाही याचे कारण वयाबरोबर वाढत जाणारी उत्साहशून्यता होय. अलीकडे मला रोज दोन तास पत्राचे जबाब देण्यात घालवावे लागतात. उरलेल्या वेळात कचेरीचे व पक्षकारांशी बोलण्याचे काम व कागदपत्रे तपासणे वगैरे करावे लागते. त्यातूनही वेळ उरला तर नवीन नाटकाच्या कथानकाचे चिंतन व मी हल्ली लिहीत असलेल्या एका कथेचे लेखन करावे लागते. यामुळे मजकडे लेखाबद्दल आलेल्या अनेक मागण्यांपैकी एकही पुरविता येत नाही. माझा जो लेख नवयुगाच्या गेल्या अंकात प्रसिद्ध झाला आहे तो मी कोणत्याही मासिकाकरिता लिहिला नव्हता. तो मी उद्यानास देऊ केला होता, व ते मासिक काही महिन्याकरिता बंद पडलेले पाहून नवयुगाकडे पाठविला व या रीतीने कै. डी. काशिनाथ यांस दिलेल्या वचनातून मुक्त झालो. यापुढे मी काही वर्षे तरी — निदान माझ्या हाती आलेली दोन नाटके व दोन कादंबऱ्या पुऱ्या होईतोपर्यंत तरी — विनोदी किंवा इतर कोणताही लेख न लिहिण्याचा संकल्प केला आहे. लिहिलाच तर मोबदल्याची अपेक्षा न करिता रा. भालेरावांकडे पाठवीन. यापेक्षा अधिक लिहिणे मला शक्य नाही हे आपणच कबूल कराल.

आपल्या शब्दाची मजपाशी किती किंमत आहे हे आपल्या निदर्शनास यापूर्वी अनेक वेळा आले असावे असे वाटते. मग अशी शंका का?

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

*

१५२

जळगाव, वऱ्हाड ९-४-२१

साष्टांग नमस्कार विनंती विशेष.

आपले ता. ८-४-२१ चे पत्र आताच हाती आले. मी गेल्या ५-७ दिवसांपासून Sciatica या वातविकाराने आजारी आहे. औषधोपचार चालू आहेत. पण रोग झपाट्याने हटण्याचे चिन्ह दिसत नाही. तो उन्हाळ्याच्या सुट्टीतही कायम राहिल्यास नाटक लिहिणे अशक्यच होईल.

आपण माझ्या पुढील नाटकासंबंधाने जी सूचना करणार आहात ती कळण्याची फार इच्छा आहे. आपल्या पत्रातील भाषा इतकी संदिग्ध आहे की तिचा काहीच उमज पडत नाही. तरी खुलासा व्हावा.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

*

१५३

जळगाव, वऱ्हाड २५-४-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. २१-४-२१ चे पत्र काल संध्याकाळी मिळाले. मला Sciatica चा आजार झाल्यामुळे कमरेपासून पायापर्यंतची सर्व डावी बाजू दुखत असते; यामुळे चालण्याचा त्रास पडतोच; पण फार वेळ खुर्चीवर बसवतही नाही. बहुतेक वेळ मी अंथरुणावर पडून असतो ही गोष्ट खरी आहे. प्रकृतीत सुधारणा फार मंद गतीने होत आहे. पूर्ण बरे वाटावयास २-३ महिनेही कदाचित् लागतील. यंदाच्या सुट्टीत मुंबई-पुण्याकडे येता येईल काय हा प्रश्नच आहे.

अजून खाजगी पत्रव्यवहाराचे काम मीच करितो. कारकुनास कोर्टाचे काम असतेच. आपण मला माझ्या नाटकसंबंधाने जे कळविणार होता त्या संबंधाने काय निश्चित केले?

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

*

१५४

जळगाव, वऱ्हाड २९-४-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. २७-४-२१ चे पत्र काल संध्याकाळी मिळाले.

प्रकृतीत मंद गतीने सुधारणा चालू आहे. तूर्त मी एका पायाने अधू झाल्यासारखा झालो आहे. मी व माझा आचारी असे आम्ही दोघेच येथे आहोत. १-२ दिवसांत बायकामुले येणार आहेत. येथे २-४ दिवस राहून नंतर ती जबलपुरास जातील. सुट्टी सुरू होताच मी वर्धा येथे बंधूंकडे जाईन.

येथील सब असिस्टंट सर्जन आपल्या कामात व स्वभावाने फार चांगले आहेत. त्यामुळे माझ्या आजारावर योग्य उपचार चालू आहेत व प्रकृतीची सर्व प्रकारे काळजी घेतली जात आहे. रा. अप्पासाहेब टिपणीस अध्यक्ष होणार हे वाचून फार आनंद झाला. नाटककार, नट व चित्रकार या तीन्ही दृष्टींनी त्यांची योग्यता आजपर्यंतच्या सर्व अध्यक्षांच्यापेक्षा निःसंशय अधिक आहे. मला त्यांचा पत्ता कळवावा म्हणजे मी त्यास अभिनंदनपर पत्र पाठवीन.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

ता. क. मी पायाने आजारी असलो तरी शरीराने व मनाने दुर्बळ झाली नाही. आपण जे मला कळविणार आहात ते कळविले तरी त्यावर काही परिणाम होणार नाही.

❋

१५५

जळगाव, वऱ्हाड ५-५-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. ३०-४-२१ चे पत्र तेरवाचे रोजी मिळाले. ते येताच मी रा. रा. अप्पासाहेब टिपणीसांस अभिनंदनपर पत्र पाठविले.

आपणांवर कोणाकडून खटला व्हावयाचा आहे व कोणत्या लेखाबद्दल हे कळण्याची इच्छा आहे. तरी सवडीप्रमाणे ते व आपणास मला जी गोष्ट बऱ्याच दिवसापासून कळवावयाची आहे ती कळवावी.

प्रकृती मंद गतीने सुधारत आहे. १-२ महिन्यांत ठीक होईल. असे वाटते.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❈

१५६

जळगाव, वऱ्हाड ता. १२-५-२१

सा. न. वि. वि.

आपले ता. ९-५-२१ चे पत्र आज सकाळी मिळाले. एक दिवस उशिराने मिळण्याचे कारण ते प्रथम खानदेशातील जळगावास गेले होते हे होय.

येथील वाचनालयात लोकसंग्रह येत नाही. त्यामुळे आपला लेख वाचावयाचे साधन नाही. मी उद्या वर्धा येथे जाणार आहे. तेथील वाचनालयात चौकशी करीत व लेख मिळाल्यास मी आपले मत कळवीन. बाकी मी कधीही फौजदारी काम घेत नसल्यामुळे माझ्या मतास विशेष किंमत नाही.

आपण निर्भीडपणाने सूचना केलेली पाहून संतोष होतो. त्या सूचनेच्या स्वरूपाबद्दल मी काहीशी अटकळ बांधली होती, व ती अटकळ बरीच खरी ठरली आहे. तथापि मी केवळ पैशाच्या दृष्टीनेच एका वर्षात तीन नाटके लिहिली असे आपणास का वाटावे हे कळत नाही. मी ती नाटके जरी २-२-४-४ वर्षाच्या अंतरांनी लिहिली असती तरी त्यांच्या स्वरूपात विशेष अंतर पडले असते असे मला वाटत नाही. इतर नाटकांवर मी जितके परिश्रम घेतो तितकेच याही नाटकावर घेतले. मी परिश्रम घेतो ते नाटकाच्या संविधानकावरच घेत असतो हे आपणांस माहीत आहेच. मी एकाही नाटकातील कल्पनांची व कोट्यांची कधी जंत्री केली नाही. जंत्री न केल्यानेच त्यांचा ओघ अस्खलित रहातो असा माझा समज आहे. कथानकावर मात्र कित्येक महिने विचार करीत असतो. 'सहचारिणी' चे कथानक माझ्या मनात दोन वर्षावर घोळत होते. परिवर्तनाचे कथानकावर नाटक लिहिण्याचा माझा हेतूही फार वर्षांचा होता. जन्मरहस्याचे कथानकही बरेच दिवस माझ्या डोक्यात घोळत होते. ते इतके की त्यामुळे मला दुसरे काही सुचेनासे झाले. व त्या वर्षी तिसरे नाटक लिहिण्याचा इरादा नसताही मला ते लिहावे लागले. सहचारिणी

व परिवर्तन ही नाटके लिहिताना पैसे मिळविण्याचा माझा हेतू होता असे म्हटल्यास चालेल. (वास्तविक पहाता तो हेतु परिवर्तनासंबंधानेच खरा आहे. सहचारिणी नाटक वधूपरीक्षेनंतर जितक्या काळाने स्वाभाविकपणे यावयाचे तितक्याच काळाने आले.) परंतु जन्मरहस्यासंबंधाने त्या हेतूचा आरोप मजवर करणे अगदीच अन्यायाचे होईल. ते नाटक मी विचारांच्या जाचणीतून सुटण्यासाठीच लिहिले. ते मी रा. केशवराव भोसल्यांना पूर्वीच्या अभिवचनातून मुक्त होण्याकरिता देणार होतो. परंतु मध्यंतरी बळवंत मंडळी निघून तिने गळ घातल्यामुळे मी ते त्या मंडळीस दिले. त्यातील पदे करणे मी लांबणीवरच टाकणार होतो. पण मंडळीच्या व रा. गडकऱ्यांच्या आग्रहामुळेच मी ती ताबडतोब करून दिली. माझ्या मंडळीशी ज्या शर्ती ठरल्या होत्या त्या सुद्धा पैशाच्या दृष्टीने ठरविल्या नव्हत्या. ही नाटके माझ्या पूर्वीच्या नाटकांपेक्षा लोकप्रिय व्हावी व त्यावर नाटमंडळ्यांस भरपूर उत्पन्न व्हावे असाही ती लिहिताना माझा हेतू नव्हता. त्यापैकी दोन नाटके सुधारणेवर असून लोकप्रिय होण्याचा फारसा संभव नाही. योग्यतेतही ती नाटके माझ्या पूर्वीच्या नाटकापेक्षा हिणकस ठरतील असे मला व माझ्या अनेक रसिक मित्रांना वाटत नाही. जन्मरहस्य नाटक माझ्या इतर नाटकांपेक्षा सरस वठले आहे असा बऱ्याच जणांचा अभिप्राय आहे. परिवर्तन नाटक त्याच्या खालोखाल येईल. तथापि ते पूर्वीच्या नाटकांहून कमी सरस वाटणार नाही. सहचारिणी नाटक काहींच्या मते परिवर्तनापेक्षा कमी तर काहींच्या मते अधिक सरस झाले आहे. मला स्वतःस ते फार आवडते. पण त्याचे कारण पक्षपातही असू शकेल. खुद्द रा. गुर्जरांचे मत सहचारिणी नाटक मराठी हास्यरसोत्पादक नाटकात पहिले आहे व परिवर्तन नाटक सर्वोत्कृष्ट झाले आहे असे प्रथम होते. ते मागाहून रा. गडकऱ्यांमुळे बदलले. परंतु रा. गडकरी हे किती आग्रही असत हे त्यांच्या मते वधूपरीक्षा अगदीच टाकाऊ आहे या एकाच गोष्टीवरून सिद्ध होते.

अशी वस्तुस्थिती असता त्या नाटकांच्या रचनेस द्रव्यभिलाष कारण झाला अशी समजूत करून घेऊन कोणी गैरसमज करून घेतला तर त्यास माझा नाइलाज आहे. जरी अलीकडे माझी सांपत्तिक स्थिती बदलल्यामुळे द्रव्यार्जनाकडे मला लक्ष पुरविले पाहिजे तरी माझ्या उच्च ध्येयापासून मी कधीच च्युत होणार नाही. माझ्या नवीन नाटकात माझी आवडती सामाजिक मते येणार नसल्यामुळे ते लोकप्रिय होण्याचा संभव आहे. पण केवळ टाळ्या मिळविण्याकरिता मी आपल्या नायकास लोकच्छंदानुवर्ती करणार नाही. कलेसंबंधाने माझ्या कल्पना अलीकडे बऱ्याच बदलल्या आहेत. लांब भाषणांपेक्षा आखूड भाषणे आवडू लागली आहेत. अनेक पात्रांचा पसारा माजविण्यापेक्षा थोडीच पात्रे आणणे पसंत पडू लागले आहे. कृत्रिमपणापेक्षा स्वाभाविकपणा आवडू लागला आहे. या कल्पना ज्यांना मान्य नसतील त्यांना माझे नवीन नाटक जरी माझ्या कल्पनेप्रमाणे उतरले तरी पसंत पडणार नाही. पण ते माझ्या कल्पनेप्रमाणे वठवण्याचा मी प्रयत्न करीन याबद्दल आपली खात्री असू द्यावी. हे नाटक लिहितानाही मी कोणतीही नाटकमंडळी समोर ठेविले नाही. पण तसे करणे गौण आहे असे माझे प्रथमपासून मत आहे.

कै. गडकऱ्यांशी मी चांगल्या तऱ्हेने वागत असता त्यांना आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात काही दिवस मजविषयी वैर वाटावे हा दैवदुर्विलास आहे. त्या वैरास माझे वर्तन यत्किंचितही कारण झाले नाही ही मला समाधान मानण्यास जागा आहे. त्यांचे ठायी मजविषयी एका तऱ्हेची ईर्ष्या उत्पन्न झाली होती व तिला जवळच्या तोंडपुज्यांकडून पोषण मिळाले होते. नाटके लिहिण्यात माझी द्रव्यदृष्टी मुळीच नसती तरी सुद्धा ती ईर्ष्या प्रकट झाली नसती असे नाही. कै. गडकरी किंवा इतर स्नेही अथवा जनता पुष्कळदा किती शुल्लक हेतूंनी प्रेरित होते याचा मला आजपर्यंत जो अनुभव आला आहे त्यावरून मी त्यांच्या कलाकडे लक्ष न देता माझ्या ध्येयाकडेच लक्ष द्यावे हे सर्वथा उचित आहे.

मी पैशाच्या मागे लागून नाटककार या दृष्ट्या स्वतःचा मृत्यू घडवून आणिला असे आपण म्हणता. पण मी यशस्वी व लोकप्रिय नाटककार कधीही नव्हतो; व कल्पकता, विनोद वगैरे ज्या गुणांसंबंधी माझ्या पूर्वीच्या नाटकांची कीर्ती आहे ते गुण माझ्या अलीकडील नाटकांतही आढळून येतील. रा. खाडिलकर हे द्रव्याच्या दृष्टीने नाटके लिहीत असताही जीवंत नाटककार आहे. त्यांचे मी अनुकरण करावे असे आपण खास म्हणणार नाही.

असो. या निमित्ताने तरी मला हे सर्व लिहिण्याची संधी मिळाली या बद्दल आनंद वाटतो.

प्रकृती झपाट्याने सुधारत आहे. आज वर्धा येथे बंधूंकडे जात आहे.

तेथील माझा पत्ता :—
D. K. Kolhatkar Esqr.
Additional District & Sessions Judge
क. लो. अ. हे वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

⁕

१५७

जळगाव, वऱ्हाड ९-६-२१

आशीर्वाद विशेष.

तुमची दोन्ही पत्रे पावली. नाटक १-२ दिवसांत मुंबईवैभव छापखान्यात छापून तयार होईल प्रस्तावनेत मी तुमचे आभार मानणार आहे; त्यास तुमची संमति आहे असे मी गृहीत धरितो. निबंधाचे काम इंदुप्रकाशात चालू आहे. पण टाइपाच्या कमतरतेने व आकृती तयार नसल्यामुळे फार दिरंगाईने चालले आहे. मी निघेपर्यंत अर्धा निबंध तरी निघेल की काय याची शंका वाटते. मी पुण्यास मध्यंतरी १-२ दिवसांकरिता गेलो होतो. आता या पुढे जाता येणार नाही. मी येथून जूनच्या १५ व्या तारखेस नागपुर मेलने खामगावास जाण्याकरिता निघेन. मतिविकाराच्या प्रती लवकरच मिळू लागतील. तुमच्या केसरीत पाठविलेल्या पत्राची पोच वाचण्यात आली. पण ते अजून प्रसिद्ध झालेले नाही. गुडघा बरा आहे. पण तो पूर्ववत कधीच होणार नाही असे दिसते. तुम्ही वारंवार आजारी पडता हे पाहून काळजी वाटते. एकदा आजाराच्या मागे लागून त्याचे निर्मूलन करावे. येथे छापण्याच्या कामामुळे पत्रे पाठविण्यास सवड सापडत नाही. वरकड मजकूर ठीक आहे.

कळावे हे आशीर्वाद.

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

जळगाव, वऱ्हाड ता. २५-९-२१

रा. भार्गवराम वरेरकर यांस :—

आपले व रा. रा. लेल्यांचे संयुक्त पत्र काल संध्याकाळी मिळाले.

हल्ली मोगरे, केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, सुमंत, विनायक, टेकाडे, तांबे इत्यादिकांच्या कविता झपाट्याने बाहेर पडत आहेत. अशा संधीत माझी कविता बाहेर आल्यास त्या उत्तम कवींच्या वहात्या गंगेत माझ्यासारख्या क्षुद्र कवीने हात धुवून घेण्यासारखे ते हास्यास्पद दिसेल, मजवर अलीकडे अनेक कारणांमुळे रुष्ट झालेल्या लेखकांकडून माझ्या कवितांवर मनसोक्त टीका होईल असे वाटते. तथापि आपणा उभयतांच्या प्रेमाच्या आग्रहास मान देणे मी. आपले कर्तव्य समजत असल्यामुळे माझी कविता प्रसिद्ध करण्याची आपणांस परवानगी देतो. मात्र प्रस्तावनेत त्या कवितेची विनाकारण स्तुती न करण्याची व उपर्युक्त प्रसिद्ध कवींच्या कवितेशी माझ्या कवितेची तुलना करण्यास अवसर रहाणार नाही अशी खबरदारी जरूर घ्यावी अशी विनंती आहे. दुर्बोध स्थळी टीपा जोडल्यास मात्र माझी हरकत नाही. सोबत माझ्या सर्व कवितांची याद पाठवीत आहे. त्या सर्व आपणांस मुंबईस सहज मिळू शकतील असे वाटते. एखादी न मिळाल्यास मला कळवावे. म्हणजे मी दिवाळीत खामगावास जाईन तेव्हा तेथून ती पाठवून देईन.

माझ्या टीका व इतर गद्यलेख (अर्थात्च विनोदी लेख व गोष्टी वर्ज्य करून) स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याची परवानगी मी दुसऱ्या एका स्नेह्यास दिलेली असल्यामुळे आपणांस देता येत नाही याबद्दल वाईट वाटते. परंतु कुणीकडून तरी माझे लेख प्रसिद्ध व्हावे येवढीच आपली उभयतांची इच्छा असल्यामुळे आपणांस त्याबद्दल वाईट वाटणार नाही अशी खात्री आहे. त्या स्नेह्याकडून ते काम न झाल्यास मात्र मी आपणास परवानगी देऊ शकेन. 'सुदाम्याच्या पोह्यां' ची सुधारून वाढविलेली ३१ लेखांची नवीन आवृत्ती काढण्याचा हक्क हल्ली मी मनोरंजन छापखान्यास देऊन चुकलो आहे. व माझ्या (हल्ली लिहीत असलेली गोष्ट धरून) पाच गोष्टी प्रसिद्ध करण्याची परवानगी माझ्या दुसऱ्या एका स्नेह्यास दिली आहे. त्यांजकडून ती कामे न झाल्यास आपणास कळवीनच.

शिवपावित्र्य जानेवारीत बसविण्यास घेणार हे वाचून संतोष झाला. मी नाताळात मुंबईस बहुधा येईन, तेव्हा सर्व मंडळींच्या भेटी होतील. त्याच वेळी नाटकांतील पदे करून देईन.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

*

रा. रा. पु. रा. लेले यांस:—

आपले ताजा कलम वाचले व रा. वरेरकरांच्या शिळ्या कलमापासून आनंद झाला तितकाच त्यापासूनही झाला.

मला कवितांच्या प्रसिद्धीपासून द्रव्यलाभ व्हावा अशी मुळीच इच्छा नाही. कवितासंग्रहास मागणी मुळीच न राहिल्यामुळे आपले नुकसान होऊ नये येवढीच इच्छा आहे. नुकसान झाल्यास मला कळवावे. मी ते भरून काढण्याचा प्रयत्न करीन.

माझ्या येथील काही स्नेही मंडळीचे असे मत आहे की माझ्या कवितांच्या पुस्तकांत माझ्या नाटकांतील वेचक पदे अर्थासह दिल्यास बरे होईल. या सूचनेचा विचार करावा.

‘शिवपावित्र्य’ नाटक माझ्या सर्व नाटकांत सरस आहे असे माझ्या येथील स्नेह्यांचे मत आहे. आपण त्यांतील प्रवेश उलट क्रमाने ऐकिले व शेवटचा प्रवेश मुळीच ऐकिला नाही. मग आपणास त्याची कशी कल्पना येणार? तथापि आपले मत कळण्याची इच्छा आहे. जरूर कळवावे. माझ्या अत्यंत पक्षपाती स्नेह्यांस जरी रा. केळकरांची प्रस्तावना आवडली नाही तरी मला ती फार आवडली. मी हल्ली येथे एकटाच आहे. प्रकृती उत्तम आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

❈

| नाव | प्रसिद्धीचे ठिकाण | पुस्तक | अंक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ तो दिन | विविधज्ञानविस्तार व मनोरंजन | ४ | २ | १८९७ |
| २ अनुपम सुख | मनोरंजन | ४ | ४ | १८९८-९९ |
| ३ खरी भाऊबीज | ” | ” | ५ | ” |
| ४ तुळशीचे लग्न | ” | ” | ६ | ” |
| ५ छत्रीचे उपकार | ” | ” | ११ | ” |
| ६ भयंकर जागृति | ” | ” | १२ | ” |
| ७ एका स्त्रीची पर्जन्य विषयक कल्पना | ” | ६ | १ | १९००-१ |
| ८ मृत अपत्याचे शेवटचे चुंबन | ” | ११ | २ | ” |
| ९ सुखकर जागृती | ” | ” | ४ | ” |
| १० स्थित्यंतर | ” | ” | ५ | ” |
| ११ विलक्षण न्यायसभा | ” | ” | ७ | ” |
| १२ मृत अपत्याचे स्वप्रदर्शन | विविधज्ञानविस्तार | ३७ | ११ | १९०६ |
| १३ सृष्टिदेवता आणि हृदयदेवता | मनोरंजन | १९ | १ | १९१३ |
| १४ आगगाडी | विविधज्ञान विस्तार | ४४ | १२ | १९१३ |
| १५ अढळपद अथवा अंत्यजाष्टक | वि. ज्ञा. वि. चा काव्यसंग्रह | | | १९२१ |

१५९

जळगाव, वऱ्हाड ता. १८-१-२२

सा. न. वि. वि.

आपले ता. १३-१-२२ चे पत्र परवा संध्याकाळी हाती आले. त्यापूर्वीची दोन्ही पत्रेही योग्य वेळी मिळाली.

आपले दोन तीन महिन्यांपूर्वी जे पत्र आले ते वाचून अत्यंत वाईट वाटले. राग आला नाही. आपली प्रकृती बिघडलेली असल्यामुळे आपली वृत्ती नाजूक बनून गेली होती. अशा स्थितीत आपणास साध्या गोष्टीचाही राग यावा हे स्वाभाविकच होते. माझ्या लिहिण्याच्या पद्धतीतही असा एक दोष आहे की तिने माझा हेतु कुत्सित असल्याबद्दल वाचणाऱ्याचा ग्रह व्हावा. आपली प्रकृती सुधारणे ज्याअर्थी माझ्या हाती नाही त्याअर्थी आपणाशी असलेला पत्रव्यवहार बंद करणे हा एकच मार्ग मला मोकळा होता, व तोच मला स्वीकारावा लागला.

आपण माझा कोणत्याही तऱ्हेचा अपराध केला नसता माझी क्षमा मागत आहात हा आपला थोरपणा आहे. यापुढे आपणाकडून पत्रे आल्यास ती मी आनंदाने वाचीन. पण वर दिलेल्या कारणामुळे आपणास पुन्हा पत्र लिहिण्याचे धाडस मला न झाल्यास रागावू नये हीच माझी आपणास शेवटची विनंती.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

*

१६०

जळगाव, वऱ्हाड ता. १७-६-२६

कृ. सा. न. वि. वि.

आपले ता. १२-६-२६ चे पत्र येथे आले त्या वेळी मी येथे नव्हतो. मी ता. १५-६-२६ रोजी परत आलो त्या वेळी ते मला मिळाले.

आपणांविषयी माझे मत प्रतिकूल आहे ही गोष्ट खरी नाही 'शिवपावित्र्य' नाटकाबद्दल आपण प्रतिकूल मत दिले यावरून माझे आपणांविषयी कलुषित मत होणे कधीच शक्य नाही. माझ्या कृतीबद्दल अनेक स्नेह्यांनी अनेकदा आपली प्रतिकूल मते प्रकट केली आहेत. परंतु माझे त्यांजबद्दल प्रतिकूल मत झाले नाही. मी आपल्या कादंबऱ्या म्हातारचळात लिहिल्या असे मत माझ्या एका स्नेह्याने प्रगट केल्याचे माझ्या कानावर काही दिवसांपूर्वी आले. पण माझे त्याच्याशी पूर्ववतच वर्तन चालू आहे. केवळ मतभेदावरून माझे व इतरांचे संबंध बिघडल्याचे एकही उदाहरण आजपर्यंत घडले नसता आपल्या प्रतिकूल मताने मी बिचकून जाणे अशक्य होय.

आपण आपला अभिप्राय मला ज्या पत्रात कळविला होता त्या पत्रात आपण माझ्या येथील स्नेह्यांबद्दल अनुदार उद्‌गार काढिले होते. त्या उद्‌गारांच्या मुळाशी आपली त्या वेळची नाजूक झालेली प्रकृतीच असावी असे वाटून मी आपणास इतःपर पत्रे पाठवून स्वतःच्या व इतरांच्या मनास त्रास देऊ नये अशी विनंती केली. हल्ली आपली प्रकृती ताळ्यावर येऊन आपण एका उत्कृष्ट साप्ताहिकाचे संपादन करण्यास समर्थ झाला आहात हे वाचून समाधान वाटते. त्या साप्ताहिकाचा वर्गणीदारही मी मोठ्या आनंदाने झालो असतो. पण माझ्या डाव्या डोळ्यात मोतिबिंदू पडल्यामुळे व उजवा डोळा पूर्वीपासूनच अधू असल्यामुळे माझी दृष्टी झपाट्याने क्षीण होऊ लागली होती; व यामुळे मला मजकडे येणारी सर्वच नियतकालिके बंद करावी लागली. Liberator बंद करण्याबद्दल मी दोन पत्रे पाठविली. असे असता व्यवस्थापकाकडून व्ही. पी. स्वीकारण्याबद्दल अगर दोन महिन्यांची वर्गणी पाठविण्याबद्दल पत्र आले तेव्हा मला वर्गणी पाठवावी लागली. मनीऑर्डर व्यवस्थापकांच्या नावाने पाठविण्याबद्दल मी माझ्या तर्फे मनीऑर्डर पाठविण्याऱ्या इसमास साताऱ्यास जाते वेळी सांगितले होते. परत आल्यावर ती आपल्या नावाने पाठविण्यात आल्याबद्दल कळले. आपणास विनाकारण तसदी पडल्याबद्दल मला मनापासून वाईट वाटत आहे. त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो. व्यवस्थापकांस पाठविलेल्या दोन पत्रांचा काही उपयोग झाला नाही. पण आपल्या नावे गेलेल्या मनीऑर्डरीतील कुपनमधील मजकुराचा तात्काळ परिणाम झाला हा त्यातल्या त्यात माझा फायदाही झाला आहे.

क. लो. अ. हे. वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

⁕

## टीपा

### पत्र ३

किर्लोस्कर मंडळीचा ग्रुप फोटो १९०७ सालीं काढला होता. या फोटोचाच हा संदर्भ आहे. या फोटोंतील खुर्चीवरील रांगेमध्ये डावीकडून दुसरे गणपतराव बोडस, चवथे शंकरराव मुजुमदार, सहावे नानासाहेब जोगळेकर, सातवे बालगंधर्व, आठवे चिंतूबुवा दिवेकर, आणि दहावे राम गणेश गडकरी. मुजुमदार आणि नानासाहेब जोगळेकर यांच्यामध्ये असलेले (डावीकडून पाचवे) रामभाऊ किंजवडेकर होत.

महादेवशास्त्री कोल्हटकर— रावसाहेब महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर. पूर्वाध्ययन परंपरागत पाठशाला पद्धतीने झालें. कँडीसाहेबांच्या प्रेरणेने इंग्रजी अध्ययन करून इंग्रजींत फार मोठें प्रावीण्य संपादन केलें. शिक्षण खात्यांत नोकरी करून डेप्युटी एजुकेशनल इन्स्पेक्टर झाले. फरडे वक्ते होते. शेक्स्पियरच्या ऑथेल्लो नाटकाचे मराठी भाषांतर केलें. ते त्यांच्या मृत्यूनंतर १८६७ सालीं छापलें गेलें. पुढे (१८७९) आर्योद्धारक मंडळी या नाटकाचे प्रयोग करीत असे. 'वेणीसंहार', 'तारा', 'ऑथेल्लो', आणि 'किंग लियर', ('अतिपीडचरित') अशीं चार नाटकें या मंडळीने बसवलीं. ऑथेल्लो नाटकांत विख्यात नाटककार गो. ब. देवल ऑथेल्लोची, आणि शंकरराव पाटकर इयागोची भूमिका करीत असत.

आपण ज्याला 'नाटक' म्हणतो त्याला १८६० पूर्वी 'खेळ' म्हणत असत. नाटक हा शब्द महादेवशास्त्री कोल्हटरांनीच प्रथम प्रचारांत आणला असें कृष्णाजी आबाजी गुरुजी म्हणतात. 'फर्डा लेखक व रंगेल वक्ता' असें गुरुजींनी शास्त्रीबुवांचें वर्णन केलें आहे.

विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा उल्लेख या पत्रात 'माझे परम मित्र' असा केला आहे. कोल्हटकर आणि गुर्जर यांच्यामध्ये पुढे कमालीचें वितुष्ट आलें.

## पत्र ४

केशवराव भोसले (जन्म ९ ऑगस्ट १८९०). अगदी लहान असतांना (चार वर्षांचे असतांना) त्यांच्या आईने त्यांना 'स्वदेशहितचिंतक मंडळी' त घातले ही मंडळी जनूभाऊ निमकरांनी १८९४ सालीं सुरू केली. 'मूकनायक' नाटकांत केशवराव सरोजिनीचें काम करीत असत. १९०८ सालीं केशवरावांनी स्वतःची 'ललितकलादर्श' मंडळी काढली.

गोपाळराव मराठे— गोपाळ अनंत मराठे. जन्म शके १७९४ (सन १८७२). 'नाट्यकलाप्रवर्तक' मंडळींतील प्रसिद्ध गायक नट. प्रथम हे किर्लोस्कर मंडळींत होते. नंतर 'वाशीमकर संगीत मंडळीं' त होते. प्रसिद्ध नट चिंतूबुवा दिवेकर (गुरव) किर्लोस्कर मंडळींत येण्यापूर्वी याच 'वाशीमकर मंडळीं' त होते. गोपाळराव मराठे, महादेव विष्णु केळकर, वासुदेव सदाशिव पटवर्धन यांनी वाशीमकर मंडळींतून फुटून स्वतःची 'नाट्यकलाप्रवर्तक' मंडळी काढली. गोपाळराव मराठे सुरवातीला 'विकल्पविमोचन', 'समानशासन' (शेक्सपियरच्या 'मेझर फॉर मेझर' या नाटकाचें रूपांतर), 'तारा' इत्यादि नाटकांत नायिकेची भूमिका करीत असत. गायन आणि अभिनय या दोन्ही दृष्टींनी गोपाळराव मराठ्यांची योग्यता मोठी होती. 'रामराज्यवियोगांत' ते मंथरेची भूमिका करीत. कालांतराने ते नायकाच्या भूमिका करू लागले.

नाट्यकलाप्रवर्तक मंडळीने १९११ च्या सप्टेंबर मध्ये हरीभाऊ आपटे यांचे 'संत सखूबाई' हें नाटक केलें. या नाटकाच्या ३० सप्टेंबरच्या प्रयोगांत विठ्ठलाची भूमिका करणारे मास्टर कृष्णराव (फुलंब्रीकर) यांना तात्यासाहेब केळकर यांच्या हस्तें घड्याळ बक्षीस देण्यांत आलें. याच कंपनींत रामभाऊ कुंदगोळकर १९०९ मध्ये दाखल झाल्यावर कंपनी सौभद्राचे प्रयोग करू लागली. रामभाऊ 'सवाई गंधर्व' या बिरुदाने गाजले. १९१३ मध्ये रामभाऊंनी 'नाट्यकलाप्रवर्तक मंडळी' सोडून दिली.

## पत्र ५

देवलांना पत्र पाठविण्याची सूचना या पत्रांत कोल्हटकरांनी लेल्यांना केली आहे. लेल्यांनी याप्रमाणें देवलांना काही महिन्यानंतर पत्र लिहिलें. नक्की केव्हा लिहिलें तें सांगतां येत नाही. पण ४ सप्टेंबर १९०९ रोजीं देवलांनी लेल्यांना कार्ड लिहिलें असा उल्लेख लेल्यांच्या डायरींत आहे. याच कार्डाचा उल्लेख कोल्हटकरांनी पत्र क्रमांक २२ मध्ये केला आहे. (पृ. २२)

गोपाळराव मराठ्यांचा 'इतके वयातीत' असा या पत्रात उल्लेख आहे. मराठ्यांचें वय या वेळीं फक्त ३७ होतें.

स्वदेशहितचिंतक मंडळी — वर पत्र ४ वरील टीप पाहा. जनूभाऊ निमकरांची ही कंपनी 'बाजीराव मस्तानी' नाटक करीत असे. जनूभाऊ मस्तानीचें काम करीत आणि स. ग. प्रधान (बाबड्या प्रधान) बाजीरावाची भूमिका करीत. वरेरकरांचें 'कुंजविहारी' नाटक याच कंपनीने रंगभूमीवर आणलें. या एकाच नाटकावर १९१० सालीं कंपनीने मुंबईचा मुक्काम गाजवला. गुजराथी प्रेक्षकांना याच कंपनीने मराठी रंगभूमीकडे खेचून आणलें. संस्कृत शाकुंतलाचा प्रयोग या कंपनीने केला व बक्षीस मिळवलें. विष्णूपंत

पागनीस याच कंपनींत प्रसिद्धीस आले. 'कुंजविहारीं' तील त्यांचें राधेचें काम अप्रतिम होत असे आणि ते पाहावयास गुजराथी प्रेक्षक मोठ्या संख्येने येत असत.

**पत्र ८**

'उदारदामोदर' (भक्त दामाजी) १८८३, लेखक सीताराम बाबाजी गुर्जर. 'विविधज्ञानविस्तार' एप्रिल १८८३ च्या अंकांत या नाटकाचें परीक्षण आलें आहे.

वीररस व हास्यरस—वीराची अद्‌भुताशीं मैत्री असते, व शृंगाराची हास्याशीं मैत्री असते.

**पत्र ९**

आर्योद्धारक नाटकमंडळी १८७९ मध्ये निघाली. नाट्यकला सुधारून समाजाच्या अभिरुचीला चांगलें वळण लावावयाचें, आणि पैसे मिळवून सार्वजनिक कामास मदत करावयाची हीं दोन उद्दिष्टें समोर ठेवून सुशिक्षितांनी ही मंडळी सुरू केली. नामजोशी, कोंडोपंत छत्रे, धारप इत्यादि प्रतिष्ठित गृहस्थांचा या मंडळीस पाठिंबा होता. देवल आणि शंकरराव पाटकर हे या कंपनीतींल प्रसिद्ध नट. पत्र ३ वरील टीप पाहा. या कंपनीचा 'ऑथेल्लो' चा प्रयोग अप्रतिम होत असे. 'सिंबेलीन' या शेक्सपियरच्या नाटकाचें रा. बा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनी 'तारा' या नावाने रूपांतर केलें. या नाटकाचा प्रयोग आर्योद्धारक मंडळी करीत असे. १४ मे १८८१ रोजीं या नाटकाचा प्रयोग पुणें येथील पूर्णानंद नाटकगृहांत झाला. मुळांत हें नाटक गद्य होतें. पण १८९९ मध्ये 'नाट्यकथार्णव' कर्ते शंकर मोरो रानडे यांनी 'श्री करुणेश प्रासादिक नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळी' साठी पदे करून दिलीं. एकूण पदें १५६ आहेत.

गोविंद बल्लाळ देवल—१८५५–१९१६. शंकरराव आत्माराम पाटकर १८५८–१९१५

वासुदेव नारायण डोंगरे— अण्णासाहेब किर्लोस्करांचें अनुकरण करून १८८१ सालीं डोंगरे यांनी 'बॉंबे रॉयल ऑपेरा कंपनी' या नावाची कंपनी काढली. 'डोंगरे संगीत मंडळी' या नावानेही ही कंपनी प्रसिद्ध होती. डोंगरे यांची कंपनी शाकुंतल (एप्रिल १८८२) वेणीसंहार, मालतीमाधव, मृच्छकटिक, इंद्रसभा, रत्नावली इत्यादि नाटकें करीत असे. विशेष म्हणजे या नाटकांच्या जोडीला स्वतः डोंगरे यांनी रचलेलें 'रंगी नायकीण' हे प्रहसनही ही मंडळी करीत असे. या मंडळीचा संसार १८८१-१८९० या दहा वर्षांतच आटोपला. नारायणबुवा मिरजकर, नथूबुवा गूरव, वासुदेवराव बापट, परशुरामबुवा बर्वे हे या कंपनीलील गाजलेले नट. वासुदेवराव डोंगरे १९०५ सालीं वारले. "रा. वासुदेव नारायण डोंगरे यांची एक नाटकमंडळी किर्लोस्कर मंडळीच्या आधीच्या अमदानींत होती" हें कोल्हटकरांचें विधान प्रामादिक आहे. डोंगरे संगीत मंडळी १८८१ सालीं स्थापन झाली.

पुरुषोत्तम भास्कर डोंगरे— चंद्रहास, चंद्रसेना, जरठोद्धाह, भीमसिंग आणि पद्‌मिनी या नाटकांचे कर्ते. पहिलीं दोन नाटकें संगीत असून उरलेलीं दोन नाटकें गद्य आहेत. 'चंद्रसेना' नाटक 'स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी' करीत असे. 'चंद्रहास' नाटक किर्लोस्कर मंडळीने रंगभूमीवर आणलें. या नाटकांत गणपतराव बोडस दुष्टबुद्धीचा मुलगा मदन याची भूमिका करीत असत. मृत्यु १५ डिसेंबर १९०८.

"मतिविकाराचा नायक निःसंशय मनोहर व नायिका सरस्वती आहे" हें कोल्हटकरांना स्पष्टपणें सांगावें लागलें याला कारण आहे. गुप्तमंजूष, मतिविकारा, व प्रेमशोधन या नाटकांमधील नायकनायिका कोण? असा प्रश्न तत्कालीन टीकाकारांना पडला होता. १९११ नोव्हेंबरच्या 'रंगभूमी' च्या अंकांत 'कवि व टीकाकार' या शीर्षकाचा पु. रा. लेले यांच्या एक विस्तृत लेख आहे. या लेखांतील पुढील वाक्य पाहा. "जुन्या नियमांप्रमाणें पाहिलें तर गुप्तमंजूष, मतिविकार, व प्रेमशोधन या नाटकांतील नायकनायिका कोण हें ठरविणें कठीण आहे."

पत्र क्रमांक १० मध्ये कोल्हटकरांनी पुन्हा 'मतिविकार' आणि 'गुप्तमंजूष' या नाटकांतील नायकनायिकांची चर्चा केली आहे. कोणत्याही नाटकांतील नायक कोण, आणि नायिका कोण, असा संभ्रम टीकाकारांस पडावा हा प्रकार विलक्षण आहे!

**पत्र १०**

कोल्हटकरांच्या 'गुप्तमंजूष' नाटकांत पहिला अंक आणि शेवटचा अंक यांच्या मध्ये सहा वर्षांचा अवधी लोटला आहे, आणि यामुळे प्रयोगाच्या वेळीं रसभंग होतो अशी तक्रार तात्यासाहेब केळकरांनी सप्टेंबर-ऑक्टोबर १९०७ च्या 'रंगभूमि' मासिकांत 'नाटकविषयासंबंधाने दोन शब्द' या लेखांत केली आहे.

शाकुन्तलाच्या चवथ्या अंकांतील दोन प्रवेशांमधील अंतरासंबंधी कोल्हटकरांचा मुद्दा अगदी गैरलागू आहे.

कोल्हटकरांची सौभद्रावरील टीका १९०३ सालीं विविध ज्ञानविस्तारांत (पु. ३४, अंक ८–९) प्रसिद्ध झाली.

**पत्र १३**

बेळगावकर स्त्रीनाटक मंडळी—एकंबा (व्यंकम्मा) नावाच्या कलावंतिणीने स्थापन केली. स्त्रियाच पुरुषभूमिका करीत. नेवाळकरांचें 'दंडधारी' नाटक या कंपनीच्या रंगभूमीवर फार लोकप्रिय होतें. दंडधारीचे नेपथ्य अगदी थेट लो. टिळकांचा भास निर्माण करीत असे. दंडधारीची भूमिका व्यंकम्मा करीत असे. दंडधारी नाटकावर पुढे सरकारने बंदी घातली. सदर स्त्रीनाटक मंडळी 'श्रीकृष्णलीला' हें नाटक करीत असे. या नाटकांत व्यंकम्मा बेळगावकरीण कंसाची भूमिका करीत असे. फेब्रुवारी १९०८ च्या 'रंगभूमी' च्या अंकांत 'सुविचारविजय' नाटकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने 'दंडधारी' नाटकाच्या अफाट लोकप्रियतेविषयीं संपादक म्हणतात— "आणखी एक उदाहरण द्यावयाचें म्हटल्यास नुकतेंच पुण्यासारख्या मार्मिकतेविषयीं प्रख्यात असलेल्या शहरांतही लोकांच्या झुंडीच्या झुंडी नाटकगृहाकडे ओढून आणणारें दंडधारी नाटक होय."

**पत्र १६**

वन्समोअर—मूकनायकांतील "काही काही पद्यांस पाच-पाच सात-सात वेळा वन्समोअरें झाली" असें कोल्हटकर म्हणतात. पदाला वन्समोअर मिळणें हे गायक नटाच्या लोकप्रियतेचें आणि आकर्षक

चालीचें निर्विवाद गमक त्या काळीं असे. स्वतः कोल्हटकरांनाही असेंच वाटत असलें पाहिजे हें पत्र ३९ वरून दिसून येईल. "बालगंधर्वांनी मला ज्या काही चाली दिल्या त्यांवरच त्यांची काही पदे झालेली आहेत. असे असता व त्यांचा आवाज फार सुंदर असता त्यांना बेताचीच वन्समोअरे मिळतात याचे कारण जितक्या उत्साहाने पदे म्हणण्यात यावीत तितक्या उत्साहाने म्हटली जात नाहीत हे असावे." (पृ. ३९. तसेंच पत्र ४२ पाहा.) दत्तोपंत हल्याळकरांच्या काही पदांना सात आठ वेळा वन्समोअर मिळत असे असे वि. ना. कोठीवाले यांनी नमूद करून ठेवलें आहे. ('स्वराज्य', ३० नोव्हेंबर १९६३). इतर अनेक संगीत नटांच्या अशाच चमत्कारिक आख्यायिका प्रचलित आहेत.

पण कोल्हटकरांच्या काळीं सुद्धा (१९०७–१९०८) वन्स मोअरच्या अतिरेकी प्रकारावर प्रतिष्ठित रसिक नाराज असत. 'रंगभूमि' वर्ष १, अंक ८-९ मध्ये 'नाटकाची घटना' या मथळ्याचा एक निनावी लेख आहे. सदर निनावी लेखक म्हणतो– "हें उघडच आहे की 'वन्समोअर' च्या आरोळ्यांनी दहा-दहा वेळा म्हटलीं जाणारीं पदें निराळ्याच मासल्याचीं आहेत! तीं केवळ प्राकृत अभिरुचीच्या समाधानासाठीच असतात. नाट्यकलेची सुधारणा होण्यासाठी 'वन्समोअर' ची वहिवाट अगदी नामशेष करणें अत्यंत आवश्यक आहे. या प्रकारामुळे उगीच कालक्षेप होतो, इतकेंच नाही तर रसभंगही होतो!"

धोंडशास्त्री ज्योतिषी—कोल्हटकर आत्मवृत्त (दुसरी आवृत्ति), पृ. ४४ पाहा.

**पत्र १७**

हल्याळकर — दत्तोपंत हल्याळकरांच्या कंपनीचे नाव 'महालक्ष्मी प्रासादिक संगीत मंडळी'. या कंपनींतून दत्तोपंत १९१३ मध्ये बाहेर पडले आणि त्यांनी 'श्री लक्ष्मीकांत प्रासादिक संगीत मंडळी' काढली.

**पत्र १८**

किर्लोस्कर थिएटरचें उद्घाटन २१ ऑगस्ट १९०९ रोजीं झालें. नवीन नाटकगृह उघडण्याच्या समारंभाची तारीख १५-२० दिवस अगाऊ कळविण्याची सूचना कोल्हटकरांनी शंकरराव मुजुमदारांना १९०९ जुलैच्या मध्यास केली होती. (पत्र १५ पाहा.) असें असतां समारंभाची निमंत्रणपत्रिका कोल्हटकरांना १९ ऑगस्ट रोजीं, म्हणजे समारंभाच्या अगोदर फक्त दोन दिवस मिळाली. वेळ फारच थोडा असल्यामुळे कोल्हटकरांना पुण्यास समारंभासाठी जातां आलें नाही. किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापकांनी (मुजुमदारांनी) कोल्हटकरांसारख्या मंडळीच्या नाटककाराचा मान राखावयास हवा होता हें उघड आहे. नाटकमंडळ्यांच्या 'प्रत्यक्ष अनुभवा' चा उल्लेख कोल्हटकरांनी या पत्रांत केला आहे. किर्लोस्कर मंडळीकडून मिळालेल्या वाईट वागणुकीचे उल्लेख कोल्हटकरांच्या आत्मवृत्तांत आहेत. (आत्मवृत्त पृ. १४, १७, २१, ३०, ३४, ४७ पाहा.)

### पत्र १९

सामाजिक मंडळी — सांगलीचे वकील केशव रामचंद्र छापखाने यांनी ही मंडळी सुरू केली. पुणे येथे १९-२० मे १९१३ रोजीं झालेल्या नवव्या नाट्यसंमेलनाचे छापखाने अध्यक्ष होते. रामभाऊ गोखले, नानवा गोखले, आबा लिमये, सुपेकर, अंतू लिमये, विनायक कानिटकर हे सामाजिक नाटक मंडळींतील प्रमुख नट. विनायक कानिटकर नायिकेच्या भूमिका करीत असे. शेक्स्पियरच्या 'रोमिओ अँण्ड जुलिअट' या नाटकाच्या आधाराने छापखाने वकिलांनी रचलेल्या 'मोहनतारा' या नाटकाचे प्रयोग सामाजिक मंडळी करीत असे. शंकरराव पाटकर काही दिवस या कंपनीत तालीम मास्तर होते. १९१२ सालीं सदर कंपनी बंद पडली. 'रंगभूमी' च्या मार्च-एप्रिल १९०९ च्या अंकात 'मोहनतारा' नाटकावर विस्तृत परीक्षण आले आहे.

"मालतीमाधवात व उत्तरमचरितात रमणीस्पर्शाने रमण सावध झाल्याचे जे प्रसंग भवभूतीने घातले आहेत तसे कालिदासाने घातलेले आठवत नाहीत" असें पत्र १९ मध्ये कोल्हटकर म्हणतात. अगदी असाच प्रसंग कालिदासाच्या नाटकात नाही हें खरें असले तरी एतत्सदृश प्रसंग 'विक्रमोर्वशीय' नाटकाच्या चवथ्या अंकांत आहे. ज्या लतेमध्ये ऊर्वशीचें रूपान्तर झालेलें असतें, त्या लतेला आलिंगन देतांच राजाला ऊर्वशीच्या स्पर्शाची संवेदना होते, आणि सुखातिरेकाने तो बेभान होतो, आणि डोळे मिटून घेतो.

### पत्र २०

"पेटी तबला रिझर्व खुर्च्यांच्या पुढे ठेवितात ही योजना चांगली नाही. ती मागेपुढे मंडळीस काढून टाकावी लागेल" असें कोल्हटकर म्हणतात.

शाकुंतलाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळी (१८८०) दोन बाजूंच्या विंगमध्ये प्रत्येकी एक तंबोरा असे. १८८३ नंतर केव्हा तरी पायपेटी साथीसाठी आली. पण ही पायपेटी आताप्रमाणे रंगभूमि व प्रेक्षक यांच्यामध्ये नसून विंगमध्येच असे. १९०० च्या सुमारास दोन्ही विंगांमध्ये पायपेट्या आल्या असे बाबूराव जोशी म्हणतात. तबलजी स्टेजच्या डाव्या बाजूला बसत असे. तबलापेटी रंगभूमीच्या पुढे केव्हा आली ते सांगतां येत नाही. १९०० नंतर केव्हा तरी हा प्रकार सुरू झाला, आणि कोल्हटकरांच्या अपेक्षेप्रमाणे तो बंद न पडतां आज तागायत अव्याहत चालू आहे.

### पत्र २२

देवलांनी पु. रा. लेले यांना लिहिलेल्या ज्या पत्राचा येथे उल्लेख आहे ते पत्र (कार्ड) लेल्यांना ४-९-१९०९ रोजीं मिळालें. देवलांच्या कार्डांतील मजकूर समजावून घेण्यासाठी कोल्हटकर किती उत्सुक होते हें पाहण्यासारखें आहे.

### पत्र २३

पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांनी 'सौभद्र' नाटक लिहिल्याचा उल्लेख मला आढळला नाही.

रुक्कुठारावर प्रतिटीका— ठोसरांनी कोल्हटकरांच्या 'गुप्तमंजूष' नाटकावर तीव्र उपहासाने भरलेली टीका 'नाट्यकलारुक्कुठार' या नावाने लिहिली होती. कोल्हटकरांची तरफदारी करून ठोसरांना उत्तर देणारा एक लेख 'नाट्यकलारुक्कुठार—लीलावती नाटक' या शीर्षकाने 'रंगभूमी' त आला होता. पण कोल्हटकर ज्या टीकेचा उल्लेख करतात ती टीका ही नाही एवढें खरें. २६ सप्टेंबर १९१० च्या संध्याकाळच्या 'इंदू' मध्ये 'A critic in a Poet's Role' या शीर्षकाचें एक पत्र आलें. या पत्रांत लेखकाने ठोसरांच्या लीलावती नाटकावर खूप कडक टीका केली आहे आणि कोल्हटकरांची भरपूर तरफदारी केली आहे. पण कोल्हटकरांच्या २३ क्रमांकाच्या पत्राची तारीख ६-१०-१९०९ आहे. यावरून ठाकऱ्यांची 'रुक्कुठारा'– वरील प्रतिटीका यापूर्वी काही महिने आली असली पाहिजे. ठाकऱ्यांची ही प्रतिटीका प्रयत्न करूनही मला उपलब्ध झाली नाही.

बापटांचा निबंध- 'नाटकविषयक व्यापक विचार' या लेखनमालेंतील लेख.

**पत्र २६**

गडकऱ्यांचे 'प्रल्हादचरित्र'—हा उल्लेख 'गर्वनिर्वाण' नाटकाला उद्देशून आहे.

**पत्र २७**

'आज गडकऱ्यांचे नाटक बहुतेक वाचिले' हा उल्लेख 'गर्वनिर्वाण' नाटकाचा आहे.

**पत्र २८**

'गर्वनिर्वाणा' चा उल्लेख याही पत्रांत पुन्हा 'प्रल्हादचरित्र' असाच केला आहे.

'गर्वनिर्वाण' नाटकाच्या निर्मितीच्या वेळचा थोडासा इतिहास केशवराव दाते यांनी दिला आहे. "आरंभीं पाच वर्षे ते (गडकरी) किर्लोस्कर मंडळींत मास्तर म्हणून होते. तेथे असताना त्यांनी 'गर्वनिर्वाण' नावाचें नाटकही लिहिलें होतें. पण त्यांच्या त्या वेळच्या अगदी जिवलग स्नेह्यांवाचून त्यांची खरी पारख फारशी कोणासच झाली नाही. इतकेंच नव्हे तर काही काही मंडळी त्यांची त्या वेळी चेष्टाच करीत असल्याचें खुद्द गडकरी मास्तरांनी अगदी चिडून जाऊन महाराष्ट्र मंडळींत सांगितलें आहे." ('मौज' ९ सप्टेंबर १९२५) 'गर्वनिर्वाण' नाटकाची जॅक्सनच्या खुनानंतर इतिश्री झाली. कोल्हटकरांची व गडकऱ्यांची जी पहिली भेट झाली तिची हकीकत सांगतांना आत्मवृत्तांत (पृ. ५६) कोल्हटकर म्हणतात– "परंतु माझी त्यांची दृष्टादृष्ट मी बार्शीला जाईपर्यंत झाली नाही. त्या सुमारास त्यांना काही कारणामुळे वैराग्य उत्पन्न झाले असून ते वेडे होण्याच्या मार्गास लागले होते." गडकऱ्यांच्या या विचित्र मनःस्थितीचे थोडेसें स्पष्टीकरण केशवराव दात्यांच्या वर उद्‌धृत केलेल्या वचनांत मिळेल काय?

## पत्र २९

लेले यांची 'मालविकाग्निमित्र' या कालिदासाच्या नाटकावरील टीका 'रंगभूमि' च्या सप्टेंबर ऑक्टोबर १९०९ मध्ये आली आहे. या टीकेचा उल्लेख या पत्रांत आहे. २०-२-१० च्या पत्र क्रमांक ३० वरून हें स्पष्ट होईल. लेले यांचा हा निबंध बत्तीस पृष्ठांचा आहे. सर्व निबंध अतिशय प्रौढ व मार्मिक आहे. संशोधनात्मक लेखनाचा आणि आस्वादक टीकेचा हा उत्कृष्ट नमुना आहे. असें असतां कोल्हटकरांनी त्याची दोन-तीन वाक्यांतच बोळवण करावी हे जरा चमत्कारिक आहे

## पत्र ३०

"गडकरी व किर्लोस्कर मंडळी यांमध्ये चांगलेच वितुष्ट पडले असून ते त्या कंपनीतून कायमचे निघून गेले आहेत" असें या पत्रांत कोल्हटकरांनी लिहिलें आहे. हें पत्र २२-४-१० चें आहे. गणपतराव बोडस यांच्या 'माझी भूमिका' (पहिली आवृत्ति, पृ १७२) या पुस्तकांत पुढील उल्लेख आहे— "चिडवा-चिडवीचें प्रकरण विकोपाला जाऊन त्या भरांत कंपनी सोडून गडकरी गेले आणि त्यामुळे गर्वनिर्वाण मागे पडलें तें कायमचेंच."

## पत्र ३१

'प्रेमशोधन' या नाटकाच्या नावाचें स्पष्टीकरण कोल्हटकरांना २२-४-१० च्या या पत्रांत करावें लागलें आहे. नावाचा नेमका अर्थ कळत नाही असा आक्षेप कोणी तरी तेव्हा घेतला असला पाहिजे. नाटक रंगभूमीवर आल्यावर रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर यांनी नाटकावर कडक टीका करणारा लेख १८-११-१९१० च्या ज्ञानप्रकाशांत लिहिला. या लेखांत प्रेमशोधन शब्दाचा नेमका अर्थ कळत नाही अशी तक्रार केली. कानिटकरांच्या टीकेला लेल्यांनी जानेवारी १९११ च्या 'रंगभूमी' च्या अंकांत जें उत्तर दिलें आहे त्यांत प्रेमशोधन या नावाचें स्पष्टीकरण केलें आहे.

## पत्र ३२

पंढरपूरकर बुवा— गंधर्व नाटक मंडळीत १९१८ पासून नायकाची भूमिका करूं लागले. 'स्वयंवर' नाटकांतील भीष्मक, आणि 'एकच प्याला' नाटकांतील रामलाल या त्यांच्या भूमिका गाजल्या. 'संशयकल्लोळां' त ते अश्विनशेटची व 'मृच्छकटिक' नाटकांत चारुदत्ताची भूमिका करीत. कोल्हटकरांनी ज्यांचा उल्लेख या पत्रांत केला आहे त्या पंढरपूरकर हरदासांचे हे चिरंजीव.

## पत्र ३३

'प्रेमशोधन' नाटकाचा पहिला प्रयोग २५ जून १९१० रोजीं झाला.

## पत्र ३४

बापटांचा निबंध— 'नाटकविषयक व्यापक विचार' या रा. सा. गोपाळ वामन बापट (डिस्ट्रिक्ट जज्ज, नरसिंगपूर, सी. पी.) यांच्या रंगभूमींतील लेखमालेचें पुस्तक १९१० च्या मे महिन्यांत किर्लोस्कर मंडळीने प्रसिद्ध केलें. बापटांच्या या पुस्तकाला कोल्हटकरांची चार पानांची प्रस्तावना आहे. मे १९१० असा कालोल्लेख प्रस्तावनेच्या शेवटीं आहे. सदर प्रस्तावना अगदी त्रोटक आहे.

## पत्र ३६

प्रेमशोधनाची पद्यावली— पदें दुर्बोध व क्लिष्ट असल्यामुळे पद्यावलीचा आग्रह लोकांनी धरला. पत्र ५३ पाहा. "लोकांची पद्यावलीबद्दल इतकी ओरड आहे, की मला ती छापवावी लागणार असे दिसते."

## पत्र ३९

प्रेमशोधनांतील चालींविषयीं सुद्धा लोकांनी वर्तमानपत्रातून ओरड केली असली पाहिजे असें दिसतें.

चिंतोबा - चिंतूबुवा दिवेकर (गुरव), १९४३ पासून गाजलेले 'शारदा' नाटकांतील श्रीमंत.

रामभाऊ - रामभाऊ किंजवडेकर.

## पत्र ४९

रा. ब. गणेश कृष्ण आगाशे यांची 'मतिविकार' नाटकावरील टीका 'रंगभूमी' च्या सप्टेंबर १९०८ च्या अंकांत आली होती.

'प्रेमशोधन' नाटकावरील रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर यांची टीका १८-११-१९१० च्या ज्ञानप्रकाशांत आली. या टीकेला उत्तर देणारी टीका 'विमला' या सहीने २५-११-१९१० च्या ज्ञानप्रकाशांत आली. पण याच्याही पूर्वी प्रेमशोधनावर विरोधी टीका येऊन गेल्या होत्या.

प्रेमशोधनाचा पहिला प्रयोग २५-६-१९१० रोजीं झाला. यानंतर लगेच १२ जुलै १९१० च्या इंदुप्रकाशांत पहिली प्रतिकूल टीका आली. पाठोपाठ चित्रमयजगत् मध्येही प्रतिकूल टीका आली २३ सप्टेंबर १९१० च्या 'इंदू' च्या ('इंदु' हें इंदुप्रकाशाचें संध्याकाळीं प्रसिद्ध होणारें इंग्रजी भावंड.) अंकांत Spectator हें नाव धारण केलेल्या लेखकाने 'नाट्यकलारुक्कुठार' कर्ते ठोसर यांच्या 'लीलावती' नावाच्या नाटकाची स्तुती करणारें एक पत्र लिहिलें होतें. या पत्रात 'लीलावती' ची स्तुती करतांना लेखकाने कोल्हटकरांच्या प्रेमशोधनावर कुत्सित टीका केली होती.

प्रेमशोधनावरील या कुत्सित टीकेला खरमरीत उत्तर देणारें एक इंग्रजी पत्र 'इंदू' च्या २६ सप्टेंबर १९१० च्या अंकांत प्रसिद्ध झालें. या पत्राच्या खाली Fairplay अशी सही असून १८ सप्टेंबर १९१० ही तारीख आहे.

कोल्हटकरांची तरफदारी करणाऱ्या या पत्रावर 'इंदू' च्या संपादकाने विस्तृत भाष्य केलें व कोल्हटकरांवर खरमरीत टीका केली. कोल्हटकरांच्या नाटकाचीं कथानकें अतिशय गुंतागुंतीचीं असतात, त्यांत कालविपर्यास भरपूर असतो, कविताही फार दुर्बोध असते असे संपादकाचे आक्षेप आहेत. शाकुंतल, सौभद्र, शापसंभ्रम, आणि शारदा अशा नाटकांवरून किर्लोस्कर मंडळी वीरतनय आणि गुप्तमंजूष यांच्यासारख्या नाटकांच्या हीन पातळीवर यावी याविषयीं संपादकाने खंत व्यक्त केली आहे. गुजराती व पारशी नाटकांतील चाली येऊन खानदानी नाट्यसंगीताची कोल्हटकरांनी रया घालवली अशी तक्रार करून संपादकाने ठोसरांनी 'नाट्यकलारुक्कुठारा' मध्ये गुप्तमंजूष नाटकावर केलेल्या कुत्सित टीकेचें समर्थन केलें आहे.

रा. ब. ग. कृ. आगाशे यांनी 'मतिविकार' नाटकाचें परीक्षण करतांना 'रंगभूमी' च्या सप्टेंबर १९०८ च्या अंकामध्ये कोल्हटकरांच्या नाटकांतील वर उल्लेखिलेल्या दोषांवर अशीच कडक टीका केली आहे. इतकेंच नव्हे तर 'नाट्यकलारुक्कुठारां' तील टीकेचें थोडेफार समर्थनच केलें आहे. "वीरतनय नाटकाच्या वेळींच या दोषासंबंधाने नेहमी चर्चा झालेली आमच्या कानावर आलेली आहे. पण त्या चर्चेचा त्यांच्या मनावर काही परिणाम झालेला दिसत नाही. गुप्तमंजूषावरील टीका झणझणीत मात्रा म्हणून पुणेकर दोघा अश्विनीकुमारांनी दिलेली आहे. तिचा काय परिणाम होतो तो पहाणें आहे," असें रा. ब. आगाशे यांनी म्हटलें आहे. गुप्तमंजूषावरील ही टीका म्हणजे नाट्यकलारुक्कुठारांतील टीका. पुणेकर दोघे अश्विनीकुमार म्हणजे ठोसर आणि मराठे (ग. स. मराठे, ॲक्च्युअरी) हें लेखकद्वय.

कोल्हटकरांच्या नाटकांतील दोषांवर झालेल्या टीकेचें खंडन करून कोल्हटकरांची तरफदारी करण्यासाठी Fairplay नावाचा लेखक 'इंदू' चा आधार घेऊन धावत आला. त्याचप्रमाणें पु. रा. लेलेही कोल्हटकरांच्या मदतीला धावून आले. लेल्यांनी 'रंगभूमी' च्या जानेवारी १९११ च्या अंकांत रा. सा. कानिटकरांच्या टीकेला दिलेल्या उत्तराचा मागे उल्लेख आलाच आहे.

**पत्र ५०**

कानिटकरांच्या टीकेवरील लेल्यांची प्रतिटीका चांगली असल्याबद्दल कोल्हटकरांनी या पत्रांत लिहिलें आहे. लेल्यांच्या या प्रतिटीकेचा उल्लेख वर केला आहे. रा. सा. कानिटकरांनी प्रेमशोधनावर घेतलेल्या सर्व आक्षेपांचें खंडन लेल्यांनी या प्रतिटीकेंत केलें आहे व आपल्या गुरूचें ऋण फेडलें आहे.

लेल्यांची प्रतिटीका येण्यापूर्वी २५-११-१९१० च्या ज्ञानप्रकाशांत 'विमला' (सौ. मथुराबाई द्रविड) या नावाने आलेल्या टीकेमध्ये रा. सा. कानिटकरांना यथोचित उत्तर मिळालें होतें. पण लेल्यांची टीका सुरवातीपासूनच फार कडक आहे. सदर लेख प्रथम ज्ञानप्रकाशाकडे आणि नंतर रंगभूमीकडे पाठविण्यापूर्वी लेल्यांनी तो कोल्हटकरांकडे पाठविला होता. याला पुरावा ४-१२-१० च्या ५० क्रमांकाच्या पत्रांतच आहे. "रा. सा. कानिटकरांच्या टीकेवरील तुमची प्रतिटीका चांगली आहे. तिजमधील त्यांच्या कुटुंबासंबंधाच्या अनुभवाचा उल्लेख वगळावा हे बरे... टीका आज परत पाठवून देत आहे" असें

कोल्हटकरांनी लिहिले आहे. रंगभूमींत लेल्यांचा जो टीकालेख आला त्यात सदर उल्लेख मुळीच नाही. म्हणून लेल्यांनी आपली टीका प्रसिद्धीपूर्वी कोल्हटकरांकडे धाडली हे उघड आहे.

'रंगभूमीं' त 'नाट्यकलारुक्कुठार —लीलावती नाटक' या नावाचा एक लेख याच सुमारास प्रसिद्ध झाला. या लेखात ठोसरांनी कोल्हटकरांच्या नाटकांवर घेतलेल्या आक्षेपांचें विस्तृत खंडन आहे.

पण लेल्यांचें एवढ्याने समाधान झाले नाही. १९११ नोव्हेंबरच्या 'रंगभूमी' मध्ये त्यांनी 'कवि व टिकाकार' नावाचा लेख लिहिला आणि कोल्हटकरांचें पुन्हा समर्थन केलें. पण गुरूचें ऋण फिटलें नाही असें वाटून त्यांनी जानेवारी ते मे १९११ या 'रंगभूमी' च्या सहा अंकांत शेक्स्पियरच्या 'मिड्समर नाइट्स ड्रीम' या मथळ्याची एक लेखमाला लिहिली. शेक्स्पियरच्या नाटकाचें केवळ निमित्त करून आणि जाणूनबुजून विषयांतर करून लेल्यांनी तीन पानें कोल्हटकरांच्या तरफदारीसाठी व स्तुतीसाठी खर्च केलीं आहेत. "रा. लेले यांचे काही विचार विषयाला सोडून आहेत असे आम्हांस वाटते" असा 'रंगभूमी' कारांनी शेरा मारला आहे.

'मिड्समर नाइट्स ड्रीम' या नाटकावरील टीकेच्या निमित्ताने लेले यांनी आपलें सारें सामर्थ्य पणाला लावून कोल्हटकरांवरील आक्षेपांचें खंडन करण्याचा प्रयत्न केला. पण याच्यापूर्वी तीन महिने 'इंदुप्रकाश' १८ ऑगस्ट १९११ च्या अंकांत नारायण के. देशपांडे यांचें एक इंग्रजी पत्र प्रसिद्ध झालें होतें. 'श्री लक्ष्मीप्रासादिक संगीत मंडळी' चे मालक दत्तोपंत हल्याळकर यांच्या वतीने हे पत्र लिहिलें होतें. सदर कंपनीच्या 'पुंडलीक' नाटकावर प्रतिकूल टीका प्रसिद्ध केल्याबद्दल पत्रलेखकाने 'इंदुप्रकाशा' च्या संपादकाला दम भरला होता. इतकेंच नव्हे तर फौजदारी व दिवाणी दावा लावण्याचीही धमकी दिली होती. या दमदाटीच्या पत्राचा संपादकांनी खरपूस समाचार घेतला आहे. आणि या निमित्ताने अनेक संगीत नाटकांवर कडक टीका केली आहे. ओघानेच 'प्रेमशोधन' नाटकावरही खरमरीत टीका या संपादकीय भाष्यांत आली आहे.

तात्पर्य, 'प्रेमशोधना' चा प्रयोग झाल्यापासून त्याच्यावर जे परीक्षणात्मक लेख आले ते बहुतेक प्रतिकूलच होते. अपवाद फक्त तीन. एक 'विमला', दुसरा Fairplay, आणि तिसरा पु. रा. लेले. मात्र या तिघांपैकी कोल्हटकरांची बाजू सांभाळण्याची खरी कामगिरी बजावली ती लेल्यांनीच!

### पत्र ५३

'प्रेमशोधना' ची पद्यावली छापण्याविषयीं लोकांचा फार आग्रह होता याचें कारण पदांची दुर्बोधता.

### पत्र ५६

गुर्जर हे कोल्हटकरांचे परम मित्र. पण त्यांचेंही 'प्रेमशोधना' च्या प्रयोगासंबंधीं फार वाईट मत झालें असें खुद्द कोल्हटकरच या पत्रांत म्हणत आहेत.

## पत्र ५७

प्रेमशोधनावर प्रतिकूल टीकाच सारखी वाचावी लागल्यामुळे मुंबईहून आलेल्या दोन अभिनंदनपर पत्रांवर कोल्हटकरांचा विश्वासच बसला नाही, आणि म्हणून तीं पत्रें मुजुमदारांच्या किंवा इतर स्नेह्यांच्या प्रेरणेने लिहिण्यांत आलीं असावींत असें त्यांना वाटलें असावें.

## पत्र ६२

'नाट्यकलारुक्कुठार' कर्त्या स. ना. ठोसरांनी अतिशय कुत्सित टीका करून कोल्हटकरांना दुखविलें असलें तरी कोल्हटकरांनी त्यांना आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें हें विशेष आहे. पुढे पुणें येथे ठोसरांनी कोल्हटकरांना फराळासाठी बोलाविलें आणि कोल्हटकरही 'संतोषाने' गेले. "असे असतां त्यांनी मधून मधून माझी वृत्तपत्रातून विनाकारण नालस्ती करण्याचा क्रम चालू ठेविला" अशी कोल्हटकरांनी तक्रार केली आहे. (आत्मवृत्त पृ. १००)

२३ सप्टेंबर १९३० च्या 'इंदू' च्या अंकांत ठोसरांच्या 'लीलावती' नाटकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने ठोसरांची स्तुती व कोल्हटकरांची निंदा करणारा इंग्रजी लेख प्रसिद्ध झाला होता. याचा उल्लेख मागे पत्र ४९ वरील टिप्पणींत येऊन गेला आहे "यांपैकी काही लेख तरी खुद्द ठोसरांच्या लेखणीतून उतरले होते असें मला काणेकर यांजकडून कळलें" असें कोल्हटकरांनी आत्मवृत्तांत (पृ. १००) म्हटलें आहे. (आत्मवृत्त, परिशिष्ट ६, पृ. १६७, वि. मा. दी. पटवर्धनांची आठवण या संदर्भांत वाचावी. तसेंच आत्मवृत्त पृ. १०१ वरील कोल्हटकरांचें स्वतःचें म्हणणेंही वाचावें.)

## पत्र ६६

राजहंसांबद्दल (बालगंधर्वांबद्दल) मुंबईंत वाईट कंड्या उठल्या आहेत, आणि त्यांच्या मुळाशीं सांजवर्तमान या वृत्तपत्रांतील बातमी आहे असें या पत्रांत म्हटलें आहे. याचीच पुनरुक्ती पत्र ६७ मध्ये आहे. सांजवर्तमानाची ऑगस्ट-सप्टेंबर १९११ ची फाईल उपलब्ध झाली तरच या बातमीचा उलगडा होईल. या बाबतींत प्रयत्न करूनही मला यश आलें नाही.

## पत्र ६७

किर्लोस्कर मंडळी व गुर्जर यांच्यामध्ये कां वितुष्ट आलें, तसेंच गुर्जरांचें खाडिलकरांशीं कोणतें आक्षेपार्ह वर्तन झालें यासंबंधी मला माहिती मिळाली नाही. पत्र ६८ मध्ये याच गोष्टीचा पुनरुच्चार आहे.

## पत्र ६८

गणपतराव भागवतांची आत्महत्या— महाराष्ट्र नाटक मंडळींतील प्रसिद्ध नट गणेश सदाशिव भागवत (कीचकवध नाटकांतील कीचक) यांनी नागपूर येथे ३-९-१९११ रोजीं विषप्राशन करून आत्महत्या केली. ६-९-१९११ रोजीं ही गोष्ट उघडकीस आली. तोंपर्यंत त्यांचे प्रेत बंद खोलींत तसेंच पडून राहिलें. (अधिक माहितीसाठी 'मराठी नाट्यसमीक्षा' या माझ्या ग्रंथाचीं २७०-१ हीं पृष्ठें पाहावीं.)

**पत्र ७३**

नानासाहेब (नारायण दत्तात्रेय) जोगळेकरांचा मृत्यु— १५ नोव्हेंबर १९११. जन्म ७ फेब्रुवारी १८७५. सन १९०० मध्ये किर्लोस्कर मंडळींत दाखल झाले. भाऊराव कोल्हटकरांच्या निधनानंतर जोगळेकर त्यांच्या भूमिका करूं लागले. संगीत मानापमानाचा पहिला प्रयोग १२ मार्च १९११ रोजीं झाला. या नाटकांतील जोगळेकरांची धैर्यधराची भूमिका फार गाजली. "जोगळेकरांनंतर आजपर्यंत २७ वर्षांत रंगभूमीवर अनेक धैर्यधर आले. परंतु खरा धैर्यधर म्हणजे एकटे एक जोगळेकरच होत" असें विधान गणपतराव बोडस यांनी केले आहे. ('माझी भूमिका', पहिली आवृत्ति, १९४०, पृ. ३९२) जोगळेकरांसारखा धैर्यधर झालाच नाही असे खुद्द बालगंधर्व १९४४ मध्ये मुंबईस झालेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवांत अध्यक्षस्थानावरून जाहीरपणाने म्हणाले.

हल्याळकरांच्या मंडळींतील चिंतुबोवा— चिंतोबा गंधी. प्रथम वाशिमकर संगीत नाटक मंडळींत होते. चिंतूबुवा दिवेकर (गुरव) किर्लोस्कर मंडळीत जाण्यापूर्वी (१८९३ पर्यंत) याच कंपनींत होते. चिंतोबा गंधी 'मोठा चिंतू' आणि चिंतूबुवा दिवेकर 'छोटा चिंतू' अशी दोघांची वाशिमकर मंडळींत नावें असत. पुढे चिंतोबा गंधी दत्तोपंत हल्याळकरांच्या 'महालक्ष्मी प्रासादिक मंडळीं' त गेले.

गोरे— कृष्णराव गोरे. किर्लोस्कर मंडळीत १८९२ मध्ये आले. प्रथम स्त्रीभूमिका करीत असत. कादंबरी (शापसंभ्रम), वसंतसेना, सरोजिनी (मूकनायक), सौदामिनी (गुप्तमंजूष) या स्त्रीभूमिका केल्यावर पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांच्या 'चंद्रहास' नाटकात त्यांनी थोरल्या चंद्रहासाचें काम केलें. पुढे किर्लोस्कर मंडळी सोडून ते जनूभाऊ निमकरांच्या 'स्वदेशहितचिंतक मंडळीं' त गेले. वरेरकरांच्या कुंजविहारी नाटकांतील त्यांची रमणाची भूमिका फार गाजली. वरेरकरांच्या 'संजीवनी' नाटकांत त्यांनी शुक्राचार्यांची भूमिका केली. स्वदेशहितचिंतक मंडळी बंद पडल्यावर १९१२ च्या अखेरीस ते पुन्हा किर्लोस्कर मंडळीत आले. 'विद्याहरण' नाटकातील त्यांची शुक्राचार्यांची भूमिकाही फार गाजली.

**पत्र ७६**

'रंगभूमीं' तील लेल्यांच्या कोणत्या लेखाचा हा संदर्भ आहे तें समजत नाही. 'कवि व टीकाकार' हा तर तो लेख नसेल ना?

**पत्र ७९**

गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाची पहिली जाहिरात ३० जानेवारी १९१२ च्या केसरीमध्ये प्रसिद्ध झाली. पहिला प्रयोग १७-२-१९१२.

**पत्र ८२**

ज्ञानप्रकाशांतील 'प्रेमसंन्यासा' वरील टीका—गुरुवार, ७ मार्च १९१२. 'प्रेषित' या नावाने सदर टीका प्रसिद्ध झाली. या टीकेचा उत्तरार्ध ज्ञानप्रकाशाच्या १० मार्च १९१२ च्या अंकांत आला.

नाट्यकलारुक्कुठारकर्त्यांची प्रेमसंन्यासावरील टीका ‘नाट्यकलारुक्कुठार, वळसा चवथा’ या शीर्षकाने बुधवार ता. १३ मार्च १९१२ च्या इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झाली.

रुक्कुठारकर्त्याच्या टिकेला उत्तर देणारें एक पत्र ‘एक मित्र’ या सहीने २ एप्रिल १९१२ च्या इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झालें.

**पत्र ८४**

टिपणीसांची कंपनी—भारत नाटक मंडळी. खाली पत्र ८९ पाहा.

**पत्र ८५**

‘रंगभूमीं’ त आलेलें गडकऱ्यांचें नाटक— ‘वेड्यांचा बाजार.’

**पत्र ८९**

‘मत्स्यगंधा’ हें ‘भारत नाटक मंडळीं’ चे पहिलें नाटक. पुणें किर्लोस्कर थिएटरमध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.

‘प्रेमसंन्यास’ नाटकाचा पहिला प्रयोग १७-२-१९१२ रोजी मुंबई येथे ग्रँट रोड बॉंबे थिएटरांत झाला. १७-३-१२ पर्यंत एका महिन्यांत या नाटकाचे दहा प्रयोग झाले. कंपनीला भरपूर पैसा मिळाला आणि भरपूर यश मिळालें. पण यानंतर थोड्याच दिवसांत महाराष्ट्र मंडळीला दृष्ट लागली. अनेक नावाजलेले नट या मंडळींत सुदैवाने एकत्र आले होते. ‘प्रेमसंन्यासां’ त लीलेची भूमिका घेणारे वामनराव पोतनीस, जयंत (अण्णासाहेब कारखानीस), विद्याधर (अप्पा टिपणीस), द्रुमन (माधवराव टिपणीस), कमलाकर (त्रिंबकराव प्रधान), सुशीला (केशवराव दाते) हे श्रेष्ठ नट असलेली महाराष्ट्र मंडळी फुटली आणि तिच्यांतून भारत नाटक मंडळी निघाली. २० जुलै १९१२ च्या ज्ञानप्रकाशांत या नवीन मंडळीच्या स्थापनेची घोषणा झाली. यशवंतराव (अप्पा) टिपणीस, त्र्यंबकराव प्रधान, आणि वामनराव पोतनीस हे महाराष्ट्र मंडळींतील विख्यात नट नवीन गद्य नाटक मंडळी सुरू करणार असा मजकूर या जाहीरातींत आहे. रविवार ता. ८ सप्टेंबर १९१२ रोजीं भारत नाटक मंडळीचा ‘मत्स्यगंधा’ हा मुहूर्ताचा खेळ पुणें किर्लोस्कर थिएटरमध्ये झाला.

अप्पा टिपणिसांबरोबर वामनराव पोतनीस, त्रिंबकराव प्रधान, चिंतामणराव कोल्हटकर, विष्णुपंत औंधकर, दत्तोपंत वैशंपायन, काका रानडे, श्रीधर कुलकर्णी, दप्तरदार हे निवडक नट महाराष्ट्र मंडळींतून बाहेर पडले अशी वरेरकरांची साक्ष आहे.

भारत नाटक मंडळीने तात्यासाहेब केळकर यांच्या ‘तोतयाचें बंड’ या नाटकाचा पहिला प्रयोग २६-१०-१९१२ रोजीं (म्हणजे मत्स्यगंधेच्या पहिल्या प्रयोगानंतर दीड महिन्याने) केला, आणि कोल्हटकरांच्या ‘वधूपरीक्षा’ या नाटकाचा पहिला प्रयोग २२ फेब्रुवारी १९१३ रोजीं केला.

## पत्र ९०

'मत्स्यगंधा' नाटकावरील ज्या टीकेचा कोल्हटकरांनी या पत्रांत उल्लेख केला आहे ती टीका ज्ञानप्रकाशाच्या २५ सप्टेंबर १९१२ च्या अंकांत आली आहे. लेखकाचें नाव के. एम्. के. असें दिलें आहे.

'दामिनी' नाटक हिराबाई पेडणेकर यांनी लिहिलें असून 'ललितकलादर्श नाटक मंडळी' या नाटकाचे प्रयोग करीत असे. कोल्हटकरांना लेखिकेविषयीं ममत्व असल्यामुळे त्यांनी ज्ञानप्रकाशांतील टीकेच्या लेखकाची आस्थेने चौकशी केली आहे. २२ ऑक्टोबर १९१२ च्या ज्ञानप्रकाशांत 'दामिनी' नाटकावर एक अनुकूल टीका आली आहे. कोल्हटकर म्हणतात ती टीका वेगळी आहे.

किर्लोस्कर मंडळींतील दुफळीच्या प्रकरणाची सुरवात १९१२ च्या ऑक्टोबरमध्येच झाली होती हें या पत्रावरून दिसतें.

## पत्र ९१

भारत नाटक मंडळी टिपणिसांचें 'राधामाधव' नाटक बसवीत आहे असा या पत्रांत (१७-१०-१२) उल्लेख आहे. सदर नाटकाचा प्रयोग शनिवार २८ फेब्रुवारी १९१४ रोजीं झाला. २-३-१९१४ च्या इंदुप्रकाशांत प्रयोगाचें परीक्षण आलें.

ज्ञानप्रकाशांतील मत्स्यगंधेवरील टीका– १३–१०–१९१२ (लेखक–माधव). 'मत्स्यगंधेचे धिंडवडे' हें या टीकालेखाचें शीर्षक आहे. 'एक प्रेक्षक' या नावाने ज्ञा. प्र. च्या २६-१०-१९१२ च्या अंकात टीका आली आहे. इंदुप्रकाशांतही तीन टीकालेख आले. (१९-९-१९१२, ४-१०-१२, १०-१०-१२)

या सर्व टीकांना नाटककार यशवंतराव टिपणीस यांनी १०-६-१९१३ रोजीं लिहिलेल्या पत्रांत उत्तर दिलें. सदर पत्र ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालें.

## पत्र ९२

नव्या नाटकाच्या संविधानकाविषयीं विचार– हें नवें नाटक गद्य 'वधूपरीक्षा' होय.

"केळकरांच्या नाटकाबद्दलचा मजकूर वाचून वाईट वाटले" हें नाटक 'तोतयाचें बंड' होय. सदर विधान नाटकाच्या प्रयोगाला उद्देशून नाही. कारण पहिला प्रयोग २६-१०-१९१२ रोजीं म्हणजे प्रस्तुत पत्र लिहिल्यानंतर पाच दिवसांनी झाला. रंगीत तालमीला उद्देशून हा मजकूर लिहिला असेल काय? रंगीत तालीम चांगली झाली नसेल. "अशा स्थितीत रा. टिपणीस यांनी झुंझारराव, हॅम्लेट इ. जुनी नाटके बसविण्यास घ्यावी हे बरे" या वाक्यावरून रंगीत तालमीविषयींचा संशय दुणावतो. 'तोतयाचें बंड' हें नाटक भारत नाटक मंडळीच्या आग्रहावरून तात्यासाहेब केळकरांनी घाईघाईने लिहिलें हें खरें असलें तरी २१-१०-१२ पर्यंत त्यांचे लेखन पूर्ण झालें असलें पाहिजे हें उघड आहे. कारण २६-१० रोजीं प्रयोग झाला. नाटक फार घाईने लिहिले याला ७-११-१२ च्या ज्ञानप्रकाशांत पुरावा आहे. "...रा. नरसोपंत यांनी मथळ्यावरील नावाचें एक ऐतिहासिक गद्य नाटक या नवीन 'भारत नाटक मंडळी' करिता घाईघाईने तयार

केले असून सांप्रत त्याचे प्रयोग पुण्याच्या रंगभूमीवर चालू आहेत” असें वाक्य ‘आत्रेय’ यांनी लिहिलेल्या परीक्षणात आहे.

वरील मजकूर लिहून झाल्यावर कोल्हटकरांना वाईट वाटण्याचें आणखी एक कारण सुचलें. नाटकाच्या प्रयोगासाठी लागणाऱ्या सरकारी परवानगीला तर विलंब झाला नसेल ना? या शंकेला १२-११-१२ च्या ज्ञानप्रकाशांत पुरावा आहे. “रा. रा. नरसोपंत केळकर यांनी नुकत्याच लिहिलेल्या ‘तोतयाचें बंड’ या नाटकाचे प्रयोगास सरकारची परवानगी मिळून त्या नाटकाचा पहिला प्रयोग गेल्या विजयादशमीस ‘श्री भारत नाटक मंडळी’ यांनी करून दाखविला.”

सरकारी परवानगी १६-१२-१२ पर्यंत मिळाली नव्हती असें वामनराव पोतनिसांच्या पत्रावरून दिसतें.

सरकारी परवानगी मिळण्यास काही अडचण आली असेल काय?

**पत्र ९६**

जयवंत — रामचंद्र भास्कर ऊर्फ भाऊसाहेब जयवंत, कोल्हटकरांचे स्नेही (आत्मवृत्त, पृ. ४०, ८२). या जयवंतांचा मुलगा नानाभाई याला वामनराव पोतनिसांची बहीण दिली होती अशी पु. रा. लेले यांनी माहिती दिली आहे.

‘केरळकोकिळ’ मासिकाच्या नोव्हेंबर-डिसेंबर १९१२ च्या अंकांत ‘तात्यांचा तोतया’ हा लेख आहे. या अंकाचा उल्लेख असावा.

**पत्र ९७**

अस्सल प्रत — ही अस्सल प्रत ‘वधूपरीक्षा’ नाटकाची आहे. याच अस्सल प्रतीवरून कोल्हटकर आणि पु. रा. लेले यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झालें. (आत्मवृत्त, पृ. ८३-८४ पाहा.)

**पत्र १००**

“नाटकाची प्रत महाराष्ट्र मंडळीकडून नक्कल होईपर्यंत तेथेच राहू द्यावी.” महाराष्ट्र मंडळीला अस्सल प्रत न देतां तिच्यावरून नक्कल करून घेण्याची स्पष्ट सूचना या पत्रात आहे.

**पत्र १०२**

वधूपरीक्षा नाटकाचा पहिला प्रयोग — २२ फेब्रुवारी १९१३ मुंबई, बॉम्बे थिएटर. १६-३-१३ पर्यंतच्या २२ दिवसांमध्ये सदर नाटकाचे एकूण सात प्रयोग झाले.

### पत्र १०५

वधूपरीक्षा नाटकाच्या अस्सल प्रतीवरून महाराष्ट्र मंडळीने आणि चित्ताकर्षक मंडळीने नक्कल करून घेण्याची सूचना या पत्रांत पुन्हा आहे. नकला होईपर्यंत अस्सल प्रत लेल्यांनी आपल्या जवळच ठेवावी अशीही सूचना आहे. कोल्हटकर—लेले वितुष्टाच्या प्रकरणांत या सूचनेचें महत्त्व फार आहे.

चित्ताकर्षक मंडळी-सांगलीच्या छापखाने वकिलांनी काढलेल्या 'सामाजिक मंडळीं' तून ही मंडळी १९१२ अखेर निघाली असें वि. ना. कोठीवाले म्हणतात. गोखले बंधू या मंडळीचे मालक होते. रघुनाथ गोखले या बंधूंपैकी एक. या मंडळीचा 'तोतयाचें बंड' या नाटकाचा प्रयोग फार चांगला होत असे. 'चंद्रगुप्त' हेंही नाटक सदर मंडळी करीत असे. कमलाबाई नावाची नटी या कंपनींत नायिकेची भूमिका करीत असे असें पु. रा. लेले म्हणतात. चित्ताकर्षक मंडळीने कोल्हटकरांच्या 'वधूपरीक्षा' नाटकाचा प्रयोग केल्याचें दिसत नाही.

### पत्र १०६

या पत्रांत 'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत कारखानिसांकडे पाठविण्याची लेल्यांना सूचना आहे. (पत्र १०० पाहा.) १७-१२-१९१२ पासून ५-४-१९१३ पर्यंत महाराष्ट्र नाटक मंडळीचा मुक्काम कोल्हापुरांत होता.

### पत्र १०७

'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत कारखानिसांकडे पाठविण्याचें कारण या पत्रांत कोल्हटकरांनी स्पष्ट केलें आहे.

### पत्र १०९

'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत गडकऱ्यांसाठी कारखानिसांकडे तातडीने पाठविण्याची लेल्यांना पुन्हा आग्रहाची सूचना.

### पत्र ११०

वरील सूचनेचा पुनरुच्चार.

### पत्र १११

'वधूपरीक्षा' नाटकाची अस्सल प्रत पु. रा. लेल्यांकडून कारखानिसांना १५-३-१९१३ रोजीं मिळाली. २४-२-१३ रोजीं पहिली सूचना. त्यानंतर १९ दिवसांनी प्रत कारखानिसांना मिळाली.

### पत्र ११४

आतापर्यंत कोल्हटकर लेल्यांना उद्देशून 'तुम्ही' म्हणत असत. या पत्रांत प्रथम 'आपण' असा बदल झाला आहे.

माधवराव टिपणीस हे अप्पा टिपणीसांचे धाकटे बंधू. त्यांनी आणि अप्पांनी भारत नाटक मंडळी सोडली आणि 'आर्यावर्त नाटक मंडळी' काढली. माधवराव टिपणीस 'प्रेमसंन्यास' नाटकांत द्रुमनची भूमिका करीत असत. 'भाऊबंदकीं' तील आनंदीबाई, 'कीचकवधां' तील सैरंध्री.

### पत्र ११५

या पत्रापासून मायनाही बदलला. आतापर्यंत 'आशीर्वाद विशेष' असा मायना होता. आता 'स. न. वि. वि.' हा औपचारिक मायना आला.

किर्लोस्कर मंडळीसंबंधीं वर्तमान म्हणजे या मंडळींतील दुफळीसंबंधीं वर्तमान 'विद्याहरण' नाटकाचा पहिला प्रयोग ३१ मे १९१३ रोजीं झाला. बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे या तिघांनी के. पी. पंडितांकडून शंकरराव मुजुमदारांना तोंडी खलिता पाठविला. लेखी नोटीस १९ जूनला दिली. १८ जुलै पर्यंत नोटिशीची मुदत होती. गंधर्व नाटक मंडळीची जाहीर घोषणा २२ जुलै १९१३ च्या 'केसरी' मध्ये आली. याच्या पूर्वी ५ जुलै रोजीं नवीन मंडळीची स्थापना झाली. २३ ऑगस्ट १९१३ रोजीं मुंबई एलफिन्स्टन थिएटरमध्ये प्रयोग सुरू व्हावयाचें ठरलें होतें. हा बेत ३ सप्टेंबर पर्यंत लांबणीवर पडला. या दिवशीं डॉ. सर भालचंद्र भाटवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली गंधर्व नाटक मंडळीचें उद्‌घाटन झालें. डॉ. त्रिलोकेकरांनी प्रास्ताविक भाषण केलें. मुहूर्ताचे नाटक 'मूकनायक.'

### पत्र ११६

या पत्रात 'स. न. वि. वि.' हाही मायना बदलला; आणि त्याच्या ऐवजीं 'सा. न. वि. वि.' हा अधिक औपचारिक मायना आला. 'आशीर्वाद विशेष' हा मायना बदलून 'स. न. वि. वि.' हा मायना आला ही गोष्ट लेल्यांना खटकली असली पाहिजे, आणि त्यांनी नाराजी व्यक्त केली असली पाहिजे हें या पत्रांतील कोल्हटकरांनी केलेल्या सारवासारवीवरून उघड आहे. कोल्हटकरांचें समर्थन अगदी दुबळें आहे.

गंधर्व मंडळींत किर्लोस्कर मंडळींतील कोणते नट गेले याची कोल्हटकरांना जिज्ञासा आहे. किर्लोस्कर मंडळींत राहिलेल्या नटांची यादी दिली म्हणजे झालें. काशिनाथ वासुदेव परचुरे, चिंतूबुवा दिवेकर, बाबू गाडे, दिनकर ढेरे, यशवंतराव आठवले, कृष्णाजी नारायण शिंदे, रामा बेडगकर, नारायण दडपे, नारायण लेले, विनायक बेहेरे हे प्रमुख नट नवीन मंडळींत गेले नाहीत. कृष्णराव गोरे मागाहून गंधर्व मंडळीत गेले.

### पत्र ११७

'भाऊबंदकी' च्या प्रयोगाचा हक्क महाराष्ट्र मंडळीकडे असतांही भारत नाटक मंडळीने या नाटकाचा प्रयोग केला.

## पत्र ११८

भारत नाटक मंडळीने 'भाऊबंदकी' चा प्रयोग जळगाव मुक्कामीं केल्यामुळे महाराष्ट्र नाटक मंडळीने धुळे कोर्टांत अप्पा टिपणिसांवर दावा लावला आणि त्यांच्या विरुद्ध मनाई हुकूम मिळविला असे वृत्त ३ ऑक्टोबर १९१३ च्या ज्ञानप्रकाशांत आलें होतें. या दाव्याचा निकाल आपसांत करून घेण्याचें उभय पक्षीं ठरलें आणि कुशाभाऊ कोतवाल (महाराष्ट्र मंडळीचे वकील) यांना पंच नेमलें. महाराष्ट्र मंडळीची सर्व मालमत्ता व 'भाऊबंदकी' सुद्धा सर्व नाटकाचे हक्क महाराष्ट्र मंडळीचे मालक कारखानीस यांच्या एकट्याकडेच आहेत; तथापी फक्त 'भाऊबंदकी' या एकाच नाटकाचे प्रयोग करण्याची परवानगी भारत नाटक मंडळीचे मालक टिपणीस यांस दिली आहे; प्रत्येक प्रयोगाबद्दल टिपणीसांनी कारखानीस यांस बारा रुपये द्यावेत; आठ दिवसांत ही रक्कम टिपणिसांनी न दिल्यास परवानगी रद्द होईल; दाव्यांच्या खर्चाबद्दल टिपणिसांनी कारखानीसांना शंभर रुपये द्यावेत.

आपसांत झालेल्या या निकालाचें वृत्त जळगाव येथील 'प्रबोधचंद्रिके' च्या १५ डिसेंबर १९१३ च्या अंकात आलें आहे.

कुशाभाऊ कोतवाल पंच होते असा स्पष्ट उल्लेख 'प्रबोधचंद्रिके' ने केला आहे. पण अकोल्याचे गुप्ते वकील यांस उभयतांनी पंच नेमिलें आहे असें कोल्हटकरांनी लिहिलें आहे. तें बरोबर नाही. 'इंदुप्रकाशा' च्या १८ डिसेंबर १९१३ च्या अंकांत कुशाभाऊ कोतवालांचाच स्पष्ट उल्लेख आहे. "या समजुतीचे सर्व श्रेय येथील सुप्रसिद्ध पुढारी रा. कुशाभाऊ कोतवाल वकील यांस आहे." १९ जानेवारी १९१४ च्या इंदुप्रकाशांत महाराष्ट्र मंडळीचे सेक्रेटरी दत्तोपंत देशपांडे यांनी लिहिलेल्या पत्रांत धुळे येथील वकील कोतवाल यांचाच सरपंच म्हणून उल्लेख आहे.

## पत्र १२०

महाराष्ट्र मंडळी आणि भारत मंडळी यांच्यामधील दाव्याचा समग्र निकाल वरच्या टीपेंत आला आहे.

'नाटक्याचे तारे' — लेखक काशिनाथ नारायण पटवर्धन. नट, नाटकें, नाटककार, नाटक कंपन्या, नाटक कंपन्यांचे मालक यांच्याविषयीं उपरोधपूर्ण लेखांचा संग्रह. या पत्रांतील "पुरुषांचे बंड' व 'नाटक्याचे तारे' या नाटकांस प्रस्तावना लिहाव्या लागल्यामुळे ..." इत्यादि वाक्यावरून 'नाटक्याचे तारे' हें नाटक आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण हें नाटक नाही.

'पुरुषांचें बंड' या गिरिजाबाई केळकरांच्या नाटकाचा प्रयोग १९१३ च्या सप्टेंबर मध्ये झाला. ४-१०-१९१३ च्या ज्ञानप्रकाशात चा नाटकाच्या प्रयोगाचें परीक्षण आलें आहे.

## पत्र १२८

'सायलस मार्नर' (Silas Marner) या कादंबरीची लेखिका जॉर्ज ईलियट. हें टोपण नाव आहे. लेखिकेचें खरे नाव मेरी ॲन एव्हन्स (१८१९-१८८०) 'ॲडम बीड' आणि 'मिल ऑन द फ्लॉस' ची लेखिका.

## पत्र १३७

'सहचारिणी' नाटकाचा पहिला प्रयोग १५ जून १९१८ रोजीं गंधर्व नाटक मंडळीने केला. नाटक प्रयोगाच्या दृष्टीने अपयशी ठरलें.

## पत्र १३८

किर्लोस्कर मंडळींतून फुटलेल्या नटांनी बलवंत संगीत मंडळी काढली. ५ फेब्रुवारी १९१८ च्या 'केसरींत' त या कंपनीची पहिली घोषणा. नावीन कंपनींत किर्लोस्कर मंडळीतून आलेले नट-दिनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर, कोल्हापुरे, दिनकर ढेरे. २९-३-१९१८ रोजीं बळवंत मंडळीचा मुहूर्ताचा खेळ 'शाकुंतल' सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या अध्यक्षतेने झाला. न्यू एलफिन्स्टन थिएटर, मुंबई.

'जन्मरहस्य' नाटकाचा पहिला प्रयोग ३०-११-१९१८ रोजीं बलवंत मंडळीने केला.

## पत्र १४३

शेट्ये—विश्वनाथ गोपाळ ऊर्फ आबा शेट्ये. यांच्या 'लोकशासन' या नाटकाचे प्रयोग टिपणिसांची 'आर्यावर्त नाटक मंडळी' करीत असे.

## पत्र १४५

१५-४-१९१९ पासून ७-५-१९२० पर्यंत जवळजवळ वर्षभर कोल्हटकरांचा लेल्यांशीं पत्रव्यवहार नव्हता.

## पत्र १४९

७-५-१९२० पासून १७-१-१९२१ पर्यंत कोल्हटकर-लेले पत्रव्यवहार पुन्हा थांबला.

गणपतराव बोडस यांनी ३० नोव्हेंबर १९१९ रोजीं गंधर्व मंडळी सोडली, आणि ते यशवंत संगीत मंडळीचे डायरेक्टर व जनरल मॅनेजर झाले. १३ जानेवारी १९२० रोजीं ते इंदूरला यशवंत संगीत मंडळींत दाखल झाले. १ मार्च १९२१ रोजीं ते गंधर्व मंडळींत परत आले.

## पत्र १५४

अप्पासाहेब टिपणीस—यशवंत नारायण टिपणीस (१८७६-१९४३). प्रसिद्ध नट माधवराव टिपणीस हे यांचे धाकटे बंधू. अण्णासाहेब कारखानीसांच्या मदतीने महाराष्ट्र नाटक मंडळी काढली आणि दोघे मंडळीचे मालक झाले. 'कांचनगडची मोहना' हें खाडिलकरांचे नाटक कंपनीने बसविलें. या नाटकांत अप्पा टिपणीस प्रतापराव, आणि माधवराव मोहना होत असत. याच्यापूर्वी १८९२ मध्ये महाडला उत्सवामध्ये केलेल्या नाटकांत अप्पांनी ऑथेल्लो (झुंझारराव) नाटकांत कमळजेची भूमिका केल्याची नोंद सापडते. १८९४ मध्ये 'त्राटिका' नाटकांत त्यांनी त्राटिकेचें काम केलें होतें.

'कीचकवधां' त ते धर्माची (कंकभटाची) भूमिका अप्रतिम करीत. 'भाऊबंदकीं' त राघोबा, 'प्रेमसंन्यासा' त विद्याधर, अशा भूमिका त्यांनी केल्या. त्यांनी स्वतः 'कमला', 'मत्स्यगंधा', 'राधामाधव' हीं नाटकें लिहिलीं व त्यांच्या स्वतःच्या भारत नाटक मंडळीने ती बसविलीं. पुढे भारत नाटक मंडळी मोडली व त्यांनी 'आर्यावर्त नाटक मंडळी' काढली. अप्पांनी लिहिलेलीं इतर नाटकें— कृतांतकृति, चंद्रग्रहण, शहाशिवाजी, राजरंजन, आशानिराशा. नाट्याच्या सर्व शाखांमध्ये त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. नट, नाटककार, स्टेज मॅनेजर, पात्रांचे कपडे बेतून स्वतः शिवणारे कारागीर, पडदे रंगविणारे पेंटर, रंगभूमीवर प्रकाशयोजना करणारे, तालीम मास्तर या सर्व दृष्टींनी ते गाजले. ग्रीज पेंट तयार करण्यात त्यांनीच गणपतराव भागवतांना मदत केली.

## परिशिष्ट १

टीपा छापून झाल्यानंतर कै. पु. रा. लेले यांचे कागदपत्र सहज चाळत बसलो असतां श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी लेल्यांना खामगावहून ८-८-१९११ रोजीं पाठविलेल्या पत्राची स्वतः लेल्यांनी केलेली नक्कल मला आढळली. सदर पत्राची मूळ अस्सल प्रत माडखोलकरांच्या आग्रहावरून लेल्यांनी त्यांच्याकडे पाठविली. अस्सल पत्र आज कोणाजवळ आहे ते माहीत नाही. सदर पत्र फार महत्त्वाचें असल्यामुळे येथे समग्र देत आहे.

पत्राच्या नकलेच्या वर लेल्यांनी पुढील मजकूर लिहिला आहे.

"नक्कल करण्याची तारीख १४-११-६२. श्री. कृ. को. च्या पत्राची नक्कल."

**मूळ पत्राची नक्कल** खामगांव ८-८-११

आशीर्वाद विशेष. तुमचीं सर्व पत्रें पावलीं. परंतु मजकडे Servants of India society चे रा. द्रविड वगैरे काही गृहस्थ व माझे चुलते रा. व. वामनराव कोल्हटकर हे येथें आले असल्यामुळें व निबंधाची प्रुफें तपासण्याचा बराच त्रास होत असल्यामुळें उत्तर धाडितां आले नाहीं याबद्दल राग नसावा.

मी प्रेमशोधनाच्या सर्व प्रती मुंबईच्या हिंद एजन्सीस विकल्या आहेत. किर्लोस्कर मंडळीकडे २६ व्या तारखेच्या आंत काही प्रती धाडण्याबद्दल लिहिलें आहे.

माझा गुडघा बरा आहे, तो पुन्हा उचल खाईल असें वाटत नाहीं.

वीरतनय आनंदपर्यवसायी केल्यामुळे नायकाच्या शीलास बाध येत नाही असें माझेंही प्रथमपासून मत आहे.

रा. गुर्जर येथे असतां मी त्यांना पेडणेकरांचा फोटो दिला होता; तो फोटो रा. गुर्जरांना पेडणेकरांकडूनच मिळाला असा रा. जोगळेकरांचा समज झाला आहे. पेडणेकरांचे मनात दामिनी नाटक मला अर्पण करावयाचें होतें. पण तें स्वीकारण्याचें मला पसंत वाटेना. म्हणून मी पेडणेकरांस असे लिहिलें कीं रा. जोगळेकरांस कटु वाटेल असें वर्तन तुमच्याकडून होऊं नये अशी माझी इच्छा आहे. यावरून जोगळेकरांचा असा समज झाला कीं नाटक मला अर्पण केल्यास त्यांस (म्हणजे जोगळेकरांना) वाईट वाटेल अशी माझी कल्पना पेडणेकरांनीच करून दिली होती. हे दोन गैरसमज घालविण्यासाठी मी रा. जोगळेकरांस एक पत्र पाठविलें होतें ही गोष्ट तुम्हांस कळली असेलच.

सहाव्या नाटकाचें काम पुढील वर्षापर्यंत हातीं घेतां येणार नाहीं. कळावें हे आशीर्वाद.

(सही) श्री. कृ. कोल्हटकर.

पत्राची नक्कल लिहून झाल्यावर लेल्यांनी पुढील मजकूर तिच्या खाली लिहिला आहे.

“हें अस्सल पत्र रा. माडखोलकरांच्या मागणीवरून त्यांचेकडे पाठविलें.”

सदर पत्र क्रमांक ६३ आणि ६४ यांच्यामध्ये वाचावें.

## परिशिष्ट २

## श्री. पुरुषोत्तम रामचंद्र लेले

श्री. पु. रा. लेले यांच्या निधनानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें व कर्तृत्वाचें विवेचन करणारे लेख अनेक वृत्तपत्रांत व मासिकांत आले. या लेखांपैकी नागपूरच्या 'तरुण भारत' मध्ये श्री. माडखोलकरांनी लिहिलेल्या आग्रलेखांतून, आणि Blitz या इंग्रजी साप्ताहिकांतील संपादकीय स्फुटामधून काही महत्त्वाचा भाग उद्धृत करीत आहे.

**श्री. ग. त्र्यं. माडखोलकरः**

"महाराष्ट्रामध्ये गेल्या पासष्ट वर्षांत जी अनेक माणसें बुद्धीचा विचक्षणपणा आणि वर्तनाचा विलक्षणपणा याबद्दल गाजून गेलीं, त्यांत श्री. लेले यांची गणना प्रामुख्याने करावी लागेल... आपल्या ('महाराष्ट्राचे दुसरे वेड') या दुसऱ्या ग्रंथांत त्यांनी म्हटल्याप्रमाणें खुद्द श्री. लेले यांनाही दोनच विषयांचे वेड होतें—एक नाटक आणि दुसरें राजकारण; व या दोन्ही वेडांनी सर्व हयातभर त्यांच्या आुयष्यात धुमाकूळ घातला. १९२० सप्टेंबरमध्ये त्यांनी त्या वेळीं नुकतीच सुरू केलेली वकिली सोडून देऊन म. गांधी यांनी प्रवर्तिलेल्या असहकारितेच्या आंदोलनात उडी घेतली. व स्वामी श्रद्धानंद यांनी दिल्ली येथे काढलेल्या 'लिबरेटर' या वृत्तपत्राचे ते जॉइंट एडिटर झाले. त्यांच्या आयुष्याला पत्रकार म्हणून जो अशा रीतीने प्रारंभ झाला, तोच त्यांचा नंतर मुख्य व्यवसाय ठरून, अगदी शेवटल्या घटकेपर्यंत काम करीत असतांनाच त्यांना मरण आले. मध्यंतरी १९२७ ते १९२९ सालापर्यंत स्वामीजींच्या शुक्लतीर्थ गुरुकुलात त्यांनी तत्त्वज्ञानाचे अध्यापक म्हणून काय काम केलें असेल, तेवढाच अपवाद! १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत मुंबई शहरांतील युद्धमंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी पाच महिन्यांची बंदिवासाची शिक्षा भोगली. तुरुंगांतून बाहेर पडल्यावर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी राजकारणात भाग घ्यावयाला सुरवात केली; व श्री. स. का. पाटील यांच्याशी त्यांचा मतभेद होईपर्यंत ते सरदार आणि श्री. पाटील या दोघांचेही उजवे हात समजले जात असत. याच धामधुमीत ते काही दिवस मुंबईच्या 'कॉनिकल' दैनिकाचेही कार्यकारी संपादक होते. व त्यांच्या प्रभावी लेखणीने सरदारांच्या राजकारणाला चांगलाच उठाव दिला..... काही काळ ते भुलाभाई देसाई यांचे विश्रब्ध राजकीय सहायक होते. सरदार पटेल, श्री. भुलाभाई देसाई आणि श्री. स. का. पाटील यांच्यासारख्या अगदी भिन्न वृत्तीच्या राजकीय नेत्यांचे श्री. लेले हे त्या अतिशय महत्त्वाच्या राजकीय संक्रमणकाळांत अंतरंगातील विश्वस्त सहकारी होते, ही गोष्ट श्री. लेले यांच्या उच्च दर्जाच्या राजनैतिक पांडित्याची आणि राजकारणी कर्तबगारीची निदर्शक म्हणावी लागेल. भारतीय संघराज्याच्या घटनेवरील त्यांचा उत्कृष्ट इंग्रजी प्रबंध हा त्यांच्या या राजनैतिक पांडित्याचा परिपाकच होय. कॉंग्रेसशी असलेला त्यांचा संबंध जसजसा विटत आणि तुटत गेला, तसतसे ते डाव्या गटाच्या राजकारणाकडे झुकत गेले. त्याचेंच पर्यवसान मुंबईच्या 'ब्लित्झ' या दणकेबाज साप्ताहिकाचे प्रमुख स्तंभलेखक म्हणून गेली वीस वर्षे 'दि इंडियन सीन' या मथळ्याखाली त्यांनी एकांडी शिलेदारी गाजविण्यांत झालें. श्री. लेले यांची जीभ आणि लेखणी यांत अधिक दंशक काय होतें हें सांगणें खरोखरी कठीण जाईल. 'ब्लित्झ' मधील या त्यांच्या साप्ताहिक राजकीय समालोचनांत त्यांच्या लेखणींतील विषार पुरेपूर उतरलेला असे. खरोखरी गेल्या चाळीस वर्षांत त्यांच्या इतकें जलाल आणि फर्डे इंग्रजी लिहिणारा बहाद्दर महाराष्ट्रांत दुसरा झाला नाहीं म्हटलें तरी चालेल."

“पण, मराठी वाचकांना लेले जे माहीत आणि मान्य आहेत, ते नाट्यवाङ्मयाचे मर्मज्ञ म्हणून. तथापि त्यांना नुसते मर्मज्ञ म्हणून भागणार नाही. मराठी रंगभूमीचा आणि नाट्यवाङ्मयाचा गेल्या सवाशे वर्षांचा इतिहास म्हणजे लेले! विशेषतः १९१० सालीं श्री. कोल्हटकर आणि श्री. खाडिलकर यांच्याशी घनिष्ठ संबंध आल्यावर तर गेल्या ५५ वर्षांत महाराष्ट्राच्या रंगभूमीवर जें काय घडलें, तें तें सगळें जणू तारीखवार त्यांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत अष्टौप्रहर उभे असे. या काळांतलें रंगभूमीवरील कोणतेंही महत्त्वाचें नाटक घ्या किंवा संस्मरणीय घटना घ्या,— तिच्याविषयीं ते मुळी तारीखवारच बोलावयाचे. त्यामुळे मराठी रंगभूमि आणि नाट्यवाङ्मय यांच्या इतिहासाचे जे ग्रंथ प्रो. दांडेकर, प्रो. बनहट्टी, डॉ. गोमकाळे प्रभृतींनी लिहिलेले आहेत, त्या ग्रंथांविषयीं ते अत्यंत तिरस्काराने बोलावयाचे, व त्या ग्रंथांतील चुकांची जंत्री घडाघड म्हणून दाखवावयाचे. याच कारणामुळे त्यांचा असा विचित्र ग्रह होऊन बसलेला होता कीं, मराठी साहित्यावर लेखन करणारे झाडून सारे मराठीचे प्रोफेसर हे बेजबाबदार, अनधिकारी, अबहुश्रुत आणि पढतमूर्ख आहेत! हा त्यांचा ग्रह बापजन्मीं सुद्धा कोणाला बदलता आला नसता. हा त्यांचा दृढमूल पूर्वग्रह जरी बाजूला ठेवला, तरी मराठी रंगभूमीवर ऐतिहासिक स्वरूपाचें लेखन करणाऱ्या ग्रंथकारांच्या लिखाणांतील ज्या चुकांच्या जंत्र्या त्यांनी मुंबईच्या साप्ताहिकांतून प्रसिद्ध केल्या, त्यासंबंधी खुलासा करण्याची सुद्धा हिंमत एकाही ग्रंथकाराने दाखवली नाही, ही गोष्ट तितकीच खरी!...

“... अशा प्रकारची मौलिक तारिखवार माहिती श्री. लेले यांच्या नियतकालिकांत विखुरलेल्या त्रुटित लेखांतून आणि नाट्यविषयक दोन्ही ग्रंथांतून भरपूर आलेली आहे; व तिचा उपयोग केल्याशिवाय मराठी रंगभूमि आणि नाटकें यांच्यावरील कोणत्याही ऐतिहासिक स्वरूपाच्या ग्रंथाला प्रामाण्य आणि पूर्तता येणार नाही.”

“प्रस्तुत लेखक गेलीं पाच वर्षे सारखा त्यांना म्हणत असे की, ‘आपण नाट्यविषयक माहितीचे महासागर आहात. तेव्हा जेवढे आपल्याला लिहिणे शक्य होईल, तेवढे लिहून काढा. त्याच्या प्रकाशनाची सोय मी करीन.” त्यावर श्री. लेले हसून म्हणावयाचे, ‘मी महासागर खरा, पण खारा आहे! त्यामुळे माझें कोणी काही छापणार नाही. तुम्ही छापतो म्हणता, तर मी लिहीन. पण कुणाच्या तरी चुका पाहिल्याशिवाय मला लिहावयाला मुळी चेवच येत नाही.”

“१९२२ सालीं कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांनी मुंबई येथे आपलें ‘शिवपावित्र्य’ नाटक आपल्या निवडक मित्रमंडळीला वाचून दाखविलें, त्यावेळीं प्रस्तुत लेखकाने श्री. मामासाहेब वरेरकर आणि श्री. पु. रा. लेले वा दोघांना प्रथम पाहिलें. नखशिखान्त बकशुभ्र खादीचा पोषाख पेहेरलेले आणि तात्यासाहेबांपुढे अत्यंत लीनतेने बसलेले जे लेले त्या दिवशीं त्याने पाहिले, तेच लेले त्याच पोषाखांत गेल्या मार्चपर्यंत तो सतत पहात आलेला होता. ते लेले आता पुन्हा दृष्टीस पडावयाचे नाहीत...”

(‘तरुण भारत’, ६-६-१९६५)

**BLITZ (June 5,1965)**

"A valued contributor, he died, like a true journalist, in harness. On Monday afternoon, as usual, he phoned BLITZ office to send a peon to collect his 'copy' for his feature '**The Indian Scene,**' he contributed with distinction for years, and when the news of his death was received, the peon was already at Mr. Lele's residence only to learn that he had passed away overnight.

A graduate of the Bombay University, aside from his political activities, which were many, Purushottam Ramchandra Lele was a multilingual scholar. He was an authority on such widely diverse subjects as the Marathi stage and Constitutional Law on which subject he contributed two volumes which though written years ago are still considered a classic.

He participated in the political struggle and did his stint of gaol terms. Refusing employment in any commercial firm where his talent would have brought him enough material rewards, he served the BPCC in various capacities rising upto the secretarial-position. He was known as a trusted right- hand man of S. K. Patil; then over differences of opinion, he resigned from the BPCC, and, for a few years, worked with Bhulabhai Desai more as a friendly advisor than as an employee. After Bhula- bhai's death Lele was left to fend for himself.

It gives us a bare insight into his character that he never sought to capitalize on his political sacri- fices throughout the years of stress and strain. He never approached anyone of his erstwhile political associates, now in high ministerial positions, for a job or any monetary help.

Yet he was a counsellor— a friend, philosopher and sure guide- to many of them and his morning hours were crowded with visitors seeking his guidance on various matters that agitated them. Many a time he was called upon to solve domestic disputes.

Despite his preoccupation with politics, Lele's was not a one-track mind. Old in years, he was young in heart. The range of his interests extended from the Vedas to Agatha Christie. In fact for a long time he toyed with the idea of starting an 'Agatha Christie club.'

He was an uncompromising fighter against fate. Lele never gave up the fight and throughout his over twenty years' association with BLITZ he never made one bad slip-up or defaulted in his 'copy'. Even from a sick-bay, he would dictate his weekly article.

The strongest feature of Lele's life was, in addition to a sterling and loyal character, his heart, which he was proud to assert, 'is in the right place— on the left.'....

Only a month before his death, he wrote a book on the Marathi drama. The show-world was his second love, but he was a poor showman. Never advertising himself, he was content to let his work advertise for him.

His life was unostentatious; death will release his greatness."